**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना सांगू इच्छितो की, आपण 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना माझ्याकडे दिली असून तसेच इतरही सन्माननीय सदस्यांनी त्या अनुषंगाने माझ्याकडे सूचना दिलेल्या आहेत. परंतु प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपल्याला 289 अन्वये सूचनांच्या संदर्भात बोलण्याची संधी मी देणार आहे. आता प्रश्नोत्तराला सुरुवात करण्यात येणार आहे.

**पृ.शी./मु.शी.**:तोंडी उत्तरे

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे उपमुख्य केंद्रीय मूल्यांकन अधिका-यांने एका विद्यार्थ्यांचे गुण वाढवून उत्तीर्ण केल्याबाबत**

**(१४) * १९३३ श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे उपमुख्य केंद्रीय मूल्यांकन अधिका-यांने एका विद्यार्थ्यांचे गुण वाढवून उत्तीर्ण केल्याची घटना दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास न□दर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने संबंधित अधिका-यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) याबाबत विद्यापीठाने चौकशी केली असून २०१४ च्या उन्हाळी परीक्षेतील बी.एड या अभ्यासक्रमाच्या Development of Education System या विषयाच्या पुर्नर्मुल्यांकनाच्या नंतर गुण वाढ करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली. सदर प्रकरण परीक्षेतील गैरप्रकार असल्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ३२ (६) (ए) अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर समितीने विद्यापीठास सादर केलेल्या शिफ□रशी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. या संदर्भात परीक्षा मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 14.....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, विद्यापीठामार्फत सामाजिक उपक्रम राबवितांना त्यामध्ये विद्यार्थी सहभागी होत असतात. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी रूजावी यासाठी हे उपक्रम राबविले जात असतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या सहभागाबद्दल गुण दिले जात असतात. विद्यार्थी सामाजिक उपक्रमाकडे काही वेळ देत असतो. मला आश्चर्य वाटते की, काही विद्यार्थी संघटनांनी यासंदर्भात तक्रार केल्यानंतर, अशा प्रकारची अनेक प्रकरणे दाखविल्यानंतरही यासंदर्भात दखल घेतले गेली नाही. माननीय शिक्षण मंत्री हे स्वत: विद्यार्थी नेते म्हणून राजकीय, सामाजिक क्षेत्रातून पुढे आलेले आहेत. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांकडून आम्हाला पॉझिटीव्ह उत्तराची अपेक्षा होती परंतु प्रत्येक प्रश्नाला "नाही" "नाही" असे नोकरशहा प्रमाणे उत्तर दिले गेले आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या प्रश्नाच्या बाबतीत ज्या विद्यार्थी संघटनांनी तक्रारी केलेल्या आहेत किंवा शंका निर्माण झाल्यामुळे एक भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाची काय भूमिका राहणार आहे, तसेच ज्या विद्यार्थ्यांना मार्क्स मिळाले नाहीत त्यासंदर्भात संबंधितांवर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. रवींद्र वायकर : सभापती महोदय, एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना 10 गुण मिळत नाही याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्य म्हणतात तशी वस्तुस्थिती नाही. एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना 10 गुण दिले जातात. मुंबई विद्यापीठाचा अध्यादेश क्रमांक 229 नुसार क्रेडीट ग्रेडींग सिस्टीम सुरु करण्यात आली असून एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना एक क्रेडीट पॉईंट दिला जातो. एक क्रेडीट पॉईंट म्हणजे 10 मार्क्स दिले जातात. क्रेडीट सिस्टीममध्ये ग्रेड देण्यात आले असून ते दिसून येत नाहीत. परंतु विद्यार्थी 5 गुणासाठी नापास झाला असेल तर अशा विद्यार्थ्याला अधिकचे पाच गूण देऊन पास केले जाते किंवा 10 गुण देऊन पास केले जाते. परंतु क्रेडीट ग्रेडींग सिस्टीम ही सिम्बॉलीक असल्यामुळे गुण दिसून येत नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, महाविद्यालय आणि विद्यापीठामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य एनएसएस आणि एनसीसीच्या माध्यमातून घडत असते. मी प्राध्यापक असताना राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रकल्प अधिकारी होतो तसेच नागपूर विद्यापीठात माझे उत्कृष्ट युनीट सुध्दा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 14.....

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

होते. एनसीसीमध्ये मी लेफ्टनंट म्हणून काम केलेले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून जे विद्यार्थी घडत आहेत त्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करुन आपण मुंबई विद्यापीठात क्रेडीट सिस्टीम लागू केली आहे. परंतु नागपूर किंवा इतर विद्यापीठामध्ये एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना गुण दिले जातात. त्यामुळे शासनाने सरसकट सर्व विद्यार्थ्यांना एनएसएस किंवा एनसीसीच्या विद्यार्थ्यांना 10 गुण देण्यासाठी शासन पुढाकार घेणार आहे काय ?

श्री. रवींद्र वायकर : सभापती महोदय, एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना 10 गुण दिले जातात.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, इतर विद्यार्थी रविवारी आराम करतात तेव्हा एनसीसीचे विद्यार्थी दुपारी 2-3 वाजेपर्यंत डिसीप्लीनसाठी घाम गाळत असतात. एनएसएसचे विद्यार्थी 2-3 महिने समाजकारणासाठी दुसऱ्या ठिकाणी जात असतात. एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना आतापर्यंत 10 गुण दिले जात होते. विद्यार्थी नापास झाला म्हणून त्याला हे गुण दिले पाहिजे असे नाही तर या विद्यार्थ्यांना ग्रेडेशनमध्ये न ठेवता विद्यार्थ्याला 90 टक्के मार्क्स मिळाले असले तरी त्याच्या हक्काचे 10 गुण या विद्यार्थ्यांना मिळालेच पाहिजे. त्यामुळे एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना सरसकट 10 गुण दिले जाणार आहे काय ?

श्री. रवींद्र वायकर : एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना अशाच प्रकारे 10 गुण दिले जातात.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबई विद्यापीठ आणि अन्य विद्यापीठामध्ये क्रेडीट सिस्टीम सुरु झाल्यापासून घोळ सुरु झाले आहेत. या सिस्टीमला प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा विरोध आहे. ज्यावेळी इतर विद्यार्थ्यांचा केवळ अभ्यासावर फोकस असतो तेव्हा एनएसएस आणि एनसीसीचे विद्यार्थी सामाजिक आणि परेडच्या कामात दंग असतात. त्यामुळे एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयासाठी 10 मार्क्स बोनस म्हणून दिले पाहिजेत. त्यामुळे एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाला 10 मार्क्स दिले जाणार आहे काय ? परदेशातील क्रेडीट सिस्टीम वेगळी असून सायन्सच्या विद्यार्थ्याला इकॉनॉमिक्स घ्यावयाचे असेल तर त्या ठिकाणी क्रेडीटचा विषय घेता येतो. परंतु आपल्या विद्यार्थ्यांना तुम्ही दर सहा महिन्यांनी

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 14.....

श्री. कपिल पाटील......

परीक्षेमध्ये गुंतवून टाकल्यामुळे आपली मुलं विद्यार्थी बनण्यापेक्षा परीक्षार्थी बनले आहेत. त्यामुळे मुंबई आणि अन्य विद्यापीठामध्ये परीक्षेला जुंपण्याची नवीन पध्दत सुरु झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या इतर ॲक्टीव्हीटीज बंद झाल्या आहेत. मुख्यमंत्री महोदय, निवडणुका घेऊन उपक्रम घेऊ पाहत आहेत. परंतु अशा कोणत्याही उपक्रमात विद्यार्थी भाग घेऊ शकत नाहीत इतकी वाईट अवस्था विद्यार्थ्यांची झालेली आहे. त्यामुळे या सर्व परीक्षा व्यवस्थेबाबत पुनर्विचार करणार आहात काय, तसेच विषय निहाय 10 मार्कांचा बोनस दिला जाणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विद्यापीठ आणि विद्यापीठाचे फंक्शनिंग हे स्वायत्त आहे. विद्यापीठातील अशा गोष्टींचा निर्णय ॲकॅडमिक एक्सपर्टने घेतला पाहिजे असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय चांगली असल्यामुळे ही सूचना संबंधित विद्यापीठाच्या ॲकॅडमिक कौन्सीलकडे निश्चितपणे पोहचवली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. हेमंत टकले :सभापती महोदय,एनएसएस आणि एनसीसी हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अतिशय महत्वाचे घटक आहेत. आपल्या राज्यात एनएसएस आणि एनसीसीचे विषय ऐच्छिक असल्यामुळे यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी विद्यापीठामार्फत काढली जाते काय, यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे की, त्यात घट होत चालली आहे ? एनसीसीसाठी संरक्षण खात्यातील लोक येत असतात. एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये जोड म्हणून उपयोग होत असतो. त्यामुळे एनएसएस आणि एनसीसी अधिक प्रभावी होण्यासाठी हा विषय ग्रेस मार्क्सपुरता न राहता याची उपयुक्तता खऱ्या अर्थाने वाढण्यासाठी आपल्या खात्यामार्फत विचार केला जाणार आहे काय ?

श्री. रवींद्र वायकर : सभापती महोदय, आमच्या विभागाकडून एनएसएस आणि एनसीसीच्या संदर्भात नक्कीच विचार केला जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाची उत्तरे त्रोटक देण्यात आली आहेत परंतु या विषयावर चर्चा मात्र फार चांगल्या प्रकारे सुरु आहे. प्रश्नाला न्याय मिळावा एवढाच आमचा उद्देश असतो.या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी चांगल्या प्रकारे उत्तरे दिलेली असल्यामुळे मी त्यांचे

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 14.....

श्री.भाई जगताप.......

अभिनंदन करतो. मंत्री महोदय, श्री. विनोद तावडे विद्यार्थी संघटनेचे नेते म्हणून काम केलेले आहे तसेच मी सुध्दा विद्यार्थी संघटनेचा नेता म्हणून काम केलेले आहे एनसीसीमध्ये मी स्वत: काम केले असल्यामुळे एनसीसी आणि एनएसएसच्या संदर्भात विद्यार्थी संघटनेने तसेच प्रोफेसरांनी ज्या सूचना दिलेल्या आहेत,

यानंतर श्री. अजित .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14...

श्री.भाई जगताप...

त्यामध्ये हस्तक्षेप करा असे मी म्हणणार नाही कारण विद्यापीठ ही ऑटोनॉमस बॉडी आहे. आपण शासन म्हणून पुढाकार घेऊन सर्व विद्यार्थी संघटनेच्या प्रमुखांचे म्हणणे ऐकून घेणार आहात काय, तसेच ॲकेडमिकच्या दृष्टीने जे बदल करणे आवश्यक आहे ते बदल करणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. शैक्षणिक विषयामध्ये सरकारचा हस्तक्षेप होणे बरोबर आहे. परंतु एनसीसी आणि एनएसएस हा शैक्षणिक मुद्दा नाही. विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांना विचारात न घेण्याची परंपरा राज्यकर्त्यांमध्ये आहे, ती परंपरा आम्ही मोडत आहोत. राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना संदर्भात विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींसोबत चर्चा करुन ज्या काही सूचना असतील त्या विचारात घेऊन त्याबाबत अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय,मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले आहे. देशाला चांगले तरुण उपलब्ध व्हावेत, संरक्षण दलासाठी आणि समाजसेवेसाठी चांगले तरुण उपलब्ध व्हावेत यासाठी एनसीसी आणि एनएसएसची निर्मिती करण्यात आली. तेव्हा विद्यापीठ ही ऑटोनॉमस बॉडी आहे असे सांगून सरकार आपली जबाबदारी टाळू शकत नाही. सरकारने विद्यापीठाच्या कारभारामध्ये हस्तक्षेप करु नये, परंतु सरकारला विद्यापीठ कायद्यामध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना आपल्याच भावना आहेत असे समजून सरकार विद्यापीठ कायद्यामध्ये बदल करणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न स्वतंत्र आणि वेगळा आहे. शैक्षणिक गोष्टींमध्ये राजकीय व्यक्तींनी हस्तक्षेप करु नये असे माझे स्पष्ट मत आहे. जेव्हा जेव्हा राजाबाई टॉवर मंत्रालयासमोर वाकला तेव्हा तेव्हा शिक्षणाचे नुकसान झालेले आहे असे मानणारा मी आहे. शिक्षण हे स्वायत्त असले पाहिजे. तेव्हा आपण ॲकेडॅमिक विषयामध्ये लक्ष घालू नये, आपण त्याबाबत सूचना कराव्यात. कारण आपल्याला समाजातील गोष्टींचा फीडबॅक असतो.आपणास चार गोष्टी नव्याने समजत असतात. आपण उपस्थित केलेल्या बाबी ॲकेडॅमिक

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14...

श्री.विनोद तावडे...

कौन्सिलपुढे निश्चितपणे मांडल्या जातील. एनसीसी आणि एनएसएस यामध्ये काही प्रशासकीय बाबी आहेत. आपण या ठिकाणी ज्या सूचना केल्या त्याबाबत निश्चित विचार करण्यात येईल. मागील सरकारच्या काळात विद्यापीठ कायदा तयार झालेला आहे. तो कायदा सभागृहात चर्चेला येण्याच्या मार्गावर आहे, त्या कायद्यामध्ये प्राध्यापक आणि विद्यार्थी संघटनेने काही बदल सुचविलेले आहेत. त्या सर्व बदलांसह विद्यापीठ कायदा पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात किंवा पावसाळी अधिवेशनात आणण्याचा जरूर प्रयत्न करण्यात येईल.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तंत्रशिक्षण विभागातील पूर्णवेळ शिक्षकांनी पदोन्नती नाकारल्याने वेतनश्रेणी कमी केल्याबाबत**

**(२) * ८३६ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो पुंडलिक गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रशिक्षण विभागाच्या पूर्णवेळ शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना केव्हापासून लागू करण्यात आली आहे,

(२) तंत्रशिक्षण विभागाच्या शिक्षकेतरांनासुद्धा सदरची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सन २००६ पासून लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(३) पदोन्नती नाकारलेल्या शिक्षकेतरांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत उच्च वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नाही हे खरे आहे काय,

(४) पूर्णवेळ शिक्षकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू नसल्यास, पदोन्नती नाकारल्यास त्यांची वेतनश्रेणी कमी करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.रवींद्र वायकर, श्री. विनोद तावडे यांच्याकरिता** : (१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील तंत्र माध्यमिक शाळेतील पूर्णवेळ शिक्षकांना आश्वासित प्रगतियोजना लागू नसून, दिनांक १६-१०-१९९२ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू केली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) पूर्णवेळ शिक्षकांना व्दिस्तरीय, त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू आहे. वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर केलेला पूर्णवेळ शिक्षकांनी जर प्रत्यक्ष नियमित पदोन्नती नाकारली तर, वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ काढून घेणे अनिर्वाय ठरते, तथापि, गट-क (तांत्रिक) या संवर्गातून गट-ब (राजपत्रित) संवर्गात पदोन्नती मिळालेल्या पूर्णवेळ शिक्षकांच्या वसुलीबाबतच्या दिनांक २६-९-२००८ च्या पत्रास शासनाच्या दिनांक ९-४-२०११ च्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मागील तीन वर्षापासून मी हा विषय येथे मांडत आहे. तत्कालीन मंत्री महोदयांसमवेत माझ्या तीन वेळा बैठका झाल्या. त्यांनी अधिकाऱ्यांना आदेश दिले, परंतु त्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. ज्या अधिकाऱ्यांनी शिक्षकांची वेतनश्रेणी कमी करुन त्यांना खालच्या वेतनश्रेणीवर आणले, त्यांच्या वेतनात कपात केली, त्या अधिकाऱ्यांवर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.836...

श्री.रामनाथ मोते....

शासन कोणती कारवाई करणार आहे ?मंत्री महोदयांनी आदेश देऊनही श्री.भुतांगे आणि श्री.आसावा या अधिकाऱ्यांनी त्याची अंमलजबजावणी केलेली नाही, तेव्हा या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ? शिक्षकांनी पदोन्नती नाकारली तर त्यांची वेतनश्रेणी कमी करण्याची कोणतीही तरतूद कायद्यामध्ये नाही. ही तरतूद फक्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू आहे आणि शासनाने उत्तरामध्ये तसे मान्य केलेले आहे. वेतनश्रेणी कमी करण्याचा आदेश शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी काढण्यात आला होता. पण अधिकाऱ्यांनी तो आदेश शिक्षकांना देखील लागू केला म्हणून हा सर्व घोळ झालेला आहे. शिक्षकांना पदोन्नती घेण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आहे. अशी पदोन्नती नाकारणाऱ्या शिक्षकांची वेतनश्रेणी कमी करण्यात आली, त्यांच्या पगारातून वसुली करण्यात आली. आता ती वसुली थांबविण्यात आल्याचे शासनाने उत्तरात म्हटले आहे. परंतु शिक्षकांकडून वसूल केलेली रक्कम त्यांना परत केलेली नाही. आता त्या शिक्षकांच्या पगारामध्ये 15 ते 16 हजार रुपयांचा फरक पडलेला आहे. माझा प्रश्न आहे की, ज्या शिक्षकांनी पदोन्नती नाकारली त्यांची वेतनश्रेणी कमी करण्या संदर्भातील आदेश तातडीने रद्द करण्यात येतील काय, ज्या शिक्षकांची पगारातून वसुली करण्यात आली त्यांची रक्कम त्यांना परत मिळेल काय, या संदर्भातील निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे सातत्याने हा विषय सभागृहात मांडत आहेत. ज्यावेळी अशी पदोन्नती होते आणि त्या पदोन्नतीचा स्वीकार केला नाही तर प्राचार्य पदाच्या जागा रिक्त राहतात त्यामुळे अधिकाऱ्यांची अडचण होते. पदोन्नती झ ाल्यानंतर वेतनामध्ये काही फरक पडत नाही व जबाबदारीमध्ये वाढ होते म्हणून पदोन्नती नाकारण्याची प्रवृत्ती मनुष्य स्वभाव म्हणून असते. परंतु आयटीआय प्राचार्याशिवाय नसेल तर विद्यार्थ्यांचे नुकसान होते. ज्यांनी पदोन्नती नाकारली असेल तर त्यांचे पगार कापण्यात यावेत असे काही करावे लागते. मला वाटते यातून काही व्यवहारिक मार्ग काढला पाहिजे. मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना आदेश देऊन सुद्धा त्याची अमलबजावणी करण्यात आली नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण अनेकवेळा त्या त्या वेळच्या

..5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.836...

श्री.विनोद तावडे...

गरजेनुसार आदेश देतो आणि त्याची अंमलबजावणी नियमामध्ये बसून करावी लागते.त्यामुळे यामध्ये दिरंगाई झाली असेल याची चौकशी करण्यात येईल. वेतन कपातीला स्थगिती दिली असेल तर अगोदर जी रक्कम कापली असेल ती देणे क्रमप्राप्त ठरते. तेव्हा याबाबतीत तपासून ती रक्कम देण्याचा आम्ही प्रयत्न करु

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, या विषयाबाबत शासनाने आदेश दिले असताना त्या आदेशाची अंमलबजावणी न करणारे अधिकारी सर्वश्री भुतांगे आणि आसावा यांना आज दिवसभरासाठी तत्काळ निलंबित करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी आदेशाचे पालन होत नाही त्यामध्ये सिस्टीमच्या काही अडचणी असतील तर अधिकाऱ्यांवर कारवाई करणे योग्य नाही. परंतु सिस्टीमच्या अडचणी नसताना जर अधिकाऱ्यांनी राजकीय नेतृत्वाने दिलेले आदेश पाळले नाहीत तर त्यांच्यावर कारवाई होणे स्वाभाविक आहे. तेव्हा याबाबतीत तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, दोन क्रमांच्या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिलेले आहे. पूर्णवेळ निदेशकांचे पदनाम बदलून ते पूर्णवेळ शिक्षक असे करण्यात येईल काय ? राष्ट्रीय स्तराच्या शैक्षणिक धोरणानुसार एकच संवर्ग ठेवण्यात यावा व गेल्या पाच वर्षापासून रिक्त असलेल्या पूर्णवेळ शिक्षकाच्या पदावर त्यांची तातडीने नियुक्ती करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे हे अतिशय गतिमान असल्यामुळे त्यांनी थेट तिसऱ्या क्रमांकावरील प्रश्न विचारलेला आहे. आपण दुसऱ्या क्रमांकावरील प्रश्नावर चर्चा करीत आहोत. तो प्रश्न चर्चेला आल्यानंतर त्याचे उत्तर देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, शिक्षकांनी पदोन्नती नाकारल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होते. मंत्री महोदय या ठिकाणी शासन म्हणून बोलत आहेत. माझा प्रश्न आहे की, जे शिक्षक पदोन्नती नाकारतील त्यांची पाच वर्षे वेतनवाढ थांबविण्यात येईल काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.836....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अशाच मानसिकतेतून अधिकारी मंडळी काही नवीन नियम आणतात. परंतु या बाबतीत टोकाची भूमिका घेऊन चालत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्यासारख्यांनी अशा प्रकारची भूमिका घेणे ठीक आहे, कारण आपल्याला ते झ ोपते. परंतु ज्यांना शिक्षक आमदारांना फेस करावे लागते, त्यांच्या तोंडाला फेस येतो. आम्हाला या कामी शिक्षक आणि आमदार महोदय मदत करतील. एखाद्या पदाची केवळ जबाबदारी वाढते म्हणून ती जबाबदारी नाकारण्याची भूमिका शिक्षकांमध्ये वाढत असेल तर त्या बाबतीत त्यांना समजावून सांगावे लागेल. परंतु या विषयी टोकाचा निर्णय घेता येणार नाही. ज्या पदावर शिक्षक काम करण्यास तयार नाहीत त्या पदांसाठी वेगळे इन्सेंटीव्हज् देता येतील काय, जेणेकरुन त्या पदाला प्रतिष्ठा मिळू शकते, या बाबत नक्की विचार करण्यात येईल. अशा पदांवर जाण्याची शिक्षकांना ओढ लागेल असा प्रयत्न करण्यात येईल.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(३) * १०७९ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी शासनाने उच्च शिक्षण महाविद्यालयांमध्ये आर्थिक आधारावर फी सवलतीचे धोरण राबविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या फी सवलतीद्वारे खाजगी शिक्षण संस्थांच्या महाविद्यालयांना फी परतावा देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या तिजोरीवर भरमसाठ आर्थिक बोजा पडून कोट्यवधी रुपये खाजगी शिक्षण संस्थांना देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी फेरविचार करुन प्रत्येक जिल्ह्यात एक शासकीय इंजिनिअरींग महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.रवींद्र वायकर**, **श्री. विनोद तावडे यांच्याकरिता :** (१) होय,
(२) होय.
(३) मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच सामाजिक मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा, शासनाची कल्याणकारी योजना म्हणून लाभ देण्यात येतो. त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात येते.
(४) व (५) राज्यात अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त राहत असल्याने प्रत्येक जिल्ह्यात एक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याची आवश्यकता नाही.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा हा प्रश्न आहे. गरीब विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे शिक्षण घेता यावे एवढाच उद्देश हा प्रश्न विचारण्यामागील आहे. कारण खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये देय असलेले शुल्क गरीब विद्यार्थ्यांना परवडत नाही. शैक्षणिक शुल्क हा परतावा असतो. परंतु खाजगी महाविद्यालयांकडून सुरुवातीला नव्हे तर शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर शुल्काचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 11:20

ता.प्र.क्र.1079....

श्री.नागो पुंडलिक गाणार....

परतावा दिला जातो. किंबहुना, खाजगी महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना परतावा अदा करण्यात त्रास दिला जातो. वास्तविक पाहता यापोटी येणारा आर्थिक भुर्दंड शासन सोसते. परंतु खाजगी महाविद्यालयाकडून या शुल्कामध्ये भ्रष्टाचार केला जातो. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, गरीब विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षण घेता यावे म्हणून प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय शासन घेईल काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्याच्या 36 जिल्ह्यांपैकी 10 जिल्ह्यांमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. 10 जिल्ह्यांतील अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता 1 लाख 56 हजार 67 असून, प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या 88,883 आहेत. याचाच अर्थ त्या महाविद्यालयामध्ये 67,184 जागा रिक्त असतात. म्हणजेच एकूण जागेच्या 43 टक्के जागा रिक्त असतात. एका अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी 73 कोटी रुपये खर्च येतो. अशा पध्दतीने अजून 26 जिल्ह्यांमध्ये महाविद्यालय बांधण्यासाठी 1898 कोटी रुपये खर्च येणे अपेक्षित आहे. हा भार जास्त होईल. सध्याच्या प्रवेश क्षमतेच्या तुलनेत रिक्त जागांची संख्या 43 टक्के असल्यामुळे बाकीच्या ठिकाणी मागणी असेल तर याबाबत विचार करुन त्यावर निर्णय घेण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना असे सांगितले की, राज्याच्या 36 जिल्ह्यांपैकी 10 जिल्ह्यांत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. शिवाय त्यांनी असेही सांगितले की, त्या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता 1 लाखाच्या वर आहे. मी त्यांच्या माहितीसाठी सांगतो की, आपण जे सांगत आहात ती शासकीय महाविद्यालये नसून खाजगी महाविद्यालये आहेत. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, प्रत्येक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेश क्षमता किती आहे आणि त्यापैकी किती जागा रिक्त आहेत ?

श्री.रवींद्र वायकर : महोदय, प्रत्येक महाविद्यालयाची प्रवेश क्षमता किती आहे आणि किती जागा रिक्त आहेत या बाबतची माहिती घेऊन ती देण्यात येईल. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1079....

श्री.विनोद तावडे : महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील जागा रिक्त नसतात हे वास्तव आहे.

श्री.सुनील तटकरे : महोदय, परंतु माननीय राज्यमंत्र्यांनी नुकतेच सांगितले की, सदरहू अभियांत्रिकी महाविद्यालयात 60 हजार पेक्षा जास्त जागा रिक्त आहेत.

श्री.विनोद तावडे : महोदय, राज्यात अनुदानित, विना अनुदानित, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये एकूण किती प्रवेश क्षमता आहे आणि त्यापैकी किती जागा रिक्त आहेत या बाबतचे उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी दिले आहे. सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी असा प्रश्न विचारला होतो की, खाजगी विना अनुदानित महाविद्यालयातील विशिष्ट प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शुल्काचा परतावा देण्याइतका पैसा शासनाकडे असेल तर त्याच पैशातून सर्व जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु केल्यास ते उपयोगी होईल. सध्या शासनासमोर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचा जो बृहत आराखडा आहे त्यानुसार लगेच कुठेही महाविद्यालय सुरु करण्याचे शासनाचे आज तरी धोरण नाही. उपलब्ध असलेल्या फॅकल्टीज, प्राध्यापक वर्ग आणि काळाची गरज लक्षात घेऊन कोणते कोर्सेस इंट्रोड्युस करणे गरजेचे आहे, या बाबतचा बृहत आराखडा तयार करुन तसेच आर्थिक क्षमता लक्षात घेऊन पुढील काळात याबाबत नक्की योजना बनविण्यात येईल.

श्री.राजेंद्र मुळक : आताच माननीय मंत्र्यांनी या संदर्भात बृहत आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे सांगितले. माझ्या माहितीनुसार सन 2011-12 या वर्षामध्ये राज्याचा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्याबाबतचा आराखडा तयार होता. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या ठिकाणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये नसतील त्या ठिकाणी अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्यात येतील काय ? या प्रश्नाच्या क्रमांक-3 च्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, ".......मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा, शासनाची कल्याणकारी योजना म्हणून लाभ देण्यात येतो." माझ्या माहितीनुसार चालू शैक्षणिक वर्षामध्ये ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची प्रतिपूर्ती अजूनपर्यंत केलेली नाही. हे शैक्षणिक वर्ष लवकरच संपणार असून, तीन महिन्यानंतर परीक्षा होणार आहेत. या निमित्ताने मी एवढेच

..5..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 11:20

ता.प्र.क्र.1079....

श्री.राजेंद्र मुळक....

विचारतो की, शासन ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कधीपर्यंत प्रतिपूर्ती अदा करणार आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी अगोदर उत्तर देताना सांगितले की, विविध फॅकल्टीज बदलण्याची आवश्यकता आहे. या बाबतची मागणी गेल्या दोन वर्षात अतिशय ॲग्रेसीव्हली वाढली आहे. या बाबीचा विचार करून बृहत आराखडा दुरूस्त करण्यात येईल. विद्यमान सन्माननीय सदस्य व माजी वित्त राज्यमंत्री यांनी विचारले की, आतापर्यंतचा पैसा का दिला नाही. महाविद्यालयांना जे पैसे वेळच्या वेळी दिले पाहिजे ते केवळ याच शैक्षणिक वर्षाचे आहेत असे नाही. मागील वर्षीचे जवळजवळ 650 कोटी रूपये द्यावयाचे राहिलेले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून अडचणी येत आहेत. त्यामुळे अधिवेशन संपल्यानंतर या बाबतीत सामाजिक न्याय विभाग, वित्त विभाग आणि महाविद्यालयांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे वर्ष-दीड वर्षात प्रलंबित शुल्क टप्प्याटप्प्याने देण्याच्या बाबतीत मार्ग काढण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयातील जागा गृहीत धरून उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी विचारले होते की, शासकीय महाविद्यालयात किती जागा रिक्त आहेत ? परंतु त्या बाबतचे अजून उत्तर आलेले नाही. वास्तविक पाहता या संदर्भातील मूळ प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांचा होता. माननीय सदस्यांनी विचारले की, इतर जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु का करीत नाही. पण आपण या बाबतचे धोरण सांगितलेले नाही. आपण काही करायचे नाही असे ठरविले आहे काय ? तसेच अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रतिपूर्तीची रक्कम अदा केलेली नाही. मी विचारु इच्छितो की, या बाबतीत एकूण किती विद्यार्थ्यांची मागणी आहे, तसेच किती विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती केली नाही ? यासाठी तरतूद करण्यात येते असे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. या निमित्ताने मी विचारतो की, या संदर्भातील तरतूद किती वर्षे झाली नाही आणि किती वर्षांपासून विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती केली नव्हती ?

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1079....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्याकडे या संदर्भातील आकडेवारी आता उपलब्ध नाही. या संदर्भातील आकडेवारी पटलावर ठेवण्यात येईल. मुळात हा प्रश्न नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करण्याच्या संदर्भातील आहे. समजा 1-2 शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करता आली तर तसे करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कारण अनेक वेळा सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय आणि आपला जिल्हा सोडून जाणे परवडत नसल्यामुळे त्या संदर्भात बृहत आराखडा तयार करून त्याचा विचार करावा, असे ठरत आहे. केंद्रीय स्तरावर स्किल्ड डेव्हलपमेंटचा आग्रहाचा विषय आहे, त्याची काही सांगड घालता येईल का, याचाही विचार आराखड्यात करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मागणी केलेली माहिती त्यांना लगेच म्हणजे आज संध्याकाळपर्यंत देण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा तयार झाला आहे. पालघर जिल्हा हा पूर्णपणे आदिवासी जिल्हा आहे. या आदिवासी भागातील विद्यार्थी सुध्दा उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण घेऊ इच्छितात. परंतु, आर्थिक अडचणीमुळे ते शहरी भागामध्ये आणि विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये जाऊ शकत नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, नव्याने निर्माण झालेल्या, शंभर टक्के आदिवासी असलेल्या पालघर जिल्ह्यामध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यासाठी शासन प्रयत्न करील का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आदिवासी जिल्ह्यात सुरू केले काय किंवा जिल्ह्याच्या बाहेर सुरू केले काय, आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना आरक्षण असते. त्यामुळे त्यांना बाहेरच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्येही प्रवेश मिळतो. आपण जेव्हा अशा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचा विचार करू, त्यावेळी अशा जिल्ह्यांचा प्राधान्याने विचार करण्याचा सरकार नक्की विचार करील.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1079....

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेशाच्या वेळी शिक्षण फी व परीक्षा फी शासन दर वेळी देते. ओबीसींना सुध्दा फी मध्ये 50 टक्के सवलत आहे. मागच्या काही काळापासून ती राज्य शासनाने सुरू केली होती. परंतु, नवीन शासन ओबीसींना फी मध्ये जशी एससी, एसटी करिता शंभर टक्के सवलत आहे, तशी देण्याचा विचार करणार आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मागच्या शासनाने या विषयातील धोरण ठरविले आहे, ते धोरण हे सरकार तसेच पुढे चालू ठेवील, त्यात काही बदल करण्याची लगेच शक्यता नाही. सवलत वाढविण्याच्या बाबतीतील गरज, आवश्यकता पाहून त्याचा विचार येत्या काळात करण्यात येईल. आज त्याचेही काहीही अध्ययन केले आहे, असे नाही. सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. राज्यामध्ये असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या किती आहे ? गेल्या 2-3 वर्षांपासून या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये जागा रिक्त राहतात. साधारणपणे यावर्षी 40 हजार जागा रिक्त आहेत. रिक्त जागांमुळे महाविद्यालय चालविणे कठीण झाले आहे. सदर बाबतीत फेरविचार करून नवीन धोरण आणण्यासंबंधी शासन विचार करणार आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, राज्यात एकूण अभियांत्रिकी महाविद्यालये 367 आहेत, प्रवेश क्षमता 1,56,067 आहे, प्रवेशित 88,883 आहेत, रिक्त जागा 67,184 म्हणजे 43 टक्के आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विचारलेला प्रश्न खरा आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयांवर एआयसीटीच्या नॉर्म्सप्रमाणे बंधने आहेत. आता जी महाविद्यालये सुरू झाली, त्यांच्या शाखांमध्ये विद्यार्थ्यांचा ओघ कमी झाला आहे. नवीन काही शाखा सुरू करायच्या असतील तर त्यासाठी एआयसीटीचे पुन्हा वेगळे नॉर्म्स आहेत. फॅकल्टीज व जागा वारंवार वाढविल्याने आता काही अभियांत्रिकी महाविद्यालयांचे वर्ग रिकामे पडू लागले आहेत. मला भीती आहे की, आपण एआयसीटीशी चर्चा करून काही नवीन पॉलिसी स्वीकृत केली नाही तर या अभियांत्रिकी महाविद्यालयांचा मंगल कार्यालये म्हणून वापर सुरू होईल. इतके वर्ग रिकामे पडू

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1079....

श्री. विनोद तावडे ....

लागले आहेत. हे वास्तव आहे. मॅनेजमेंट, इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये मी अनेक ठिकाणी गेलो आहे. वर्षांनुवर्षे तेथे वर्ग भरत नाहीत. शेवटी ते वर्ग भाड्याने द्यावे लागतील, अशी अवस्था झाली आहे. एआयसीटीचे नॉर्म्स खूप कडक आहेत. त्यामुळे मी एआयसीटीचे चेअरमन श्री. मंथा साहेबांशी या विषयी चर्चा केली आहे. ते बहुधा या महिन्याअखेर पर्यंत या पदावर आहेत. नवीन चेअरमन त्यानंतर येतील, त्यांच्याशी चर्चा करून यासंबंधी धोरण ठरविण्यात येईल. राज्यातील इंजिनिअरिंग व मॅनेजमेंट या दोन्हीमध्ये रिक्त जागा राहत आहेत. 2-4 कॉलेज मिळून एक क्लस्टर केले आणि असे करून जर फॅकल्टी वापरता आली तर बरे होईल, अशा काही प्रॅक्टिकल कल्पना माझ्या मनात आहे. याबाबत चर्चा केल्यानंतर त्याला मान्यता मिळाली तर सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे महाविद्यालये आपल्याला वाचविता येतील. मोठ्या प्रमाणात शैक्षणिक विभागात झालेली गुंतवणूक बिगर शैक्षणिक कामांकडे वळू नये, हा प्रयत्न सरकारतर्फे नक्की करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षण विभागाला डायनॅमिक नेतृत्व मिळाले असल्यामुळे काही चांगले निर्णय शिक्षण क्षेत्रात होतील, अशी अपेक्षा आम्हाला वाटते. माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले, त्याचे मी स्वागत करतो. राज्यातील सर्वच अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच तंत्रनिकेतन महाविद्यालये या बाबतीत आपण बृहत आराखडा करू असे म्हटले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रशिक्षण महाविद्यालये, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालये म्हणजे तंत्रशिक्षणाखाली येणाऱ्या सर्व महाविद्यालयांच्या बाबतीतील हा बृहत आराखडा शैक्षणिक वर्ष संपण्याअगोदर आणि पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्याअगोदर करणार आहात का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शैक्षणिक गुणवत्तेच्या गोष्टींना आवश्यक तेवढा काळ दिला पाहिजे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांचा आग्रह लक्षात घेता मला असे वाटते की, अगदी मे महिन्यापर्यंत नाही तर त्यापेक्षा अधिक कार्यकाळ नक्की लागू शकतो. यापूर्वीच बृहत आराखडा एआयसीटीला सादर केलेला आहे. तो पूर्णपणे नवीन करायचा नाही. त्यामध्ये दुरूस्त्या करायच्या आहेत, बदल करायचे आहेत. आमचा प्रयत्न राहील की, सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे नवीन शैक्षणिक वर्षापर्यंत तो पूर्ण करावा.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1079....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, वारंवार तोच मुद्दा येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी सर्व आकडेवारी वाचली. महत्त्वाचा मुद्दा हाच आहे की, केवळ 10 जिल्ह्यांतच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. राज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये शासकीय अभियांत्रिकी विद्यालय असणे अभिप्रेत आहे. त्यावेळची गरज म्हणून खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांना परवानगी दिली गेली. विद्यार्थ्यांची संख्या त्यावेळी खूप प्रमाणात वाढली होती. आता विद्यार्थ्यांची संख्या खूप प्रमाणात कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांवर खर्च केल्यानंतर त्या जागा रिक्त राहणे योग्य नाही. प्रत्येक जिल्हानिहाय खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालय ताब्यात घेऊन शासनाच्या वतीने ती सुरू करण्यात येतील का, जेणेकरून प्रत्येक जिल्ह्यात तशा पध्दतीची सुविधा निर्माण करता येऊ शकेल. माननीय राज्यमंत्री यांनी चुकीचे उत्तर दिले आहे, ते रेकॉर्डवरून काढून टाकण्यात यावे. माननीय राज्यमंत्र्यांनी खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांची माहिती दिली होती. प्रश्न शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचा विचारला आहे. तेथे आता एकही जागा रिक्त नाही, असे माननीय मंत्र्यांनी मघाशी कबूल केले आहे. त्यामुळे माननीय राज्यमंत्र्यांच्या उत्तरात दुरूस्ती व्हावी. माननीय राज्यमंत्र्यांनी लेखी व तोंडी उत्तरामध्ये तेच सांगितले आहे. त्यामुळे त्या उत्तरामध्ये दुरूस्ती केली जावी. मी सांगितल्याप्रमाणे, शासन विचार करेल का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या इनटेकविषयी सांगितले. त्यामध्ये खाजगी शब्द आला असेल तर तो काढून टाकू. त्यांनी एकूण इनटेकची माहिती सांगितली आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी आपल्या माहितीकरिता वाचून दाखवितो. प्रश्नाच्या क्रमांक 4 मध्ये असे आहे की, "उक्त प्रकरणी फेरविचार करून प्रत्येक जिल्ह्यात एक शासकीय इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा

..5

ता.प्र.क्र.1079....

श्री. सुनील तटकरे ....

करण्यात येत आहे.?" उत्तरातील क्रमांक 4 व 5 मध्ये असे म्हटले आहे की, "राज्यात अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहत असल्याने प्रत्येक जिल्ह्यात एक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याची आवश्यकता नाही." प्रश्नातील क्रमांक 4 स्पेसिफिक आहे, विवक्षित आहे. तो शासकीय महाविद्यालयांबाबतचा प्रश्न आहे. उत्तर मात्र रिक्त जागांबाबत दिले आहे. त्यामुळे उत्तर दुरूस्त केले जावे. हा प्रतिष्ठेचा भाग नाही. काही वेळा नजरचुकीने झाले असेल तर चुकून झाले असे म्हणण्यामध्ये काही अडचण असावी, असे मला वाटत नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1079............

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण तारांकित प्रश्नाला दिलेले उत्तर पाहिले तर अधिकची माहिती देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे, हे आपल्या लक्षात येईल. शेवटी प्रश्न सोडविताना सर्वंकष माहिती उपयोगाची ठरत असते. त्या दृष्टीने उपयोगाची माहिती दिलेली आहे. परंतु, ती जर सन्माननीय सदस्यांना आवश्यक वाटत नसेल तर ती कमी करण्यास आमची काही हरकत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी मांडलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. ज्या खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे इन्फ्रास्ट्रक्चर आहे, पण महाविद्यालये चालविण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नाही, अशा महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाबरोबर चर्चा करुन पदांचा आणि अन्य बाबींचा रिकरिंग खर्च करणे आपल्या योजनेत बसत असेल तर प्राथम्याने अशा व्यवस्थापनांबरोबर कोलॅबोरेट करुन ही महाविद्यालये सुरु करण्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना रास्त आहे. या सूचनेचा आम्ही नक्की विचार करु.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यात एकूण 367 खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. त्यामधील 100 ते 150 महाविद्यालयांनी पायाभूत सुविधा पूर्ण केलेल्या नाहीत म्हणून ती बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशी महाविद्यालये ताब्यात घेऊन टप्प्याटप्प्याने या संस्थांना पैसे देऊन शासन ती सुरु करण्याचा प्रयत्न करणार आहे का ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, चंद्रपूर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील जागा रिक्त आहेत. त्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेश घेऊ इच्छित नाहीत. कारण, त्या ठिकाणी पायाभूत सुविधा पूर्ण झालेल्या नाहीत. ही बाब खरी आहे का ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबतची माहिती घेऊन ती पुरविण्यात येईल.

श्री.हरिभाऊ राठोड : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग 1 मध्ये "फी सवलतीचे धोरण राबविले आहे का", असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता व त्याला शासनाने 'होय', असे उत्तर दिलेले आहे.

...2....

16-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1079............
श्री.हरिभाऊ राठोड..........

सभापती महोदय, ही फी सवलत इतर मागासवर्ग आणि भटक्या व विमुक्त प्रवर्गातील सरसकट सर्व विद्यार्थ्यांना मिळत नाही. ज्यांच्याकडे क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र आहे, त्यांनाच ही सवलत मिळते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने असा शासन निर्णय निर्गमित केला की, दरवर्षी क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र न घेता शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या वर्षाला प्रमाणपत्र घेतल्यानंतर त्या विद्यार्थ्याला पुढील तीन वर्षे किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत फी सवलत सुरु ठेवावी. विद्यार्थ्याने पहिल्या वर्षी क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र दिल्यानंतर तो विद्यार्थी फी प्रतिपूर्तीसाठी पात्र ठरतो. परंतु, खाजगी संस्था मात्र विद्यार्थ्यांकडून दरवर्षी प्रमाणपत्र मागतात आणि ते सादर न केल्यास पूर्ण फी भरावी, असे आदेश देतात. शासन निर्णय असताना व हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असताना तो अद्याप आम्हाला प्राप्त झालेला नाही, अशी उत्तरे खाजगी संस्थाचालक देतात. विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी प्रमाणपत्र सादर करण्याचा त्रास होऊ नये, यासाठीच सामाजिक न्याय विभागाने हा शासन निर्णय काढला आहे. परंतु, संस्थाचालक या शासन निर्णयाची अंमलबजावणी विविध कारणे पुढे करुन करीत नाहीत, अशा अनेक तक्रारी आमच्यापर्यंत आलेल्या आहेत. अशा संस्थांवर शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सर्वप्रथम मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या प्रश्नाचे उत्तर देतो.

सभापती महोदय, ज्या महाविद्यालयांनी पायाभूत सुविधा निर्माण केलेल्या नाहीत, अशा संस्थांची मान्यता ऐआयसीटीनें काढली आहे, ही बाब खरी आहे. अपूर्ण पायाभूत सुविधांमुळे बंद पडलेल्या महाविद्यालयांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन ती शासनाला वापरता येऊ शकतील का, या सूचनेचा शासन नक्की विचार करील. जेव्हा केव्हा शासनाला शासकीय महाविद्यालये सुरु करावयाची असतील त्यावेळी अशा अर्धवट व अपूर्ण पायाभूत सुविधा असलेल्या महाविद्यालयांमधील पायाभूत सुविधा पूर्ण करुन ती शासनाने वापरावीत, हा विचार चांगला आहे.

...3....


SRR/ प्रथम श्री.मंगेश......... 11:40

ता.प्र.क्र.1079............

श्री.विनोद तावडे...........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ राठोड यांनी विचारलेला प्रश्न सामाजिक न्याय विभागाशी संबंधित असला तरी मी या निमित्ताने सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, अशा पध्दतीने जी महाविद्यालये विद्यार्थ्यांना जाणूनबुजून त्रास देत आहेत, त्यांची माहिती घेऊन त्यांना नक्की जाब विचारण्यात येईल. सन्माननीय सदस्यांकडे देखील अशी काही माहिती असेल तर ती त्यांनी शासनाला उपलब्ध करुन द्यावी.

----------

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात क्ष किरण**

**विभागात एक्स रे फिल्मचा तुटवडा असल्याबाबत**

**(४) * १११५ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात क्ष किरण विभागात एक्स रे फिल्मचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक गोरगरीब रुग्णांना २ महिन्यानंतर एक्स रे साठी बोलविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्ष किरण विभागात एक्स रे फिल्मचा तुटवडा निर्माण होण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच उक्त याप्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.रवींद्र वायकर, श्री. विनोद तावडे यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे.
सदर कालावधीत रूग्णालयात काही काळ एक्स-रे फिल्मचा तुटवडा होता. तथापि तद्नंतर पुरवठादारांकडून एक्स-रे फिल्मचा पुरवठा नियमरित्या सुरू आहे.
(२) नाही,
गोरगरीब रूग्णांचे आजाराचे गांभीर्य लक्षात घेवून तसेच अत्यावस्थ व एमएलसी रुग्णांचे एक्स-रे काढण्यात येत होते.
(३) पुरवठादाराने एक्स-रे फिल्मचा पुरवठा अनियमितपणे केल्यामुळे एक्स-रे फिल्मचा तुटवडा मार्च, २०१४ मध्ये काही काळापुरता निर्माण झाला होता.
(४) सद्य:स्थितीत रुग्णालयास एक्स-रे फिल्मचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. औषधे व सर्जिकल बाबींच्या खरेदीबाबत अधिष्ठाता व संचालक यांना असलेल्या वित्तीय मर्यादा वाढविणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात क्ष किरण विभागात एक्स-रे फिल्मचा तुटवडा झाला होता. त्यामुळे बाहेरुन एक्स-रे काढण्याबाबत रुग्णांना सांगण्यात आले, अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आम्हाला प्राप्त झाल्या आहेत. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, एक्स-रे फिल्मचा तुटवडा होता. तथापि,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1115............

प्रा.अनिल सोले...........

तद्नंतर पुरवठादारांकडून एक्स-रे फिल्मचा पुरवठा नियमितरित्या सुरु आहे. मी असा प्रश्न विचारु इच्छितो की, मध्यंतरीच्या काळात एक्स-रे फिल्मचा पुरवठा का थांबला होता, कंत्राटदाराने पुरवठा करण्याचे का थांबविले होते आणि प्रशासनाला खरेदीसाठी दिलेली 20 लक्ष रुपयांपर्यंतची मर्यादा वाढवून देण्याबाबत शासन काही विचार करणार आहे का ?

सभापती महोदय, याच अनुषंगाने मला असे विचारावयाचे आहे की, त्या ठिकाणी प्रभारी डीनची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे भविष्यात शासन विशेष कार्य अधिकाऱ्यांची नियुक्ती या रुग्णालयात करणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अनेक वेळा प्रशासनातील अत्यंत सोप्या गोष्टी, करता येण्यासारख्या गोष्टी सिस्टिममधील मालाफाईड किंवा बोनाफाईड मिस्टेक्समुळे पूर्ण होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी उपस्थित केलेली बाब खरी आहे. मध्यंतरी त्या रुग्णालयात एक्स-रे फिल्मचा तुटवडा होता. तथापि, नंतर तो सुरु करण्यात आला आहे.

सभापती महोदय, येथील डीन यांना 20 लक्ष रुपयांपर्यंतच्या खरेदीचे अधिकार आहेत. त्यावरील खरेदीसाठी त्यांना संचालक किंवा सचिव स्तरापर्यंत प्रस्ताव पाठवावा लागतो व मान्यता घ्यावी लागते. या सर्व प्रवासात वेळ जातो व रुग्णालयाच्या सेवा-सुविधांवर त्याचा परिणाम होतो. मागील काळात कधी तरी या स्तरावर भ्रष्टाचार झाला असावा व त्यामुळे ही खर्चाची मर्यादा घालण्यात आली असावी. हे जरी खरे असले तरी पर्याय देत असताना रुग्णालयाच्या अडचणी वाढतील, असा पर्याय न देता रुग्णांची, रुग्णालयांची सोय होईल आणि कार्यपध्दतीत पारदर्शकताही राहील, या दृष्टीने पर्यायी व्यवस्था आणणे गरजेचे होते. त्यामुळे जी 20 लक्ष रुपयांपर्यंतची मर्यादा होती ती अभ्यासाअंती 45 ते 50 लक्ष रुपयांपर्यंत वाढवून दिली तर या अडचणी येणार नाहीत. ही मर्यादा किंवा अधिकार वाढवून देण्याचा शासन नक्की विचार करील.

...6........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1115............ श्री.विनोद तावडे........

सभापती महोदय, या रुग्णालयाला पूर्णवेळ डीन किंवा विशेष कार्य अधिकारी मिळाले तर केवळ हाच प्रश्न नाही तर रुग्णालयाचे अनेक प्रश्न सोडविण्यामध्ये मदत होऊ शकते. त्यामुळे मार्चमध्ये नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती नक्की करु.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, वैद्यकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय यांना लागणारी साधनसामुग्री, औषधे आणि अन्य तांत्रिक गोष्टी याबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्यामध्ये बऱ्याच वेळा समन्वय नसतो, ही बाब आपल्यासमोर येत असते. एक साधी गोष्ट आहे की, एक्स-रे फिल्म ही रग्णालयांसाठी अत्यावश्यक बाब आहे. असे असताना साठा संपला, असे कसे होऊ शकते ? कोणत्याही ठिकाणी स्टॉक लेव्हल एक महिना पुरेल एवढ्यापर्यंत आल्यानंतर नव्याने पुरवठा झाला पाहिजे, अशा प्रकारची सर्वसामान्य पध्दत असताना तो साठा शून्यावर येईपर्यंत वाट का पहावी लागते ?

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सिस्टिममधील दोषाबाबत सांगितले आहे. अशा प्रकारचा दोष जर परचेसिंग प्रणालीमध्ये असेल तर तो दूर करुन रुग्णालयांमध्ये सातत्याने मिनिमम स्टॉक लेव्हल अबाधित राहील, अशी दक्षता घेण्याबाबत सूचना देऊन त्या प्रमाणे कार्यवाही होईल का,

यानंतर श्री.शिगम.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एक्सरे पासून गरीब रुग्ण वंचित राहाणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल काय ?

श्री. विनोद तावडे : स्टॉक संपतो हे माहीत असताना, परवानगी घेण्यासाठी नागपूरहून मुंबईला येण्यासाठी किती वेळ लागतो हे माहीत असताना, एक्सरे फिल्मचा तुटवडा होईल हे माहीत असताना देखील त्याबाबतीत काळाजी का घेतली जात नाही असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. आर.सी. संपल्यानंतर ते रिन्यू करण्यासाठी वर्षभराचा कालावधी लागतो आणि तोपर्यंत पुरवठादाराला मुदत वाढवून दिली तर मुदत का वाढवून दिली असा लेखा परीक्षकांचा ठपका येतो. मेडिकल कॉलेजेसमधील लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी सर्वंकष धोरण ठरविले पाहिजे. वस्तू रेट कॉण्ट्रॅक्टनेच खरेदी केल्या पाहिजेत असे नाही. रेट कॉण्ट्रॅक्टपेक्षा स्वस्त दराने वस्तू मिळत असतील तर त्या खरेदी केल्या तरी चालतात. काही मिसकन्सेप्शन होत असतात, त्या दुरूस्त केल्या तर रुग्णांना अधिक फायदा होईल. रुग्णांची गैरसोय होणार नाही अशा प्रकारची पर्चेस पॉलिसी वैद्यकीय महाविद्यालयांपुरती निश्चित आणली जाईल.

श्री. सतीश चव्हाण : तत्कालीन वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या डीनला 50 हजार रुपयापर्यंत खरेदी करण्याचे अधिकार देण्यात येतील असे सांगितले होते. आता वैद्यकीय महाविद्यालयाच्या डीनला किती रकमेपर्यंत खरेदी करण्याचे अधिकार आहेत ?

श्री. विनोद तावडे : अर्थातच ही मर्यादा वाढविली पाहिजे. वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण देणे त्याच बरोबर हॉस्पिटल देखील चांगल्या पध्दतीने चालवून रुग्णांना योग्य उपचार उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे आहे. या संदर्भात आवश्यक ते अधिकार डीनला मिळाले पाहिजेत. वैद्यकीय महाविद्यालयातून चांगले वैद्यकीय शिक्षण दिले जाईल आणि उपचारही चांगले केले जातील यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.

श्री. प्रकाश गजभिये : एक्सरे विभागात फिल्म उपलब्ध होत नाहीत. नागपूरमध्ये आयजीएमसी आणि जीएमसी अशी दोन वैद्यकीय महाविद्यालये आहेत. या दोन्ही कॉलेजेसमधील परिस्थिती वाईट आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये मोफत सेवा पुरविली जाते. असे असताना त्या ठिकाणी प्रत्येक सेवेकरिता रुग्णांकडे पैसे मागितले जातात. वरील दोन्ही वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमआरआय आणि सिटीस्कॅन याकरिता किती शुल्क आकारले जाते ? गरीब

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1115.... श्री. प्रकाश गजभिये...

रुग्ण या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपचार घेण्यासाठी जात नाहीत ते खाजगी रुग्णालयामध्ये जातात. त्यांच्या या वैद्यकीय महाविद्यालयातील सेवांवर विश्वास राहिलेला नाही. या वैद्यकीय महाविद्यालयातून एक्सरे, एम.आर.आय आणि सिटीस्कॅन याकरिता किती शुल्क आकारले जाते ?

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य हे जनसामान्यामध्ये फिरत असल्यामुळे त्यांना अनेक गोष्टी माहीत असतात. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी मानून या बाबत तपासणी केली जाईल. गरीब रुग्णांकडून पैशाची मागणी करुन अशा प्रकारे भ्रष्टाचार होत असेल त्याची चौकशी केली जाईल. एमआरआयसाठी 1800 रुपये, सिटीस्कॅनसाठी 500 रुपये आणि एक्स रे साठी 70 रुपये शुल्क आकारले जाते. ज्यांच्याकडे पिवळे रेशनकार्ड असेल त्यांना या सुविधा मोफत पुरविल्या जातात. अशा प्रकारची व्यवस्था असताना देखील अधिकचे पैसे घेतले जात असतील तर त्याची चौकशी करण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील माध्यमिक विभागातील पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांच्या**
**प्रलंबित प्रस्तावाना मंजुरी मिळणेबाबत**

(५) * **७४५ डॉ.अपूर्व हिरे**, **श्री.रामनाथ मोते**, **श्री.नागो गाणार** : **तारांकित प्रश्न क्रमांक ४९१४७ ला दिनांक ५ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक विभागातील पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याचा प्रस्ताव उच्च स्तरीय समितीकडे सादर करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली, माध्यमिक विभागातील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, प्रस्तुत प्रक्रिया केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) वित्त विभागाने दिलेल्या विहित विवरणपत्रात सदर माहिती क्षेत्रिय यंत्रणेकडून प्राप्त करून प्रस्ताव पुन्हा वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

डॉ. अपूर्व हिरे : या प्रश्नाला मागील अधिवेशनामध्ये जे उत्तर मिळाले तेच उत्तर आताही मिळालेले आहे. 2003-2004 पासून हे लोक काम करीत आहेत. त्यांना कामाचा मोबदला मिळत नाही, त्यांच्या पदांना मान्यता मिळत नाही. या सर्व लोकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन ही सर्व पदे नियमित करण्यात येतील काय ?

श्री. विनोद तावडे : शिक्षण खात्याचा अभ्यास पूर्ण झाला असे वाटत असतानाच नवीन एखादी बाब निर्माण होते आणि पुन्हा नव्याने अभ्यास करावा लागतो. मी शिक्षण खात्याचा पदभार स्वीकारुन 40 दिवसच झाले आहेत. सन्माननीय सदस्यांनी पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्यात यावी असे सांगितलेले आहे. 2008ला शिक्षण कायदा लागू झाला. त्यामुळे पायाभूत जागा कमी जास्त होतात. इयत्ता नववी, दहावीचा हा मुद्दा आहे. अन्य प्रशासकीय खात्यांना जे लागू आहे ते शिक्षण खात्याला लागू करता येणार नाही. कारण संच मान्यते नुसार ते बदलत राहते. वाढीव पदांना मान्यता दिली पाहिजे. ही पदे किती वाढली आणि किती कमी झाली याचाही विचार केला पाहिजे. अशा प्रकारची पदे 5-10 वर्षासाठी करावीत या दृष्टीने विचार करावा लागेल. संच मान्यतेच्या अधीन राहून याबाबतीत सकारात्मक विचार करण्यात येईल. या प्रश्नासंबंधी सर्व शिक्षक आमदारांना बरोबर चर्चा करुन प्रॅक्टीकल विचार केला पाहिजे.

श्री. जयंत प्र. पाटील : ह्या जागा कमी होतील, अधिक होणार नाहीत.

श्री. विनोद तावडे : 6वीला प्रवेश वाढतात आणि 8वीला पुन्हा कमी होता.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.836...

डॉ. सुधीर तांबे : वाढीव पदांच्या बाबतीत शासनाने घेतलेल्या निर्णयाकडे मी लक्ष वेधित आहे. पायाभूत पदे मान्य केल्यानंतर पदे वाढतात. त्या पदांना मान्यता द्यावी असा शासन निर्णय आहे. तरी देखील चार-पाच वर्षे या पदांना मान्यता दिली जात नाही. शिक्षक विनावेतन काम करतात. 5-5 वर्षे या शिक्षकांवर अन्याय झालेला आहे. ज्या वर्षी पदे निर्माण होतील त्या वर्षीच मान्यता द्यावी आणि सर्वांना वेतन द्यावे अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

श्री. विनोद तावडे : यासंबंधी शासन निर्णय आहे, नियम आहेत. शिक्षण खात्याने सुचविले आणि वित्त खात्याने ते नाकारले अशा प्रकारचे सरकारचे उत्तर असू शकेल.

.....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.745...... श्री.विनोद तावडे....

सरकार हे एकच आहे. ज्यावेळी दुष्काळ आणि इतर कारणासाठी 40 टक्के कट लावण्याचा विषय येतो त्यावेळी असा विषय पोस्टपोन होतो. अशी व्यवहार्य सूचना अर्थ खात्याकडून होते त्यामुळे आम्हाला मनात नसताना मान्यता द्यावी लागते. केव्हा तरी एकदा नियम केला आहे त्यानुसार पुढे जाणे हा विषय आहे. ही आपली सूचना नक्की विचारात घेण्यासारखी आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, वाढीव पदांचा हा विषय आहे. मंत्री महोदयांना मी प्रश्न विचारु इच्छितो की, पायाभूत पेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याचा घोळ सुरु आहे. नव्याने जो जीआर निघाला आहे तो रद्द करण्यात येईल काय?

सभापती महोदय, ही पदे आजची नसून 2001 पासून 2008 पर्यंतची 1703 पदे आहेत. 14 वर्षाचा काळ उलटला आहे. म्हणजे या शिक्षकांनी आपली निम्मी सेवा विना मान्यता, विना वेतन सुरु ठेवली आहे. मंत्री महोदयांनी काही प्रमाणात संवेदनशील होऊन या सर्व शिक्षकांना मान्यता देण्याच्या संदर्भात तातडीने बैठक घ्यावी. 14 वर्षे काम केलेल्या या शिक्षकांच्या वेतनाच्या मान्यतेचा प्रश्न आहे. मंत्री महोदय तातडीने बैठक घेऊन अधिकाऱ्यांशी चर्चा करुन हा प्रश्न मार्गी लावणार आहेत काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शिक्षकांचा जो मुद्दा मांडला आहे हा विषय थोडे संवेदनशील होऊनही सुटण्यासारखा आहे. 1200 पदांचा विषय गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. हा विषय सोडवित असताना दिनांक 23.10.2013 रोजी जो जीआर काढण्यात आला आहे तो कन्फ्युझिंग आहे. चिपळूणकर समितीचा अहवाल विचारात घेतला तर शिपाई पदे वाढतात. दिनांक 23.10.2013 चा जीआर विचारात घेतला तर शिपायाची पदे कमी होतात व प्रयोगशाळा सहाय्यक आणि निरीक्षकाची पदे वाढतात. आपल्याला गरज शिपाई पदाची आहे की निरीक्षकांची आहे, या दोन्हीमधील नवीन फॉर्म्यूला आणावयाचा काय? चांगल्याप्रकारे ते विना अनुदानित शाळा चालवित आहेत. ज्या भागात गरज आहे त्या भागात ते शाळा चालवित आहेत अशा लोकांचे मार्गदर्शन घेऊन नक्की करु माननीय सदस्य डॉ.अपूर्व हिरे व माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी मांडलेल्या 1206 शिक्षकांच्या पदांना मान्यता देण्याच्या विषयाबाबत पुढील जानेवारी महिन्याच्या आत नक्की ठोस पावले उचलली जातील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>दुष्काळाची पाहणी करण्यास आलेल्या केंद्रीय पथकासंबंधी</u>**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक महाराष्ट्रात आलेले असून रात्रीच्या वेळी विजेऱ्यांच्या सहाय्याने लातूर आणि बीड जिल्हयातील दुष्काळी भागाची पाहणी करीत असल्याचे दृश्य दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवरुन दाखविण्यात आले. ही पाहणी दिवसा उजेडी करण्यात आली तरच दुष्काळाची झळ किती प्रमाणात बसली आहे याची स्पष्टता होऊ शकेल. अन्यथा प्रत्यक्षात किती नुकसान झाले आहे हे केंद्रीय पथकाला निश्चित करता येणार नाही. हे पथक दोन दिवस पाहणी करणार असल्यामुळे मी शासनाला विनंती करतो की, या संदर्भात केंद्र सरकारला तातडीने विनंती करुन या केंद्रीय पथकाचा मुक्काम दोन दिवसांनी वाढविण्यात यावा आणि प्रत्यक्ष पाहणी दिवसा झाली पाहिजे असे कळविण्यात यावे.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी या प्रकरणी लक्ष द्यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय योग्य आहे. केंद्रीय पथकाकडून रात्रीच्या वेळीच पाहणी केली जाते, दिवसा पाहणी केली जात नाही असे समजू नये. दुष्काळाच्या विषयावर काल विधानसभेत चर्चा झाली, आज या सभागृहात चर्चा होणार आहे. विलंब होता कामा नये. कारण शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. म्हणून घाईने तपासणी केली पाहिजे. केंद्रीय पथक दिवसरात्र काम करीत आहे. त्यांच्याकडून पाहणी होत असताना अन्याय होता कामा नये याची नक्की सूचना करु व हा आग्रह आम्ही धरु.

--------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी आणि सातवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी आणि सातवी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात)

------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेद्वारे एका गंभीर स्वरूपाच्या विषयावर सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा घेण्यात यावी अशी विनंती केली होती. आपण त्या सूचनेबाबत प्रश्नोत्तराच्या तासानंतर या गंभीर विषयावर माझे मत व्यक्त करण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा गावामध्ये संजय जाधव, त्यांची पत्नी जयश्री जाधव व त्यांचा एकूलता एक मुलगा सुनील जाधव या एका दलित परिवारातील तीन व्यक्तींची 20 ऑक्टोबर, 2013 रोजी निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणामध्ये पोलिसांना दीड महिन्याचा काळ उलटूनही गुन्हेगाराचा सुगावा लागलेला नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. जाधव परिवारातील काही लोकांनी जी शंका व्यक्त केली होती त्याला कलाटणी देण्यात आली. 6 डिसेंबर या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी मुंबईच्या चैत्यभूमीवर लाखोच्या संख्येने त्यांचे अनुयायी जमतात. महाराष्ट्रामध्ये उद्रेक होऊ नये म्हणून जाणीवपूर्वक जाधव परिवारातील काही तरुणांना आरोपी बनवून त्यांना पोलीस कस्टडीमध्ये ठेवण्यात आले आहे. पोलीस विभागाने दीड महिन्यापर्यंत कोणताही तपास व्यवस्थितपणे केला नाही. संपूर्ण राज्यामध्ये जवखेडे हत्याकांडाच्या संदर्भात दलित समाजाकडून आंदोलने सुरु आहेत. आंबेडकर प्रेमी दलित समाज शांततेने आंदोलने करीत आहेत. असे असताना अशांतता निर्माण झाली आहे, उद्रेक झाला आहे असे भासवून तो शमविण्यासाठी जाणीवपूर्वक जाधव परिवारातील तरुणांना ताब्यात घेऊन चौकशी करण्याचा प्रयत्न केला जात आहे अशी सर्वत्र चर्चा आहे. खरे पाहता आंदोलने शांतपणे सुरु असताना नक्षलवाद्यांसारखी आंदोलने सुरु असल्याचा आरोप केला जातो ही चुकीची भावना आहे.

सभापती महोदय, या प्रकरणाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा झाली पाहिजे. गृह खात्याने स्पष्टीकरण दिले पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी घटनास्थळाला भेट दिली. सामाजिक न्याय खात्याचे राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे हेही घटनास्थळी जाऊन आले. ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनीही त्या ठिकाणी भेट दिली. विविध राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेते मंडळींनी भेट दिली, इतका हा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. महाराष्ट्रामध्ये खैरलांजी येथील घटनेपासून दलित समाजावरील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

प्रा.जोगेंद्र कवाडे...

अत्याचाराची प्रकरणे वाढीस लागली आहेत. त्याचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी सरकार गांभीर्याने कोणती कारवाई करणार आहे या संदर्भात सभागृहात स्वतंत्र चर्चा होणे आवश्यक आहे. या प्रकरणाबाबत पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता. आमची मागणी आहे की, जवखेडे येथील हत्याकांडाच्या चौकशीबाबत महाराष्ट्राच्या पोलीस विभागाने कलाटणी देऊन दलितांना आरोपी बनविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करण्यात यावी.

सभापती महोदय, हा प्रश्न जवखेडे गावापुरता मर्यादित नसून महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये दलितांवर हल्ले केले जात आहेत. त्यांच्या घराची तोडफोड केली जात आहे, त्यांना मारहाण केली जात आहे. या प्रकरणी स्वतंत्रपणे चर्चा करण्यासाठी मी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना मान्य करण्यात यावी अशी माझी विनंती आहे. सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित असते तर या प्रश्नाला न्याय मिळाला असता. दलितांच्या जीविताचा, वित्तहानीचा प्रश्न असून त्यांच्यावर सातत्याने अत्याचार होत आहेत, हत्या होत आहेत.

नंतर एच.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ......

त्यामुळे राज्यातील दलितांमध्ये भीती व दहशतीची भावना निर्माण झाली असून ती दूर करावयाची असेल तर दलितांना संरक्षण देण्यासंबंधी शासनाला विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच या विषयावर या सभागृहात सखोल चर्चा करणे नितांत गरजेचे आहे. म्हणून मी माननीय सभापतींना विनंती करणार आहे की, जवखेडा दलित हत्याकांड आणि राज्यातील दलितांवरील अत्याचाराच्या संदर्भात प्रदीर्घ चर्चा घडवून आणावी, जेणेकरुन दलितांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण कशी होईल याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या नावाने आपण राज्य करतो पण त्याच राज्यात दलितांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत तसेच जवखेडा येथील दलित हत्याकांडामुळे राज्याची देशाच्या पातळीवर बदनामी झालेली आहे आणि पोलिसांकडून या प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न होत आहे, या सर्व गोष्टींचा विचार करता तातडीने या विषयावर सखोल चर्चा करावी अशी विनंती करतो.

**उप सभापती** : या विषयावरील चर्चा पुढील दोन दिवसात घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी जो विषय उपस्थित केला त्यावरील चर्चा सभागृहात घ्यावयाची आहे आणि त्यातूनच या घटनेचे वास्तव जनतेसमोर येणे आवश्यक आहे. तसेच हे शासन दीन-दलितांच्या बाजूने आणि त्यांचे संरक्षण करण्यास सक्षम आहे हेही त्यातून दिसून येईल, त्या अनुषंगाने शासनाची देखील चर्चा घेण्याची तयारी असून तसा वेळ माननीय सभापतींनी ठरवून द्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. माणिकराव ठाकरे : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेतील विषयावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा तर आहेच पण या घटनेबाबत संपूर्ण राज्यात एक शंका व्यक्त केली जात आहे ती स्पष्ट होणे आवश्यक आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआय सारख्या यंत्रणेमार्फत व्हावा अशीही सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. याचा अर्थ राज्याच्या पोलिसांबद्दल शंका आहे अशातला भाग नाही. राज्यात यासंदर्भात वेगवेगळ्या शंका उपस्थित केल्या जात असल्याने सीबीआय मार्फत या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशी माझी देखील मागणी आहे.

**उप सभापती** : या विषयावर चर्चेची मागणी मान्य केली असल्याने आपण चर्चेत भाग घ्यावा. तसेच आता सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी दिलेल्या नियम 289 अन्वयेच्या सूचनेच्या संदर्भात थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील : महोदय, मी नियम 289 अन्वये शासनाच्या ही बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, राज्यात आघाडीचे सरकार सत्तेवर असताना मराठा आणि मुस्लीम समाजाच्या आरक्षणासंबंधी धोरणात्मक निर्णय घेतला गेला. तत्कालीन मंत्री माननीय श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले होते. त्या समितीने संपूर्ण राज्यात विविध ठिकाणी व काना-कोपऱ्यात जाऊन माहिती गोळा केली व आरक्षण देणे कसे योग्य आहे याबद्दलची सांगोपांग चर्चा केली व नंतरच हा निर्णय घेण्यात आला. आता राज्यात सुदैवाने नवीन सरकार सत्तेवर असले असून या सरकारच्या बाबतीत आमच्या अपेक्षा होत्या की, मागील सरकारने जे निर्णय घेतले आहेत ते तसेच्या तसे पुढेही चालू ठेवण्यात येतील. दुर्भाग्याची गोष्ट अशी की, काही लोक या निर्णयाविरुध्द कोर्टात गेले व कोर्टाने या निर्णयाला स्थगिती दिली. तसेच या सरकारने मात्र यासंदर्भात एक समिती गठित केली आणि त्या समितीचे अध्यक्ष माननीय शिक्षण मंत्री श्री. विनोदजी तावडे हेच आहेत. त्यांच्याकडून आमच्या अपेक्षा आहेत की, मंत्री महोदय मराठा व मुस्लीम समाजाला न्याय देण्यासाठी तसेच त्यात काही कमतरता राहिली असेल तर ती भरुन काढावी आणि शासनाच्या वतीने कोर्टात चांगली बाजू मांडावी, जेणेकरुन वर्षानुवर्षे झगडत असलेल्या मराठा व मुस्लीम समाजाला न्याय मिळेल, यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत व या विषयावर सभागृहात चर्चा करावी, अशी मी विनंती करतो.

श्री. विक्रम काळे : महोदय, आघाडी सरकारने पूर्ण विचार करुनच मराठा आणि मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबतचा निर्णय घेतला होता आणि त्याबाबत कोर्टाने निर्णय दिल्यामुळे राज्यातील मराठा व मुस्लीम समाजाचे हजारो लोक विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असल्याने अपेक्षा ठेवून आहेत. तसेच राज्यातून अनेक मोर्चे सुध्दा येत आहेत, त्या अनुषंगाने सभागृहात या बाबीचा विचार होऊन शासनाच्या वतीने निवेदन होणे आवश्यक आहे, जेणेकरुन काही अंशी त्यांना दिलासा मिळू शकेल म्हणून तातडीने ही चर्चा मान्य करावी अशीही मी विनंती करतो.

ॲड.हुस्नबानू खलिफे : महोदय, मराठ्यांबरोबरच मुस्लीम समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात देखील नियम 289 अन्वये सभागृहात चर्चा करावी अशी मी विनंती करते.

**उप सभापती** : यासंदर्भातील कोणताही विषय आजच्या कामकाज पत्रिकेत नसल्याने मी तांत्रिकदृष्ट्या ही नियम 289 अन्वयेची सूचना नाकारीत आहे. तसेच या विषयावर गांभीर्याने लक्ष घालावे असे मी निदेश देत आहे.

......3



PFK/ प्रथम श्री. भोगले........ 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : महोदय, मराठा व मुस्लीम आरक्षणाच्या बाबतीत शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केलेली आहेच पण हा विषय अत्यंत महत्वाचा असल्याने येत्या दोन दिवसात या विषयावर अल्पकालीन चर्चा घ्यावी अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : ठीक आहे.

------------

...4....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राहुल नार्वेकर यांनी श्री.अनिल वाघमारे या तरुणाला पोलिसांनी पोलीस कोठडीत मारहाण केल्याने त्यांचा मृत्यू होणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, राज्यातील कस्टोडियल डेथच्या संदर्भात नियम 93 अन्वये मी सभागृहाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, नागपूर येथील गणेश पेठ पोलीस स्टेशनमध्ये 8 डिसेंबर, 2014 रोजी श्री. अनिल सचिन वाघधरे या तरुणाला अटक करण्यात आली आणि त्याला पोलीस कोठडीत डांबून ठेवले. कोठडीतच या तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली आणि त्याचा 13 डिसेंबर, 2014 रोजी या तरुणाचा मृत्यू झाला. नागपूर येथे विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असतानाच अशा प्रकारे कोठडीत मारहाणीने मृत्यू होण्याची घटना अत्यंत लाजिरवाणी आहे.

यानंतर श्री. भारवि ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर....

हा मानवी हक्काचे उल्लंघन करणारा गंभीर असा प्रश्न आहे. संपूर्ण देशात, आंतरराष्ट्रीय स्तरावर कस्टोडियल डेथबद्दल अतिशय गांभीर्याने लक्ष दिले गेले आहे. भारतीय राज्यघटनेच्या आर्टिकल 14 व 21 अनुसार आपल्याला जे मूलभूत हक्क प्राप्त झालेले आहेत त्याचे उल्लंघन झालेले आहे. तेव्हा या गंभीर मुद्यावर सभागृहाने चर्चा करावी असे माझे निवेदन आहे. कस्टोडियल डेथसारखा विषय आज आपण दुर्लक्षित केला तर समाजात निश्चितपणे एक चुकीचा संदेश जाईल. आज आय.पी.सी., सी.आर.पी.सी. अंतर्गत पोलिसांना विशेष अधिकार दिलेले आहेत. अटक करण्याचे अधिकार दिलेले आहेत. या अधिकाराचा चुकीचा वापर होणार असेल तर समाजात या व्यवस्थेविरुद्ध एक लाट निर्माण होईल. तेव्हा माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, सर्व विषय बाजूला ठेवून कस्टोडियल डेथचा हा सिरियस विषय सभागृहाने चर्चेसाठी घ्यावा.

**उप सभापती** : सदर विषय हा आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नाही. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या मी ही सूचना नाकारीत आहे. तसेच, महाराष्ट्र विधान परिषद नियम 93 अन्वये सूचना सभागृहात मांडण्यात आली असून शासनाने त्यावर निवेदन करावे असे निर्देश यापूर्वीच दिलेले आहेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आपले सभागृह सुरू असताना एखाद्याचा पोलिसांच्या मारहाणीमुळे कोठडीत मृत्यू झाला असेल तर आपल्या सभागृहाच्या प्रथा परंपरेनुसार त्यासंबंधातील चर्चा उपस्थित करण्यात येते. कृपा करून आपण परंपरेला तडा देऊ नये अशी माझी सूचना आहे.

**उप सभापती** : या विषयासंबंधातील म.वि.प.नियम 93 अन्वयेची सूचना सभागृहात मांडण्यात आली असून त्यावर शासनाने निवेदन करण्याचे निदेश यापूर्वीच दिलेले आहेत.

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, यावर निवेदन करण्यात येईल.

......

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु. शी : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2010-2011, 2011-2012, 2012-2013, 2013-2014 या वर्षाचा अनुक्रमे त्रेपन्नावा, चौपन्नावा, पंचावन्नावा, छप्पनावा वार्षिक लेखा अहवाल व महालेखापाल कार्यालयाचे सन 2009-2010, 2010-2011, 2011-2012, 2012-2013 या वर्षांचे स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल (S.A.R.) ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) : (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षांचा अनुक्रमे चोवीसावा व पंचवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे (पाटील) विरोधी पक्षात असताना अहवाल विलंबाने ठेवण्यात येत असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित करीत होते. यापुढे तरी आता दरवर्षी अहवाल ठेवले जातील याची खबरदारी घ्यावी एवढीच मी त्यांना आठवण करून देत आहे.

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, हे मागील शासनाने साठवून ठेवलेले अहवाल आहेत. ते आम्ही तातडीने सभागृहामसोर ठेवावयाचे आहेत अशा सूचना दिल्यामुळे ते आता आले असून लगेचच मांडत आहोत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, अहवालाचे गठ्ठेच्या गठ्ठे बाहेर पडलेले असतात. आपल्या मार्फत आमची सरकारला विनंती आहे की, अहवाल आता सीडीच्या स्वरूपात दिले पाहिजेत. जेणे करून आपला पैसा वाचेल आणि ते अहवाल आम्हाला घरी जाऊन नीटपणे सविस्तरपणे वाचता येतील.

**उप सभापती** : आपण एक काम करावे. सभागृहाचे कामकाज देखील सीडीमध्ये नेऊन घरी बघावे.

.....

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "दिनांक 15 नोव्हेंबर 2006 रोजीच्या शासन निर्णयानुसार साधनसामुग्री खरेदीमध्ये रू.15.00 लाखापर्यंतची कामे सहकारी मजूर संस्थांना विना निविदा देण्यात येणे तथापि, आता खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी तीन लाखांपेक्षा अधिक रकमेसाठी ई निविदा पद्धतीचा अवलंब करण्यात येत असल्यामुळे मजूर सहकारी संस्था कामापासून वंचित राहात असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश बिनसाळे, अनिल तटकरे, ख्वाजा बेग, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.यांनी "अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात गेल्या आठ महिन्यात सुमारे 365 बालकांचा झालेला मृत्यू, या भागात एकूणच तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता व आरोग्य सेवेच्या दुरवस्थेमुळे कोट्यवधी रूपये खर्च होऊन सुद्धा त्याचा लाभ कुपोषित बालकांना होत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषि वनामती या संस्थेस चालू आर्थिक वर्षात उपलब्ध करून दिलेल्या 50 लाख रूपयांचा निधी पुण्याच्या कृषि आयुक्तालयाच्या नूतनीकरणासाठी बेकायदेशीर खर्च झाल्याचे दाखविल्यामुळे शासनाची झालेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण "जलसंपदा विभागातील सहायक अभियंता श्रेणी-2 या पदाकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेतून पात्र अभियंत्यांना 9 महिने होऊनही नियुक्ती न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दीपक साळुंके यांनी "आंतरराष्ट्रीय बाजारात दुधाच्या पावडरचे दर कमी झाल्यामुळे दुधाच्या भावात घट होणे, त्यामानाने पशु खाद्य व वैरण इत्यादींचे भाव कमी न होणे, यामुळे सुमारे 30 लाख दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "औरंगाबाद येथील आयबीएन लोकमत या वृत्त वाहिनीचे पत्रकार श्री.सिद्धार्थ गेडाम व बीड येथील दिव्य मराठीचे पत्रकार यांना क्रांतीचौक पोलीस ठाण्याचे पीएसआय श्री. सय्यद सिद्धीकी यांनी धमकावणे व मारहाण करून त्यांच्या विरूद्ध खोटा गुन्हा दाखल करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, आनंद ठाकूर वि.प.स.यांनी "महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी चंद्रपूर येथील औष्णिक विद्युत केंद्रात न धुतलेला कोळसा वापरत असणे त्यामुळे प्रदूषणात वाढ झाल्याने नागरिकांचे धोक्यात आलेले आरोग्य" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सूचना मी दालनात नाकारल्या आहेत.

........

**म.वि.प.नियम 93 अन्वयेच्या सूचनांच्या निवेदनासंबंधी.**

**उप सभापती** : आता म.वि.स.नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने घेण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी काल आपल्याला सूचना केल्याप्रमाणे आज आपण नियम 93 वरील निवेदन घेत असल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

**उप सभापती** : आपली सूचना तात्काळ अंमलात आणणारा मी माणूस आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** :मैत्राह वायू(कृष्णा) प्रा.लि. या कंपनीने 29 कोटी रकमेचा मुद्रांक महसूल बुडवणे याबाबत श्री. अमरसिंह पंडित वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक दोन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मैत्राह वायू(कृष्णा) प्रा.लि. या कंपनीने दिनांक 27/6/202013 व दिनांक 11/12/2013 रोजी सब रजिस्ट्रार कार्यालय, अहमदनगर येथे रु.583.85 कोटी कर्जाबाबत गहाणखत व दुरूस्ती गहाणखत करण्याबाबत मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. या विषयाच्या संदर्भात उत्तरामध्ये आपण मान्य केले आहे की, प्रत्येक दस्तावर जास्तीत जास्त 10 लाख रुपये मर्यादेच्या अधीन राहून मुद्रांक शुल्क आकारणी करून दिलेली आहे व त्याच्या खाली म्हटले आहे की, यासंदर्भात चौकशी करीत आहोत. याप्रकरणामध्ये काही तरी चूक झ ााल्यामुळेच आपण चौकशी करीत आहात. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात मंत्री महोदयानी सविस्तर निवेदन करतील काय ?.

श्री. एकनाथराव खडसे(पाटील) : सभापती महोदय, महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमाला अनुसरून जी काही प्रॉपर्टी आहे ती प्रॉपर्टी बँकेला देण्यात आलेली नसल्यामुळे या कायद्यातील कलम 40(ब) नुसार आपण यामध्ये जास्तीत जास्त 10 लाख रुपये मुद्रांक शुल्क घेऊ शकतो. त्यामुळे ज्या ज्या वेळेस व्यवहार झालेले आहेत त्या त्या वेळेस त्यांच्याकडून पैसे वसूल करण्यात आलेले आहेत. परंतु सूचनेमध्ये आपण शका उपस्थित केल्यामुळे फेर चौकशी करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मॉर्गेज करण्याच्या संदर्भात नियम असून या प्रकरणाच्या संदर्भात एसबीआय बँकेकडे चौकशी केली असताना बँकेमार्फत मॉर्गेज करण्यात आलेली आहे. या प्रकरणात संबंधितांनी पैसे सुध्दा उचलले आहेत. त्यामुळे यासंदर्भात चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

श्री. एकनाथराव खडसे(पाटील) : सभापती महोदय, ठीक आहे. सदर प्रकरणाची फेर चौकशी करण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी जी सूचना दिलेली आहे त्यातील निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की, 583.85 कोटी कर्जाबाबत गहाणखत व दुरूस्ती गहाणखताची नोंदणी करण्यात आली आहे. याचा अर्थ गहाणखत झाले आणि त्याची नोंदणीही झाली. असे असताना किमान दराने शुल्काची आकारणी करण्याचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे.. ..

कारण काय ? गहाणखताची नोंद करुन जर कर्जाची उचल झाली असेल तर नियमाप्रमाणे संबंधितांकडून पैशांची आकारणी करुन दंड वसूल केला जाईल काय ? आकारणी व दंड वसूल न झाल्यास गहाणखत रद्द केले जाईल काय ?

श्री. एकनाथराव खडसे(पाटील) : सभापती महोदय, गहाणखत करणे वेगळे असून प्रत्यक्ष मालमत्ता ताब्यात घेणे या बाबी वेगळया आहेत. महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमान्वये या ठिकाणी कलम 31 अन्वये कलेक्टरांमार्फत अभिनिर्णीत करुन घेण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर अधिनियमाच्या अनुसूची एक अन्वये व अनुच्छेद 40(ब) नुसार आपण जास्तीत जास्त 10 लाख रुपये मुद्रांक शुल्क आकारु शकतो व त्याप्रमाणे वसुली करण्यात आलेली आहे. ज्या ज्यावेळेस गहाणखताचे व्यवहार होतील त्या त्यावेळी जास्तीत जास्त 10 लाख रुपये मुद्रांक शुल्क आकारण्यासंबंधीची कायद्यात तरतूद आहे. जर एकवेळ मुद्रांक रजिस्टर केले तेव्हा त्यांच्याकडून 10 लाख रुपये घेतले गेले,दुसऱ्यांदाही मुद्रांक रजिस्टर केले असून त्यावेळेसही 10 लाख रुपये घेतले गेले आहे. परंतु वरील मालमत्ता प्रत्यक्ष बँकेच्या ताब्यात दिलेली नाही त्यामुळे अनुच्छेद 40 (ब) नुसार मुद्रांक शुल्क आकारणीची जी कमाल मर्यादा आहे त्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त आकारणी आपल्याला करता येत नाही. त्यामुळे आपल्या सूचनेनुसार या प्रकरणाची चौकशी आरजीआरच्या माध्यमातून केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** :औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथील संत एकनाथ सहकारी साखर कारखाना ताब्यात घेण्यासाठी 10 कोटी रुपयांची अट असताना अवघे दीड कोटी रुपये देऊन गाळप सुरु करणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक तीन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती होदय, आपल्या राज्यात मोठया प्रमाणात सहकारी कारखानदारी वाढली आहे. परंतु वेगवेगळया कारणामुळे आता सहकारी कारखानदारी अडचणीत आलेली आहे. त्यामुळे एक पर्यायी व्यवस्था म्हणून साखर कारखाने भाडे तत्वावर किंवा सहभाग तत्वावर खाजगी लोकांना चालवण्यास देण्याची प्रथा या राज्यात सुरु झाली. पैठण येथील संत एकनाथ सहकारी साखर कारखाना एका खाजगी विकासकाने सन 2014-2015 पासून 18 वर्षे कालावधीसाठी सहकारी तत्वार चालवावयास घेतला. 18 वर्षाची जी कालमर्यादा ठरवून दिली जात असताना ही कालमर्यादा कोणत्या निकषावर दिली जाते? 18 वर्षाच्या कालावधीमध्ये या कारखान्याची आर्थिक घडी कशा प्रकारे राहणार आहे याची माहिती दिली जात असते. या विषयाच्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी निवेदनामध्ये तपशीलवार माहिती दिलेली असून त्यानुसार या कारखान्यावर कोणतीही कारवाई होणार नाही हे स्पष्ट होते. एकदा करार झाल्यानंतर जेव्हा अडचण निर्माण होते त्यावर उपाय म्हणजे ज्यांना हा साखर कारखाना सहकारी तत्वावर चालवावयास दिला आहे त्याचा फेर विचार करण्याची आवश्यकता आहे. ऊसाचा गळीत हंगाम सुरु झाल्यानंतर कारखाना सुरु व्हावा यासाठी आपण कारखाना चालवावयास देत असतो. परंतु हंगाम सुरु झाल्यानंतरही कारखाना सुरु न होता त्यामध्ये अधिकचे गैरव्यवहार केले जातात. असे कारखाने ऊसाचे गाळप न करता कारखान्याच्या मालमत्तेकडेच जास्त लक्ष देत असतात. साखर उत्पादनाच्या मूळ हेतूकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात असते. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात फेरविचार करतांना सदर कारखान्याने नियमांची पूर्तता न केल्याबद्दल शासन कोणती कारवाई करणार आहे यासंदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करण्याची आवश्यकता आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये साखर कारखानदारी मोठया प्रमाणात अडचणीत आहे. साखर कारखाने मोठया प्रमाणात कर्जात अडकले असल्यामुळे त्यांच्यांकडून जमीन विकण्याचे प्रस्ताव येत असतात, कारखाना भाडयाने देण्याचा विषय सुध्दा येत असतो. या वर्षी राज्यातील सर्व कारखाने संपूर्ण क्षमतेने चालवले तरी संपूर्ण ऊसाचे गाळप होणार नाही अशी परिस्थिती आहे. कारखाना मूळ संचालकाला चालविता येत नसल्यामुळे तो भाडे तत्वावर चालवण्याची पनवानगी देण्यात यावी असा प्रस्ताव शासनाकडे येतो तेव्हा सर्व विचार करुन कारखाना भाडे तत्वावर चालवू



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .. ..

देण्याची परवानगी दिली जाते. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना 18 वर्षापर्यंत चालविण्यासाठी सहकारी तत्वावर देण्यात आलेला असल्यामुळे याठिकाणी त्यांच्या प्रॉपर्टीचा कोणताही विषय येत नाही तर हा कारखाना भाडयाने चालविण्याचाच विषय आहे. या साखर कारखान्याने 31 मार्च, 2015 अखेर 8 कोटी रुपये शासनाला द्यावयाचे असून त्यांनी शासनाला भागभांडवल म्हणून 1.69 कोटी रुपये दिलेले आहेत. त्यांना 8 कोटी रुपये 31 मार्च पूर्वी भरावयाचे असून हे 8 कोटी रुपये भरण्यासाठी सदर मे. सचिन घायाळ कंपनी 4 हप्त्यात दोन दोन कोटी रुपये भरण्याची परवानगी मागत आहे. 4 हप्त्यामध्ये 8 कोटी रुपये भरण्याची परवानगी दिली तरी त्यांच्याकडून आपल्याला 8 कोटी रुपयांची बँक गॅरंटी लागणार आहे. 8 कोटी बँक गॅरंटीच्या संदर्भात आम्ही दर वर्षी 2 कोटी रुपयांची बँक गॅरंटी देऊ असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या प्रस्तावाबाबत सरकार विचार करीत असून यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझ्या माहितीनुसार सदर कारखाना यापूर्वीही चालविण्यास देण्यात आला होता. या कारखान्यावर वेगवेगळया बँकेचे एकंदर कर्ज किती आहे ? सदर कपंनी 18 वर्षानंतर रिपेमेंट करणार आहे. परंतु या कंपनीला कारखाना चालविण्याचा काही अनुभव आहे काय ? यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारे जे कारखाने चालविण्यास घेतले जातात त्यातील बरेच कारखाने एक वर्षानंतर करारनामे तोडून निघून जातात. त्यामुळे या कारखान्याच्या मालमत्तेवर जे कर्ज आहे त्या कर्जाचे रिपेमेंट कसे केले जाणार आहे ? या कारखान्यावर कामगारांची एकूण किती देणी बाकी आहे याची माहिती या ठिकाणी मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, अशाप्रकारच्या प्रस्तावाची पुरेशी छाननी करुन निर्णय घेण्यात येतो. त्यामुळे त्या कंपनीची क्षमता आहे हे पाहून निर्णय घेतलेला आहे. सदर कारखान्याकडे एकूण 98 कोटी 19 लाख रुपये इतक्या रकमेची देणी आहेत. त्यापैकी मे.सचिन घायाळ शुगर प्रा.लि.पुणे या संस्थेने 57 कोटी 31 लाख रकमेची देणी स्वीकारलेली आहे. त्यामध्ये वित्तीय संस्थांची देणी 24 कोटी 30 लाख रुपये, शासकीय देणी 16 कोटी 9 लाख रुपये आणि इतर देणी 16 कोटी 92 लाख रुपये आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, निवेदनात नमूद केलेले आहे की, या कारखान्यास अद्याप गाळप परवाना देण्यात आलेला नाही. दिनांक 11.12.2014 अखेर पर्यत या कारखान्याने 38 हजार 660 मे.टन ऊसाचे गाळप केले आहे. माझा प्रश्न आहे की, कारखान्याकडे गाळप परवाना नसताना त्या कारखान्याने गाळप कसे केले, त्या कारखान्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे या साखर कारखान्याकडे कोणताही अनुभव नाही. त्यांनी कागदपत्रांमध्ये हेराफेरी केलेली आहे तसेच गाळप परवाना नसताना गाळप केलेले आहे. तेव्हा शासन त्या कारखान्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, साखर कारखाना भाडेतत्वावर द्यायचा असेल तर मिटकॉन या संस्थेकडून फायनान्शिअल मॉडेलिंग रिपोर्ट घेण्यात येतो. त्या रिपोर्टनुसार निर्णय घेण्यात येतो. साखर कारखाना भाडेतत्त्वार द्यावयाचा असेल तर त्या संदर्भात वर्तमानपत्रात निविदा दिली जाते. निविदेद्वारे प्राप्त झालेल्या अर्जातून एका कंपनीची निवड केली जाते. त्या कंपनीस अनुभव आहे किंवा कसे हे सरकारने पाहिलेले नाही तर ते काम मिटकॉन संस्थेने केलेले आहे. गाळप काढण्याचा परवाना नसताना जर गाळप करण्यात आले असेल, तर त्या विरुध्द फौजदारी गुन्हा करण्याची तरतूद नाही. परंतु असे झाले असेल तर प्रतिटन 100 रुपयें दंड आणि प्रत्येक दिवसाला 1 हजार रुपये दंड अशी शिक्षेची तरतूद आहे. त्या साखर कारखान्याकडून हा दंड आकारण्यात येईल. एकदा गाळप सुरु झाल्यानंतर तो बंद करुन त्या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान करणे योग्य होणार नाही. परंतु शासन त्या कारखान्याला दंड करणार आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, गाळप बंद करा असे आमचे म्हणणे नाही. परंतु चुकीच्या पद्धतीने निर्णय होऊ नयेत. शासनाने निवदेनात म्हटले आहे की, साखर कारखान्यास गाळप काढण्याचा परवाना दिलेला नाही. तेव्हा त्या साखर कारखान्याने गाळप परवाना नसताना गाळप केले म्हणून नियमानुसार त्यांना दंड करणार काय ? कामगारांची देणी देण्यासंदर्भात शासन पावले उचलणार काय आणि या संदर्भातील निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येईल काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, साखर कारखान्याकडे गाळप काढण्याचा परवाना नसताना गाळप केले म्हणून दंड करणार आहोत असे अगोदरच सांगितलेले आहे. कामगारांची देणी देण्यासाठी अधिवेशन संपण्यापूर्वी संबंधितांशी बैठक घेऊन देणी देण्याचे टाईम टेबल ठरविण्यात येईल.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : .सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निष्काळजीपणामुळे गर्भधारणेपासून प्रसुतीनंतर संबंधित आजारामुळे विदर्भासह राज्यभरात मातांचे होत असलेले मृत्यू याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.दीपक सावंत (सार्वनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:40

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, राज्यात माता मृत्युचे प्रमाण वाढत असल्याबाबत मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यावर देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, "माता मृत्यू झालेले आहेत हे खरे असले तरी हे मृत्यू आरोग्य विभागाच्या निष्काळजीपणामुळे झ ाालेले नाहीत." माता मृत्यूचे प्रमाण कमी व्हावेत म्हणून एनआरएचएमच्या सिस्टीममध्ये अधिक चांगल्या पद्धतीने सुधारणा व्हावी यासाठी माननीय मंत्री या बाकावर असताना त्यांनी सरकारला चांगल्या सूचना केल्या होत्या. या सिस्टीमध्ये असलेले दोष दूर करण्याबाबत आपण एकत्रित चर्चा करुन ते दोष दूर करण्यास शासनास भाग पाडले होते. राज्यात माता मृत्यू होत आहेत हे सरकारला मान्य आहे. जर माता मृत्यू झाले असतील तर त्यामध्ये निश्चितपणे निष्काळजीपणा झालेला आहे. माता महिलेवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा निष्काळजीपणा आहे, औषधोपचाराचा आहे की अन्य कोणत्या कारणांमुळे माता मृत्यू झालेले आहेत याची माहिती मंत्री महोदय देतील काय, माता मृत्यू रोखण्यासाठी शासन कोणती उपाय योजना करणार आहे ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, गेल्या वर्षभरात विदर्भामध्ये एकूण 208 माता मृत्यू झाले आहेत हे खरे आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, माता मृत्युची कारणे काय आहेत. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाले की अन्य कोणत्या कारणामुळे झाले असेही त्यांनी विचारले. मी आपल्या माध्यमातून सभागृहासमोर काही आकडेवारी देतो. सन 2010 ते 2012 या काळात भारतामध्ये साधारणपणे 178 माता मृत्यू झाले आहेत. केरळ राज्यात 66, महाराष्ट्रात 87, आणि तामिळनाडू राज्यात 209 माता मृत्यू झाले. माता मृत्यू झाले हे खरे आहे आणि ही बाब महाराष्ट्राला भूषणावह नाही हे देखील मान्य आहे. या मृत्यूमागे काही कारणे आहेत. ज्यावेळी महिला प्रसुतीसाठी जाते त्यावेळी बाळाचे शोल्डर प्रेझेन्टेशन होणे किंवा सुरुवातीलाच बाळाचे पाय बाहेर येणे अशी अडचणीची प्रसूती होणे हे एक महत्वाचे कारण आहे. दुसरे कारण म्हणजे त्या मातेला प्रसूतीच्या काळामध्ये शेवटच्या तीन महिन्यामध्ये डायबेटीस, ब्लड प्रेशरचा त्रास होणे किंवा सेप्टीप इन्फेक्शन होणे. तिसरे कारण म्हणजे प्रसूतीनंतर खूप ब्लीडींग होणे, या तीन कारणांमुळे माता मृत्यू होतात. सन्माननीय सदस्यांनी मातेवर उपचार करण्यामध्ये डॉक्टरांकडून निष्काळजीपणा झाला अशी स्पेसिफीक केस सांगितली तर त्याबाबत चौकशी करुन त्या आरोग्य केंद्राच्या प्रमुखा विरुद्ध जरुर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

..5..

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, माता मृत्यू होऊ नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. त्याबाबत सांगू इच्छितो की,आपण आदिवासी विभागामध्ये अनेक योजना राबवितो त्यामध्ये जननी सुरक्षा योजना आहे, नव संजीवनी योजना आहे, मानव विकास योजना आहे. जननी सुरक्षा योजनेमध्ये मातेची इन्स्टिटयुशनल डिलिव्हरी व्हावी म्हणून आपण जास्तीत जास्त प्रयत्न करतो आणि हे मी समोरच्या बाकावर असताना देखील सांगितलेले आहे. त्या योजनेमध्ये मातेला 500 रुपये इन्टेन्सिव्ह म्हणून देण्यात येतात. ती महिला स्वत: खर्च करुन वाहनाने आली तर तिला वेगळे 100 रुपये देण्यात येतात. ती महिला ग्रामीण भागातील असेल तर तिला 200 रुपये देण्यात येतात. म्हणजे आपण मातेला 700 रुपये देतो. नव संजीवनी योजनेमध्ये मातेला 400 रुपये देतो. त्याशिवाय औषधांसाठी वेगळे 400 रुपये देतो. ती रक्कम कॅशमध्ये न देता काईन्डमध्ये देतो. मानव विकास योजनेंतर्गत प्रत्येक मातेला चार हजार रुपये दिले जातात. म्हणजे एका आदिवासी मातेला इन्स्टिटयुशनल डिलिव्हरी व्हावी म्हणून किंवा त्या मातेने प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रसूतीसाठी यावे म्हणून साधारणत: 5100 रुपये शासन देते. त्याशिवाय शेवटच्या तीन महिन्यांमध्ये 400 रुपयांची औषधे मोफत दिली जातात.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 12:50

डॉ.दीपक सावंत....

जी महिला खेड्यापाड्यात राहते, डोंगराळ भागात राहते तिला माहेर योजनेंतर्गत प्रसूतीच्या 8 दिवस अगोदर देखरेखीसाठी रुग्णालयात दाखल करुन घेण्यात येते. त्या महिलेची प्रसूती झाल्यानंतर तिला माहेरवाशीण म्हणून ट्रिट करण्यात येते. तिला आणि तिच्या सोबत असलेल्या एक व्यक्तीला जेवण पुरविले जाते. अशा प्रकारे राज्यात जननी सुरक्षा योजनेचे 4 लाख 3 हजार 460 लाभार्थी आहेत. या विषयाबाबत जास्तीत जास्त विचार करुन हे मृत्यू कमी करण्याचे धोरण शासनाने अवलंबिले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, माननीय मंत्र्यांचे आरोग्य क्षेत्रात काम आणि अभ्यास आहे. माझ्या माहितीनुसार त्यांनी नुकतीच मेळघाट येथे भेट दिली होती. मेळघाटच्या परिसरात जे मृत्यू झालेले आहेत त्या संदर्भात कोठेना कोठे यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाले हे सन्माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आले आहे काय ? तसेच दुसरी बाब अशी की, त्यांनी विरोधी पक्षात असताना वारंवार मागणी केली होती की, कुपोषणाच्या बाबतीत शासनाने श्वेतपत्रिका काढावयास पाहिजे. या निमित्ताने मी त्यांना विचारु इच्छिते की, आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपण काय कृती करणार आहात आणि तशा प्रकारचा निर्णय शासन घेणार काय ?

डॉ.दीपक सावंत : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, प्राथमिक आरोग्य केंद्रात, सरकारी रुग्णालयात अनेक त्रुटी आहेत ही गोष्ट मी मान्य करतो. सन्माननीय सदस्यांनी कुपोषणाच्या बाबतीत श्वेतपत्रिका काढण्याचा आग्रह धरला तर श्वेतपत्रिका काढण्यास माझी तयारी आहे. या विषयाच्या संदर्भात आजपर्यंत काय झाले आणि भविष्यात काय करणार आहोत, या बाबतची माहिती कोणत्याही माध्यमातून देण्यास मी तयार आहे.

श्री.सुनील तटकरे : महोदय, मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, श्वेतपत्रिका काढत असताना मागच्या सरकारने काय उपाययोजना केल्या हे सुध्दा त्यात नमूद करावे. कारण आपण निवेदनामध्ये कबूल केले आहे की, राज्यात माता मृत्यूचे प्रमाण घटलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : होय. श्वेतपत्रिका काढल्यास त्यामध्ये दोन्ही बाजूंचा समावेश करण्यात येईल. तसेच विभागाचे भविष्यात काय प्रयोजन असेल ते सुध्दा त्या माध्यमातून समोर येईल.

---------

..2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत

**उप सभापती** : आता म.वि.प. नियम 260 अन्वये गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीबाबतच्या प्रस्तावरील चर्चेस सुरुवात करु या. या चर्चेला प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी मी निदर्शनास आणून देतो की, या प्रस्तावावर माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह 2 तास 40 मिनिटे चर्चा होईल. मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, आपणास उत्तरासाठी किती वेळ लागेल ?

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, मला उत्तरासाठी 30-40 मिनिटे लागतील.

**उप सभापती** : सत्ताधारी आणि विरोधी पक्षाला प्रत्येकी 1 तास चर्चेसाठी देण्यात येईल. उर्वरित 40 मिनिटे माननीय मंत्र्यांना उत्तरासाठी देण्यात येतील.

श्री.सुनील तटकरे : महोदय, सत्ताधारी पक्षाला देण्यात येणारी वेळ ही उत्तरासह असते.

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) : महोदय, या सभागृहात अजून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला सुध्दा उत्तर देणे बाकी आहे. विधानसभा सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेला उत्तर दिलेले आहे. त्या संदर्भातील बातम्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या आहेत. विधानसभा सभागृहात जे उत्तर दिलेले आहे त्यापेक्षा मला काही नवीन सांगायचे नाही. त्या चर्चेचे उत्तर देण्यास मी तयार आहे. त्या चर्चेवरील उत्तर द्यायचे आहे म्हणून ते द्यावे लागेल.

**उप सभापती** : ठीक आहे. आता म.वि.प. नियम 260 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

**पृ. शी.** : अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे राज्यातील बहुतांश भागात शेती व फळबागांचे नुकसान होणे

**मु. शी.** : अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे राज्यातील बहुतांश भागात शेती व फळबागांचे नुकसान होणे, या विषयावर सर्वश्री सुनील तटकरे, जयवंतराव जाधव, जयंत प्र.पाटील, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, आनंद ठाकूर, धनंजय मुंडे वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व राज्यातील बहुतांश भागामध्ये दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजी झालेला अवकाळी पाऊस तसेच गारपिटीमुळे आंबा, काजू, केळी, कापूस, धान, सोयाबीन, ज्वारी, डाळिंब, द्राक्ष, ऊस, कांदा, टोमॅटो इ. फळबागांचे, पीक व भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल व उध्वस्त होणे, शेतकऱ्यांची पाळीव जनावरे मृत्युमुखी पडणे, अगोदरच दुष्काळामुळे होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या हातातोडांशी आलेला घास पुन्हा हिरावून घेणे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत शासनाची मदत मिळालेली नसताना अवकाळी पाऊस व गारपिटीने पुन्हा नुकसान होणे, शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंतेचे व नैराश्याचे वातावरण निर्माण झाल्यामुळे शासकीय यंत्रणेने तातडीने नुकसानीचे वस्तुस्थितीदर्शक पंचनामे करुन राज्यातील शेतकऱ्यांना या परिस्थितीतून सोडविण्यासाठी त्यांच्या पिकाच्या झालेल्या नुकसानीनुसार तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये मदतीबाबत सुधारित निकष ठरवून विशेष आर्थिक पॅकेज देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, राज्यात गेल्या दोन दिवसांत उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व राज्यातील बहुतांश भागामध्ये दिनांक 12, 13 व 14 डिसेंबर, 2014 रोजी झालेला अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळेच आम्ही नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

महोदय, अधिवेशनाचे काम 8 दिवसांपूर्वी सुरु झाले. पहिल्या आठवड्यात राज्यभरात जी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली त्या बाबत चर्चा घेण्यात आली. पण सरकारने अजूनपर्यंत दुष्काळ जाहीर केला नाही. 1972 च्या भीषण दुष्काळासारखे चटके या राज्यातील जनता अनुभवत आहे. गेल्या महिन्या-दोन महिन्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. म्हणून त्यावेळी या विषयी सभागृहात गांभीर्याने चर्चा केली. त्या चर्चेला उत्तर देताना राज्यातील 10-12 कोटी जनतेला अभिप्रेत होते की, दुष्काळाच्या संदर्भात राज्य सरकार आपली भूमिका स्पष्ट करेल. परंतु काही उपयोग झाला नाही.

महोदय, आताच्या दुष्काळाची 1972 च्या दुष्काळाशी तुलना करताना त्याच्या भीषणतेचे वास्तव राज्यात मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्याचे चित्र आपण अनुभवत आहोत. राज्यात गेल्या महिनाभरात वाढलेल्या आत्महत्या या आपल्या सर्वांना चिंता करायला लावणाऱ्या आहेत. या विषयी केवळ सरकारनेच या बाबतीत साधकबाधक विचार करावा असे नाही. राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, समाज जीवनात काम करणारे वेगवेगळी व्यक्तिमत्वे असतील, या सर्वांनी या विषयी गांभीर्यपूर्वक विचार करण्याची आवश्यकता भासत आहे. सरकारने दुष्काळाच्या बाबतीत जी भूमिका घेतली, पॅकेजच्या नावाखाली जे जाहीर केले, त्या संदर्भात आम्ही त्याच वेळी तीव्र नापसंती व्यक्त केली होती. कारण सरकारने जाहीर केलेले पॅकेज हे केवळ 3975 कोटी रुपयांचे होते. ते 2 लाख 72 हजार हेक्टर क्षेत्र व्यापणाऱ्या शेती संदर्भात होते. त्यामुळे हेक्टरी अनुदान द्यावे अशा प्रकारची आम्ही मागणी केली होती. साधा गुणाकार-भागाकार केला तरी हेक्टरी मिळणाऱ्या अनुदानाचे प्रमाण 1400-1500 च्या आसपास येते.

महोदय, आता राज्यातील शेतकऱ्यांवर अस्मानी-सुलतानी संकट आले आहे. विशेषत: बागायती शेती करणारा शेतकरी जळगाव, नाशिक या भागात आहे. राज्याच्या पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या भागात सुध्दा आहे. या भागात खरीप पीक घेणारा शेतकरी आहे. निसर्गावर अवलंबून असणारे शेतकरी एका बाजूला खरीप पीक घेतात. त्याच प्रमाणे दुसऱ्या बाजूला नैसर्गिक आणि भौगोलिक परिस्थितीनुसार रब्बी पीक घेतले जाते. अलीकडच्या काळात ऋतुमानानुसार निसर्ग वागत नाही ही वस्तुस्थिती आहे. ग्लोबल वार्मिंगचे परिणाम सबंध राज्याला, देशाला आणि जगाला भोगावे लागत आहेत. परंतु या सर्व भीषणतेचे आणि वास्तवतेचे चटके बळीराजाला

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

भोगावे लागत आहेत. आपल्या शेतीत 12-12 महिने राबणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबली वार्मिंगचे परिणाम भोगावे लागत आहेत. ग्लोबल वार्मिंगमुळे कदाचित या दिवसात पाऊस पडला तर आपण हातामध्ये छत्री घेऊ शकतो. परंतु ग्लोबल वार्मिंगच्या परिणामामुळे गारपीट झाली तर त्या शेतकऱ्याने कष्टाने लावलेल्या बागा उद्ध्वस्त होता. कारण तो शेतकरी छत्री घेऊन त्या बागांचे संरक्षण करु शकत नाही. आपल्याला माहीत आहे की, उत्तरेकडील अनेक राज्यामध्ये बर्फवृष्टी होते. परंतु गेल्या काही वर्षात या राज्यामध्ये ग्लोबल वार्मिंगमुळे गारपिटीच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे चित्र निर्माण होत आहे.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

काल उत्तराच्या भाषणात माननीय मंत्र्यांनी शेतकऱ्यांकडून आत्महत्या होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. आपण वेगवेगळे दीर्घकालीन उपाययोजना करून शेतकऱ्यांच्या आत्महत्या आटोक्यात आणण्याच्या बाबतीतील सर्व प्रयत्न सर्व स्तरांवर नक्की करू, असे सांगितले होते. पण आता जे संकट आले आहे ते पूर्णपणे नैसर्गिक आहे. पाण्याची उपलब्धता नाही म्हणून आलेले हे संकट नाही. अवकाळी पाऊस झाला, गारपीट झाली, हाता-तोंडाशी आलेला घास गेला. आपण गेले 2-3 दिवस विदारक चित्र पाहत आहोत. दूरचित्र वाहिन्यांवर शेतकरी त्या संदर्भात भावना व्यक्त करीत आहेत, त्यांना त्यांच्या डोळ्यांतील अश्रू थांबविता येत नाहीत, त्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास गेला आहे. द्राक्ष, डाळिंब पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जळगाव सारख्या प्रगत जिल्ह्यात मेहनत करून प्रचंड प्रमाणात उत्पादन केलेल्या केळीच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मी गेली अनेक वर्षे कोकणात सार्वजनिक क्षेत्रात काम करीत आहे. माझ्या कोकणातील आंबा, काजू, भात या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाला या संदर्भातील संवेदना निश्चितपणे दाखवाव्या लागतील.

सभापती महोदय, आता आपल्याला गेल्या आठवड्यात शासनाने जाहीर केलेल्या मदतीवर थांबून चालणार नाही. गेली 15 वर्षे राज्याला अशा पध्दतीच्या आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे. सन 2000 च्या आसपास लोकशाही आघाडीचे सरकार आले आणि त्यानंतरच्या काळात अतिवृष्टी आली. त्यामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना सुध्दा मदत करण्याची भूमिका त्या काळात शासनाने घेतली. आता नियम 93 च्या निवेदनाच्या बाबतीत बोलले गेले की, अजून गाळप हंगाम सुरू झाला नाही. माननीय सहकार मंत्र्यांनी मघाशी सांगितले की, यावर्षी गाळपाविना ऊस शिल्लक राहणार आहे. सन 2003-04 मध्ये सुध्दा राज्यात अशाच पध्दतीने ऊसाचे विक्रमी उत्पादन झाले होते व त्यावेळीही गाळपाविना ऊस शिल्लक राहिला होता. त्यावेळच्या सरकारने सन 2003-04 मध्ये गाळपाविना राहिलेल्या ऊसाच्या संदर्भात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याच्या हेतूने हेक्टरी 25 हजार रूपये अनुदान देण्याची भूमिका घेतल्याचे चित्र आपल्याला निश्चितपणे आठवत असेल. माझा मथितार्थ हाच आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या अंगाखालचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे. वेगवेगळ्या कारणाने ते कमी होत आहे. राज्य शासन, केंद्र शासन यांच्या विविध योजनांसाठी संपादित केलेल्या जमिनींचे क्षेत्र वाढत आहे. त्यामुळे ते कदाचित होत आहे. नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे सुध्दा होत आहे. शेतकऱ्यांच्या कुटुंबाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे सुध्दा हे होत आहे. एका शेतकऱ्याच्या मागे जेवढे क्षेत्र पूर्वीच्या काळात होते, त्यापेक्षा ते कमी झाले आहे, असे आपल्याला अनुभवायला मिळत आहे. उपलब्ध असलेल्या क्षेत्रामध्ये नवीन प्रयोग करणे गरजेचे आहे. फळबागांच्या लागवडीच्या संदर्भात शेतकरी जागरूक आहे. नवीन कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याची मानसिकता आता नवीन पिढीतील शेतकऱ्यांच्या मनात मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जगाच्या बाजारपेठेत कृषी क्षेत्रामध्ये आज भारताचे गौरवशाली स्थान निर्माण झाल्याचे आपण पाहू शकत आहोत. फळबागाच आता शेतकऱ्यांना जीवनदायी ठरू शकणार आहेत. केवळ खरीपाच्या आणि रब्बीच्या पिकांवर अवलंबून असलेला शेतकरी फळबागाच्या लागवडीकडे मोठ्या प्रमाणात वळला आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात त्यांना फळबागांची जोडधंद्यासारखी मदत होऊ शकेल, असा क्रांतिकारी निर्णय सन 1992-93 च्या आसपास आदरणीय श्री. शरद पवार साहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना घेतला गेला. रोजगार हमी योजनेची सांगड फळबागाच्या योजनेमध्ये घालण्यासंबंधीचा निर्णय त्या काळात घेतला गेला. त्यामुळेच आज राज्यात विशेष करून माझ्या कोकणामध्ये प्रचंड प्रमाणात आंबा, काजूची लागवड झाल्याचे चित्र पहायला मिळू शकते. एकेकाळी वाडवडिलांनी, आजोबांनी, पणजोबांनी लावलेल्या आंबा, काजूच्या बागांवर अवलंबून असणारा माझा आंबा, काजू उत्पादक शेतकरी आता नव्याने आंबा, काजूच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याची मानसिकता तयार करीत आहे आणि अशाच वेळी अवकाळी पाऊस झाला.

सभापती महोदय, परवा दिवशी झालेला अवकाळी पाऊस, गारपीट शेतकऱ्यांचे जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त करणारी ठरली. सुदैवाने आमचे माननीय महसूल मंत्री जळगावचे आहेत. जळगाव जिल्ह्याने केळी उत्पादनाच्या बाबतीत राज्यातच नव्हे तर देशात अग्रगण्य स्थान मिळविले. नाशिक जिल्ह्यात कष्टकरी शेतकरी आहेत. पाणी कुठे व किती द्यावे, याचे वादविवाद असतील.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

परंतु, शेतकऱ्यांच्या कष्टाबद्दलचे वादविवाद कोणाच्या मनात राहू शकत नाहीत. द्राक्ष उत्पादन करणारा शेतकरी आहे. नगदी पिकांचे उत्पादन करणारा शेतकरी आहे. त्याच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली तशी दर हेक्टरी, एकरी खर्चामध्ये सुध्दा वाढ झाली आहे आणि त्याच्या कष्टामध्ये सुध्दा वाढ झाली आहे. त्याला रात्री अवेळी, विवक्षित वेळ न ठेवता, शेतात, द्राक्षांच्या, डाळिंबाच्या, बोरांच्या, आंब्यांच्या, काजूच्या बागांमध्ये जावे लागते. त्याला सतर्कपणे लक्ष देऊन काम करावे लागत आहे. खरीपाची पिके निसर्गावर अवलंबून असल्यामुळे त्यावर लागणारे कष्ट एका बाजूला आहेत, पण फळबाग शेतकऱ्यांना त्याबाबतीत सतत सतर्क रहावे लागत असते. मोठ्या प्रमाणात त्या संदर्भातील वेगवेगळे उद्योग तयार होत असतात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये निर्यातीच्या माध्यमातून कृषी मालाची मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे. परिणामी, देशाच्या परकीय चलनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे चित्र गेल्या काही वर्षांत आपल्याला पहायला मिळत आहे. शेतकऱ्यांची निर्माण झालेली अवस्था भीषण आहे. काल परवा केंद्रीय समिती आली. आपण दिल्लीला गेला. केंद्रीय समिती पाहणी करीत आहे. केंद्रीय समिती मराठवाड्याच्या भागात पाहणी करीत आहे. पश्चिम महाराष्ट्र किंवा ज्या ठिकाणी दुष्काळजन्य परिस्थिती आहे त्या ठिकाणी पाहणी करणे आवश्क आहे, यामध्ये दुमत नाही. पण त्याच केंद्रीय समितीला गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची सुध्दा पाहणी करायला लावणे अत्यंत अवश्यक आहे. आता गोलमाल करून पॅकेज देऊन थांबता येणार नाही. आता शेतकऱ्याला, बागायतदारांना हेक्टरी मदत करण्याची आवश्यकता आहे. वर्ष अखेरच्या कालखंडात आंब्याच्या पिकाला मोहोर येण्यास सुरूवात होते. पीक सर्वसाधारणपणे जानेवारी, फेब्रुवारीमध्ये येते. अलीकडच्या काळात बाजारात आंबा केव्हा येईल याची उत्सुकता सर्व स्तरावर असल्याचे दिसत आहे. गेल्या वेळी शेवटच्या टप्प्यामध्ये कीड आल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. शासनाने त्यांना हेक्टरी 15 हजार रूपयांचे अनुदान देण्याची भूमिका घेतली. आज तर पीकच येणार नाही. गेल्या वर्षी पीक येण्याच्या निम्म्या स्थितीत आल्यानंतर आंब्यावर रोग पडला. आज द्राक्ष पीक हातामध्ये येणार नाही. जे काही पीक येईल त्यांना काही तुटपुंजी मदत देऊ. पण त्यातून तो सावरला जाईल, असे नाही. या वर्षीचे पीक शंभर टक्के

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

उद्ध्वस्त झाले आहे. केळीचे पीक 2-3 वेळा रोटेशनने येत असते तर बरे झाले असते. केळीची झाडे उद्ध्वस्त झाली आहेत. 4-4 किलोंच्या गारा पडतात त्यावेळी झाडाचे अस्तित्वच शिल्लक राहील की नाही अशी चिंताजनक स्थिती निर्माण होत असते. मी आकडेवारीमध्ये जाणार नाही. फळबागा पूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या आहेत. हे एक दुष्ट कालचक्र आहे. प्रत्येक गोष्टीशी संबंधित अनेक गोष्टी आहेत. नाशकातील द्राक्ष उत्पादन करणारा शेतकरी परराष्ट्रात द्राक्षे निर्यात करतो. त्यावर अवलंबून असणारे इतर अनेक घटक आहेत. केळीवर, डाळिंबावर, बोरांवर अवलंबून असणारे अनेक घटक आहेत. कोकणातील आंबा, काजू हा सुध्दा परराष्ट्रात मोठ्या प्रमाणात जात आहे आणि त्याचे परिणाम वेगवेगळ्या क्षेत्रांवर, घटकांवर होणार आहेत. आंबा उत्पादन करणारा शेतकरी पूर्णपणे मोडला. शासनाने त्याच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे. आर्थिक गुंतवणूक करणे सोपे नाही. बँकेकडून, वित्तीय संस्थांचे कर्ज घेणे, आपल्या बागा अगोदरच खरेदी करणाऱ्याला विकणे अशा परिस्थितीत वाटचाल करण्याचा तो प्रयत्न करीत असतो.

सभापती महोदय, आपत्तीमध्ये सापडलेल्या सर्व फळबाग शेतकऱ्यांना शासनाकडून अपेक्षा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर थोडे उशिरा उत्तर दिले तरी चालेल. आम्ही त्यावरील 5 मिनिटांचे उत्तर समजून घेऊ. परंतु, नुकसान झालेल्या सबंध फळबागायतदारांना, उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी मदत देण्याची भूमिका शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. पंचनामे करण्याचे आदेश दिले की नाही याची माहिती मिळू शकत नाही. ते त्या दिवशी देण्याची आवश्यकता होती. फक्त कागदी घोडे नाचविणे योग्य नाही. गेल्या वर्षी आम्ही 1500 कोटी रूपयांचे अनुदान मंजूर केले आणि त्यानंतर ते 2300-2400 कोटी रूपयांच्या आसपास गेले. कारण ते वास्तवतेवर आधारित होते. आपण प्रथम नजर पाहणीच्या माध्यमातून आकडेवारी निश्चित करतो. नुकसानभरपाई प्रचंड प्रमाणात वाढली, मग बोगस शेतकरी तयार केले, असे आरोप शेतकऱ्यांवर, यंत्रणेवर करण्याचा प्रयत्न होतो. कोणत्या परिसरात अशा प्रकरच्या फळबागा लावल्या आहेत, कोणत्या परिसरात नुकसान झाले आहे, याची जाणीव सरकारला असावी, असे मला वाटत आहे. आपण सर्वजण जाणकार आहोत, शेतकरी आहोत.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.............

आपण त्या दिवशी म्हणाला होता, ठीक आहे. परंतु, आज आम्हाला आपल्याकडून तसे अभिप्रेत नाही. "राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे म्हणून आम्हाला आता मदत करता येत नाही", असे कृपया आपल्या उत्तरामधून येऊ नये, अशी आपल्याला आमची नम्रतेची विनंती आहे. याचे कारण असे की, एकवेळ आमच्या शासकीय योजनांना कपात लागली तरी चालेल पण हा माझा बळीराजा, काबाडकष्ट करणारा शेतकरी, महाराष्ट्राला आणि देशाला प्रगतीपथावर नेणारा शेतकरी जिवंत राहणे, हे आमच्या सर्वांच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहे आणि त्या दृष्टीने सर्वंकष विचार राज्य शासनाने करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. म्हणून हेक्टरी भरघोस अनुदान शासनाने द्यावे, अशी आमची मागणी आहे.

सभापती महोदय, या संदर्भातील काही कायम स्वरुपी उपायोजना आपण करु शकतो का ? या प्रश्नाचे उत्तर 'नाही', असे आहे. कारण, कधी गारपीट होईल, हे तुम्हा, आम्हाला सांगता येणार नाही. ग्लोबल वॉर्मिंगचे वेगवेगळे परिणाम सतत होत असतात. कितीही परिणामकारक वेगवेगळ्या गोष्टी करण्याचा आपण प्रयत्न केला तरी निसर्गाचा बदललेला असमतोल अगदी प्रगत राष्ट्रामध्ये देखील जाणवतो आहे. आपण पहातो की, अन्य राष्ट्रात देखील अनेक वेळा महापूर येतो, अनेक वेळा मोठ्या प्रमाणावर गारपीट होते. त्यामुळे या बाबतीतील संशोधन होईल तेव्हा होईल, पण सबंध राष्ट्राला आणि राज्याला पुढे नेणाऱ्या या माझ्या शेतकऱ्याला पूर्णपणे मदत करण्याची भूमिका शासनाने घेणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, या बाबतीत आकडेवारी शासनाकडे आली असेल. जिल्हावार किती नुकसान झाले, तालुकावार किती झाले, अगदी मंडळनिहाय किती झाले, या तांत्रिक आकडेवारीत जाण्यापेक्षा आज जो कोणी अडचणीत सापडलेला उत्पादक आहे, त्याला मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, माझ्या कोकणातील परिस्थिती या पेक्षाही भिन्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील भाषण करतील त्यावेळी ते याचा उल्लेख करतीलच. आमच्याकडे भात कापणी अगोदर होते. या पूर्वी अवेळी पाऊस झाला त्या वेळी भात पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. चंद्रपूर, भंडारा, गोंदिया परिसरात आणि कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुध्दा

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे..........

नुकसान झाले. आमच्याकडील स्थिती आणखीन वेगळी आहे. भात कापणी केल्यानंतर लगेचच झोडणी होते, असे नाही. लगेचच भात शेतकऱ्याच्या घरात येतो, असे नाही. भात काढणी झाल्यानंतर मळण्या रचल्या जातात. त्या दोन-तीन महिने होतात आणि मग जेव्हा शेतकऱ्याला फुरसत मिळते आणि शेत मजूर उपलब्ध होतात, त्यावेळी मळण्या झोडून भाताचे पीक शेतकऱ्याला मिळते. आता परवा झालेल्या पावसामुळे अशा प्रकारे संरक्षित केलेले भात पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झ ाले आहे. एका बाजूला आंबा आणि काजू तर गेलाच. त्यामुळे सरकारचे किती परकीय चलनाचे नुकसान होणार आहे, हा भाग आपण सोडून देऊ. परंतु, उत्पादन करणारा हा शेतकरी मानसिकदृष्ट्या खचतो. तो ज्यावेळी अशा रितीने खचतो त्यावेळी तो आत्महत्यांकडे वळतो. कारण, सर्व स्तरातून जर निराशाच त्याच्या पदरात पडणार असेल आणि ज्या सरकारकडून त्याच्या अपेक्षा असतात, ते सरकार याबाबतीत नाकर्तेपणाची भूमिका घेत असेल, आमच्या तिजोरीत खडखडाट आहे, असे सांगून त्याच्या दु:खावर डागण्या देण्याचा प्रयत्न दुर्दैवाने होत असेल तर त्याच्या मनात असलेला संताप शेवटी स्वत:चे जीवन संपवून टाकण्याच्या प्रक्रियेपर्यंत त्याला नेऊन पोहोचवितो. म्हणून या सरकारच्या संवेदना अधिक जागरुक व्हाव्यात. केवळ संवेदना जागरुक ठेवून उपयोग होणार नाही तर सर्व सरकारी यंत्रणा या कामी लावणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, एका बाजूला दुष्काळी परिस्थितीत सापडलेल्या शेतकऱ्याला न्याय देण्याची भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा आहे. परंतु, केंद्रीय समितीने पहाणी केल्यानंतर केंद्राकडून आम्हाला काय मिळणार आहे, याची वाट सरकारने पाहू नये. आता सरकारकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययातून तातडीने या शेतकऱ्यांना काय देता येईल, या गोष्टीवर भर देण्याचा प्रयत्न सरकारने करावा.

सभापती महोदय, नियम 289 अन्वये सर्व कामकाज थांबवून या विषयावर चर्चा करण्याची सर्व सन्माननीय सदस्यांची मानसिकता एवढ्यासाठीच होती की, या विषयाचे गांभीर्य खूप मोठे आहे. हे गांभीर्य समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या वेळी एखाद्या महिन्यात पगार मिळाला नाही तर पगारदार माणसाची अवस्था काय होते, हे आपल्याला माहीत आहे. परंतु, संपूर्ण

...3....



SRR/ प्रथम श्री.मंगेश..... 13:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे..........

बारा महिन्याचे पीक जाते, काबाडकष्ट करणाऱ्या, घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याचे जीवन ज्यावेळी उद्ध्वस्त होते त्यावेळी कोणत्याही राजकीय अभिनिवेशाने या गोष्टीकडे बघण्यापेक्षा मानवतेच्या दृष्टीकोनातून आणि शेतकऱ्याच्या भवितव्याच्या दृष्टीकोनातून या सर्व गोष्टींकडे बघण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, म्हणूनच आज आम्हाला हे अभिप्रेत आहे की, शासनाने प्रत्येक पिकासाठी दर हेक्टरी मदत जाहीर करावी. हे करीत असताना प्रत्येक पिकाचा उल्लेख करावा. कारण, प्रत्येक पिकाचा उत्पादन खर्च वेगळा आहे. एक पीक गेले की, ते केवळ त्या वर्षापुरते जाते, असे नाही तर तो शेतकरी, तो बागायतदार अनेक वर्षांसाठी बाधित होतो. या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून, सर्वांना विश्वासात घेऊन, या संदर्भातील स्पष्ट भूमिका राज्य सरकारने या निमित्ताने जाहीर करावी, एवढीच विनंती मी या निमित्ताने करु इच्छितो.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. म्हणूनच वेळेचे भान ठेऊन माझे विचार संपवीत असताना माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्याकडून, या सरकारकडून आमच्या याच अपेक्षा आहेत की, काल काय घडले, परवा काय घडले, यामध्ये त्यांनी जाऊ नये. लोकशाही आघाडी सरकारच्या 15 वर्षांच्या काळात दुर्दैवाने दरवर्षी नैसर्गिक आपत्ती आली. परंतु, या आपत्तीत सापडलेल्या प्रत्येक आपदग्रस्ताला न्यायाच्या प्रक्रियेमध्ये आणण्याचा प्रयत्न सातत्याने आघाडी सरकारने केला. यावेळी अधिकची मदत त्या शेतकऱ्याला राज्य सरकारकडून निश्चितपणे मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. सरकारने संवेदना दाखवाव्यात, सबबी सांगू नयेत, अशी पुन्हा एकदा आग्रहपूर्वक विनंती करून ज्या शेतकऱ्याच्या न्यायाच्या प्रतिक्षेत आम्ही सर्वजण आहोत, त्या अपेक्षा सरकारने पूर्ण कराव्यात, अशा भावना व्यक्त करून थांबतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या विषयावर नियम 289 अन्वये विरोधी पक्षाकडून चर्चेचा प्रस्ताव देण्यात आला होता. परंतु, आपण नियम 260 अंतर्गत चर्चेला मान्यता देऊन आता हा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सभागृहात मांडला आहे. या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा विषय गंभीरपणे सभागृहात चर्चेला यावा आणि मंत्री महोदयांनी सुध्दा या विषयाकडे अधिक लक्ष द्यावे, अशी आमची अपेक्षा आहे. कारण, या संदर्भात सरकारने संवेदना दाखविणे गरजेचे आहे. त्यामुळेच विरोधी पक्षाकडून जरी हा प्रस्ताव आला असला तरी हा राजकारणाचा विषय होऊ नये. कारण, राज्यातील अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला न्याय मिळाला पाहिजे, हा दृष्टीकोन या चर्चेमागे आहे.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी संपूर्ण खानदेशमध्ये आणि राज्यातील इतर भागात पाऊस पडला. सुमारे 1200 मि.मी.पेक्षा जास्त पाऊस या क्षेत्रात झाला असून मराठवाडा, खानदेश आणि कोकण परिसरातील 300 पेक्षा जास्त गावातील पिकांची, जनावरांची आणि इतर मालमत्तांची हानी झाली आहे. साधारणपणे 3100 हेक्टर क्षेत्र बाधित झाले असल्याची माहिती समोर येत आहे. परंतु, अंतिम सर्वेक्षण झाल्यानंतर यापेक्षाही जास्त क्षेत्र बाधित झाल्याचे आपल्या लक्षात येईल. सभापती महोदय, यापूर्वी आलेल्या आपत्तीतील आकडेवारी लक्षात घेतली तर संपूर्ण राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. साधारणपणे दिवसाला 10 ते 12 आत्महत्या होत आहेत. अशा प्रकारची परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीची पहाणी करण्यासाठी नुकतेच केंद्रीय पथक राज्यात आले होते. त्यांची औरंगाबाद येथे बैठक सुरु होती. बैठक सुरु होऊन ती संपेपर्यंतच्या काळात मराठवाड्यातील 5 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. फक्त मराठवाड्याची आकडेवारी त्यांच्यापर्यंत पोहोचली होती. त्यामध्ये विदर्भाच्या आकडेवारीचा समावेश नव्हता.

यानंतर श्री.मा.शिगम...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 13:20

श्री. माणिकराव ठाकरे....

परंतु त्या बैठकीच्या कालावधीमध्ये 5 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रामध्ये भीषण टंचाई निर्माण झाल्याचे आपणास दिसत आहे. परवा या सदनामध्ये टंचाईच्या संदर्भात चर्चा झाली. अशा भीषण टंचाईच्या परिस्थितीमध्ये शासन कोणती मदत करणार याकडे राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागलेले आहे. विद्यमान सन्माननीय महसूल मंत्री हे या आधी विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेते होते. सन्माननीय परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते हे विधानपरिषदेमध्ये विरोधी पक्षामध्ये होते. विरोधी पक्षामध्ये असताना दोन्ही मंत्री महोदय शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत केली पाहिजे अशी सातत्याने मागणी करीत होते. विरोधी पक्षाकडून आलेली मागणी नाकारली किंवा त्या मागणीकडे दुर्लक्ष केले गेले अशा प्रकारची भूमिका काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारने कधी घेतली नाही. पूर्वी कोणती परिस्थिती होती आणि कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली आणि आता काय परिस्थिती आहे, या परिस्थितीमध्ये काय मदत करणार असे प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. आजच्या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करणे गरजेचे आहे. या परिस्थितीमध्ये दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येतील असे शासनाने उत्तर दिले. शासनाने शेतकऱ्यांना असे सांगितले की, आता तहान लागलेली असल्यामुळे विहीर खोदायला घेतलेली आहे. विहीर खोदून तिला पाणी लागल्यानंतर तुझी तहान भगविली जाईल. अशा प्रकारची शासनाने घेतलेली भूमिका महाराष्ट्रातील जनतेला समजली आहे.

सभापती महोदय, खानदेश मधील नाशिक जळगाव या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली. मराठवाड्यातील लातूर, औरंगाबाद, जालना या परिसरामध्ये अवकाळी पाऊस झाला. कोकणामध्ये अवकाळी पाऊस झाला. या अवकाळी पावसामध्ये कोकणातील आंब्याचा सर्व मोहोर गळून पडला. औषध फवारणी देखील वाया गेली. मराठवाड्यामध्ये ज्वारी, द्राक्ष, कांदा इत्यादी पिकांचे अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. महाराष्ट्रातील शेतकरी नजरेसमोर आणला तर आज कापूस उत्पादक शेतकरी आर्थिक मदतीच्या आशेने शासनाकडे डोळे लावून बसलेला आहे, कांदा उत्पादक शेतकरी, सोयाबीन पिकविणारा शेतकरी शासनाकडे आर्थिक मदतीच्या आशेने पहात आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामध्ये शेतकऱ्याला कोणतेही आर्थिक पॅकेज घोषित केलेले नाही. या टंचाईच्या परिस्थिती बाबत केन्द्र सरकारकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

मदत मागितलेली आहे असे मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले. जेव्हा अशी कोणती आपत्ती राज्यावर येते त्यावेळी आपण केन्द्र सरकारकडे मदत मागत असतो आणि केन्द्र सरकार त्या त्या परिस्थितीनुसार मदत करीत असते. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये केंद्राकडून किती मदत मिळते ते पाहून राज्यामध्ये योजना राबवू असे मंत्री महोदयांनी सांगितले. आज शेतकऱ्याला हेक्टरी आर्थिक मदत करण्याची गरज आहे. या बाबतीत मंत्री महोदयांनी आपल्या संपूर्ण भाषणामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून पुढच्या काळामध्ये जलसंधारणाच्या योजना घेण्यात येतील, सौरऊर्जेवर चालणारे शेतीपंप शेतकऱ्यांना देण्यात येतील, ठिबक तसेच सूक्ष्म सिंचन पध्दतीचा अवलंब मोठया प्रमाणावर केला जाईल, जलसंधारणाची कामे घेतली जातील, पाणी अडवा पाणी जिरवा हा कार्यक्रम राबविला जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. आज कापूस, सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना, फळबागायतदार शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची गरज आहे. आज राज्यातील कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याच्या हातामध्ये कोणतेही उत्पन्न आलेले नाही, कापूस पिकणाऱ्या भागामधील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. या शेतकऱ्याला तातडीने मदत करावी अशी आमची मागणी आहे. द्राक्ष पिकविणारा शेतकरी, कांदा पिकविणारा शेतकरी, सोयाबीन, मका, ज्वारी इत्यादी पीक घेणाऱ्या शेतकऱ्याचे अवकाळी पाऊस आणि गारपिटीने प्रचंड नुकसान झालेले आहे. नाशिकमधील एका शेतकऱ्याने सीडलेस ऐवजी जम्बो द्राक्षाची लागवड केली. चीनमधील व्यापारी त्याच्या शेतावर येऊन त्यांनी शेतकऱ्याने लागवड केलेली सर्व द्राक्षे घेतली. खरेदीची बोलणी झाल्यानंतर केवळ पैसे देण्याचे बाकी होते. परंतु अचानक झालेल्या गारपिटीमुळे त्या शेतकऱ्याची संपूर्ण द्राक्षबाग खाली कोसळली आणि होत्याचे नव्हते झाले. त्या शेतकऱ्याने कर्ज काढून द्राक्षाची बाग फुलविली होती. या गारपिटीमुळे द्राक्ष पिकविणाऱ्या शेतकऱ्याचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या प्रमाणेच कांदा पिकविणाऱ्या शेतकऱ्याचेही प्रचंड नुकसान झालेले आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये देखील आंब्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या परिस्थितीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. निवडणुकीच्या काळामध्ये, शेतकऱ्याच्या शेत मालाला भाव मिळाला पाहिजे, आमचे सरकार आल्यानंतर तो भाव दिला जाईल, झालेल्या नुकसानीबाबत आर्थिक मदत केली जाईल अशी आश्वासने दिली जातात. राज्यात अवकाळी पाऊस

..3..



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

आणि गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असताना मदत कार्य व पुनर्वसन मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसे हे सिनेमा पहाण्यासाठी गेले होते. ते एकटे गेले असते तर मी समजू शकलो असतो. परंतु आपल्या अधिकाऱ्यांना आणि सहकारी आमदारांना बरोबर घेऊन ते सिनेमा पहाण्यासाठी गेले. खरे तर, त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना राज्यात झालेल्या नुकसानीची पहाणी करायला पाठवायला पाहिजे होते. जळगाव जिल्ह्यामध्ये काही दिवसापूर्वी घटना घडली होती. 26 नोव्हेंबर हा शहीद दिन मानला जातो. परंतु त्या दिवशी जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी 400 अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना घेऊन आपल्या मुलाच्या वाढदिवसाच्या पार्टीमध्ये गर्क होते.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव)**

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारचे अधिकारी असतील, अशा प्रकारचे लोकप्रतिनिधी असतील त्यांनी या राज्यातील शेतकऱ्यांच्या संदर्भात संवेदना दाखविली नाही तर जनतेचे त्यांच्याकडे लक्ष असते याची जाणीव ठेवावी. तुम्ही कोणत्या गोष्टीला प्राधान्य देता हे जनता पहात असते. अहिराणी भाषेतील सिनेमा असला तरी लोकप्रतिनिधी तो इतर वेळेला पाहू शकले असते. सिनेमा पहात असताना अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी थांबवून ठेवणे आणि आम्ही शेतकऱ्यांच्या प्रती संवेदनशील आहोत, मदत करण्याची भूमिका घेत आहोत अशा गप्पा मारणे हे नाकर्तेपणाचे लक्षण आहे. दुष्काळाच्या प्रश्नाबाबत शासनाने संवेनदशील असले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळालेली नाही. कोकण, खानदेश आणि मराठवाड्यातील शेतकरी आज शासनाकडे आशेने पहात आहेत. शासन कोणत्या प्रकारे आर्थिक मदत करणार आहे, कोणत्या प्रकारे न्याय देणार आहे याकडे शेतकरी डोळे लावून बसला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग लक्षात घेऊन शासनाने आर्थिक मदत जाहीर करण्याची गरज आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी मदत जाहीर करण्याची गरज आहे. सोयाबीन, ज्वारी उत्पादक तसेच फळ पिकांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शासनाने लाँग टर्म कार्यक्रम तयार करण्याचे सूतोवाच केले आहे ते आम्ही मान्य करतो. भविष्यात जे घडणार आहे ते घडू नये याकरिता शासनाचे नियोजन असणे हे महत्वाचे काम आहे. माननीय महसूल मंत्री यांना राज्याच्या सर्व भागांची चांगली माहिती आहे. संपूर्ण राज्याच्या दृष्टीने अभिभाषणात मुद्दे समाविष्ट होत असताना एखाद्या विषयाबाबत युनिट स्थापन केले जाईल, अभ्यास केला जाईल असे म्हटले जाते तेव्हा ते युनिट अंमलात न येता केवळ चर्चा सुरु झालेली असते. त्या चर्चेतून फलित निघावे अशी अपेक्षा असेल तर घोषित केलेल्या मुद्याची अंमलबजावणी होणे क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदय, तहान लागल्यानंतर विहीर खोदणार आणि विहिरीला पाणी लागल्यानंतर तहानलेल्यांना पाणी पाजू असे सांगून शासनाला जबाबदारी झटकता येणार नाही. शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी कर्ज काढावे लागले तरी चालेल, परंतु शेतकऱ्यांना आर्थिक पॅकेज जाहीर करुन त्यांना कर्जमुक्त करण्याच्या दृष्टीने या सदनामध्ये धोरण जाहीर करावे अशी मी शासनाला विनंती करतो. राज्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय,नियम 260 अन्वये उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व राज्यातील बहुतांश भागामध्ये दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजी झालेला अवकाळी पाऊस तसेच गारपीट यामुळे नुकसान झालेल्या शेतमालाच्या व फळ पिकांच्या संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक 11 व 12 डिसेंबर, 2014 रोजी नाशिक जिल्हयात आणि खानदेश परिसरात अवकाळी पाऊस झाला आणि मोठया प्रमाणात गारपीट झाली. त्यामधून शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले. द्राक्ष, डाळिंब, कांदा, भाजीपाला, मका आणि काही भागात भात पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. नाशिक जिल्हयातील मालेगाव, कळवण, सटाणा, देवळा, निफाड, चांदवड, येवला या तालुक्यातील परिस्थिती अत्यंत भयानक झालेली आहे. शनिवार व रविवार या दोन्ही दिवशी मी स्वत: या सर्व भागांची पाहणी करुन आलो.

सभापती महोदय, या दु:खामध्ये एका गोष्टीचा आनंद झाला. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी आले. त्यांनी शेतकऱ्यांच्या संवेदना जाणून घेतल्या. त्यांनी स्वत: पाहणी केली. नाशिक जिल्हयामध्ये पहिल्यांदा असे घडत होते. मागील 3 वर्षे सातत्याने या भागांमध्ये गारपीट झाली, अवकाळी पाऊस झाला होता. परंतु तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी भेट दिली नव्हती. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून संवेदनशीलता दाखविली. त्यांच्यासोबत माननीय मंत्री सर्वश्री गिरीष महाजन, एकनाथ शिंदे हे देखील होते. त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम केले. द्राक्षासारख्या नगदी पिकाचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. संपूर्ण पीक उद्ध्वस्त झाले आहे. झाडाला पाने शिल्लक राहिलेली नाहीत. गारांच्या मारामुळे खोड तुटले आणि मुळे सुध्दा तुटण्याच्या अवस्थेत आहेत. संपूर्ण झाड जाईल अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, लोखंडी अँगलच्या सहाय्याने मांडव घातला जातो ते मांडव पूर्णपणे वाकले आहेत. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांनी 80 टक्के भागात नेट शेड उभारले होते त्या ठिकाणी एका रुपयाचे देखील नुकसान झाले नाही. परंतु हे नेट शेड आयात करावे लागते आणि त्यासाठी 6 लाख रुपये आयात शुल्क भरावे लागते. त्यामुळे शासनाने प्रथम हे आयात शुल्क माफ करावे अशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी मागणी करतो. ज्या 20 टक्के भागात नेट शेड उभारले नव्हते तेथे काहीही शिल्लक राहिले नाही. नेट शेडची उभारणी करण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना

...3..



डॉ.अपूर्व हिरे............

आखण्यात यावी. ज्याप्रमाणे राज्यात ठिबक सिंचनासाठी योजना तयार करण्यात आली आहे त्याच धर्तीवर नेट शेड उभारण्यासाठी योजना तयार करण्यात यावी आणि नेट शेडवरील आयात शुल्क माफ केले तर शेतकऱ्यांना खूप मोठा दिलासा मिळू शकतो. वातावरणातील बदलामुळे दरवर्षी अवकाळी पाऊस येणार आहे. मागील 3 वर्षे अवकाळी पाऊस पडलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संदर्भात अनेक प्रश्न उभे रहात आहेत. दरवर्षी त्यांना विविध अडचणींना सामारे जावे लागते. त्यादृष्टीने नेट शेड ही उपाययोजना ठरू शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, डाळिंब हे टणक फळ ओळखले जाते. ज्या भागामध्ये पाण्याची उपलब्धता नाही, मुरमाड भाग आहे, जेथे द्राक्ष पीक घेणे शक्य नाही अशा मालेगाव, कळवण, सटाणा, देवळा भागात डाळिंब पिकाची मोठया प्रमाणात लागवड केली जाते. परंतु गारपीट झाल्याने आघात होऊन डाळिंब पीक उद्ध्वस्त झाले. कांद्याला योग्य भाव मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. ते कांद्याचे पीक पूर्णपणे जमीनदोस्त झाले आहे. भाजीपाला, मका व अन्य पिके शेतामध्ये शिल्लक आहेत अशी स्थिती नाही. या नुकसानीबाबत तातडीने पंचनामे होण्याची गरज आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या दौऱ्यात तसे आदेश दिलेले आहेत आणि पंचनामे सुरु झालेले आहेत. याबाबत पाठपुरावा करून गतीने हे काम पूर्ण करण्यात यावे.

सभापती महोदय, पीक विमा योजना ही पूर्णपणे फसवी आहे. विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी ही योजना तयार केली आहे की काय असे दुर्दैवाने म्हणावे लागते. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी योग्य प्रमाणात आर्थिक मदत दिली आहे असे आठवत नाही. शेतकऱ्यांना केवळ विम्यापोटी पैसे भरावे लागतात. त्यातून भरपाई मिळत नाही. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, शासनप्रणित का होईना, शेतकऱ्यांसाठी विम्याची विशेष योजना आखली गेली पाहिजे.

नंतर क्यू..1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अपूर्व हिरे .......

ही पीक विमा योजना राज्यातील शेतकऱ्यांसाठी सुरु करीत असताना अथवा रेग्युलर पीक विमा योजनेच्या नियमांमध्ये बदल करुन ज्या शेतकऱ्याने पीक विमा काढला असेल मग त्याचे नुकसान नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले असो अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे होऊ दे त्याला नुकसानीची भरपाई मिळालीच पाहिजे अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. दुसरी महत्वाची बाब अशी आहे की, शेतकऱ्याने फळ बागायतीसाठी जे पीक कर्ज घेतलेले आहे त्याचे पुनर्गठन करणे आवश्यक आहे. याचे कारण असे की, आजच्या परिस्थितीत शेतकऱ्याकडे होते नव्हते ते सगळेच खर्च करुन त्यांनी द्राक्ष व डाळिंबाच्या बागा उभ्या केल्या आहेत पण या फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे त्याचा खर्च कधीच भरुन निघणार नाही त्यामुळे तो कर्जाची परतफेडही करु शकणार नाही. त्यामुळे माझी अशी मागणी आहे की, शेतकऱ्याने फळ बागायतीसाठी घेतलेल्या कर्जाचे पुनर्गठन करावे आणि त्या कर्जावरील व्याज शासनाने भरावे. तसेच पुढील वर्षी त्याला पुन्हा कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे. वास्तविक त्या शेतकऱ्याकडे प्रत्येकी केवळ दीड ते दोन लाखापेक्षा ही कर्जाची रक्कम जास्त नसेल अशा शेतकऱ्याला तेवढेच कर्ज उपलब्ध करुन दिले तर एका शेतकऱ्याकडे जास्तीत जास्त तीन ते चार लाखाचेच कर्ज होईल आणि त्या शेतकऱ्याच्या जमिनीचा भावच मुळात एकरी 25 ते 30 लाख असा असल्याने तो कर्जाची नक्कीच परतफेड करु शकेल, त्याला अडचण येणार नाही, म्हणून मी सुचविल्यानुसार शासनाने ही योजना राबविणे आवश्यक आहे. या भागातील शेतकरी आज संपूर्णत: हवालदिल झालेला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी तर आपापल्या चिता रचून ठेवून मदत मिळाली नाही तर स्वत:लाच पेटवून घेण्यापर्यंत त्यांनी तयारी केली आहे, म्हणून शासनाने या शेतकऱ्यांच्या बाबतीत विचार करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, नाशिक भागातील पाण्याची उपलब्धता दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे. गोदावरी सारख्या नदीवर सुध्दा नाशिक शहराच्या वाढत्या नागरीकरणामुळे लोड येत असून जास्तीत जास्त पाणी पिण्यासाठीच वापरले जात असून शेतीत जाणारे पाणी कमी होत आहे. त्याशिवाय नार-पार, दमणगंगा यातील पाणी गोदावरीमध्ये आणि गिरणा नदीमध्ये आणता आले तर त्यांच्या माध्यमातून मराठवाड्यापर्यंत सुध्दा ते नेता येईल व अशा कायमस्वरुपी

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अपूर्व हिरे ......

उपाययोजना करणे ही देखील काळाची गरज आहे. नर्मदेसारख्या नदीमधील पाणी तापी नदीत आणून जळगांव भागातून मराठवाडा व औरंगाबाद पर्यंत सुध्दा येता येऊ शकेल आणि ही योजना राबविली तर उत्तर महाराष्ट्राचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटू शकेल. तसेच ज्या मराठवाड्याला दरवर्षी दुष्काळ सहन करावा लागतो त्या भागात सुध्दा या योजनेचा फायदा होऊन अशा दीर्घकालीन योजना शासनाने प्राधान्याने हाती घ्याव्यात अशी मी मागणी करतो. माननीय मुख्यमंत्री व इतर मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो. उत्तर महाराष्ट्रातील गारपीटग्रस्त शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहून शेतकऱ्यांनी काळजी करु नये, शासन त्यांच्या सोबत आहे असा संदेश देण्यासाठी ते स्वत: गेले. अशाच प्रकारे शासनाने शेतकऱ्याला त्याच्या पायावर उभे करुन त्याला दिलासा देणे, आत्महत्येकडे वळणाऱ्या शेतकऱ्याला थांबविणे अशीच यापुढील भूमिका घेणे ही काळाची गरज आहे व ती भूमिका या शासनाकडून घेतली जात आहे, त्याबद्दल शासनाचे व माननीय मुख्यमंत्र्यांचे पुन्हा एकदा आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

**तालिका सभापती (श्री. जयवंतराव जाधव)** : आता सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या आपले विचार व्यक्त करतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मुळात हा प्रस्ताव प्रथम मी व सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी दाखल केलेला आहे. प्रस्तावावर बोलण्यास प्रथम सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे उभे राहिले असता ते मलाच प्रथम बोलण्याची संधी देत होते पण मीच त्यांना बोला म्हणून विनंती केली. असे असताना अजूनही मला बोलण्याची संधी मिळत नाही हे अत्यंत अयोग्य आहे. तसेच आपल्याला योग्य मार्गदर्शन मिळत नाही असे मला वाटते हे देखील गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजे.

**तालिका सभापती** : ठीक आहे, यानंतर आपणास बोलण्याची संधी दिली जाईल.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, राज्यात झालेली गारपीट हा विषय संपूर्ण राज्याच्या दृष्टीने महत्वाचा असून या अधिवेशनाकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. विशेषत: दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात शासनाने काही घोषणा केल्या व निर्णय सुध्दा जाहीर केले त्यामुळे पुढील आठवड्यात वेगळे कामकाज आपण करु शकू असे वाटले होते. पण उत्तर महाराष्ट्रात अवकाळी पाऊस व गारपीट मोठ्या प्रमाणात झाली व पुन्हा तीच चर्चा घ्यावी लागली. या चर्चेच्या दरम्यान बोलत असताना उत्तर महाराष्ट्रातील गारपीटग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी व तेथील जनतेचे अश्रू पुसण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय मंत्री श्री. एकनाथजी शिंदे, माननीय राज्यमंत्री श्री. दादाजी भुसे, माननीय मंत्री श्री. गिरीष महाजन इ. अनेक मंत्री गेले होते. मंत्री महोदयांचा भेटीचा उद्देशच मुळात असा होता की केवळ उपचार म्हणून नव्हे तर झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने व्हावेत. या निमित्ताने मी एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, पुणे जिल्ह्यातील मुळशी, भोर व वेल्हे तालुक्यात मी काही ठिकाणी पाहणी केली. त्यातील मुळशी तालुक्यातील घोटवडे या गावात भेट दिली असता तेथील श्री. सुरेश शेळके नावाच्या शेतकऱ्याची हृदयस्पर्शी कहाणी ऐकायला मिळाली. त्याने आपल्या निवेदनात स्पष्टपणे मांडलेले आहे. तो म्हणत आहे की, 7 जूनचा पाऊस जुलै अखेर सुरु झाला त्यामुळे भाताच्या रोपाचे नुकसान झाले. त्यानंतर पडलेल्या थोड्या पावसावर लावणी करण्यात आली परंतु नंतर अवकाळी पाऊस होऊन उरलेसुरले भाताचे सर्वच नुकसान झाले. तसेच संबंधित शेतकरी सांगत आहे की, आसपासच्या गावांमध्ये सुध्दा कांदा आणि बटाट्याच्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. अशा प्रकारे खरीप आणि रब्बीचे संपूर्ण नुकसान झाले आहे. हीच परिस्थिती गेल्या दोन तीन वर्षापासून सातत्याने घडत असल्याने या भागातील शेतकरी हवालदिल झालेला आहे. उत्तर महाराष्ट्रात माननीय मुख्यमंत्री पाहणी करण्यासाठी गेले, विदर्भात देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, मराठवाड्याच्या व्यथा सुध्दा सन्माननीय सदस्यांनी सभागृहात मांडल्या, कोकण प्रदेशाच्या बाबतीत बोलून झाले पण पुणे जिल्ह्यातील वेल्हे, मुळशी व भोर तालुक्यांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे चर्चा होत नाही, ही दु:खाची बाब आहे. त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

भागातील शेतकरी सांगत आहेत की, आमच्याकडे कोणत्याही प्रकारचे पंचनामे झालेले नाहीत, अशा प्रकारे राज्याच्या नकाशावरील काही तालुक्यातील शेतकरी सातत्याने दुर्लक्षित झालेला दिसत आहे. माझी मागणी आहे की, निदान आज तरी माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जरी हा प्रस्ताव मांडला असला तरी देखील ही बाब संपूर्ण राज्याच्या संदर्भातील आहे व त्याबाबत संपूर्ण चर्चा होणे आवश्यक आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय कृषी मंत्र्यांनी जाहीर केले आहे की, राज्यात गारपीट व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरु झालेले आहेत तसे पंचनामे भोर, वेल्हे आणि मुळशी या पुणे जिल्ह्यातील तिन्ही गावांमध्ये सुध्दा व्हावेत अशी माझी मागणी आहे.

महोदय, त्यानंतर शासनाच्या वतीने पीक विमा योजनेच्या संदर्भात बोलले गेले. त्या अनुषंगाने हा बदल कसा करणार आणि सध्याच्या पीक विमा योजनेची अंमलबजावणी किती प्रमाणात होते हे राज्याच्या दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या आर्थिक पाहणी अहवालावरुन दिसून येते. त्यातील आकडेवारीतून दिसते की, राज्यातील 40 ते 50 हजार शेतकऱ्यांनी पीक विम्याची रक्कम भरलेली असते पण प्रत्यक्षात फक्त 200 लोकांनाच 30 ते 50 रुपयापर्यंतची नुकसान भरपाई या विमा योजनेच्या माध्यमातून मिळत असते. याच भागातील शेतकऱ्यांना मी पुन्हा विचारले की, पीक विमा योजनेचा शेवटचा चेक कधी मिळाला हे आठवते का, त्यावर त्यांनी सांगितले की, मागील साडेचार वर्षापूर्वी आम्हाला पीक विम्याची रक्कम मिळाली होती व ती आणण्यासाठी तालुक्याला जाण्यास आम्हाला 40 रुपये खर्च आला होता व विम्याची नुकसान भरपाईची रक्कम मात्र 73 रुपये इतकीच होती.

नंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्यामुळे आपण पीक विमा योजनेमध्ये कोणता बदल करणार आहात हे देखील सांगितले पाहिजे. मला शासनाला एक विनंती करावयाची आहे की, ज्या कंपन्यांना शासनाने वेळोवळी ब्लॅक लिस्ट केले आहे त्या कंपन्या पुन्हा येणार नाहीत याची खबरदारी घ्यावी. ज्या विमा कंपन्या आयत्या वेळी आपले नियम बदलतात त्याकडे देखील शासनाने लक्ष दिले पाहिजे. शासना बरोबर जो करार झालेला असतो त्यातील नियम वादळामुळे झालेल्या नुकसानीला लागू होणार नाहीत असे वादळ येऊन गेल्या नंतर सांगतात. तोच प्रकार गारपिटीसंबंधात देखील आहे. विमा कंपनी नैसर्गिक आपत्तीचा अंतर्भाव विम्यामध्ये कसा होऊ शकणार नाही यासाठी शेवटच्या क्षणी पळवाटा काढत असते. शेतकऱ्यांच्या दाव्याची रक्कम मिळण्यासाठी प्रचंड काळ गेलेला असतो. त्यामुळे पूर्वी आपण ज्या पीक विम्या कंपन्यांना ब्लॅक लिस्ट केले होते त्या पुन्हा वेगळ्या दाराने येत नाहीत ना हे देखील तपासून बघणे गरजेचे आहे. याचा परिणाम निर्यातीवर देखील झालेला आहे. उत्पादकांना कशा प्रकारे नुकसान भरपाई देण्यात येणार आहे हा देखील विषय महत्त्वाचा आहे. यासंबंधी आपल्यावर मर्यादा असणार आहे हे देखील मला मान्य आहे. त्यामुळे निर्यातीवर देखील फटका बसणार आहे. तेव्हा उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर विम्याची नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. काही ठिकाणी जनावरांबरोबर मनुष्यहानी देखील झालेली आहे. आपण हवामान बदला संबंधीचा उल्लेख करतो. परंतु, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कुठलीही माहिती दिली जात नाही. पुण्यातील वेध शाळेच्या प्रमुख डॉ.मेधा खोले यांच्याशी मी मुद्दाम चर्चा केली. त्यांनी आम्हाला माहिती दिली की, दोन ठिकाणी दाबाचे पट्टे निर्माण झाले व ते एकत्र आल्याने नाशिक आणि परिसरामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. ही माहिती हवामान खात्याकडे होती पण ती शेतकऱ्यांना सावध करण्याच्या दृष्टीने वापरली जात नाही. त्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. धन्यवाद.

.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सिनिऑरिटीने आपण प्रत्येक सन्माननीय सदस्याला भाषण करण्यास संधी दिली पाहिजे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, काही दिवसांपूर्वी मी आपणाला बोलण्याची संधी दिली तेव्हा आपण स्वत:हूनच सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना बोलण्यास अनुमती द्यावी. त्यावेळी देखील वाद झाला होता. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर भाजप व शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना मी संधी दिलेली आहे. त्यामुळे आता आपण भाषणास सुरुवात करावी. आपल्याला नंतर बोलू देण्याचा माझा हेतू नाही.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नम्रपणे सांगतो की, ज्याचा प्रस्ताव असतो त्याला प्रथम बोलण्याची संधी दिली पाहिजे. पुरवणी मागण्या, विधेयके यावरील चर्चा असते तेव्हा रूटीन क्रम असतो. तेव्हा आपणाला अधिकाऱ्यांनी योग्य ते मार्गदर्शन केले पाहिजे. त्यात आपला दोष नसून मी येथे कालपासून प्रशासनाला दोष देत आहे.

ज्या प्रदेशात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली आहे तेवढ्यापुरतीच ही चर्चा मर्यादित ठेवली पाहिजे. येथे अवांतर चर्चा होत आहे. या सदनातील ज्येष्ठ अभ्यासू सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ग्लोबल वॉर्मिंगवर चर्चा केली होती. तेव्हा त्यांची चर्चा आम्ही हसण्यावारी नेली होती. त्या 7-8 वर्षापूर्वी या सदनात आल्या तेव्हा ग्लोबल वॉर्मिंगमुळे किती हानी होणार आहे यासंबंधातील अभ्यासपूर्ण असे भाषण केले होते. माझी मागणी ही आहे की, कोणतेही सरकार आले तरी ते शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जास्त निधी देऊ शकणार नाही. या संकटाला सामोरे कसे जायचे हे सर्वांनी मिळून ठरविले पाहिजे. येथे कोण कुठल्या राजकीय पक्षाचा आहे हा प्रश्न नाही. अशा संकटाला सामोरे कसे जायचे हे ठरविण्याचे काम आपण सर्वांनी मिळून करावयाचे आहे. आपण पुष्कळ मागण्या करूशकतो. तेवढा निधी शासन देऊ शकणार आहे काय ?

सभापती महोदय, कोकण, नाशिक आणि खान्देशामध्ये मोठ्याप्रमाणावर गारपीट आणि अवकाळी पाऊस झाला आहे. ही चर्चा तेवढ्या पुरतीच मर्यादित आहे. विदर्भात देखील पाऊस पडला. पण त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झालेले नाही. मात्र, कोकण, नाशिक, जळगाव येथे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तेवढ्या पुरतीच ही चर्चा मर्यादित ठेवली पाहिजे. दुष्काळावरील चर्चा करीत राहिलो तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. मी शुक्रवारी रायगडला गेलो होतो. सकाळी उठून बघतो तर माझ्या आजूबाजूची संपूर्ण शेती पाण्याने भरून गेली होती. फार मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला होता म्हणून मी तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांना फोन केले. त्यांनी सांगितले की, आमच्याकडे देखील पाऊस सर्वदूर आहे. मी तातडीने तीन तासामध्ये पक्षाची बैठक घेतली आणि माझ्या कार्यकर्त्यांना सर्व्हे करायला सांगितला. शासनाचा सर्व्हे होण्याआधीच माझा स्वत:चा सर्व्हे झालेला आहे. मी शनिवारी, दुपारी 2.00 वाजता,

..4

श्री.जयंत प्र.पाटील....

माझ्या कार्यकर्त्यांमार्फत किती नुकसान झाले याचा सर्व्हे केला. कोकणामध्ये शेतीचेच नव्हे तर मच्छिमारांचे देखील नुकसान झाले आहे. आम्ही किनाऱ्यावर मच्छिमारांसाठी खळी निर्माण करतो. त्याचे देखील प्रचंड नुकसान झाले आहे. सुक्या माशांचा एकेक मांडा वाहून गेला आहे. माझ्या तालुक्यात 16 कोळीवाडे असून माननीय सामाजिक न्याय राज्यमंत्री हे आमचे जावई आहेत. त्यांना या सर्वांची कल्पना आहे. अवकाळी पावसामुळे तेथील सर्व सुके मासे नष्ट झालेले आहेत. जी सुकी मच्छी वाहून गेली आहे ्त्याची नोंद कोण करणार आहे ? आमच्या येथे औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणावर झाले असल्यामुळे विटांचे देखील कारखाने आहेत. त्यांचे देखील नुकसान झाले आहे. आमच्या कोकणामध्ये एवढा मोठा प्रचंड स्वरूपात पाऊस कधीच पडलेला नाही. तेव्हा याचा सर्व्हे तातडीने करण्याची गरज आहे. या विषयासंबंधी आपल्याला कायमस्वरूपी निर्णय घ्यावा लागणार आहे. आपल्या येथे कृषि विद्यापीठे आहेत. त्यांनी ग्लोबल वॉर्मिंगवर कोणता अभ्यास केला आहे. कोकण,अकोला, मराठवाडा येथे कृषि विद्यापीठे आहेत. तेव्हा या विद्यापीठांनी ग्लोबल वॉर्मिंगच्या दृष्टीने कोणता अभ्यास केला आहे याचे अवलोकन आपण केले पाहिजे. यासाठी आपल्याला स्वतंत्र यंत्रणा उभी करावी लागेल.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये 18.63 मि.मी.पाऊस पडला. आंब्यावर फवारणीसाठी दरवर्षी आम्हाला 30 ते 35 हजार रूपये खर्च येतो. आंबा पिकांचे नुकसान किती झाले याचे सर्वेक्षण आम्ही करीत आहोत. 4232 शेतकरी अवकाळी पावसामुळे बाधित झाले आहेत. रायगड जिल्ह्यातील 3761 हेक्टर जमीन यामध्ये बाधित झालेली आहे. 27 गावांमध्ये काजू पिकांचे नुकसान झाले आहे. आमच्या पाहणीमध्ये 800 काजू उत्पादक शेतकरी बाधित झाले असून 900 हेक्टर जमिनीचे यामुळे नुकसान झाले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील .......

सभापती महोदय, माझ्या भागातील 27 गावातील 433 हेक्टरमधील 602 शेतकऱ्यांच्या भाजीपाला पिकाचे नुकसान झालेले आहे. माझ्या रायगड जिल्हयात भाजीपाल्याचे आणी पांढऱ्या कांद्याचे वैशिष्टयपूर्ण पीक घेतले जाते. माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते यांचे मूळ गाव रायगड जिल्हयातील खंडाळा असून त्या ठिकाणीच मोठया प्रमाणात पांढऱ्या कांद्याचे पीक घेतले जात असल्यामुळे त्यांना यांसदर्भात चांगली कल्पना आहे. पांढरा कांदा हा औषधी कांदा म्हणून वापरला जातो. माझ्या रायगड जिल्हयांतील पांढऱ्या कांद्याचे संपूर्णपणे नुकसान झालेले आहे. पांढऱ्या कांद्याचे पीक घेणारा शेतकरी पूर्णपणे उद्धवस्त झालेला आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीचे जे काही नुकसान होत असते त्यासाठी शासन नुकसान भरपाई देत असते परंतु अशा प्रकारची नुकसानभरपाई देण्यापेक्षा यापुढे अशा प्रकारची आपत्ती येणार नाही, आपत्ती आली तर तीला कोणत्या प्रकारे तोंड दिले पाहिजे यासंदर्भात उपाययोजना व जास्तीत जास्त संशोधन करण्याची आवश्यकता आहे. पुढील काळात येणाऱ्या आपत्तीला कशा प्रकारे तोंड देता येईल यासंदर्भात शासनाने धोरण जाहीर करण्याची आवश्यकता आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना प्रत्यक्ष नुकसान भरपाई दिली जात नाही तर प्रत्यक्ष शेतकऱ्याची फसवणूकच केली जात असते असे मला वाटते. या ठिकाणी चर्चा करुन आपण आपले समाधान करुन घेत असतो.

सभापती महोदय, नाशिक, खानदेश आणि कोकणातील शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची आवश्यकता आहे. द्राक्षबाग उभी करण्यासाठी शेतकऱ्याला 2-3 वर्षाचा कालावधी लागत असतो. परंतु असे असताना नाशिक जिल्हयात 2-2 किलाच्या गारा पडल्यामुळे नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सांगली जिल्हयात किती नुकसान झाले याची मला कल्पना नाही त्यामुळे मंत्री महोदयांनी यासंदर्भात सभागृहाला माहिती दिली तर बरे होईल. दुष्काळ आणि गारपीट यावर आपण किती वेळ बोललो यापेक्षा आपण काय बोललो आणि त्याचा फायदा शेतकऱ्यांना कसा मिळाला याकडे आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई शासनाकडून दिली जाईल अशी घोषणा शासनाकडून झाली तर त्याचा सर्वात जास्त आनंद



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील .......

आम्हाला होईल. अवकाळी पाऊस आणि गारा पडणे हे गेल्या तीन वर्षापासून आपल्या राज्यात सुरु आहे. त्यामुळे ही परिस्थिती बारमाही राहणार असेल तर त्या पध्दतीची उपाययोजना व तशा पध्दतीची पिके घ्यावी लागतील व त्यामुळे यासंदर्भात आपल्याला संशोधन करण्याची आवश्यकता आहे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नाशिक जिल्हयासह संपूर्ण उत्तर महाराष्ट्र आणि कोकणामध्ये अतिवृष्टी व गारपिटीचा सामना आमचा बळीराजा करीत आहे. राज्यामध्ये गारपिटीमुळे सर्वात जास्त नुकसान झाले असेल तर ते नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांचे झाले आहे. नाशिक जिल्हा हा कांदा,द्राक्ष,डाळिंब या पिकांसाठी प्रसिध्द आहे. नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांनी चांगल्या कांद्याचे पीक घेऊन येथील कांदा सातासमुद्रापार पोहचवला आहे. आमच्या नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन चांगल्या प्रकारची द्राक्ष उत्पादित करुन ही द्राक्ष सुध्दा सातासमुद्रापर पोहचवली आहेत. नाशिक जिल्हयात ज्या ठिकाणी कमी पाण्याचे क्षेत्र आहे त्या ठिकाणचा शेतकरी डाळिंबाचे पीक घेतो. डाळिंबाच्या उत्पादनातून शेतकरी सुखावतो आहे अशी परिस्थिती निर्माण झाली होती. काही ठिकाणी आमचा बळी राजा सुखावला होता. परंतु भाव न मिळाल्यामुळे डाळिंब उत्पादक शेतकरी नागावला गेला. शेतकऱ्यांनी तयार केलेल्या मालाला भाव देण्यापेक्षा दिल्लीतील राज्यकर्त्यांच्या डोळयापुढे ग्राहक महत्वाचा ठरु लागल्यामुळे आमच्या शेतकऱ्यांचे नुकसान होऊ लागले आहे. ग्राहक हा महत्वाचा घटक ठेवल्यामुळे आमच्या भागातील कांद्याचे, द्राक्षाचे भाव पडू लागले. कांद्याची निर्यात सुध्दा आता बंद पडू लागली आहे. शेतकऱ्याला माल उत्पादन करण्यासाठी जो काही पैसा लागतो तेवढा पैसाही आता शेतकऱ्याला मिळत नाही. नाशिक जिल्हयातील निम्मा जिल्हा टंचाईसदृश परिस्थितीमध्ये असताना सुध्दा आमचा शेतकरी बागा जगवण्याचे काम करीत होता. बागा जगवित असताना आमच्या शेतकऱ्यांने बायका-मुलांच्या तोंडचा घास कमी करुन शेतात पैसा लावला. आमच्या शेतकऱ्याने बायकोचे मंगळसूत्र सावकाराकडे गहाण ठेवून तो पैसा शेतीमध्ये लावला.

सभापती महोदय, आज सर्वात मोठा जुगारी कोण असेल तर तो शेतकरी आहे. बायकोचे मंगळसूत्र सावकाराकडे गहाण ठेवून त्यातील पैशातून बी-बियाणे घ्यावयाचे, खते घेऊन शेतात वापरायचे. एवढया महागाचे बी-बियाणे शेतात टाकताना त्यातून उत्पन्न किती मिळेल याची काहीही शाश्वती नसते. पीक आले तर भाव मिळेल की, नाही याची शाश्वती शेतकऱ्याला नसते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव ......

त्यामुळे शेतकऱ्याचे कुटुंबच्या कुटुंब आज जुगारावर अवलंबून आहे. शेतकऱ्याने अशा प्रकारचा जुगार खेळला नाही, अन्नधान्य पिकवले नाही तर आपली जनता सुखावणार आहे काय ? शेतकरी स्वत:पुरते अन्नधान्य पिकवतो का ? 1972 च्या दुष्काळामध्ये आपल्याला अमेरिकेहून लाल गहू आयात करावा लागला होता. परंतु माननीय पवार साहेबांच्या दूरदृष्टीच्या धोरणामुळे राज्यातील शेतकरी आपले अन्नधान्य सातासमुद्रापार पाठवू शकला.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांचे भाषण पूर्ण झाल्यामुळे त्यांनी कृपया खाली बसावे. आता सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी भाषणाला सुरुवात करतील.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मला भाषण पूर्ण करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : कृपया आता आपण खाली बसावे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय,, वेळेअभावी मी माझे भाषण येथेच संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय,अत्यंत महत्वाच्या विषयावर या सभागृहात चर्चा सुरु आहे. दोन दिवसापूर्वी आमच्या खानदेशामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीट झाल्यामुळे आमच्या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्याचे पीक त्याच्या डोळयादेखत उद्धस्त होतांना त्याने बघितले आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंतवराव जाधव सांगत होते ते खरे आहे. सर्वात मोठा रिस्की धंदा कोणता असेल तर तो शेती धंदा आहे. शेतकऱ्याचे पीक त्याच्या घरामध्ये येईपर्यंत त्याला असंख्य संकटांना सामोरे जावे लागत असते.

सभापती महोदय, शेतकरी सुरुवातीलाच बियाण्यामध्ये फसतो. बऱ्याच वेळा पेरणी करुन सुध्दा पीक उगत नाही.

यानंतर श्री. अजित.. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी ....

त्याला संकटाला सामोरे जावे लागते. आता पिकांवर देखील नवीन प्रकारची रोगराई येत आहे. कृषी केंद्र विभागसुद्धा उधारीचे खाते झाले आहे ते प्रामाणिकपणे कीड रोगावरील कीटकनाशके देत नाहीत. ज्या कीटकनाशकांची किंमत जास्त असते तेच कीटकनाशके दुकानदारांना देण्यास सांगतो. दुकानदारही शेतकऱ्यांना महागडी कीटकनाशके देतो. शेतकऱ्यांकडे पैसे नसतील तर तो ती कीटकनाशके दुकानदाराकडून उधारीवर घेतो. कारण त्याला आपल्या शेतातील पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करायची असते. परंतु त्या कीटकनाशकाने कीड मरत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे पीक वाया जाऊन त्याचे आर्थिक नुकसान होते. म्हणजे शेतकऱ्यांची चहूबाजूने कुचंबणा होत असते. कधी अस्मानी संकट तर कधी सुल्तानी संकट त्याच्यावर ओढवत असते.

सभापती महोदय, आज शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मजूर मिळत नाहीत. मजूर मिळाले तर त्यांना कामावर आणण्यासाठी आणि घरी सोडण्यासाठी गाडी पाठवावी लागते. आमच्या भागात 25-25 कि.मी.अंतरावरुन मजुरांना आणण्यासाठी ट्रॅक्टर वा जीपची सोय करावी लागते. तशी सोय केल्यानंतरच मजूर कामावर येतात. अशा अनेक संकटांमध्ये शेतकरी सापडलेला आहे आणि शेवटी हे सर्व करुन पीक हाती येईपर्यंत त्याला निसर्गाच्या कृपेवर रहावे लागते. निसर्गाची अवकृपा झाली तर हाता तोंडाशी आलेले पीक डोळ्यासमोर निघून जाताना त्याला पहावे लागते.

सभापती महोदय, राज्यात दुष्काळ पडला म्हणून सरकारने काही पॅकेज जाहीर केले. काही ठिकाणी 50 पैशाच्या आत आणेवारी निघाली. आपण दुष्काळग्रस्तांसाठी आणेवारी काढली. परंतु दोन दिवसांपूर्वी गारपिटीमुळे झालेल्या नुकसानी संदर्भात आणेवारी काढण्याची गरज नाही असे माझ ो स्वत:चे मत आहे. आमच्या भागामध्ये खास करुन धुळे, नंदूरबारचा पूर्व भाग, नाशिक जळगाव या भागात झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. या शेतकऱ्यांना चांगली आर्थिक मदत मिळेल अशी आमची शासनाकडून अपेक्षा आहे.

सभापती महोदय, विदर्भात दरवर्षी अधिवेशन होते. या अधिवेशनात विदर्भातील शेतकऱ्यांना शासन मदत देणार आहे हे आम्ही मागील 15 वर्षापासून ऐकत आहोत. आज गारपीटग्रस्त शेतकरी रोज टी.व्ही.पाहत आहेत. कारण त्याला वाटते सरकार आज तरी आमच्यासाठी काही तरी मदत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी ....

घोषित करील. परंतु तसे काही होताना दिसत नाही. या गारपिटीमुळे कांदा, डाळिंब पिकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. आम्ही डाळिंब पिकाचे नमुने आणले होते, ते आपल्यापर्यंत पोहोचले नाहीत. त्यामुळे आम्ही ते पीक आपणास दाखवू शकलो नाही हे आमचे दुर्दैव आहे. आपण डाळिंब निर्यातीवर बंदी आणल्यामुळे आज रस्तोरस्ती डाळींब विकले जात आहे. त्यामुळे शेतकरी डाळिंब रस्त्यावर फेकत आहे ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, आमच्या भागात मिरची हे अत्यंत महत्वाचे पीक आहे. आमच्या येथून गुजरात राज्य जवळ असल्यामुळे शेतकरी गाडी घेऊन त्या ठिकाणी मिरची विकायला जातो. आज आमच्या भागात इतकी गारपीट झाली की, झाडावर मिरच्याच राहिल्या नाहीत. आमच्या भागात शेतकरी मिरच्या वाळविण्यासाठीपथारीवर टाकतो. शेतकऱ्यांनी मिरच्या वाळविण्यासाठी पथाऱ्यावर टाकल्या असताना गारपिटीमुळे लाल मिरच्या काळ्या पडल्या. शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक डोळ्यादेखत नष्ट झाल्याचे दुर्भाग्य त्याच्या नशिबी आले. आज शासनाकडे सर्व माहिती उपलब्ध आहे. शेतीचे पंचनामे होतील तेव्हा होतील मंत्री महोदयांनी सर्व परिस्थिती माहिती आहे. तेव्हा शासनाने या गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जेव्हापासून केंद्रातील सरकार बदलून दुसरे सरकार आले तेव्हापासून या सरकारचा पायगुण चांगला नाही असे माझे स्वत:चे मत आहे. मुला-मुलीचे लग्न करायचे असेल आपण जन्मपत्रिका पाहतो. सुनेचा पायगुण पाहतो. देशात नवीन सरकार आल्यापासून शेतकऱ्यांवर अनेक संकटे येत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितलेली बाब खरी आहे की, पुढील 12 महिने पाऊस पडेल की काय अशी शंका शेतकऱ्यांना वाटत आहे. शेतकऱ्यांना नेहमी कोणत्या ना कोणत्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. अशावेळी शेतकरी मदतीसाठी शासनाकडे पाहणार नाही तर कोणाकडे पाहणार ? शासनाने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी तातडीने पावले उचलली पाहिजेत अशी माझी शासनाला विनंती आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी ....

सभापती महोदय, दुष्काळावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना सौरऊर्जा पंप देणार असल्याची घोषणा सरकारने केली आहे. एका सौरऊर्जा पंपांची किंमत 5 लाख रुपये आहे असे 5 लाख सौरऊर्जा पंप घेण्यात येणार आहेत. या सर्व पंपाची किंमत 25 हजार कोटी रुपये होते. हा पाच वर्षाचा कार्यक्रम असला तरी तो कार्यक्रम राबविणे सरकारला शक्य नाही. "अच्छे दिन येणार" असे शेतकऱ्यांना दिवास्वप्न दाखवून त्याला पुन्हा उद्ध्वस्त करु नका, त्यापेक्षा शेतकऱ्याला प्रेमाची चटणी-भाकरी कशी मिळेल यादृष्टीने त्यांना मदत करावी.

सभापती महोदय, आज हमी भावाची काय परिस्थिती आहे ? गव्हाच्या पिकाचा हमी भाव कमी करण्यात आला. कापूस हे खानदेशातील अत्यंत महत्वाचे पीक आहे. आज कापूसाचा पिकाची काय परिस्थिती आहे ? सीसीआयने खरेदी केंद्र सुरु केले. नाफेडच्या माध्यमातून खरेदी सुरू झाली नाही. आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींनी आंदोलने केली तेव्हा सरकारने सीसीआयचे केंद्र सुरु केले. सीसीआयने कापसाला 4 हजार 050 रुपये हमी भाव दिला. पूर्वी कापसाला 7 हजार रुपये भाव मिळत होता. शेतकरी कापसाचे वजन वाढण्यासाठी त्यावर पाणी मारत होता आणि व्यापारी सुद्धा काट्यामध्ये फेरफार करीत होता. एवढे होऊनही दोघेही खूष असायचे. कारण दोघांच्याही पदरी काही पडत होते. आज सीसीआय शेतकऱ्यांच्या कापसाला 4 हजार 050 रुपये भाव देत आहे. एकेकाळी बीटीच्या माध्यमातून 20-20 क्विंटल कापूस काढणारा शेतकरी आज दोन क्विंटलवर समाधानी आहे.

सभापती महोदय, ज्या शेतकऱ्यांनी सीसीआयला कापूस दिला असेल त्यांनाच बोनस दिला जाईल असे सरकार सांगत आहे. ही चुकीची बाब आहे. ज्या शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावर कापूस दाखविला असेल त्या प्रत्येक शेतकऱ्याला शासनाने हेक्टरी मदत दिली पाहिजे. मागील 15 वर्षे आघाडीचे सरकार सत्तेवर होते. या सरकारने शेतकऱ्यांसाठी हजारो कोटी रुपये उपलब्ध करून दिले. त्यावेळी देखील आर्थिक अडचणी होत्या. परंतु आघाडीच्या सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले नाही. आघाडी सरकारची शेतकऱ्यांशी बांधिलकी होती. शेतकरी जगला तर राज्य प्रगतीकडे जाऊ शकते असे मागील सरकारचे धोरण होते. याच धोरणामुळे आघाडी सरकारने

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चंद्रकांत रघुवंशी ....

मागील 15 वर्षे शेतकऱ्यांना प्रत्येक संकटात मदतीचा हात दिलेला आहे. हे शेतकऱ्यांचे सरकार आहे असा त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण केला. शेतकरी संकटात सापडलेला असताना आघाडी सरकारने त्यांना भरीव मदत केली. आपण विरोधी बाकावर असताना अशा प्रश्नांवर भरपूर भाषणे केलेली आहेत.

सभापती महोदय, मी मागे एकदा सांगितले होते की, आपली फक्त बैठक व्यवस्था बदलली आहे. आपण इकडून तिकडे गेला आहात, परंतु आपली मानसिकता बदललेली नाही. आपल्या सरकारकडून देखील शेतकऱ्यांच्या तेवढ्याच अपेक्षा आहेत. या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. शेतामध्ये पाच-पाच किलोच्या गारा पडल्या. एवढी मोठी गार एखादा माणसाच्या डोक्यावर पडली तर त्याचा तेथेच मृत्यू होईल आणि मग त्याच्या वारसांना दोन-पाच लाख रुपयांची मदत कराल. जर शेतात एवढ्या मोठ्या गारा पडल्या तर शेत कसे उभे राहील ? या गारपिटीमुळे मिरची, केळी, कांदा या सर्वच पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. तेव्हा या गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने भरीव मदत करावी, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी दुष्काळ जाहीर करण्यात आला त्यामध्ये आमच्या विभागावर अन्याय करण्यात आला. जळगाव, धुळे आणि नंदूरबार या जिल्ह्यांमध्ये दुष्काळ नाही असे सांगण्यात आले. माननीय महसूल मंत्री आमच्या विभागातील आहेत त्यांना या सर्व बाबींची कल्पना असल्यामुळे दुसऱ्या कोणत्या पंचनाम्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. एकीकडे सरकारने अन्याय केला आणि दुसरीकडे निसर्गाने आमच्यावर अन्याय केला. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, शासनाने पूर्ण खानदेश भागाला न्याय द्यावा तसेच आमच्या भागाकरिता जास्तीत जास्त मदत कशी करता येईल यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी अनवधानाने आपल्या भाषणात सुनेचा पायगुण आणि नवीन सरकारच्या पायगुणामुळे संकट आले असे दोन उल्लेख केलेले आहेत.हे उल्लेख कामकाजातून काढून टाकावेत अशी माझी आपणास विनंती आहे. आपण सरकारच्या धोरणावर टीका केली पाहिजे. परंतु यामध्ये सुनेच्या पायगुणाचा काही संबंध नाही एवढेच मला सांगायचे आहे.

---------- यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या राज्यातील शेतकरी अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे उद्ध्वस्त झाला आहे. उत्तर महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ, कोकण या भागात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीबाबतची चर्चा ऐकायला मिळते. त्याच प्रमाणे पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील 30-35 दुष्काळी तालुक्यातील शेतकरी आणि अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे भरडलेले शेतकरी हवालदिल झाले आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजेत. परंतु दुर्दैवाने सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी गेल्या 8 दिवसांपूर्वी फतवा काढला की, कोणत्याही अधिकाऱ्यांनी आमदारांना भेटू नये. महोदय, मी हे जबाबदारीने सांगतो. सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी वर्तमानपत्रात एक स्टेटमेंट केले होते की, कोणत्याही अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींना भेटू नये. विधानसभा सभागृहात या विषयी हक्कभंगाची सूचना देण्यात आलेली आहे. शनिवार आणि रविवार या सुटीच्या दिवशी आम्ही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मतदारसंघात गेल्यानंतर.....

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते धक्कादायक आहे. अधिकाऱ्यांनी आमदारांना भेटू नये असा उल्लेख झाला असेल किंवा अशा प्रकारचे परिपत्रक जर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी काढले असेल तर त्यांच्यावर कारवाईच झाली पाहिजे. या बाबतचे निवेदन माननीय मंत्र्यांनी तातडीने करावयास पाहिजे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिपकराव साळुंखे यांनी गंभीर अशी बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. या प्रकरणी संबंधितांवर निश्चितपणे कारवाई केली पाहिजे.

तसेच दुसरी बाब मी सभागृहाच्या आणि माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, माझ्या जिल्ह्यातील बदलापूर नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी नगरपरिषदेशी संबंधित असलेली कोणतीही कामे न करता केवळ त्यांच्याकडे सादर करण्यात आलेले प्लान्स मंजूर करतात. या शिवाय ते इतर कोणत्याही नियमित कामांना हात लावत नाहीत. या विषयी मला नगरसेवकांचे एक शिष्टमंडळ भेटावयास आले होते व त्यांनी सर्व प्रकार माझ्या निदर्शनास आणून दिला. मी संबंधित





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती....**

मुख्याधिकाऱ्यांसोबत दूरध्वनीवरुन बोलून त्यांना समज दिली. मी त्यांना सांगितले की, तुम्ही नियमित कामे व्यवस्थितरित्या पार पाडावीत. परंतु नंतर त्या मुख्याधिकाऱ्यांनी नगरसेवकांना असे उत्तर दिले की, माझी नियुक्ती माननीय राज्यपालांनी केलेली आहे. मला इतर कोणाचीही बंधने येणार नाहीत आणि मी कोणाचा अधिकार मानत नाही. मला वाटते बदलापूर नगरपरिषदेच्या प्रभारी मुख्याधिकाऱ्यांवर शासनाने त्वरित कारवाई करावी. तसेच त्यांच्याकडून प्रभारी मुख्याधिकारी पदाचा कार्यभार काढून घ्यावा आणि नियमित मुख्याधिकाऱ्यांची ताबडतोब नेमणूक करावी.

श्री.संजय राठोड : ठीक आहे. या प्रकाराची माहिती घेऊन या बाबत सभागृहाला अवगत करतो.

**उप सभापती** : मी सन्माननीय राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्य सभागृहात जे सांगत असतात ते सत्य आहे असेच ग्राह्य धरावे लागते. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी अधिकारी कसे वागतात या बाबत माहिती दिलेली आहे. या अनुषंगाने सांगतो की, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी. तसेच संबंधित मुख्याधिकाऱ्याकडून तातडीने प्रभारी पदाचा कार्यभार काढून घ्यावा.

श्री.संजय राठोड : होय.

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, दोन दिवसांच्या सुटीमध्ये आमच्यासारखे लोकप्रतिनिधी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गेल्यानंतर तेथे कोणीही अधिकारी उपस्थित राहत नाही, ही आपल्या राज्याच्या दृष्टीने काळिमा फासणारी गोष्ट आहे. सोलापूर जिल्हा हा रब्बी पिके घेणारा जिल्हा आहे. सोलापूर जिल्ह्यातील मालदांडी ज्वारी मंगळवेढा सारख्या दामाजी पंताचे कोठार असलेल्या भागातून सबंध देशाला पुरविण्यात येते. परंतु या भागातील फुलोऱ्याला आलेली ज्वारी काल-परवाच्या पावसामुळे उद्ध्वस्त झाली आणि शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असताना शासनाचा कोणताही अधिकारी नुकसानीची पाहणी करण्यासाठी किंवा पंचनामा करण्यासाठी गेला नाही.

..3..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपकराव साळुंखे....

महोदय, सोलापूर परिसरात कांदा पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. तसेच सबंध देशात नावलौकिक असणाऱ्या सांगोला आणि माळशिरस या दुष्काळी भागातील डाळिंबाच्या बागा उद्ध्वस्त झाल्या. त्या भागातील डाळिंब जागेवरच फुटले. एवढे सर्व घडलेले असताना शासकीय यंत्रणा नुकसानीचा आढावा घेण्यासाठी त्या ठिकाणी राबत नाही. या माध्यमातून मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, त्या भागातील शेतकरी आता आत्महत्या करायला लागला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या विदर्भ आणि मराठवाड्यात होत आहेत. तशाच प्रकारच्या आत्महत्या सरकारला पश्चिम महाराष्ट्रात जाणीवपूर्वक सुरु करायच्या आहेत काय, अशी भीती माझ्यासारख्या कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाली आहे.

महोदय, माणसारख्या दुष्काळी भागात एका शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. या बाबतीत सरकारने वेळीच पावले उचलली नाहीत तर भयानक परिस्थिती सबंध महाराष्ट्रात आणि विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागात निर्माण होईल. या निमित्ताने मी विनंती करतो की, सरकारने या अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी मदत करावी.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांना वाटते की, राज्यातील शेतकरी अडचणीत आणि संकटात सापडल्यामुळे त्याला मदत केली पाहिजे. वास्तविक पाहता हे सभागृह केवळ शेतकऱ्यांनाच न्याय देणारे नाही तर राज्यातील 12 कोटी जनतेला न्याय देणारे आहे. नागपूरचे मुख्यमंत्री झाल्यामुळे नागपूरला अनेक वर्षानंतर न्याय मिळाला आहे. विद्यमान मुख्यमंत्र्यांकडून जनतेच्या फार अपेक्षा होत्या. हे सरकार सत्तेवर येऊन दीड महिना होऊन गेला आहे. राज्यातील गरीब शेतकऱ्यांसाठी, आत्महत्येस प्रवृत्त होणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ते काही तरी करतील अशी अपेक्षा होती. आज सरकार किती गंभीर आहे हे....

**उप सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या प्रस्तावावरील चर्चेवर बोलण्यासाठी बरीच नावे माझ्याकडे आलेली आहेत. त्यापैकी काही सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. मला वाटते जे सन्माननीय सदस्य भाषण करीत आहेत त्यांच्या व्यतिरिक्त कोणीही या प्रस्तावावर बोलण्यास जास्त इच्छुक दिसत नाही. सत्ताधारी बाजूने सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतर कोणीही उपस्थित नाही. परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेता सभागृहात उपस्थित असलेल्या व या प्रस्तावावर बोलण्यास इच्छुक असलेल्या पाच सन्माननीय सदस्यांनाच बोलण्याची संधी देण्यात येईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांच्या उत्तराला सुरुवात होईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री नुकसानग्रस्त भागाची पाहणी करतानाचे वर्तमानपत्रातील फोटो आम्ही बघितले. त्या फोटोमध्ये ते झाडावरील अंगुराकडे बघत असल्याचे दिसत होते. आमच्या भागात द्राक्षाला अंगूर म्हणतात. आम्हाला वाटले की, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे फक्त झाडांवरील अंगुरांचेच नुकसान झाले आहे. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी झाडावरुन गळून पडलेले अंगूर बघितले नसतील, त्यांची झालेली हानी बघितली नसेल तर, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना खरोखरच न्याय वा मदत मिळेल काय या बाबत मला शंका वाटते. महोदय, आमच्या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात, ते आत्महत्येस प्रवृत्त का

..5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

होतात याचा देखील विचार केला पाहिजे. सततची नापिकी आणि कर्जामुळे शेतकरी आत्महत्या करतात. काल-परवा नाशिक सारख्या प्रगत जिल्ह्यामध्ये गारपीट झाल्यामुळे कमीतकमी 5 हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची बातमी महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात छापून आली आहे. राज्याच्या भागात केंद्र सरकारचे पथक आले होते. त्या पथकासमोर राज्यातील शेतकऱ्यांनी आम्ही आत्महत्या करायच्या नाहीत तर काय करायचे हे सांगितले. महोदय, ज्यावेळी सर्व मार्ग बंद होतात त्यावेळी शेतकरी विष पिऊन आत्महत्या करतो. ज्यावेळी शेतकऱ्यासमोरील सर्व मार्ग बंद होतात त्यावेळी तो आत्महत्येचा शेवटचा पर्याय निवडतो. कारण आत्महत्या करण्याशिवाय त्याच्याकडे दुसरा पर्याय नसतो.

नंतर श्री.कांबळे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये ....

आघाडी सरकार असताना आता सत्ताधारी बाकावर बसणारी मंडळी विरोधी बाकावर होती आणि असे आरोप करीत होती की, या सरकारनेच शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केलेले आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर खुनाचे गुन्हे दाखल करावेत. आम्ही त्यांची भाषणे ऐकलेली आहेत. राज्यावर त्यावेळी अस्मानी-सुलतानी संकट आले, त्यावेळी त्या संकटाला सामोरे जाण्याचे धाडस आमच्या आघाडी सरकारने दाखविले. तुम्हाला त्यासाठी निश्चितच आघाडी सरकारचे अभिनंदन करावे लागेल. आघाडी सरकारने त्यावेळी 1200 कोटी रुपयांचे गोसीखुर्दचे पॅकेज दिले. केवळ पॅकेज घोषित केले नाही तर पैसेही दिले. विभागीय आयुक्तांनी आम्हाला सांगितले की, पैसे आले आहेत. त्यांनी प्रेस कॉन्फरन्स घेतली आणि त्यानंतर 4 दिवसांनी पॅकेजचे पैसे आले. राज्यात त्यावेळी अवकाळी पावसामुळे 38 हजार पक्की घरे पडली होती. 36 हजार घरांचे अंशत: नुकसान झाले होते. शेतीचे नुकसान 50 टक्क्यांच्या वर झाले होते. आमच्या आघाडी सरकारने त्यावेळी 13-14 हजार कोटी रुपयांची मदत दिली. आज माननीय कृषी मंत्र्यांनी जाहीर केले की, गारपिटीमध्ये जर कोणी मरण पावला असेल तर त्याच्या कुटुंबाला दीड लाख रुपये देण्यात येतील. दीड लाख रुपयांनी काय होणार आहे ? आमची मागणी आहे की, गारपिटीमध्ये मरण पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला 5 लाख रुपये मदत दिली पाहिजे. आपल्या घरचे काही जाणार आहे का ? आपल्या घरचे काहीही जाणार नाही, हा जनतेचा पैसा आहे. गरीब शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे. आपण विरोधात असताना केलेली भाषणे आम्ही ऐकली आहेत. माननीय मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार हे विदर्भाचे आहेत. मी त्यांचे अभिनंदन करीन. आपल्याला एक चांगला नेता मंत्री म्हणून मिळाला आहे. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी शेतकऱ्यांचे 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. आता माननीय मंत्र्यांना मी सांगेन की, तुम्हीही शेतकऱ्यांना एवढी मदत दिली असे दंड पिटून सांगा. आपल्याकडून या संदर्भात काही तरी निवेदन होऊ द्या. फक्त वल्गना करणे योग्य नाही.

बैलजोडी मरण पावली तर 16 हजार रुपये देण्यात येतील, असे माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे (पाटील) साहेब म्हणत आहेत. एका बैलाची किंमत किती आहे, हे आपल्याला माहीत आहे. आपण कास्तकार आहात. आम्हाला आपल्याबाबत गर्व वाटतो. आपण बोलता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये ....

ते करता. शेतकऱ्यांना 50 हजार रूपये हेक्टरी दिले पाहिजे अशी आम्ही मागणी केली तर ते तुम्ही द्याल. आपण भाषणात ते बोलणार आहात, याचा आम्हाला विश्वास आहे. आम्ही तुमची भाषणे ऐकली आहेत. आमच्याकरिता तुमची भाषणे आदर्श आहेत. आपण आदर्श मंत्री आहात. बकरा-मेंढी मेली तर साडेतीन हजार रूपये, बैल-गाय मेली तर 16 हजार रूपये, गाढव मेले तर 10 हजार रूपये मदत देण्यात येईल, अशी माननीय मंत्र्यांनी घोषणा केली. जनावरांचे जीव गेले म्हणून मदत केली जाईल. परंतु, माणसे आत्महत्या करीत आहेत. आपण त्याचे काय करणार आहात ? गारपीटग्रस्तांना आपण काय देणार आहात ? शेतकऱ्यांसाठी जीवाचे रान करणारे श्री. राजू शेट्टी कुठे दिसतच नाहीत. भाजपा व शिवसेनेने त्यांना काही दिल्यामुळे ते दिसत नाहीत का ? दररोज शेतकऱ्यांच्या संदर्भात पत्रकार परिषद घेत होते, आंदोलन करीत होते. त्यांची आंदोलने फक्त बारामतीत सुरू होती, राज्यात इतरत्र कुठेही नव्हती, असे का होते, याचे सुध्दा उत्तर आम्हाला अपेक्षित आहे.

आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी सन 2009-10 या आर्थिक वर्षांत 673 कोटी रूपयांचे केवळ पॅकेज दिले नाही तर तेवढी रक्कमही दिली. आमच्या आघाडी सरकारने सन 2010-11 मध्ये 550 कोटी रूपये दिले, सन 2011-12 मध्ये 2736 कोटी रूपये दिले. तुम्ही आमचे अभिनंदन केले पाहिजे. मागील दीड महिन्यांपासून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. आपण विदर्भात चर्चा करीत आहोत. नागपूरमध्ये 515 आमहत्या झाल्या आहेत. वर्ध्यामध्ये 1122, भंडाऱ्यामध्ये 355, गोंदियामध्ये 148, चंद्रपूरमध्ये 427, गडचिरोलीमध्ये 61 आत्महत्या झाल्या आहेत. आतापर्यंत 2640 लोकांचे जीव गेले आणि तरीही सरकार गंभीर नाही. पूर्व-पश्चिम विदर्भावर अन्याय सुरूआहे. काल मी चंद्रपूरची बातमी पाहिली. त्यामध्ये 2 हजार शेतकऱ्यांनी आत्मदहन करण्याची परवानगी मागितली आहे. आम्ही आतापर्यंत असे पाहिले नव्हते. आता तरी तुम्हाला विचार करावा लागेल. आम्ही राजकारणासाठी विरोध करणार नाही. माननीय मुख्यमंत्री नागपूरचे असल्यामुळे आमचा तो अधिकार आहे. निश्चितच याबाबत ते चांगली घोषणा करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये ....

सभापती महोदय, मघाशी शेतकऱ्यांना 70 रूपयांचे चेक दिले, असा उल्लेख झाला. कदाचित चुकून 7 हजार रूपये ऐवजी 70 रूपये लिहिण्यात आले असेल, त्यावर चुकीचे छापले असेल. आपण 7 रूपयांचा चेक तरी एखाद्या कास्तकाराच्या खात्यामध्ये दिला का, याचे सुध्दा उत्तर मिळाले पाहजे. केंद्र सरकारची टीम पाहणीसाठी आली होती, त्या टीमसमोर पीडित शेतकऱ्यांनी, कात्रीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांनी म्हटले की, आमच्याजवळ दुसरा पर्याय नाही, आम्हाला आत्महत्याच करावी लागेल. आपल्याला यासंबंधी धोरण ठरवावे लागेल. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होत आहेत ? आपल्यापेक्षा बांगलादेश गर्भश्रीमंत आहे. बांगलादेश, अमेरिका या देशांनी त्यांच्या शेतकऱ्यांसाठी निर्णय घेतले. तेथील शेतकरी आत्महत्या करीत नाही. मग आपल्या राज्यातील शेतकरी का आत्महत्या करीत आहे ? आपले नियोजन बरोबर नाही. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देत नाही. शेतकऱ्यांनी दीर्घ मुदतीचे कर्ज काढले आहे, ते पूर्णपणे माफ झाले पाहिजे. सत्ताधारी पक्षाने घोषणा केली होती की, भारत काँग्रेसमुक्त करणार. आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की, आपण शेतकऱ्यांना कर्ज मुक्त करावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव)**

ॲड. हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, गारपिटीमुळे व अवकाळी पावसामुळे राज्यभर नुकसान झाले आहे आणि त्याचा तडाखा कोकणालाही बसला आहे. कोकणातील सर्व शेतकरी, फळबागायतदार मोठ्या आशेने, अपेक्षेने शासनाकडे पाहत आहेत. कारण या शासनामध्ये 4-5 मंत्री कोकणातील आहेत. कोकणातील लोकांसाठी, शेतकऱ्यांसाठी, फळबागायतदारांसाठी पॅकेजमध्ये काहीही देण्यात आल्याचे दिसत नाही. कोकणातील मुख्य पीक भात आहे. ऑक्टोबरमध्ये झालेल्या पावसात भात शेतीचे नुकसान झाले आहे. भात पीक 130 दिवसानंतर येते. हे पीक ऑक्टोबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात येते. ऑक्टोबरमध्ये फार जोरदार अवकाळी पाऊस झाला. जमिनीवर कापून ठेवलेले पीक सततच्या 4-5 दिवसांच्या पावसामुळे कुजून गेले. उभे पीक सुध्दा कुजून गेले, खराब झाले. कोकणातील महत्त्वाचे पीक आंबा, काजू हे देखील आहे. हे परकीय चलन देणारे पीक आहे. आंबा व काजू या 2 फळांपासून आपल्याला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते. परंतु, यावेळी अशी परिस्थिती झाली आहे की, मागील ऑक्टोबर महिन्यात पडलेला पाऊस व आता 2-3 दिवस पडत असलेला पाऊस यामुळे संपूर्ण काजू, आंबा फळांवर आलेला मोहोर गळून पडला आहे. लहान फळे सुध्दा गळून पडली आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. हुस्नबानो खलिफे.............

हापूस आंबा पीक हे अतिशय नाजूक असून त्यावर थोडा जरी डाग पडला तरी ते डागी फळ म्हणून ओळखले जाते. आज अशी परिस्थिती आहे की, छोटे छोटे आंबा फळ खराब झालेलेच आहे पण आलेला मोहोर देखील गळून पडला आहे. मार्च, एप्रिल महिन्यात येणाऱ्या फळासाठी शेतकरी वर्षभर मेहनत करीत असतो. त्या उत्पन्नावर त्याचा वर्षभराचा उदरनिर्वाह होतो. परंतु, अवकाळी पडलेल्या पावसामुळे आंबा, काजू फळांचे नुकसान झाले आहे. मागील काळात भात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्याचे सर्वेक्षणही शासनाकडून करण्यात आले नाही. आज पावसामुळे संपूर्ण मोहोर काळवंडून गेला आहे, गळून पडला आहे. परंतु, या शेतकऱ्याला मदत मिळण्यासाठी शासन पावले उचलताना किंवा शासकीय अधिकारी धावपळ करताना दिसत नाहीत. एका हेक्टरमध्ये हापूस कलमाची 100 झाडे लावली जातात. त्यामुळे शासनाकडून जी मदत दिली जाणार आहे, ती हेक्टरी मदत दिली गेली पाहिजे, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. अवकाळी पावसामुळे कोकणातील लोकांचे नुकसान झाले आहे, त्यांच्या नुकसानीचा लवकरात लवकर पंचनामा करून त्यांना शासनाने हेक्टरी मदत जाहीर करावी, अशी मागणी करते आणि थांबते.

--------------

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेला आला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी लोकसत्ताचा अग्रलेख वाचला का, अशा प्रकारची विचारणा आताच केली होती. त्यासंबंधीचा उल्लेख त्यांच्याच उत्तराच्या भाषणातून येईल, असे मी गृहीत धरतो. पॅकेजेस का देऊ नयेत, या बाबतचे सविस्तर विवेचन लोकसत्ताकारांनी त्यांच्या आजच्या अग्रलेखात केले आहे. तो विषय आपण थोडा बाजूला ठेऊ.

सभापती महोदय, यापूर्वी देखील या सभागृहात दुष्काळी परिस्थितीबाबत चर्चा झाली होती. विदर्भ, मराठवाड्यातील जे शेतकरी या संकटात सापडले होते, त्यांच्या संदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, या संबंधीचे उत्तर महसूल मंत्री महोदयांनी दिले होते. त्यानंतर अचानक झाली आणि ती उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र अशा राज्याच्या बहुतांश भागात गारपीट झाली.

सभापती महोदय, गारपिटीसंदर्भात जुन्या काळातील दाखला द्यावयाचा झाला तर गारांचा पाऊस ही आमच्या सर्वांच्या लहानपणी आश्चर्याची गोष्ट समजली जायची. गारासुध्दा एवढ्या माफक की, अंगावर पडली तरी त्याचा त्रास कोणाला जाणवायचा नाही. त्यावेळची ती छोटी गार आज खडकाएवढी मोठी कशामुळे झाली आणि ती अशी अचानक का कोसळते, याबद्दलचा विचार आपण करीत असतो. हे सर्व हवामान बदलाचे परिणाम आहेत, ते आताच का जाणवयाला लागले आहेत ? गेली काही वर्षे सातत्याने सृष्टीमधील बदलाचा परिणाम शेतावर, लोकांच्या जीवनावर होताना आपण पहातो आहोत. यापेक्षा अधिक दाखले या संदर्भात देण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, मागील लोकांनी काय केले, तुम्ही काय करणार आहात, असे स्वरूप या चर्चेला येऊ नये. तुमच्याकडे राज्याची मॅनेजमेंट आहे आणि आम्ही कोणी तरी युनियनचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्या मागण्या तुमच्या पुढे ठेवत आहोत, असे समजू नका. कृपा करून आम्ही मागण्याचा आणि तुम्ही देण्याचा या पलीकडे जाऊन या संदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, अशा प्रकारच्या आपत्तींमध्ये इस्त्रायल सारखा छोटा देश कोणत्या उपाययोजना करतो, याबाबत नेहमीच उदाहरण दिले जाते. परंतु, आपल्या राज्याचा विस्तार, राज्याच्या विविध भागात शेतकरी घेत असलेली पिके, बागायतदार पिकवीत असलेली फळे, यांची

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.............

परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे या सर्वांसाठी एकच नियम आपण करायला गेलो आणि शासकीय यंत्रणेवर अवलंबून त्याची अंमलबजावणी होईल, असा विचार केला तर केवळ तात्पुरती मलमपट्टी होऊ शकेल, कायमच्या उपाययोजना होणार नाहीत.

सभापती महोदय, खरे म्हणजे, आता विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे. मी यापूर्वीही नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर मागणी केली होती की, सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी हा एक वेगळा विभाग राज्याने सुरु करावा आणि याकडे लक्ष द्यावे. कारण, ही संकटे मालिकांसारखी एका मागून एक येत राहिली तर हे दुष्टचक्र थांबेल, अशी अपेक्षा आपल्याला करता येणार नाही. दुष्टचक्र थांबेल, अशी अपेक्षा करण्यात काही गैर आहे, असे नाही. माणसाने आशावादी असले पाहिजे. परंतु, अशा प्रकारे सातत्याने नैसर्गिक आपत्ती येत असतील आणि या आपत्तींचा गेल्या 5-6 वर्षातील पॅटर्न आपण बघितला तर शेतीचे अर्थशास्त्र ज्या पायावर उभे आहे, तो पायाच निखळून पडल्यासारखी अवस्था आज झाली आहे. कदाचित असे होईल की, शेतकऱ्याला आज ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत, त्यामुळे शेतकरी आपल्या पुढच्या पिढीला सांगेल की, या शेतीने पार जीवन संपविण्याच्या टोकावर मला आणून ठेवले आहे, तू काही शेतीच्या नादाला लागू नको, शेती सोडून दे. शेती सोडून हे सर्व लोक बाहेर पडले आणि जमिनी ओसाड पडल्या, काही पिकले नाही तर देशातील अन्नधान्याची आणि लोकांच्या भूकेची समस्या आपण कशी सोडविणार आहोत, हा एक फार मोठा प्रश्न या निमित्ताने तयार होईल.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय नाशिक जिल्ह्यात आले होते. महसूल मंत्री महोदयांनीही अनेक ठिकाणी बैठका घेतल्या आहेत. त्यासंबंधीचा आढावा घेतला आहे. या सर्व उपाययोजना आपण करीत आहोत. परंतु, विकेंद्रीकरणाचा विचार आपण करीत नाही. आपण अनेक पॅकेजेस जाहीर करतो. प्रत्यक्षात ज्याला त्रास झाला आहे, जो कष्टामध्ये आहे, ज्याला उभे करण्याची गरज आहे, त्याच्यापर्यंत ही पॅकेजेस पोहोचतात की नाही, आपली यंत्रणा संवेदनशील आहे किंवा नाही, वेगवेगळ्या यंत्रणेतील त्या त्या अधिकाऱ्यांना आपण अधिकार दिले आहेत किंवा नाहीत आणि ते दिले असतील तर ते त्याची अंमलबजावणी करतात की नाही, करीत नसतील तर त्या संदर्भात चेक ॲण्ड बॅलन्सची काही यंत्रणा आपल्याकडे आहे किंवा नाही, याचाही विचार

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले............

आपण केला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारे दुर्लक्ष होत असेल त्या ठिकाणी तत्काळ कारवाई करुन ही सर्व यंत्रणा अधिक सक्षम केली तर आज आपण जी काही चर्चा करीत आहोत, त्याचा प्रत्यक्ष लाभ या होरपळलेल्या लोकांना मिळू शकेल.

सभापती महोदय, राज्यातील फळबागांचा आणि शेतीचा क्रॉप पॅटर्न, आपल्याकडे असलेला उपलब्ध पाणी साठा, पुढील पाच वर्षात नव्याने निर्माण होणारा पाणी साठा, याचा शेतीला किती उपयोग होणार आहे, किती टक्के पाणी शेतीला मिळणार आहे, याचा विचार करुन पीक क्षेत्रातील आणि फळबाग क्षेत्रातील तज्ज्ञांना बरोबर घेऊन कशा पध्दतीने पुढील आखणी करावी, याचा विचार आपण केला पाहिजे. एखाद्या वर्षी गारपिटीमुळे नुकसान होत असेल आणि त्यावेळी तयार केलेली बाग 5 वर्षानंतर फळावर येईल, या आशेवर शेतकरी असताना ती जर उद्ध्वस्त झाली असेल तर मधल्या काळात त्याने काय करावे, त्याची रोजीरोटी कशी चालणार, या सर्व गोष्टींचा आढावा आपण या निमित्ताने घेतला पाहिजे.

सभापती महोदय, जी काही मदत सरकार जाहीर करणार आहे, ती तात्पुरती मलमपट्टी ठरु नये. कायमचे हे दुखणे थांबेल आणि भविष्यात येणाऱ्या संकटाचा सामना करण्यासाठी शासन यंत्रणेबरोबरच शेतकरी कसा सज्ज होईल, या दृष्टीने पावले टाकणे सरकारकडून अपेक्षित आहे.

सभापती महोदय, आम्हा सर्वांना माहीत आहे की, महसूल मंत्री महोदय शेतकऱ्यांमधूनच आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदनांची त्यांना चांगली जाण आहे. त्यांनी खूप संवेदनशील होऊन याबाबतचा विचार केला पाहिजे. सर्व सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या भागातील पिकांची आणि फळांची परिस्थिती आपल्यासमोर ठेवली आहे आणि काही मागण्याही केल्या आहेत. त्यांच्या कटोऱ्यात आपण काही तरी टाकाल, अशी अपेक्षा व्यक्त करतो, त्या शेतकऱ्याला उभे राहण्यासाठी आपण मदत करावी, अशी विनंती करतो आणि थांबतो.

------------

यानंतर श्री.मा.शिगम........

अस्सुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व राज्यातील बहुतांश भागामध्ये दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे तसेच गारपिटीमुळे आंबा, काजू, केळी, कापूस, धान, सोयाबीन, ज्वारी, डाळिंब, द्राक्ष, ऊस, कांदा, टामॅटो इत्यादी फळबागांचे, पिकाचे व भाजीपाल्याचे जे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात या सदनामध्ये चर्चा सुरु आहे. दोनच दिवसापूर्वी या सदनामध्ये दुष्काळावर चर्चा झाली. राज्यामध्ये विशेषत: मराठवाड्यामध्ये पडलेल्या दुष्काळामुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे. आता झालेल्या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. आत्महत्येकडे तो वळू लागला आहे. आत्महत्येची मालिका राज्यातील विविध भागामध्ये सुरु झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये शासन या शेतकऱ्याला कोणता मदतीचा हात देणार आहे, त्यांच्या आत्महत्या कशा थांबविणार आहे, शासन कोणत्या तातडीच्या उपाययोजना करणार आहे हे माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणातून स्पष्ट होण्याची गरज आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी नाशिक जिल्ह्याची पाहणी केली. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु शासनाने केवळ पाहणी करुन आणि शासन शेतकऱ्याच्या पाठीशी आहे असे सांगून भागणार नाही. या कठीण परिस्थितीमध्ये आपण शेतकऱ्याला तातडीने मदत केली नाही तर त्याचा आत्मविश्वास ढासळेल आणि पुन्हा निराशेच्या गर्तेत जाऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त होईल. मागच्या भीषण दुष्काळाच्या वेळी तत्कालीन केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी आणि राज्य सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज शंभर टक्के माफ केले होते. वीज बिल देखील शंभर टक्के माफ केले होते. यामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या शंभर टक्के थांबल्या नाहीत. परंतु त्या वाढल्या मात्र नाहीत हे निश्चित. तशा पध्दतीची काही ठोस भूमिका हे सरकार घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणार आहे काय हा खरा प्रश्न आहे. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, झालेल्या नुकसानीचे पंचनामे नंतर होतील परंतु आता शेतक-याला निराशेच्या भावनेतून बाहेर काढण्यासाठी त्याला तातडीने हेक्टरी आर्थिक मदत द्यावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

**(सभापतीस्थानी माननी उप सभापती)**

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व राज्यातील बहुतांश भागामध्ये दिनांक 12 डिसेंबर रोजी झालेला अवकाळी पाऊस तसेच गारपिटीमुळे आंबा, काजू, केळी, कापूस, धान, सोयाबीन, ज्वारी, डाळिंब, द्राक्ष, ऊस, कांदा, टोमॅटो इत्यादी फळबागांचे, पीक व भाजीपाल्याचे जे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात नियम 260 अन्वये या सदनामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे शेतीचे आणि फळबांगाचे प्रचंड नुकसान होऊन शेतकरी आणि फळबागायतदार हवालदिल झालेले आहेत. काही ठिकाणी गारांचा पाऊस झाला. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आणि अन्य अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पूर्वी ज्या गारा पडायच्या त्या आम्ही अंगणामध्ये वेचायला जात होतो. आता पडणाऱ्या गारा हया शेतकरी आणि जनावरांना प्राणाला मुकावे लागेल की काय अशा प्रकारच्या पडत आहेत. हिंदीमध्ये एक म्हण आहे की, "सिर मुंडाते ही ओले पड़े" काल-परवा मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळी परिस्थितीवर अत्यंत चिंता व्यक्त करण्यात आली. सभागृहामध्ये त्यासंबंधी चर्चा झाली. आदरणीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी चिंता व्यक्त करुन उपाययोजना देखील सुरु केली. मराठावाडा आणि विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला सावरण्यासाठी आपण सर्वांनी मिळून उपाययोजना सुरु केली. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असे आपणा सर्वांचे मिळून शासन असते. या शासनाने उपाययोजना करण्यास सुरुवात केली. तेवढ्यातच अवकाळी पाऊस झाला, गारपीट झाली आणि शेतकरी हवालदिल झाला. आपल्या भारतातील शेतीबद्दल आमच्या सहकारी मित्रांनी बरेच काही सांगितले. त्याची पुनरावृत्ती मी करु इच्छित नाही. मी भारतीय अर्थशास्त्राचा प्राध्यापक आहे. भारतीय शेती ही निसर्गाच्या तालावर नाचणारी आहे. Indian agriculture dances on the tune of nature असे भारतीय शेतीबद्दल म्हटले जाते. भारतात कोठेही नसतील इतकी कृषी विद्यापीठे आपल्या राज्यामध्ये आहेत. राहुरीचे महात्मा ज्योतीबा फुले कृषी विद्यापीठ, मराठवाड्याचे वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, अकोल्याचे पंजाबराव कृषी विद्यापीठ आणि कोकणातील बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ अशी चार विद्यापीठे आपल्या राज्यामध्ये आहेत. त्याचप्रमाणे वेधशाळा आणि हवामान खाते आपल्या राज्यामध्ये आहेत. यांना हवामानाचा,

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे.....

निसर्गाच्या लहरीपणाचा कोणताही अंदाज लागत नाही. परिणामी शेतकऱ्याचे फार मोठे नुकसान होते. शेतकऱ्याच्या या झालेल्या नुकसानीची शासनाने त्वरित भरपाई करायला पाहिजे. शेतकऱ्याला नैराश्येच्या वातावरणातून बाहेर काढून त्याला दिलासा दिला पाहिजे. जे रिमोट कंट्रोलने शेती करतात त्यांना या दुष्काळी परिस्थितीचे, अवकाळी पावसाचे किंवा गारपिटीचे काही देणेघेणे नसते. पण जो शेतकरी चिखलामध्ये राबतो, जो जीवनम्मरणाच्या ऋतू-चक्रात सापडलेला आहे त्या शेतकऱ्याला वाचविण्यासाठी मदत करावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माझ्या भाषणाच्या वेळी अनेक मुद्दे मांडायचे राहून गेले. ते मुद्दे मी मांडू इच्छित नाही. परंतु माझ्या भावना मी कवितेच्या रुपाने येथे मांडत आहे. जिच्या नवऱ्याने आत्महत्या केलेली आहे अशा महिलेसंबंधीची ही कविता आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

गेला माझा नवरा जरी मला नका भेटू
माझ्या पोरासंगे बसून नका काढू फोटू
लाल दिव्याच्या गाडीतून येईल तुमचा ताफा
कॅमेऱ्यात बघून बघून मारल्या जातील थापा
पांढरा घोट रुमाल काढून तुम्ही डोळे सुध्दा पुसत्याल
पोरक्या माझ्या पोरांना खेटून खेटून बसाल
खोटा खोटा कंठ तुमचा नका देऊ दाटू
माझ्या पोरासंगे बसून नका काढू फोटू
धनी माझा गुणाचं, शेतामध्ये झोपायचं
अर्ध पोटी राहून सुध्दा इभ्रतीला जपायचं.
काळया आईची ओटी भराया  कर्ज थोडं काढलं
पीक गेलं जळून पण कर्ज मात्र वाढलं
सावकार लागला छळू तेव्हा धीर लागला ढळू
माझ्या पोरासंगे बसून नका काढू फोटू
रातच्याला जवळ येऊन लई गोड बोललं
डोळयात दिसलं पाणी तेव्हा काळीज माझं हललं
जाग आली पहाटे तेव्हा जवळ नाही दिसलं
झाडाला फाशी देऊन कुंकू माझं पुसलं
म्हणून सांगते माझ्या पोरासंगे बसून नका काढू फोटू
धनी होता तेव्हा कोणी नाही धीर दिला
आता किती तातडीने पंचनामा केला
कॅमेरे घेऊन पांढऱ्या गाड्या आल्या दारामध्ये
आभाळ फाटलय आमचं त्यांना प्रसिध्दीची संधी
म्हणे जग लय सुधारलंय पण माणुसकी लागली आटू
म्हणून सांगते माझ्या पोरासंगे बसून नका काढू फोटू
धनी जरी गेलं तरी मी नाही हरायची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

पोरांना करुन पोरकं मी नाही मरायची

तुमचं मात्र थांबवा ढोल त्याला नका भेटू

म्हणून सांगते माझ्या पोरासंगे बसून नका काढू फोटू, नका काढू फोटू. एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

------------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) (महसूल मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी एका शेतकऱ्याच्या विधवा पत्नीची व्यथा कवितेद्वारे या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, राज्यभरातील चित्र वेगळे आहे. मी त्यांच्या कवितेवर नंतर भाष्य करणार आहे. दरवर्षी कुठे ना कुठे अशा स्वरूपाचे चित्र या महाराष्ट्रात उभे राहू लागले आहे. अवकाळी पावसामुळे, मागील कालखंडात भूकंपामुळे नुकसान झाले. दरवर्षी अतिवृष्टी कोणत्या ना कोणत्या विभागात होते. त्यावेळी या सभागृहात त्या विषयाबाबत चर्चा होते. या चर्चेला उत्तर देताना महिन्यापूर्वी तुमची भूमिका वेगळी होती. महिन्यापूर्वी आमची भूमिका वेगळी होती. त्यामुळे जी जी भूमिका या महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने आपण या ठिकाणी मांडतो, त्यांची व्यथा जाणत असतो यातून सरकारमध्ये तुम्ही होता काय आणि आम्ही आलो काय यापेक्षा तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना करीत असताना इतकी वर्षे निघून गेली. मघाशी या ठिकाणी असे सांगण्यात आले की, तुम्ही कायमस्वरूपी उपाययोजना सांगावी. शेतकऱ्यांच्या पदरात काय पडणार आहे ते सांगावे. दरवर्षी असे प्रकार होत असतील तर ते होऊ नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना आखण्याची गरज आहे. त्यामुळे कायमस्वरूपी उपाययोजनेच्या संदर्भात, दुष्काळाच्या संदर्भात आपण सांगितले या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, दरवर्षी अशा स्वरूपाची तात्पुरती उपाययोजना करीत असताना कायमस्वरूपी उपाययोजनेकडे आपण लक्ष दिले पाहिजे त्या दृष्टीकोनातून राज्य सरकार पाऊल उचलत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी काही दिवसापूर्वी सभागृहात दुष्काळाच्या संदर्भात पॅकेज जाहीर केले. त्या घोषणेमध्ये संपूर्ण शेतीमध्ये ओलावा निर्माण होईल, त्यामधून शेतीमध्ये छोटी छोटी कामे करण्याच्या संदर्भात त्यांनी भूमिका मांडली. शेतामध्ये पाणी गेले पाहिजे. मोठया धरणाच्या माध्यमातून तेथे पाणी जाईल असे नाही. पाणी अडवा, पाणी जिरवा योजनेच्या माध्यमातून, शिरपूर पॅटर्नचे बंधारे असतील त्या माध्यमातून शेतामध्ये पाणी जाण्याचे आणि जलसंधारणाच्या सहाय्याने त्याला प्राधान्य देण्याच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. तो विषय वेगळा आहे.

सभापती महोदय, गारपिटीच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा करण्यात आली. राज्यभरात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे गेल्या 3-4 दिवसात फार मोठया प्रमाणात हानी झाली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील).........

अवकाळी पाऊस दिनांक 14 ते 17 नोव्हेंबर या कालखंडामध्ये झाल्याने अंदाजे 40 हजार हेक्टर जमीन बाधित झाली. 12 ते 14 डिसेंबर या काळात अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि गारपीट यामुळे 60 हजार हेक्टर जमीन बाधित झाल्याचा अंदाज आहे. अंतिम आकडेवारी यायची आहे. काल रात्री देखील काही ठिकाणी पाऊस पडला आहे आणि आजही पाऊस पडणार असा हवामान खात्याचा अंदाज आहे. एकूण 1 लाख हेक्टर जमीन बाधित झाली आहे. 32 तालुके आणि 893 गावे आतापर्यंत बाधित झाल्याचे नजरेस आलेले आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये 10 जिल्हे बाधित झाले होते. नाशिक जिल्हयात 17 हजार हेक्टर, पुणे जिल्हयात 6 हजार हेक्टर, उस्मानाबाद जिल्हयात 1500 हेक्टर, सांगली जिल्हयात 800 हेक्टर, अहमदनगर जिल्हयात 300 हेक्टर जमीन आणि धुळे,सातारा, अमरावती जिल्हयांमध्ये काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, डिसेंबर महिन्यात 10 जिल्हे बाधित झाले असून नाशिक जिल्हयात 4200 हेक्टर, जळगाव जिल्हयात 7800 हेक्टर, सोलापूर जिल्हयात 4700 हेक्टर, रायगड जिल्हयात 4500 हेक्टर, धुळे जिल्हयात 4200 हेक्टर, सांगली जिल्हयात 1600 हेक्टर, नगर जिल्हयात 1500 हेक्टर व नंदूरबार, पुणे आणि सातारा जिल्हयात थोड्या प्रमाणात नुकसान झाल्याची विभागाने नोंद केली आहे. हे करीत असताना आंबा पिकावर मोहोर उशिरा येण्याची शक्यता आहे. आंबा पिकावर मोहोर येण्यास सुरुवात झाल्याने जी फवारणी केली होती ती वाया गेली. त्यामुळे आंबा पिकाचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. आलेला मोहोर थोडा असला तरी त्याची मोठया प्रमाणात हानी झालेली आहे.

सभापती महोदय, बागायती पिकामध्ये फळ पिकाची 25500 हेक्टर जमीन बाधित झाली असून त्यात द्राक्ष, केळी व अन्य फळ पिके आहेत. पूर्णत: 100 टक्के हानी झाल्याचे म्हणता येईल अशा स्वरुपात द्राक्ष आणि केळी पिकाची हानी झाली आहे. केळीवर 4-4 किलो, 3.5 किलो वजनाची एक एक गार पडल्याची नोंद कृषी विभागाने केली आहे. माणसे जगली असली तरी पूर्णपणे पिकाची हानी झाली आहे. प्रामुख्याने नाशिक, धुळे जिल्हयामध्ये काही क्षेत्रात अनुभवास आले आहे. इतर पिकाची हानी 32500 हेक्टर इतकी झालेली आहे. कांद्याचे नुकसान 13600 हेक्टर, रब्बी ज्वारीचे 8500 हेक्टर, मका 3800 हेक्टर, गहू 1500 हेक्टर, हरभरा 1700 हेक्टर, भाजीपाला 2500 हेक्टर इतक्या प्रमाणात बाधित झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y.5

SGB/ 15:00

श्री.एकनाथराव खडसे (पाटील).........

सभापती महोदय, फळ पिकाची विगतवारी आलेली आहे. नाशिक जिल्हयातील 10500 हेक्टर जमिनीवरील म्हणजे जवळपास 25000 एकरवरील द्राक्ष पीक उद्ध्वस्त झाले आहे. डाळिंब 4300 हेक्टर, आंबा 500 हेक्टर, केळी 700 हेक्टर आणि काजू 900 हेक्टर इतक्या क्षेत्रावरील फळ पिकाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यासाठी मोठया प्रमाणावर नुकसान झ ााल्याचे पंचनामे करण्याच्या सूचना देखील दिलेल्या आहेत. राज्य सरकारने स्थायी आदेश दिलेले आहेत. सरकारच्या आदेशाची वाट न पाहता गारपीट झाल्याचे दिसेल, नुकसान झाल्याचे दिसेल, अतिवृष्टी झाली असेल अशा ठिकाणी सुमोटो जिल्हा प्रशासनाने स्वत: पुढाकार घेऊन कृषी विभाग, फलोत्पादन विभाग आणि महसूल विभागाचे अधिकारी यांनी त्या ठिकाणी तातडीने पंचनामे करावेत अशा सूचना प्रत्येक ठिकाणच्या महसूल विभागाला दिलेल्या आहेत. सरकार आता पंचनामे करण्याचे आदेश देईल, मग पंचनामे होत राहतील यापेक्षा स्वत: पंचनामे करुन नुकसानीचा अंदाज जिल्हाधिकाऱ्यांना पाठवावा.

नंतर झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे-पाटील.......

अशा प्रकारे दररोज एक अहवाल शासनाकडे आला पाहिजे अशा सूचना केल्या आहेत. नाशिक जिल्ह्यात प्रथम गारपीटीला सुरुवात झाली, मालेगांव व सटाणा भागात पहिल्यांदा गारपिटीमुळे पिकाचे नुकसान झाले व त्याच क्षणाला पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. आमचे सहकार राज्य मंत्री माननीय श्री. दादाजी भुसे यांच्या मतदारसंघात निफाड तालुक्यात हे नुकसान मोठ्यात प्रमाणावर झालेले आहे. त्याच दिवशी रात्री धुळे आणि जळगांव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गारपीटीमुळे नुकसान झाले. तीच परिस्थिती कोकणात देखील निर्माण झाली आणि शासनाकडून तातडीने व आजच्या आज पंचनामे करण्याचे आदेश दिले गेले व त्यानुसार जी आकडेवारी मिळाली तीच ही आकडेवारी मी सांगितली आहे.

महोदय, मघाशी मंत्री म्हणून माझ्या नावाचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी केला व ते म्हणाले की, राज्याचे महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे संवेदनशील नाहीत. दुष्काळी परिस्थिती व अवकाळी पाऊस पडला असताना ते सिनेमा पाहण्यासाठी बसले होते. ही गोष्ट खरी आहे आणि मला सुध्दा कधी कधी मिडियाचे कौतूक करावेसे वाटते की अगोदरचा भाग वगळून तसेच नंतरचाही भाग वगळून मधलाच पार्ट दाखवायचा तो वाचायलाही बरा वाटतो त्यामुळे असे गैरसमज होत असतील कदाचित. पण मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, त्या दिवशी सकाळी मी माझ्या शेतावरच होतो, मी राहतो सुध्दा शेतातच आणि मी माझ्या घरी होतो. माझा पंढरपूरचा दौरा होता पण गारपीट झाल्यामुळे मी तो रद्द केला व सकाळीच शेतात पोहचलो. तेथून जळगांव जिल्ह्यातील नशिराबाद भागात ज्वारीच्या पिकाचे नुकसान झाले म्हणून तेथे गेलो. मी जिल्हाधिकारी व तहसीलदारांना सूचना केल्या होत्या की, आपण स्वत: परिस्थितीची पाहणी करुन 11 वाजेपर्यंत या, 11 वाजता बैठक घेऊ. त्यानुसार आमचे जिल्हाधिकारी व तहसीलदार सुध्दा सकाळी 8.30 वाजता जाऊन आले. या बैठकीत मी झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला आणि नुकसान भरपाई किती द्यावी अशा सूचना त्यावेळेस दिल्या होत्या. त्यात एका ठिकाणी एक महिला मृत झाली असे कळले पण पोस्ट मार्टेम रिपोर्ट यावयाचा होता. तेव्हा मी तातडीने पूर्वी आपण रुपये एक लाखाची मदत देत होतो पण तातडीने रुपये दीड लाखाची मदत दिली आणि आवश्यकता भासल्यास माननीय मुख्यमंत्री निधीतून आणखी रुपये एक लाख मिळण्यासाठी विनंती

......2

श्री. एकनाथराव खडसे-पाटील.......

करीन अशा प्रकारे एकूण रुपये अडीच लाखाची मदत देण्यात येईल असे सांगितले. त्यावेळेस ही बैठक संपली आणि सिनेमा पाहण्याचा कार्यक्रम त्या दिवशी नव्हताच, तो अगोदरच ठरलेला कार्यक्रम होता. हा सिनेमा मी पहावा अशी विनंती मला करण्यात आली याचे कारण तो टॅक्स फ्री करावयाचा होता. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याच्या शिफारशीनंतरच टॅक्स फ्री करण्याची प्रोसिजर असल्याने मला पाहण्याची विनंती केली होती. विशेष म्हणजे हा अहिराणी भाषेतील सिनेमा असून त्यात सामाजिक विषय अंतर्भूत आहे........

श्री. माणिकराव ठाकरे : महोदय, माझ्या नावाचा उल्लेख झाल्याने मला स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, अधिकाऱ्यांनी पाहणी करुन मला रिपोर्ट केला याची कदाचित मला माहिती नव्हती किंवा ती बातमी वर्तमानपत्रातूनही छापून आली नव्हती पण राज्यात अशी परिस्थिती असताना आणि चित्रपट कितीही महत्वाचा असला तरी आणि संदेश देणारा असला तरी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना पाठविणे, स्वत: न जाणे हे तितकेसे संयुक्तिक वाटत नाही.

श्री. एकनाथराव खडसे-पाटील : महोदय, मी आताच सांगितले की, माझा पंढरपुरचा दौरा मी रद्द केला आणि माझे घर शेतातच असल्याने मी शेतावरच होतो ......अडथळा.......आमच्या भाषेत शेतातील घराला झोपडी म्हणतात पण आपण कदाचित त्याला फार्म हाऊस म्हणत असाल. मी लहान पणापासूनच दररोज त्याच शेतावर जात होतो, झोपतही होतो, बैलगाडी घेऊन त्यावरच अंथरुण टाकून झोपत होतो, त्याच शेतावर निंदण, खुरपण, डवरणे वगैरे शेतीची कामे करीत होतो. विहिरीत उतरुन पूर्वीच्या काळात असलेले ऑईल इंजिन दुरुस्तीची कामे सुध्दा करीत होतो. मी सांगितले की, जळगांव जिल्ह्यातील नशिराबाद भागात ज्वारीचे नुकसान झाले म्हणून मी नशिराबाद नाक्याजवळ बसलो आणि शेतकरी सुध्दा तेथे आले. मला काही शेतकऱ्यांनी सांगितले की, अमक्या भागात जास्त नुकसान झाले व इकडच्या भागात कमी नुकसान झाले. तसेच हे शेतकरी असेही सांगत होते की, या पावसामुळे रब्बीच्या पिकाचे म्हणजेच ज्वारीचे पीक येण्यास तशी मदतही होणार आहे. याचे कारण मला शेतातील संपूर्ण कामाचा अनुभव असल्याने शेतकरी माझ्याबरोबर चर्चा करीत होते. ही सर्व कामे सन्माननीय सदस्यांनी कधी केली होती काय, त्यांना

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे-पाटील.......

हे डवरणे, वखरणे अथवा वाही देणे वगैरे शब्दांची तरी माहिती असेल की नाही याची शंका आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : महोदय, मी सुध्दा शेतात डवरणे व वखरण्याची कामे केलेली आहेत.

श्री. एकनाथराव खडसे : असेल कदाचित, मला माहीत नव्हते आपण सांगितल्यामुळे माझ्या ज्ञानात भर पडली आणि मला यापुढे शेतासंबंधी काही गरज पडली तर मी आपले मार्गदर्शन जरुर घेईन. पण आपण राजकारणासाठी बोलत असाल तर माझी राजकीय भाषण करण्याची तयारी आहे पण मी राजकीय भाषणाकडे वळत नाही म्हणून मी सुरुवातीलाच एका ओळीत सांगितले होते की, अगोदरच्या काळात जी परिस्थिती तुमची होती तीच माझी आता आहे.......अडथळा..... मला तरी भारतीय जनता पक्षाने येथपर्यंत आणून ठेवले, निवडून दिले आणि मी सहा वेळा विधानसभेवर निवडून आलो आहे आपल्याला तर लोकांनी निवडून सुध्दा दिले नाही.......

**उप सभापती** : असे बोलून सन्माननीय सदस्यांनी महत्वाच्या चर्चेचे गांभीर्य घालवू नये अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. एकनाथराव खडसे-पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी माझ्या ज्ञानात भर पाडली आहे. या सिनेमातील सामाजिक विषय म्हणजे हुंड्यासाठी सावकाराच्या दरबारात जाऊन आपली जमीन गहाण ठेवणाऱ्या शेतकऱ्याची आहे. ती जमीन सोडवताना तो शेतकरी मरण पावतो पण सावकाराच्या जाचामुळे ती सोडविता येत नाही. ती परत मिळविण्यासाठी मृत शेतकऱ्याचा भाचा प्रयत्न करतो. तसेच त्या गावचा सरपंच हगणदारी मुक्तीसाठी गावातील पैसा लावतो आणि वैयक्तिक शौचालयासाठी मिळालेला पैसा खाऊन जातो पण हगणदारी मुक्त गाव करण्यास सरपंचास भाग पाडतात. अशा प्रकारे हुंडाबळी, हगणदारी मुक्ती असे सामाजिक विषय असल्याने व हा सिनेमा टॅक्स फ्री करावयाचा असल्याने मी पाहण्यासाठी गेलो होतो. तसेच मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जेवढी काळजी मला कृषी व महसूल मंत्री म्हणून आहे तेवढी कदाचित आपणास असेल. तसेच अहिराणी भाषेतील हा पहिलाच सिनेमा असल्याने व तो टॅक्स फ्री करावयाचा होता. तसे पाहिले तर मी 15-16 वर्षापूर्वी कोठेतरी सिनेमा पाहिला असेल त्यानंतर हा पाहिला व तो देखील विशिष्ट कारणासाठी. कारण

......4



PFK/ पूर्वी श्री. भोगले........ 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे-पाटील.......

आज समाजात सावकारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या असे ज्वलंत प्रश्न आहेत पण मघाशी सांगितल्याप्रमाणे अगोदरचे आणि नंतरचे काहीच न दाखविता केवळ मधलाच भाग आणि मोबाईलच दाखवायचा व आपला टीआरपी वाढवून घ्यायचा पण त्यात माझेही नाव येते. पण माझी विनंती आहे की, गेली चाळीस वर्षे मी राजकारण व समाजकारणात मेहनत घेत आहे, रात्रीचे दिवस केले आणि येथे बसण्याच्या इमेजपर्यंत माझी पात्रता सिध्द केली त्याच्या मागे माझी चाळीस वर्षांची मेहनत आहे ........

यानंतर श्री. भारवि ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) .....

40 वर्षे माणसे जीवनात प्रामाणिकपणे काम करतात त्यांची एका शब्दामुळे प्रतिमा बदनाम करणे हे योग्य आहे काय ? नाथाभाऊंना संवेदना नाही असे आपण बोललात त्याचे मला काही वाटत नाही. पण जे दाखवले गेले त्या संदर्भात मी बोलत आहे. ज्या माणसाने 40 वर्षे जनतेची सेवा केली त्याच्यावर चोऱ्या, दरोडे, छिनाली असे कुठलेही आरोप नाहीत. नाथाभाऊ मोबाईलवर बोलला एवढाच त्यांच्यावर आक्षेप आहे. येथे अकोल्याचे आमदार उपस्थित आहेत. कृषि संजीवनी योजनेला मुदतवाढ द्यावी अशा प्रकारची मागणी माननीय आमदारांनी केली. मी त्यांना सांगितले की, या योजनेमध्ये पैसे भरावे लागतात. आपण पैसे भरले तर वीज बिलामध्ये 50 टक्के सूट मिळेल. त्यावरील दंड व्याजामध्ये सूट मिळेल असे मी सांगितले. त्यावेळी एक आमदार महोदय म्हणाले की, अर्धे पैसे भरायला देखील आमच्याकडे पैसे नाहीत. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, आपणाकडे पैसे नसतील तर आपल्याला लाभ मिळणार नाही. आपल्या मुलीशी बोलण्यासाठी मोबाईलचे बिल कसे वेळेवर भरतो ? ते वेळेवर भरण्यासाठी आपण काळजी घेतो. त्याप्रमाणे आपण पैसे भरलेत तर आपल्याला सूट मिळेल नाही तर मिळणार नाही. सरकारकडे येणे असेल तर ते आपण प्रथम भरावे आणि मग आपणाला सवलत देतो हे सांगणे गैर आहे काय ? कृषि संजीवनी मध्ये 50 टक्के सवलत घ्यायची असेल तर मुद्दल भरावे लागेल, हे सांगणे गैर आहे काय, चूक आहे ? पण नाथाभाऊंनी वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे त्यांची राज्यपालपदी नेमणूक करण्यात येणार आहे अशा प्रकारची बातमी देण्यात आली. मी लगेच वर विचारले की, मला कोणत्या राज्यामध्ये पाठवत आहात. त्यांनी मला सांगितले की, आम्ही आपणाला तेथे पाठवत नाही. आपणाला वरच्या सभागृहातातील नेता बनवत आहोत. त्याचा मला आनंद आहे. मी मुख्यमंत्र्यांच्या बरोबरीचा आहे. मला मुख्यमंत्री केले नसेल असे आपण जरी म्हणत असाल तरी देखील मी आज बारा खात्यांचा मंत्री आहे. .... (अडथळा).... माजी माननीय सदस्य श्री.नारायण राणे हे विरोधी पक्ष नेते पदी राहिले. त्यांनी जंगजंग पछाडले तरी देखील त्यांना आपण मुख्यमंत्री केले नाही. आपण सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मुख्यमंत्री पद का दिले नाही ? श्री.माणिकराव ठाकरे यांची मेहनत केवढी आहे ती पहावी. त्यांनी रात्रीचा दिवस केला.

...2

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) .....

सभापती महोदय, या विषयामध्ये कायमस्वरूपी उपाययोजना झाली पाहिजे. पुढच्या कालखंडामध्ये आम्ही मदत देण्याचे ठरविले आहे. आता पर्यंत कोरडवाहू पिकांची हानी झाली तर त्यासाठी आपण हेक्टरी 4500 रूपये मदत देत होतो. पण या बरोबरीला आता विशेष मदत म्हणून रूपये 4500 + 5500 = रूपये 10000/- प्रती हेक्टरी मदत देण्याचे सरकारने ठरविले आहे. कापूस, सोयाबीन या पिकांसह अन्य पिकांची अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे हानी झाली असेल अशा कोरडवाहू पिकांना शासन मदत करणार आहे.

मागच्या वर्षी बागायती पिकांना हेक्टरी रूपये 9000/- इतकी मदत करण्यात येत होती. त्यात विशेष मदत म्हणून रूपये 6000/- असे एकूण हेक्टरी रूपये 15000/- एवढी मदत बागायती पिकांना देणार आहोत. यात फळबागा सोडलेल्या आहेत. फळबागा सोडून जी बागायती पिके आहेत त्यांना आपण हेक्टरी रूपये 15000/- इतकी मदत करणार आहोत.

ज्या 1 वर्ष, 2 वर्ष, 4, वर्ष, 5 वर्षांच्या बहुवार्षिक फळबागा आहेत त्यांना यापूर्वी हेक्टरी रूपये 12000/- एवढी मदत देण्यात येत होती. त्यात रूपये 13000/- एवढी वाढ करून प्रती हेक्टरी रूपये 25000/- मदत करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. द्राक्ष, डाळिंब आणि आंबा अशा पिकांसाठी राष्ट्रीय फलोत्पादन मिशन, नवी दिल्ली यांच्याकडे केंद्रीय कृषि मंत्री श्री.राधामोहन सिंग यांच्यामार्फत प्रस्ताव पाठविणार आहोत. मी त्यांच्याशी बोलून विनंती केली आहे की, राष्ट्रीय फलोत्पादन मिशनकडून आम्हाला काही तरी मदत मिळवून द्यावी. आम्ही ही जी मदत देणार आहोत ती वेगळी आहे. द्राक्ष, डाळिंब, आंबा उत्पादक शेतकऱ्यांना सावरणे फार कठीण आहे. त्यामुळे त्यांनी मला सांगितले की, आमची एक नियमित योजना आहे. त्यासाठी आपण एक प्रस्ताव पाठवावा. यात 15 टक्के राज्याचा तर, 85 टक्के केंद्र शासनाचा हिस्सा राहील याप्रमाणे आपणाला मदत करण्यात येईल असेही त्यांनी मला सांगितले. अशी साधारणत: हेक्टरी रूपये 70000 ते

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) .....

रूपये 80000/- पर्यंतची मदत त्या शेतकऱ्याला मिळू शकेल. तसा प्रस्ताव आम्ही तयार करीत आहोत. हा प्रस्ताव आम्ही केंद्र शासनाकडे पाठवून देणार आहोत. या योजने अंतर्गत किती निधी द्यायचा हे केंद्र शासनाच्या हातामध्ये आहे. देशाचा सर्व अभ्यास करून आपल्याला अधिकाधिक मदत करण्याचा ते निश्चितच पर्यत्न करतील. ही मदत दोन हेक्टर पर्यंतच मर्यादित राहणार आहे. परवाच आपण तीन महिन्यांचे वीज बिल माफ करणे, दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची फी माफ करणे, कर्जमाफीच्या संदर्भात कर्जाचे पुनर्गठन करीत असताना त्यावरील व्याज माफ करणे असे दुष्काळासंबंधातील जे आदेश काढले आहेत ते जसेच्या तसे आताच्या गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना देखील लागू राहतील.

सभापती महोदय, नैसर्गिक आपत्तीमध्ये एखादी व्यक्ती मयत झाली की, त्याच्या कुटुंबीयांना साधारणत: एक लाख रूपये देण्याचे स्थायी आदेश आहेत. आता यामध्ये रूपये 50000/- इतकी वाढ करून ती रक्कम दीड लाख रूपये करण्यात येईल. नैसर्गिक आपत्तीमध्ये किती लोक मृत पावले आहेत याचा अंदाज घेऊन मृतांच्या परिवाराला रूपये दीड लाख, अधिक मुख्यमंत्री सहायता निधीतून रूपये एक लाख असे मिळून रूपये अडीच लाखाची मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

मोठ्या मृत जनावरांसाठी रूपये 25000/-, बकऱ्या, मेंढ्या या लहान जनावारांसाठी रूपये 3500/-, गाढव या सारख्या मध्यम जनावरांसाठी रूपये 10000/- मदत देण्यात येणार आहे.

पक्क्या घराची भिंत कोसळून नुकसान झाले असेल तर अशा घरांसाठी रूपये 70000/- मदत करण्यात येणार आहे. कच्च्या घरासाठी रूपये 25000/- मदत करण्यात येणार आहे आणि अशंत: उद्ध्वस्त झालेल्या घरांसाठी रूपये 15000/- इतकी मदत करण्यात येणार आहे.

शेत पिकाचे 50 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर, धान पीक असेल तर प्रती हेक्टर रूपये साडेसात हजार रूपये मदत करण्यात येणार आहे. करडईसह अन्य जी इतर पिके असतात त्यांना प्रती हेक्टरी पाच हजार रूपये इतकी मदत करण्यात येणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) .....

जळगावला 24 तासामध्ये 65 मि.मी.इतका पाऊस झाला. पावसाळ्यात कधी पाहिला नव्हता एवढा पूर त्या दिवशी जळगाव येथे आला होता. त्यामुळे काही जमिनी खरडल्या गेल्या. काही जमिनींचे नुकसान झाले. जमीन खरडून गेल्यामुळे ज्यांचे नुकसान झाले असेल अशांना हेक्टरी रूपये 20000/- इतकी मदत त्या जमिनीच्या दुरूस्तीसाठी देण्यात येणार आहे. ज्यांची जमीन पूर्णत: वाहून गेली आहे, ना पेर झाली आहे अशा जमीन मालकांना हेक्टरी रूपये 25000/- देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .......

सभापती महोदय, ज्या ज्या ठिकाणी गारपीट झालेली आहे त्या त्या ठिकाणी निश्चिपणे नुकसानभरपाई दिली जाणार आहे.

सभापती महोदय, प्रामुख्याने असे लक्षात आले आहे की, द्राक्ष,डाळिंब, आंबा व अन्य तत्सम पिकांना मोठया प्रमाणात नुकसान भरपाई दिली जात असते. ज्या ठिकाणी द्राक्ष,डाळिंब,आंबा पीक घेतले जाते त्या ठिक्राणी गारपीट किंवा अतिवृष्टी झाली तर हे पीक घेणारा शेतकरी उद्धवस्त होतो. मी आपल्याला सांगू इच्छितो की, इटलीमध्ये गारपिटीच्या संदर्भात आच्छादन शेडचे तंत्रज्ञान विकसित झालेले आहे. फळ पिकांवर आच्छादन शेड घातले तर पिकाला सूर्यकिरण मिळते व पीकही मोठे होते. कितीही गारा पडल्यातरी अच्छादनामुळे गारांच्या तडाख्याने पिकाला नुकसान होत नाही. त्यामुळे आच्छादन शेडच्या तंत्रामुळे फळपिकाचा बचाव होतो. यासंदर्भात माहिती मागवली असता आच्छदन शेडसाठी हेक्टरी 6 लाख रुपये खर्च येतो अशी माहिती मिळाली आहे. राज्य शासनाने यासंदर्भात अधिकची माहिती घेऊन केंद्रसरकारला अच्छादन शेडच्या तंत्रासाठी विनंती केली जाणार आहे. या आच्छादनासाठी आयात कर 40 टक्के लावला जात असतो. केंद्रसरकारने आयात कर माफ केला व केंद्र राज्य सरकारने यासाठी सबसिडी दिली तर कमी खर्चामध्ये फलोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला आच्छादनाचा लाभ देता येईल. आम्ही अशी एक योजना तयार करीत आहोत की, आच्छादन तंत्रासाठी केंद्राने पैसा दिला नाही परंतु केंद्र सरकारने आयातशुल्क माफ केले तर राज्य सरकार त्यामध्ये आपला वाटा घालील व फळपीक उत्पादकाला कायमस्वरुपी आच्छादन शेड उभारणीसाठी मदत करु शकेल.

सभापती महोदय, वेगवेगळया उपाययोजना करीत असताना विमा आणि आणेवारीच्या संदर्भात मी माहिती दिलेली आहे. आपली आणेवारीची पध्दत ही ब्रिटीशकालीन पध्दत असून त्या पध्दती प्रमाणे आणेवारी काढली जाते. पिकाची कापणी करुन त्याचे उत्पादन काढणे ही एक आणेवारी काढण्याची पध्दत आहे तसेच आणेवारी अंदाजित पध्दतीनेही काढली जाते. जुनी आणेवारीची पध्दत बदलवून सुधारीत आणेवारीची पध्दत आणली जाणार आहे. पुण्याचे कमिशनर श्री. विकास देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील एक समितीचे यांसदर्भात काम सुरु असून

श्री.एकनाथराव खडसे .......

या विषयाच्या संदर्भात काल त्यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, या विषयाच्या संदर्भात आमचा अहवाल तयार झाला असून या अहवालाच्या स्क्रुटीनीचे काम सुरु आहे. त्यामुळे येत्या बजेट सेशन पर्यंत आणेवारीची पध्दत बदलवण्यासाठी जो काही निर्णय घेतला जाईल तो सभागृहाच्याही निदर्शनास आणला जाईल. आपल्या राज्यात इंग्रजांच्या कालखंडापासून सुरु असलेली आणेवारीची पध्दत 100 टक्के बदलण्यात येईल.

सभापती महोदय, पीक विमा योजनेच्या संदर्भात बजाज ॲग्रो इन्श्यूरन्स कंपनी, रिलायन्स ॲग्रो इन्श्यूरन्स कंपनी, टाटा ॲग्रो इन्श्यूरन्स कंपन्यांशी यासंदर्भात चर्चा करण्यात आलेली आहे. प्रत्येकाला विम्याचा लाभ मिळाला पाहिजे. आपल्याकडे आतापर्यंत सुरुवातीला 100 रुपयांचा चेक येतो व त्यानंतर 10 रुपयाचा चेक येतो. परंतु हे चेक अशा प्रकारे का येतात याचा जेव्हा शोध घेतला तेव्हा असे कळले की, यामध्ये 60 टक्के उंबरठा उचलण्याची पध्दत आहे. समजा 50 टक्के उंबरठा उत्पन्न आले तर उरलेल्या 10 टक्क्याचाच लाभ दिला जातो. समजा 59 टक्के उंबरठा उत्पन्न असेल तर एकच टक्क्याचा लाभ दिला जातो. विमा कंपन्यांशी चर्चा करताना आम्हाला 100 आणि 200 रुपये नुकसानीचा विमा नको तर 100 टक्के नुकसानीचा लाभ झाला पाहिजे. वाटल्यास राज्य सरकार विम्याचा हप्ता अजून वाढवून देईल परंतु 100 टक्के नुकसानीचा फायदा शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. आतापर्यंत विमा कंपनींकडून आपल्याला प्रतिसाद मिळत नव्हता परंतु आता विमा कंपन्यांना यांसदर्भात सूचना केलेली आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्याने जर आत्महत्या केली तर आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला 1 लाख रुपयाची मदत दिली जात होती. यामध्ये 1 लाख रुपये मदत देत असतांना 70 हजार रुपये बँकेत जमा केले जात होते व 30 हजार रुपये रोख रक्कम दिली जात होती. सरकारच्या ज्या काही योजना असतात त्या सुरूच असतात. आत्महत्या होऊ नये यासाठी आपण प्रयत्न करीत आहे. परंतु दुर्दैवाने शेतकऱ्याने आत्महत्या केली तर शासनाला मदत करावी लागत असते. त्यामुळे शेतकऱ्याचा किमान 5 लाखाचा विमा उतरवता येईल काय, माणूस समोर नाही परंतु नोश्नल विमा उतरवता आला तर एखाद्या शेतकऱ्याने दुर्दैवाने आत्महत्या केली तर अशा आत्महत्याग्रस्त

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .......

शेतऱ्याच्या कुटुंबाला एक लाख रुपयाऐवजी पाच लाख रुपये देता येईल काय, हे 5 लाख रुपये देत असतांना विम्याचा संपूर्ण हप्ता राज्य सरकारने भरावा यासंदर्भात शासन विमा कंपन्यांशी चर्चा करीत आहे. आत्महत्या 100 टक्के थांबल्या पाहिजेत यासाठी शासन प्रयत्न करीत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : राज्य शासन संपूर्ण हप्ता भरण्यास तयार असेल तर विमा सुरु होईलच. त्यामुळे आता सांगितल्या प्रमाणे राज्य सरकार निर्णय घेणार आहे की, केवळ चर्चाच करणार आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय हा विम्याच्या निकषात बसत नाही. अपघात हा विषय विम्याच्या निकषात येत असतो. आत्महत्या सुध्दा विमा कंपनीच्या निकषात कशा बसतील व त्याचा हप्ता कसा भरता येईल यासंदर्भात विमा कंपन्यांशी आम्ही चर्चा केलेली आहे. विमा कंपन्यांनी आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीला विमा संरक्षण देण्याची तयारी व्यक्त केलेली आहे. आता पर्यंत कोणत्याही विमा कंपनीने आत्महत्या करणाऱ्याला विम्याचे संरक्षण दिलेले नव्हते. परंतु आता शेतकऱ्यांने आत्महत्या केली तर ती आत्महत्या ॲक्सीडेंटल समजून विमा कंपनी विमा देण्यासआता तयार झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात अजून चर्चा सुरु असून यापुढे आत्महत्या गुन्हा धरला जाणार नाही.

सभापती महोदय, हवामानावर आधारित फळ पीक योजनेच्या संदर्भात सर्कलमध्ये हवामानाच्या संदर्भातील यंत्र बसविले जातात. परंतु ज्या ठिकाणी अश्ा प्रकारची यंत्रे बसवली गेली नाहीत त्या ठिकाणी अन्याय होत असतो. त्यामुळे आता हवामान यंत्र गाव निहाय बसविण्याचे नियोजन केले जाणार आहे. पर्जन्य मापक यंत्र तालुक्यांमध्ये बसविलेली आहेत. तसेच काही मोजक्या मंडल विभागात पर्जन्यमापक यंत्रा बसविलेली आहेत. त्यामुळे पर्जन्यमापक यंत्रणा प्रत्येक गावामध्ये बसवण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. येत्या पावसाळयाच्या आत पर्जन्य मापक यंत्रणा सर्व मंडलस्तरापर्यंत बसवली जाणार असून त्याच्या पुढील वर्षी प्रत्येक गावात पर्जन्यमापक यंत्र बसविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. हवामानावर आधारित विमा असेल किंवा अन्य विमा असेल तर त्यासाठी प्रत्यक्षात किती पाऊस पडला या सूत्रावरुन आणेवारी काढली जात असते.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .......

सभापती महोदय, विमा आणि आणेवारीच्या पध्दतीमध्ये राज्य शासन सुधारणा करीत आहे. परंतु ही सर्व कामे करण्यासाठी राज्य शासनाला पैशाची आवश्यकता लागणार आहे. माननीय श्री.तटकरे साहेबांनी आम्हाला सांगितले आहे की, आम्हाला पैशाची अडचण सांगू नका. ठीक आहे यापुढे आम्ही पैशाची अडचण सांगणार नाही. परंतु आहे त्या पैशाचे आपल्याला नियोजन करावेच लागणार आहे. काही काळासाठी तरी आपल्याला पैसा उभा करावा लागणार आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करीत असताना असे सांगण्यात आले की, यावर्षी गारपीट झाल्यामुळे, अतिवृष्टी झाल्यामुळे, दुष्काळ पडल्यामुळे थोडी आर्थिक ओढाताण होते आहे. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय आमदारांना आपण वर्षाकाठी 700 कोटी रुपये आमदर निधी देत असतो. त्यामुळे आमदार निधी एका वर्षासाठी गोठवण्यात यावा व हा पैसा अतिवृष्टी, गारपीट, आत्महत्या तसेच अन्य ठिकाणी वापरावा अशा प्रकारची एक सूचना आमच्याकडे आलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे ....

राज्य सरकार त्याचा गंभीरपणे विचार करीत आहे. सन्माननीय सदस्य या सूचनेला नाही म्हणणार नाहीत असे मला वाटते. आपण आमदारांना 700 कोटी रुपये देतो. ही रक्कम आपणास दुष्काळग्रस्त, गारपीटग्रस्त,टंचाईग्रस्त भागाकरिता वापरता येईल अशी सूचना आलेली आहे. त्या सूचनेवर मंत्रिमंडळात चर्चा करण्यात येईल. या सूचनेस सर्व सन्माननीय सदस्यांची सहमती असेल तर तसा निर्णय घेण्यात येईल. सदस्यांची सहमती नसेल तर शासन निर्णय घेणार नाही. आमदारांनी सहमती दिली तरी या वर्षापुरता त्यांचा आमदार निधी दुष्काळग्रस्त, गारपीटग्रस्त व टंचाईग्रस्त भागाकरिता वापरता येईल. आमदारांना 2 कोटी रुपये आमदार निधी मिळतो. आपण हा निधी दुष्काळग्रस्त भागांवर खर्च केला तर स्थायी मालमत्ता उभी राहील आणि शेतकऱ्यांच्या खिशात देखील पैसा जाईल. तेव्हा आपण या सूचनेस सहमती द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर सन्माननीय सर्वश्री सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे, डॉ.अपूर्व हिरे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत प्र.पाटील, चंद्रकांत रघुवंशी, दीपकराव साळुंखे, प्रकाश गजभिये, श्रीमती हुस्नभानू खलिफे, सर्वश्री हेमंत टकले, आनंद ठाकूर व अन्य सदस्यांनी भाग घेतला या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून माझे उत्तर पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी राईट ऑफ रिप्लायसाठी उभा आहे...

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,...

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी सांगू इच्छितो की, आपणास बोलण्याची संधी देण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचा राईट ऑफ रिप्लाय आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळलेले आहे. काही भागात पाऊस झाला नाही, पीक आले नाही म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा उल्लेख आहे. कापूस आणि सोयाबीन पिकणाऱ्या भागामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. इतरही भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. परंतु कापूस पिकणाऱ्या भागात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत हे आपणास मान्य करावे लागेल. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांबाबत आर्थिक पॅकेजमध्ये एका पैशाचा मदतीचा उल्लेख केलेला नाही. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात उल्ल्ेख केलेला नाही. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना किती आर्थिक मदत करणार आहात, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार आहात की नाही याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव उपस्थित केला. तेव्हा राईट ऑफ रिप्लायसाठी पहिला अधिकार कोणाचा असतो या संदर्भातील माहिती मला मिळाली पाहिजे. या सभागृहाचा सदस्य म्हणून माहिती घेण्याचा माझा अधिकार आहे. तेव्हा आपण मला माहिती द्यावी.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मागील तीन दिवसामध्ये झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या अतोनात नुकसानी संदर्भात चर्चा करण्यासाठी आम्ही नियम 260 अन्वये प्रस्ताव दिला होता.मंत्री महोदयांच्या उत्तराने आम्हाला थोडा खेद वाटला तसेच दुःखही झाले. मंत्री महोदयांकडून अशाप्रकारच्या उत्तराची आम्ही अपेक्षा केली नव्हती. आज सर्व बागायतदार शेतकरी होरपळलेला आहे. अशावेळी अशातऱ्हेची चर्चा करणे आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने आतल्या आत उत्तरे देणे आणि मग श्रेयासाठी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या राईट ऑफ रिप्लायसाठी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

केलेली घाई, हे योग्य आहे असे मला वाटत नाही. ज्यांनी अशी घाई केली त्यांच्याबद्दल मी बोलत आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आपण मध्ये बोलू नका कारण आता आपण गंभीर आहोत. आपण गंभीर असले पाहिजे. या बाजूला होता तेव्हा गंभीर होता आणि तिथे तुम्हाला घेतले नाही म्हणून गंभीर आहात. पण आपण या विषयावर तरी आपल्या संवेदना जागृत ठेवाव्यात अशी माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे. आपण जेवढे बोलाल तितक्याच प्रखरतेने आम्ही देखील बोलू शकतो, पण आज तो क्षण नाही. मघाशी माननीय महसूल मंत्री उत्तर देत असताना बाके वाजविण्यात आली, ही सुद्धा लांच्छनास्पद गोष्ट आहे. अशी गोष्ट पुढील काळात घडू नये यासाठी आपण त्यांना समज द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांच्या उत्तरात शेतकऱ्यांना मदतीचा काहीच उल्लेख आलेला नाही. माननीय महसूल मंत्री यांनी पूर्वीचे स्थायी आदेश आणि आकडेवारी वाचून दाखविली. त्यांच्याकडून द्राक्ष, केळी, डाळिंब, आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात काही मदतीची घोषणा होईल अशी अपेक्षा होती. परंतु त्यांनी फक्त स्थायी आदेश वाचून दाखविला आणि त्या संदर्भात काय करणार आहोत हे सांगितले. मंत्री महोदयांनी नुकसानी संदर्भातील आकडेवारी घेण्याचे काम सुरु आहे असे सांगितले. तसेच त्यांनी या ठिकाणी वेगवेगळी आकडेवारी सांगितली. त्यांनी पंचनाम्यामध्ये जी आकडेवारी येईल ती सांगावी. पंचनामा करण्याचे काम त्वरित सुरु करण्यात यावे कारण अजून पंचनामे करण्याचे आदेश दिलेले नाहीत. सरकारने आता कोणत्याही सबबी सांगू नयेत. आपणास आमचा आमदार निधी घ्यावयाचा असेल तर आपण तो घ्यावा. शेतकऱ्यांना न्याय देण्याची वेळ आली असल्याने सरकार कर्ज काढू शकते. कर्ज काढण्याची वित्तीय मर्यादा शिल्लक आहे याची आपणास आणि मला देखील माहिती आहे. तेव्हा सरकार कर्ज काढू शकते. जो शेतकरी कर्जामुळे दबला आहे, त्याचा संसार उद्ध्वस्त झालेला आहे, त्याबाबत संवेदना जागृत ठेवा एवढेच मला या निमित्ताने सांगायचे आहे.

..4..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, या ठिकाणी महसूल मंत्री महोदयांनी खरोखरच उत्तर दिले असे मला वाटले नाही. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब यांच्याप्रती आदर ठेवून सांगतो की, आपणाकडून अशा उत्तराची अपेक्षा नव्हती. आपणास उत्तराच्या भाषणात एवढे विश्लेषण करावे लागेल अशी आमची आमच्याकडून बिलकूल अपेक्षा नव्हती. कारण आताच्या संवेदना खूप वेगळ्या आहेत. उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्याला आपण सभागृहात काय बोलत आहोत यापेक्षा सरकारच्या माध्यमातून आपणास कोणता न्याय मिळणार आहे याकडे त्याचे अधिक लक्ष असते.

सभापती महोदय, या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या पिकांचा समावेश आहे. या संदर्भात पूर्वीचे जे आदेश होते त्या बाबत आमची हरकत होतीच कारण त्यामध्ये स्पष्टता नव्हती. त्यावेळी सरकारने चार हजार कोटी रुपयांचे पॅकेज देणार असे सांगितले होते. एकूण 2 लाख 82 हजार हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले आहे आणि त्याचा प्रति हेक्टरी हिशोब केला तर फक्त 1450 रुपये देखील मिळत नाही. आमच्या सरकारने 10-15 हजार हेक्टरी मदत करण्यासाठी पावले उचलली होती.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांचा विमा काढणार आहोत असे मंत्री महोदयांनी सांगितले. ज्यावेळी ही योजना येईल त्यावेळी त्यावर बोलता येईल. परंतु आम्ही आज ज्या अपेक्षेने चर्चा उपस्थित केली होती त्या अपेक्षेचा भंग झालेला आहे, शेतकऱ्यांचा भ्रमनिरास झालेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याच्या दृष्टीने सरकारकडून जी पावले उचलण्याची अपेक्षा होती त्या अपेक्षांची पूर्ती त्यांनी केलेली नाही. तेव्हा आम्ही सरकारचा जाहीर निषेध करून बहिर्गमन करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सदस्य बर्हिगमन करतात.)

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक सायंकाळी 4.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.48 ते 4.30 पर्यंत स्थगित झाली )

---------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : मला वाटते आपण माननीय मंत्र्यांची दोन मिनिटे वाट बघू या.

श्री.हेमंत टकले : महोदय, सभागृहात मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करावी, अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे मी सभागृहाची बैठक सायंकाळी 4.45 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.32 ते 4.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

**-------**

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, आपण अगोदर लक्षवेधी सूचना घ्याव्यात, अशी माझी आपणाला विनंती आहे.

**उप सभापती** : आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा व त्यावरील उत्तर होईल. मी माननीय सभापतींशी या संदर्भात विचारविनिमय करून आलो आहे, त्यांच्या सूचनेनुसार माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आता आपण घेत आहोत. त्यानंतर लक्षवेधी सूचना देखील होतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात उत्तर देणारे माननीय मंत्री व संबंधित माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्याची संधी मिळावी, अशी आम्ही माननीय सभापतींना विनंती केली आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आम्हाला देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्याची संधी मिळावी. आम्ही तयारी करून आलो आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलू द्यावे आणि त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर घ्यावे.

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी भाषणास सुरुवात करावी.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

श्री. नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दिनांक 12 नोव्हेंबर, 2014 रोजी विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर अभिभाषण केले. मी त्या अभिभाषणावर माझे विचार मांडत आहे.

गेल्या 15 वर्षांपासून माननीय राज्यपालांनी जे विचार मांडले आहेत, त्या विचारांची तीच लाईन पुढे खेचण्यात आलेली आहे. नव्याने निवडणुका झाल्या, त्यानंतर नवीन सरकार राज्यात स्थापन झाले. नवीन सरकारला राज्याचा कारभार समजून घेण्यासाठी वेळ लागणार असला तरी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे रिपिटेशन होत आहे, असे मी माझे मत मांडत आहे. सरकारने अतिशय गंभीर्याने राज्याची सूत्रे हाती घेतली आहेत. शेतकऱ्यांचे, उद्योगांचे, दुष्काळाचे, राज्यातील विकास कामांचे प्रश्न व इतर अनिर्णित प्रश्न कसे मार्गी लागतील, याचा शासनाने विचार करणे गरजेचे आहे, असे मला वाटते.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापती स्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.नरेंद्र पाटील.........

सभापती महोदय, मी सर्वप्रथम माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे अभिनंदन करतो. अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर नागपूर शहराला हा मान मिळालेला आहे. आता त्यांच्याकडून विदर्भासह सर्व महाराष्ट्रातील जनतेला खूप अपेक्षा आहेत. परंतु, गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना किंवा दुष्काळात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ज्या प्रकारे या सरकारने मदत केली आहे, त्यामुळे आम्ही संतुष्ट झालेलो नाही.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अरबी समुद्रात बांधण्याचा निर्णय हा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतलेला आहे. तत्कालीन अर्थमंत्री माननीय श्री.अजित दादा पवार यांनी अर्थसंकल्पात 100 कोटी रुपयांची तरतूद केली होती. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी इंदू मिलची जागा मिळावी, या साठी अनेक सन्माननीय सदस्यांनी याच सभागृहात मागणी केली होती आणि ही जागा केंद्र सरकारकडून मिळवून देण्याचे काम तत्कालीन आघाडी शासनाने केले.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांचा सरकारला विसर पडलेला दिसतो. मागील सरकारने त्यांच्या स्मारकासाठी काही निधीची तरतूदही केली होती. सन्माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील हे आज सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु, ते कोल्हापूर येथील आहेत. त्यांनी तरी छत्रपती शाहू महाराजांचा विसर पडू देऊ नये, त्यासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करुन हे स्मारक पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणात माहिती व तंत्रज्ञानाबाबतचा विषय मांडलेला आहे. नवी मुंबईला आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. त्यामुळे ठाणे, नवी मुंबई, पनवेल हा परिसर माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी वापरला तर अधिक चांगले होईल, असे मला वाटते.

सभापती महोदय, ई-टेंडरिंगचा मुद्दा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आहे. वास्तविक पाहता, ई-टेंडरिंगला मागील सरकारच्या काळात म्हणजेच दिनांक 23 सप्टेंबर, 2011 रोजीच

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील.........

सुरुवात झाली आहे. नवीन सरकारने याबाबत काहीही केलेले नाही. तथापि, या सरकारला आणखी पारदर्शकपणे ई-टेंडरिंगच्या बाबतीत काही करावयाचे असेल तर आम्ही त्याचे स्वागतच करु.

सभापती महोदय, 26/11 ला मुंबईमध्ये अतिरेकी हल्ला झाला होता. त्यावेळी माजी गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी समुद्र किनाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी विशेष पोलीस दल स्थापन केले होते. या दलाला अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करुन दिलेली आहे. काही प्रमाणात हा प्रयोग यशस्वीही झाला आहे. आपल्या पोलीस दलाने 26/11 चा हल्ला व्यवस्थितपणे हाताळला होता. त्या हल्ल्यातील आतंकवाद्यांना पकडण्याचे कामही आपल्या पोलीस दलाने केले आहे. माझी नवीन सरकारला विनंती आहे की, माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी सागरी किनाऱ्याच्या संरक्षणासाठी जी यंत्रणा निर्माण केलेली आहे, ती चांगल्या पध्दतीने सुरु राहील, याची काळजी सरकारने घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे पोलीस भरती करणेही गरजचे आहे. जेणेकरुन महाराष्ट्रात भविष्यकाळात अशा प्रकारचे हल्ले होणार नाहीत. कालच ऑस्ट्रेलियात एक मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. आपण या हल्ल्याचे चित्रीकरण दूरदर्शनवर पाहिले असेल. अशा प्रकारचा हल्ला मुंबईमध्ये किंवा महाराष्ट्रामध्ये होता कामा नये, याबाबतची खबरदारी नवीन सरकारने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, हुतात्मा तुकाराम ओंबळे यांच्या बाबतीतही अभिभाषणात उल्लेख आला आहे. त्यांच्या नावाने लहान मुलांना शौर्य पुरस्कार देण्यात येणार आहे. मला या बाबतीत अशी विनंती करावयाची आहे की, असा पुरस्कार देत असतानाच त्या मुलांची शिक्षण फी माफ करणे, महाविद्यालयीन फी माफ करणे, उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे, अशा प्रकारच्या सवलतीही जाहीर कराव्यात.

सभापती महोदय, राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर झाला आहे. मागील सरकारच्या काळात महालक्ष्मी येथील शक्ती मिलमध्ये झालेल्या बलात्काराच्या घटनेतील आरोपीला मुंबई पोलिसांचा वापर करुन पकडण्याचे काम तत्कालीन गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी केले

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील.........

होते. त्याचप्रमाणे या गुन्ह्यासाठी विशेष न्यायालय स्थापन करुन आरोपीला शिक्षा देण्याचे कामही त्यांनी केले होते. अशा प्रकारचे काम नवीन सरकारने करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, फौजदारी प्रकरणांमध्ये संबंधित गुन्हेगाराला न्यायालयात उपस्थित ठेवण्याचे काम पोलीस दलाला करावे लागते. गुन्हेगाराची कारागृहातून संबंधित न्यायालयात ने-आण करण्यामध्ये पोलीस दलाचा बराचसा वेळ व पैसा खर्च होत असतो. त्यासाठी मागील सरकारने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची यंत्रणा उभारली होती. या यंत्रणेव्दारे गुन्हेगारांना न्यायालयीन कामकाजात सहभागी करुन घेतले तर पोलीस यंत्रणेवरील बराच ताण कमी होऊ शकेल व मोठ्या प्रमाणावर शासनाचा पैसा वाचू शकेल. ज्यावेळी गुन्हेगार न्यायालयामध्ये आणले जातात, त्यावेळी अनेक अनिष्ट गोष्टी घडत असतात. गुन्हेगारी टोळ्या व्यापाऱ्यांना न्यायालयात बोलावितात, त्यांच्याकडून खंडण्या गोळा करतात, त्यांना धमक्या दिल्या जातात, अनेक प्रकारच्या सेटलमेंट होतात. त्यामुळे राज्य शासनाने व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणेला अधिक सक्षम करावे आणि सर्व न्यायालयात ही यंत्रणा कार्यरत करावी, अशी मागणी मी या चर्चेच्या माध्यमातून करीत आहे.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाने निवडणुकीपूर्वी एल.बी.टी.रद्द करु अशा प्रकारचे अभिवचन जनतेला दिले आहे. आम्ही सरकारमध्ये आलो तर हा कर रद्द करु, अशी घोषणा त्यांनी केली होती. आज सांगलीचे व्यापारी एल.बी.टी.च्या संदर्भात उपोषणाला बसले आहेत. माजी खासदार माननीय श्री.संजय पाटील आणि व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी आजच मुख्यमंत्री महोदयांना भेटले होते. ज्यावेळी या सरकारचा शपथविधी झाला त्या वेळीच या सरकारने एल.बी.टी. रद्द करण्याबाबतची घोषणा करावयास हवी होती. परंतु, अशा प्रकारची घोषणा या सरकारने अद्यापपर्यंत केलेली नाही. यापूर्वी या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी आपले विचार मांडत असताना ठाणे आणि पुणे महानगरपालिकेला अगोदर उत्पन्न किती होते, एल.बी.टी. लावल्यानंतर किती मिळाले, किती कमी झाले, कमी उत्पन्न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासही त्यांच्याकडे कसे पैसे नाहीत, प्रशासन चालविण्यात कशा अडचणी येत आहेत, याबाबतची माहिती दिली आहे. त्यामुळे या सरकारने दिलेल्या वचनानुसार राज्यातील व्यापाऱ्यांना एल.बी.टी.तून मुक्त करावे, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

...4....



SRR/ प्रथम श्री.मंगेश........ 16:50

श्री.नरेंद्र पाटील.........

सभापती महोदय, या सरकारने उद्योगधंद्याच्या बाबतीत खूप गाजावाजा केला आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात एक नवीन धोरण मांडलेले आहे. राज्यात नवीन उद्योगधंदे आले पाहिजेत. परंतु, कामगार कायद्याचे काय करणार आहात ? याबाबत मला अशी माहिती मिळाली आहे की, कामगार कायद्यात बदल करण्यात येणार आहेत. पूर्वी एखाद्या कारखान्यात कामगार कायदा लागू होण्यासाठी 100 कामगारांची मर्यादा घालण्यात आली होती. कामगार कमी करावयाचे असतील, कामगारांना काढावयाचे असेल, कारखाना बंद करावयाचा असेल तर त्यासाठी 100 पेक्षा अधिक संख्या असलेल्या कारखान्यांना कामगार कायद्यान्वये काही बंधने घालण्यात आली होती. आता ही संख्या वाढविण्याचा विचार नवीन कामगार कायद्यात करण्यात येणार आहे. उद्योगधंदे वाढवायचे असतील तर कामगार कायद्यामध्ये कामगारांना संरक्षण देणे गरजेचे आहे. शिवसेनेचीही कामगार संघटना आहे. सरकारमधील सहयोगी पक्ष जर अशा प्रकारचा निर्णय घेणार असेल तर शिवसेनेने त्याला ठाम विरोध केला पाहिजे.

सभापती महोदय, अभिभाषणात असंघटित कामगारांबाबतही उल्लेख करण्यात आला आहे. मागील सरकारमधील माननीय कामगार मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी घरेलु कामगारांसाठी नवीन कायदा केला, बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी कायदा केला व त्यामुळे या कामगारांना संरक्षण मिळाले. हे सरकारही कामगार कायद्यात बदल करु इच्छित आहे. परंतु, या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कामगार विभागात अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. आम्ही यापूर्वीही वारंवार सांगितले होते की, कामगार कायद्यात बदल करीत असताना कामगार विभागात अधिकाऱ्यांच्या नेमणुका करा. परंतु, आजही या नेमणुका झालेल्या नाहीत.

यानंतर श्री.मा.शिगम...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील...

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमुळे शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मिळाला. या बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकऱ्याचा माल गिऱ्हाईकापर्यंत पोहोचविला जातो. मी एका गोष्टीची या निमित्ताने आठवण करुन देऊ इच्छितो की, मागील वेळी तत्कालीन कृषी मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी छोटीछोटी आऊटलेट काढण्यासंबंधीचा निर्णय घेतला. या आऊटलेटच्या माध्यमातून ठिकठिकाणी स्वस्त भाजीपाला मिळू लागला. या सदनाचे माजी सदस्य श्री. आशिष शेलार यांनी स्वस्त भाजी केंद्र काढण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारची स्वस्त भाजी केंद्रे काढून त्याचे व्यवस्थित नियोजन करुन नागरिकांना स्वस्त भाजी देण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. हे सर्व करीत असताना एपीएमसी मधील जो कामगार घटक आहे त्याच्यासाठी शासनाने काही तरी करावे, त्याच्याकडे दुर्लक्ष करु नये अशी माझी शासनाला कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल आणि नायर हॉस्पिटलमध्ये रुग्णांची फार गर्दी होते. मुंबईच्या कानाकोपऱ्यातून या ठिकाणी रुग्ण येत असतात. या हॉस्पिटलमधील गर्दी कमी होण्यासाठी, रुग्णांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी बोरिवली येथे 25-30 एकरामध्ये एक अद्ययावत असे शासकीय रुग्णालय सुरु करावे जेणेकरुन बोरीवली आणि आजूबाजूच्या परिसरातील लोकांना त्या रुग्णालयामध्ये उपचार घेता येतील.

सभापती महोदय, कर्नाटक सीमेवरील वादग्रस्त क्षेत्राचा जो प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित आहे तो लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी शासनाने पावले उचलावीत एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषावरील आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 34मध्ये असे नमूद केलेले आहे की, "माझे शासन, दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी विशेषत: सतत दुष्काळी परिस्थिती असलेल्या भागांमध्ये, दीर्घकालीन उपाययोजना हाती घेईल." आज महाराष्ट्रामध्ये इतकी भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे की तिचे वर्णन माझ्या आधीचे वक्ते सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी केलेले आहे. मी त्या मुंद्याची पुनरावृत्ती करणार नाही. अगोदर मराठवाडा आणि विदर्भ हा दुष्काळाच्या विळख्यात सापडला. आता गारपीट आणि अवकाळी पाऊस यामुळे नाशिक, उत्तर महाराष्ट्र आणि जवळ जवळ संपूर्ण महाराष्ट्रच या दुष्काळाच्या विळख्यात सापडण्याची शक्यता बळावलेली आहे. या दुष्काळामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये विदर्भातील 51 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. अकोला जिल्ह्यातील मानार गावातील एका शेतकऱ्याने स्वत:चे सरण रचून आत्महत्या केली. त्या गावाला मी स्वत: भेट दिली. एकूणच शेतकऱ्याची परिस्थिती अतिशय गंभीर झालेली आहे. एखादा उद्योजक एखादी वस्तू तयार करताना ती वस्तू बनविण्याकरिता त्याला 15 रूपये खर्च येईल हे माहीत असते. तो हिंमत करून त्या वस्तू बनवितो आणि बाजारात विकतो. परंतु शेतकरी हा मात्र देवाच्या भरवशावर बी जमिनीमध्ये पेरतो. जेव्हा सुगीचे दिवस असतात त्यावेळी शेतकऱ्याच्या हातामध्ये चारपैसे येत असतात. परंतु सुगीच्या दिवसामध्ये त्याच्या हाताला काहीच लागलेले नसल्यामुळे तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेला आहे. आज राज्यातील शेतक-याची ही परिस्थिती आहे.यापुढे किती भयाण परिस्थिती निर्माण होईल हे शब्दात सांगता येणार नाही. शेतकरी शेतात अन्नधान्य पिकवितो. या बळीराजाबद्दल मी चार ओळींची कविता आपणास वाचून दाखवितो. तो असे म्हणतो की,

"अब मैं राशन की कतारों में नजर आता हूँ
अपने खेतों से बिछडने की सजा पाता हूँ
ऐसे हालात में बाजार से कुछ लाता हूँ
अपने बच्चों में बाट के मैं शरमाता हूँ "

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ख्वाजा बेग....

अशा पध्दतीचे त्याचे जीणे झालेले आहे. या परिस्थितीवर दूरगामी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आमच्या भागामध्ये अरुणावती प्रकल्प आहे. अरुणावती प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले आहे. या प्रकल्पाचा डावा कालवा 55.90 कि.मी.चा आणि उजवा कालवा 44.20 कि.मी.चा आहे. दुर्दैव असे की, शेवटच्या टेलएण्ड पर्यंत कालव्याचे पाणी गेलेले नाही. शेतक-याने ऐपत नसताना त्याची जमीन कालव्यासाठी दिली. या कालव्याच्या पाण्यामुळे माझी शेती बहरेल, माझ्या मुलींची लग्ने होतील, माझ ी परिस्थिती सुधारेल अशी स्वप्ने रंगवून त्याने कालव्यासाठी जमीन दिली. परंतु या कालव्याचे पाणी अद्याप त्या शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचलेले नाही हे सांगताना त्याचा ऊर भरुन येतो. डोळयातून अश्रू वाहू लागतात.

सभापती महोदय, ठिबक सिंचनासाठी, सूक्ष्म सिंचनासाठी शासनाने धडक सिंचन विहिरीची योजना आणली. मी यवतमाळ जिल्हयातील आर्णी तालुक्याचा आढावा घेतला. मला अशी माहिती मिळाली की, धडक विहीर योजनेचे लक्ष्यांक 948 होते. श्ेडयूल ए, बी आणि सी अशी 3 शेडयूल बनविण्यात आली. शेडयूल ए मध्ये पूर्ण झालेल्या विहिरी वर्ग केल्या, 948 लक्ष्यांकामध्ये 490 विहिरी पूर्ण झाल्या. शेडयूल बी मध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील 324 विहिरी वर्ग केल्या. शेडयूल सी मध्ये धडक सिंचन विहिरीसाठी 57 विहिरी वर्ग केल्या. शेडयूल बी मध्ये 324 विहिरी वर्ग केल्या होत्या. त्या योजनेमध्ये शेतक-यांना आठवड्याचे मस्टर्स काढावे लागतात. पंचायत समितीला ते सादर करुन त्याची ऑन लाईन मंजुरी घ्यावी लागते. ही पध्दत अतिशय अवघड असल्यामुळे तो शेतकरी त्याचा पाठपुरावा करण्याचे सोडून देतो. अशा त-हेने अमरावती विभागातील प्रलंबित असलेल्या विहिरींची संख्या 555 आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत 3633 विहिरी अपूर्ण आहेत. अकोला जिल्हयामध्ये 315 विहिरी पूर्ण झालेल्या असून 2439 विहिरी अपूर्ण आहेत. यवतमाळ जिल्हयामध्ये 1811 विहिरी पूर्ण झाल्या असून 3155 विहिरी अपूर्ण आहेत. बुलढाणा जिल्हयामध्ये 110 विहिरी पूर्ण झालेल्या असून 2432 विहिरी अपूर्ण आहेत. वाशिम जिल्हयामध्ये 416 विहिरी पूर्ण झालेल्या असून 1193 विहिरी अपूर्ण आहेत. वर्धा जिल्हयामध्ये 116 विहरी पूर्ण झालेल्या असून 1620 विहिरी अपूर्ण आहेत. एकूण 3326 विहिरी

..4..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. ख्वाजा बेग.....

पूर्ण झालेल्या असून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत 13052 अशा एकूण 16378 विहिरी अपूर्ण आहेत. या जल सिंचनाच्या विहिरी पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. भविष्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्यांना कसा आळा बसेल याची व्यूह रचना आखून शासनाने धडक कार्यक्रम राबवावा अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग.....

मानिनीय राज्यपालांच्या अभिभाषणात विशेष पीक विमा योजना राबविण्यात येईल असे म्हटले आहे. या संदर्भात यवतमाळ जिल्हयामध्ये विदारक चित्र निदर्शनास आले आहे. ज्या शेतकऱ्याने एकरी 500 रुपये हप्ता भरुन विमा योजना घेतली होती त्याच्या बँक खात्यामध्ये केवळ 133 रुपयांचा चेक पाठविण्यात आला ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा मुद्दा असून कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि इतर ठिकाणी जी दुष्काळी परिस्थिती उद्‌भवली आहे त्या संदर्भात धडक योजना राबविण्यात यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत देशपांडे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मी सरकारचे अभिनंदन करतो. अभिभाषण हे उत्तम असून खऱ्या अर्थाने त्याची अंमलबजावणी झाली तर खरोखर सरकार अभिनंदनास पात्र होईल. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे अभिवचन माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात दिले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यायचे असेल तर जो शिक्षण हक्क कायदा आपण स्वीकारला तो मुळातच चुकीच्या पध्दतीने स्वीकारला आहे हे मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

सभापती महोदय, 1993 मध्ये सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार 10 वर्षात देशामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याकरिता एकच कायदा असावा असे निर्देश दिले गेले होते. त्यानंतर ॲक्ट तयार करण्यास 10 वर्षाचा कालावधी लागला. 2004-05 मध्ये या ॲक्टवर सर्व राज्य सरकारांकडून अभिप्राय मागविण्यात आले. 2008 मध्ये कुमुद बन्सल यांची समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने 5000 पानी अहवाल तयार केला होता, त्या अहवालाकडे कोणी पाहिले नाही. राज्य सरकारने शिक्षण हक्क कायदा जशाच्या तसा स्वीकारला. वास्तविक पाहता या कायद्याच्या कलम 20 मध्ये अशी तरतूद होती की, राज्य सरकार जो कायदा सध्या अस्तित्वात आहे त्या कायद्यात भौगोलिक, सामाजिक परिस्थितीचा विचार करुन सुधारणा करु शकते. परंतु ॲक्टमध्ये कोणतीही सुधारणा केली गेली नाही. या ॲक्टची अंमलबजावणी करण्याकरिता स्टेट गव्हर्निंग कौन्सिल नेमण्याची सूचना केंद्र शासनाने केली होती, ती सूचना आजपर्यंत अंमलात आणली नाही. राज्यात या ॲक्टची चुकीच्या पध्दतीने अंमलबजावणी सुरु आहे. या ॲक्टच्या संदर्भात सभागृहात संपूर्ण दिवस चर्चा होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, ज्या शाळेत 40 विद्यार्थी असतील, त्यापैकी पहिलीच्या वर्गात 10, दुसरीच्या वर्गात 10, तिसरीच्या वर्गात 10 व चौथीच्या वर्गात 10 विद्यार्थी असतील तर त्या शाळेत फक्त दोन शिक्षक मिळतात. त्यापैकी एका शिक्षकाने पहिली व दुसरीच्या वर्गात आणि दुसऱ्या शिक्षकाने तिसरी व चौथीच्या वर्गात शिकवावयाचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण कोणत्या आधारे देणार आहात? या संदर्भात निश्चितपणे विचारमंथन झाले पाहिजे. शिक्षण हा संवेदनशील विषय आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांनी शिक्षण हक्क कायद्यात काय बदल अपेक्षित आहेत याबद्दल सरकारला सूचना करावी आणि सरकारने त्यावर विचार करावा असे माझे मत आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यशस्वी ठरेल असा माझा विश्वास आहे, त्यादृष्टीने सरकारने प्रयत्न करावा एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-----

(नंतर हिंदी भाषण......3

16-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) HH.3

SGB/AKA पूर्व श्री भोगले 17:10

श्री मुझफ्फर हुसेन (महाराष्ट्र विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय मैं माननीय राज्यपाल जी के अभिभाषण पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं.

सभापति महोदय, राज्यपाल जी के अभिभाषण में शेतकरी, सिंचन, राजस्व की परिस्थित, पैकेज, एवं दुष्काल परिस्थिति पर बहुत कम शब्दों में शासन की भूमिका बताई गई है. समाज में लेखक और कवि समाज की परछाई होती है. समाज में चल रही परिस्थितियों के बारे में वे लिखा करते हैं. इस देश में स्वतंत्रता से लेकर आज तक कई लेखकों ने कई किताबें दुष्काल परिस्थिति, शेतकरी, किसान, कास्तकार एवं साहूकार पर लिखी हैं. देश की सबसे प्रचलित फिल्म मदर इंडिया को शायद ही किसी ने नहीं देखा होगा या नहीं पहचानता होगा. जब वह फिल्म देखी जाती है और उस प्रकार के लेखक की किताबें जब हम पढ़ते हैं तब हमें वहां पर एक ही व्यक्ति विलेन नजर आता है. किताब पढ़ते वक्त एवं फिल्म देखते वक्त ऐसा महसूस होता है कि अपनी कुर्सी को छोड़कर एवं किताब को छोड़कर उस साहूकार से लड़े, उसे नष्ट करें और उसे खत्म करें.

सभापति महोदय, देश में और राज्य में किसानों की आत्महत्या का जो प्रमाण बढ़ा है वह कॉमोडिटी ट्रेडिंग का काम शुरु होने के बाद से बढ़ा है. अनाज का जब से कॉमोडिटी ट्रेडिंग का काम शुरु हुआ तब से किसानों की आत्महत्या बढ़ी है. दुष्काल परिस्थिति से निपटने के लिए सिंचन, पानी पहुंचाना, किसानों को सब्सिडी देना, बैंकों के माध्यम से कम ब्याज दरों पर पैसे पहुंचाना, ये सारी सहूलियतें शासन ने दी हैं. मगर एक चीज का निपटारा सरकार आज तक नहीं कर पायी. मनी लेंडर को, साहूकार को मनी लेंडिंग का लाईसेंस देकर उन्हें किसानों का अधिकृत उत्पीड़न का काम दिया है. जब किसान की फसल खेत में खड़ी होती है, जब वह फसल को सींचने का काम करता है तब उसकी फसलों का सौदा करने का काम ये मिडिलमेन करते हैं, ये साहूकार करते हैं और जब दुष्काल पड़ता है तब किसान के पास जाकर पैसे लेने का काम करते हैं और जब किसान के पास पैसे नहीं होते तब वह आत्महत्या करता है. उस समय हमारी बैंक या सरकार उस किसान की मदद के लिए पहुंचने में कहीं न कहीं कम पड़ती है. यह इतिहास नहीं

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बल्कि स्टेटिस्टिक है. इस देश में, राज्य में या समाज में कोई मिसाल या उदाहरण के तौर पर बताये कि एक किसान के पास 1947 में एक एकड़ जमीन थी और आज वह 100 एकड़ जमीन का मालिक है. हम यह मिसाल नहीं दे सकते हैं. हम मिसाल जरूर दे सकते हैं कि इस देश में, एक गांव में जो साहूकार था, आज वह अरबपति है, उद्योगपति है, कॉमोडिटी की ट्रेडिंग करता है, स्टॉक मार्केट की ट्रेडिंग करता है, बड़ा बैंकर है,

-4-

16-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) HH.4

SGB/AKA पूर्व श्री भोगले 17:10

श्री मुजफ्फर हुसेन......

बड़ा प्रोफेशनल है. मगर एक किसान वह तरक्की नहीं कर पाया. शेतकरी तरक्की नहीं कर पाया. इसकी वजह यह सिस्टम है. जब तक हम पूरी तरह से मनीलेंडर या साहूकार के एलिमिनेशन का कानून इस राज्य में लागू नहीं करते हैं, मुझे नहीं लगता है कि किसी भी प्रकार से दुष्कालग्रस्त किसानों को उनका हक और न्याय दे सकेंगे. परसों ही सरकार ने पैकेज जाहिर किया और उसमें भी मनीलेंडर या साहूकारों से जो पैसा लिया गया था, वह पैसा उनको देने के लिए प्रावधान किया गया.

सभापति महोदय, एक गलत मिसाल इस राज्य में सेट हुआ है. मैं सरकार से विनती करना चाहता हूं कि क्या वे ऐसी पहल करेंगे, क्या वे ऐसा कदम उठाएंगे ? जहां पर एलिमिनेशन ऑफ मिडल मॅन और एलिमिनेशन ऑफ दी साहूकार संबंधी एक सिस्टिम महाराष्ट्र के अंदर लाएंगे ? मेरी सरकार से विनती है कि इस बारे में एक ऐसा कानून लाए और इस राज्य और देश को, किसानों को सही न्याय देने का काम करें.

सभापति महोदय, माननीय राज्यपाल जी के अभिभाषण में इस महत्वपूर्ण मुद्दे पर कोई भी खास बात नहीं कही गई. मैं चाहता हूं कि इस ओर सरकार ध्यान दे और साहूकारी संबंधी उचित कानून लाए, इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

--------

इसके बाद श्री खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदुरकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासंबंधी अभिनंदनपर प्रस्ताव माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मांडला व सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी त्या प्रस्तावाला अनुमोदन दिले. या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माननीय राज्यपालांचे भाषण हे परंपरागत पध्दतीने 78 ते 80 परिच्छेदांचे असते आणि त्यापैकी 13 परिच्छेदांमध्ये देशाच्या फेडरल स्टेट्सना विरोध करणारे देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांच्या बाबतीत आहेत उरलेल्या भाषणात म्हणजे सुरुवातीलाच माननीय राज्यपाल महोदयांनी स्वत: म्हटले आहे की "The Government will implement good decisions taken by the previous Government." यामध्ये 37 मुद्दे पूर्वीच्या लोकशाही आघाडी सरकारने घेतलेलेच रिपीट झाले आहेत. त्यानंतर बाकीचे मुद्दे असे आहेत की, ज्यांना न्याय मिळायला पाहिजे होता पण ते केवळ एक-एक वाक्यातच दिलेले आहेत असा या संपूर्ण भाषणाचा सारांश आहे.

महोदय, मी माझ्या भाषणाला सुरुवात करताना असे सांगू इच्छितो की, माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या भाषणात "The objective of the Government is 'Minimum Government, Maximum Governance'." केंद्रात दिल्लीच्या तख्तावर विराजमान झालेले पंतप्रधान मोदी यांचीच ती फिलॉसॉफी आहे किंवा त्यांचेच ते म्हणणे महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे करीत असताना माननीय पंतप्रधान यांनी सांगितले की, जुने व आऊटडेटेड कायदे असतील .......अडथळा.........मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसेजी आपण ते ताबडतोब काढून टाकू शकता आणि आपल्याकडे ती कॅपेसिटी आहे पण तत्पूर्वी माझे म्हणणे तर ऐकून घ्यावे. देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींचेच म्हणणे यात अंतर्भूत झाले असून त्यांच्या म्हणण्यानुसार या राज्यात जे जुने कायदे असतील ते मोडीत काढण्यात येतील पण केंद्राचे सरकार सत्तेवर येऊन सहा महिन्यांचा काळ लोटला पण अद्याप एकही जुना कायदा मोडीत निघाला नाही आणि त्यासाठी अजून किती वेळ लागणार आहे हे समजायला मार्ग नाही. तसेच यात पुन्हा रिपीट झालेले आहे की, कामगारांसंबंधीचा कायदा मोडीत काढून नवीन कायदा आणण्यात येईल. या सरकारला जरी 40 दिवस सत्तेवर येऊन झाले असले तरी केंद्राला मात्र जास्त कालावधी झालेला आहे तरी देखील अद्याप तसा निर्णय घेतला गेला नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदुरकर ............

महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या उद्‌घाटनाची तारीख आपल्या राज्याचे मुख्यमंत्री यांनी 19 फेब्रूवारी अशी ठरविली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या संदर्भात मात्र माननीय मुख्यमंत्र्यांनी तसे घोषित न करता केंद्र शासनाला आम्ही हमी पत्र दिल्याचे खालच्या सभागृहात सांगितले. केंद्र शासनाला हमी पत्र देण्याची कोणती भानगड आहे हेच मला समजत नाही. माझ्या माहितीनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी मागच्या युपीए सरकारने 12.50 हेक्टर जमीन देऊ केली त्यासंदर्भातील विधेयक लोकसभेत सादर झाले असून अद्यापही ते मंजूर झालेले नाही. ते विधेयक मंजूर होत नाही तोपर्यंत या जागेचे हस्तांतर होत नाही म्हणून माझी आपणास विनंती आहे की, पहिल्यांदा दिल्लीच्या लोकसभेमध्ये सादर झालेले विधेयक मंजूर करुन घ्यावे, हमी पत्राची वगैरे गरज नाही असे मला वाटते पण या बाबीचा खुलासा येथे झाला पाहिजे.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, मुंबईचा विकास होण्यासाठी, मुंबईला आधुनिक बनविण्यासाठी माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली एक समिती बनविण्यात येणार आहे. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा ज्याप्रमाणे महानगरपालिका तसेच एमएमआरडीए यांचा जो निधी असतो तो स्टेट लिस्टमधील निधी असतो आणि बाकीचा खर्च कंकरन्ट लिटमधील असतो. एमएमआरडीएच्या संदर्भात खालच्या सभागृहात चर्चा झाली होती आणि निधीच्या बाबतीत देखील प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यामुळे हा कॉन्स्टीट्युशनल डेटा तयार झाला परंतु जो पैसा आहे तो स्टेट लिस्टचाच पैसा असून म्युनिसिपालिटीमार्फतच खर्च झाला पाहिजे असे विरोधी पक्षाचे म्हणणे होते. दुसऱ्या बाजूला खर्च करण्याची परवानगी कशी द्यावी तर स्थानिक स्वराज्य संस्था या शासनाच्या अखत्यारितीलच असल्याने तो खर्च करण्यासाठी केंद्राची गरज नाही. आपले मुख्यमंत्री मात्र माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यास निघाले आणि त्यातून मुंबईचा विकास कसा करणार याची माहिती देखील राज्यातील जनतेला उत्तरातून मिळाली पाहिजे तसेच यासंबंधी शासनाचे कोणते धोरण आहे व त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देणार आहे याची स्पष्टता होणे आवश्यक आहे.

..........3

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदुरकर ............

आपल्या देशाचे माजी पंतप्रधान माननीय श्री. मनमोहन सिंग यांना आम्ही मुंबईत बोलाविले आणि त्याच्या हस्ते 36 हजार कोटीचे मेट्रो आणि मोनोचे प्रकल्प कार्यान्वित केले. आम्हाला मात्र कॉर्पोरेशन किंवा पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची गरज भासली नाही. याचे कारण कार्पोरेशन किंवा महाराष्ट्र शासनामार्फतच तो पैसा वापरावा लागणार आहे. It is very surprising and shocking that काल देशाचे माननीय मंत्री महोदय श्री. नितीनजी गडकरी यांनी प्रेसला माहिती दिली की, मुंबईच्या विकासासाठी त्यांच्या विभागाकडून 90 हजार कोटी खर्च करण्यात येतील. पण ते खरे की खोटे किंवा जनतेला झुलवत ठेवणार की प्रेससमोर डिस्कस करण्यासाठी बोलले हे माहीत नाही. Hon. Chairman, Sir, I am raising important points in my speech and therefore, I request to be given more time.

**The Deputy Chairman:** Hon. Member, you have already consumed your time. Now, you conclude your speech.

Prof. Janardan Chandurkar : Hon. Chairman, Sir, kindly give me 5 minutes more. माननीय श्री. नितीनजी गडकरी यांनी त्यांच्या विभागामार्फत 90 हजार कोटी रुपये खर्च करुन एक प्रकल्प राबविला जाणार असल्याची माहिती दिली. त्यात माहीमपासून कुलाब्यापर्यंत भुयारी उलट आणि सुलट रेल्वेलाईन सुरु करणार, पण हे कसे करणार हे स्पष्ट केले नाही. माननीय श्री. नितीनजी गडकरी हे एका खात्याचे मंत्री आहेत. निवडणुकांपूर्वी माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनी ज्यावेळेस कोस्टल रोडचा प्लॅन डिस्कस केला होता त्यावेळी मी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे गेलो होतो......

नंतर श्री. भारवि............

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर ...

तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री म्हणाले की, तसे करण्याचा कॉर्पोरेशनला अधिकार आहे. मुंबईचा विकास हा मुंबई महानगरपालिकेकडूनच व्हायला पाहिजे की केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्या खात्याकडून व्हायला पाहिजे याचा खुलासा माननीय श्री.दिवाकर रावते यांनी करावा. श्री.नितीन गडकरी यांचे खाते 90 हजार कोटी रूपये मुंबईच्या प्रकल्पासाठी खर्च करणार आहे. हा खर्च मुंबई महानगरपालिकेच्या एकूण बजेटच्या तिप्पट आहे. श्री.नितीन गडकरी यांनी निवडणूकीपूर्वी कोस्टल रोड स्वत:च्या खात्यामार्फत करण्याची देखील घोषणा केली होती. ती हवेत विरून गेली. श्री.नितीन गडकरी यांच्या खात्याचे एकूण बजेट 45 हजार कोटी रूपयांचे असताना सर्व निधी ते मुंबईसाठीच खर्च करणार आहेत की काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर यांच्या बोलण्याला माझी हरकत असली तरी त्यांच्या भाषणाला मी विरोध करीत नाही. त्यांचे विचार ऐकायला मला नेहमीच आनंद वाटतो. माननीय श्री.नितीन गडकरी हे केंद्रीय मंत्री आहेत. त्यामुळे देशातील विविध भागात विकास योजनांची अंमलबजावणी करण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यांना अधिकार असल्यामुळेच ते योजना तयार करतात. ह्या योजना काही लगेच होत नाहीत. संबंधित राज्य, तेथील महापालिका किंवा एजन्सी यांच्या मार्फतच त्या योजना होतात. तेव्हा त्यांच्या अनुपस्थितीत टीकाटिप्पणी करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य हे वकील आहेत. त्यांनी येथे एकेरी उल्लेख अनावधानाने केला असल्यामुळे मी त्याचा उल्लेख करू इच्छित नाही. कोणाचाही उपमर्द करण्याचा त्यांचा उद्देश नव्हता, हे मी स्वत:हूनच सांगत आहे. बोलण्याच्या ओघातून तो उल्लेख आला आहे. त्यामुळे ते छोटे होत नाहीत आणि आपणही मोठे होत नाहीत. तो मुद्दा मी सोडून देतो. एका माननीय केंद्रीय मंत्र्यानी काय केले आणि काय केले नाही ही चर्चा येथील विषयाला धरून नाही. तेव्हा माननीय सदस्यांना त्यांचे वक्तव्य मागे घ्यायला सांगावे किंवा सभागृहाच्या पटलावरून काढून टाकावे आणि पुढील विषय सुरू करावा अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : ते वक्तव्य सभागृहाच्या पटलावरून काढून टाकण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या वक्तव्याला माझी हरकत आहे.

...2

**उप सभापती** : आता आपल्याला राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या उत्तराला सुरुवात करावयाची आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या सभागृहात केंद्रीय मंत्र्यांचा उल्लेख एकेरी केला गेला तो रेकॉर्डवरून काढून टाकावा अशी विनंती माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी केली आहे. आपल्या मताशी आम्ही पूर्णत: सहमत आहोत. आम्ही विरोधक असलो तरी देशाचे माननीय पंतप्रधान किंवा माननीय केंद्रीय मंत्री असतील त्यांचा अशा प्रकारे उल्लेख करणे बरोबर नाही. मी सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.गिरीश बापट यांना सांगू इच्छितो की, या सभागृहामध्ये देशाच्या माननीय पंतप्रधानांचा अनेक वेळा उल्लेख झालेला आहे. त्यांचा उल्लेख करणे हा आमचा अधिकार आहे. मुंबईच्या विषयाला स्पर्श करताना त्यांचे नाव येणे हे स्वाभाविक आहे. तेव्हा त्यांची हरकत कशावर आहे हे आम्हाला समजू शकलेले नाही. त्यासंबंधी आमच्या ज्ञानात भर टाकली तर बरे होईल.

**उप सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणास सुरुवात करावी.

प्रा.जर्नादन चांदूरकर : सभापती महोदय, माझे भाषण सुरू आहे.

**उप सभापती** : आपणास जेवढा वेळ दिला होता त्यापेक्षा जास्त वेळ बोलला आहात. आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील उत्तर आपणाला सुरू करावयाचे आहे.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांमार्फतच मुंबईच्या विकासाची घोषणा होणे अधिक चांगले असते. त्यांनी घोषणा करणे हे घटनेला धरून आहे. त्यामुळे अशा प्रकारची मुंबईच्या संदर्भातील घोषणा राज्यातील एका माननीय मंत्र्यांनी केली तरी काही प्रॉब्लेम नाही. साधारणपणे प्रथा अशी आहे माननीय मुख्यमंत्री घोषणा करतात.

सभापती महोदय, फेडरल स्ट्रक्चरच्या विरुद्ध हे अभिभाषण आहे असा मी सुरुवातीला उल्लेख केला आहे. या अभिभाषणामध्ये मायनॉरिटी वेल्फेअरसंबंधी फक्त एकच वाक्य आहे. "The Government will promote the welfare of minority communities..."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर...

एस.सी., एस.टी., ओ.बी.सी.संबंधी एकच वाक्य आहे की, त्यांची जी जात प्रमाणपत्रे आहेत ती आम्ही लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करू. त्यांच्या आर्थिक विकासासाठी, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कुठल्याही प्रकारचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण म्हणजे सरकारचा कार्यक्रमच असतो. तेव्हा हे जे अभिभाषण आहे ते महाराष्ट्राच्या जनतेच्या डोळ्यात धूळ फेकणारे आहे. मागील सरकारने दिलेला कार्यक्रम पुढील पानावरून सुरू करण्यासारखाच आपला कार्यक्रम आहे. हे अभिभाषण भारतीय संविधानाला विरोध करणारे आहे हे मी येथे नमूद करू इच्छितो. मला बऱ्याच गोष्टी सांगावयाच्या होत्या. परंतु, आपण मला बोलायला संधी देत नाही, त्याबद्दल खेद व्यक्त करतो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला असहमती व्यक्त करून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद जय महाराट्र.

**उप सभापती** : आता यापुढे कोणालाही भाषण करण्याला संधी मिळणार नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आमची नावे लिहून घेऊन आम्हाला बोलायला संधी देणार नसाल तर येथे बसून फायदा काय आहे ? असे जर असेल तर आम्ही घरी जातो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : उप सभापती महोदय, आम्ही जेव्हा माननीय सभापतींना भेटलो तेव्हा त्यांनी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी संधी देण्यात येईल असे सांगितले होते.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना एक-एक मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी सभापतीस्थानी यावे. तो पर्यंत मी माननीय सभापतींशी या विषयावर बोलून येतो. श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणाला सुरूवात करावी.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आम्हाला बोलायला परवानगी देणार नसाल तर आजपासून अधिवेशन संपले असे समजून घरी निघून जातो. एका आठवड्यापासून आम्ही अभिभाषणावर तयारी केली आहे. काही तरी मुद्दे मांडता येतील म्हणून आम्ही आपणाला विनंती

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

करीत आहोत. सभागृहात आठ दिवसांनी देखील बोलता येत नसेल तर कशासाठी बसायचे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.चंद्रकांत रघुवंशी)**

आम्ही नावे देखील दिली आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणास सुरुवात करावी. माननीय उप सभापती, माननीय सभापती महोदयांकडे विचारविनिमय करण्यासाठी गेले आहेत.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, आपण पाच मिनिटे वाट बघावी. माननीय उप सभापती, माननीय सभापती महोदयांकडे गेलेले आहेत. आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : मला वाटते यासंबंधी आपण आपला निर्णय द्यावा. माझी अशी सूचना आहे की, सन्माननीय सदस्यांना एक-एक मिनिटे बोलण्यासाठी अनुमती द्यावी.

**तालिका सभापती** : माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चा किती वेळ सुरू ठेवायची हे विचारण्यासाठी माननीय उप सभापती महोदय, माननीय सभापतींकडे गेले आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सन्माननीय सदस्यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सहभाग घेतल्याचे दर्शवायचे आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : माननीय सभापती महोदयांकडून निरोप आल्यानंतर सन्माननीय सदस्यांना माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या भाषणानंतर आपले विचार मांडता येतील. आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणास सुरुवात करावी.

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर अभिनंदनाचा ठरावावर या सदनात चर्चा सुरु असून राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

या नवीन सरकारने निवडणुकीच्या काळात जनतेला अनेक आश्वासने दिली होती. पूर्वीच्या सरकारने काहीही काम केलेले नाही असे या सरकारला वाटत असेल. आपण सत्तेत आल्यानंतर राज्याचे काही तरी धोरण नजरेसमोर ठेवून या राज्याचा कारभार करावा असे त्यांना वाटले असेल. कालचा विरोधी पक्ष आज सत्तेमध्ये बसला आहे. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस हे या राज्याचे मुख्यमंत्री झालेले आहेत. माननीय मुख्यमंत्री हे विदर्भाचे असल्यामुळे साहजिकच विदर्भातील जनतेच्या अपेक्षा वाढणार आहेत. ज्यावेळेस माननीय देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षात होते त्यावेळची त्यांची भाषणे आपण ऐकली असेल तर त्यांच्या प्रत्येक वाक्यात विदर्भ हा शब्द आलेला आहे. विदर्भातील समस्यांच्या संदर्भात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. मागचे सरकार विदर्भाचा विकास करण्याच्या संदर्भात उदासीन आहे असे एक नाही तर अनेक वाक्ये त्यांच्या भाषणातून व्यक्त होत असते. राज्यात होणाऱ्या कोणत्याही चर्चेमध्ये ते विदर्भाचा जरुर उल्लेख करीत असत.

सभापती महोदय, सरकार भविष्यामध्ये कशी वाटचाल करणार आहे, सरकारचे भविष्यातील धोरण काय राहणार आहे यासंदर्भात माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण असते. विदर्भाला खऱ्या अर्थाने न्याय दिला पाहिजे, विदर्भाच्या संदर्भात माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या ज्या काही कल्पना होत्या त्यांना मूर्तस्वरुप देण्यासाठी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात यासंदर्भात कोणताही उल्लेख आढळून येत नाही हे मला मोठया खेदाने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, विदर्भात सर्वात महत्वाचा प्रकल्प कोणता असेल तर तो मिहान प्रकल्प आहे. मिहान प्रकल्पाचा जवळ जवळ 400 कि.मी.पर्यंत फायदा होणार असून मिहान प्रकल्पाच्या संदर्भात विदर्भातील जनतेच्या मनामध्ये देशातील सर्वात जास्त गुंतवणूक करणारा प्रकल्प म्हणून पाहिले जात आहे. या प्रकल्पाच्या संदर्भातील उर्वरित कामे आहेत त्यामध्ये लष्कराची जमीन ताब्यात घेण्याचा उल्लेख आहे, विमानाची दुसरी धावपट्टी करण्यासाठी लागणाऱ्या जमिनीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु असे सर्व असताना राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात मिहान प्रकल्पाचा शब्दाने सुध्दा उल्लेख करण्यात आलेला नाही. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ......

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रांना न्याय मिळाला पाहिजे. विदर्भात अधिवेशन सुरु आहे. विदर्भाची अर्थव्यवस्था शेतीवर अववलंबून असून यासंदर्भातील उल्लेख सुध्दा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. विदर्भातील कापसावर प्रक्रिया करण्याच्या संदर्भात मागच्या सरकारने टेक्सटाईलचे धोरण आणले होते त्यामध्ये आपण आणखी काय बदल करु शकतो, कशा पध्दतीने कापूस उत्पादकांचा आपण विकास करु शकतो यासंदर्भात एका शब्दाने सुध्दा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, विदर्भात मागच्या काळात सहकार क्षेत्राच्या माध्यमातून 16 कारखाने उभे करण्यात आले होते. 16 कारखान्यापैकी 8 सहकारी साखर कारखाने खाजगी क्षेत्रामध्ये विकले गेले आहेत. जे काही 2-4 सहकारी कारखाने शिल्लक राहिलेले आहेत त्या कारखान्यांना आता घरघर लागली आहे. विदर्भातील सूत गिरण्या, टेक्सटाईल मिल्स, साखर कारखाने जगविण्यासाठी आम्ही काय करणार यासंदर्भातील धोरण राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात यावयास पाहिजे होते परंतु ते दुर्दैवाने आलेले नाही.

सभापती महोदय, विदर्भातील धानावर प्रक्रिया करणारे उद्योग सहकार माध्यमातून उभे करण्यात येतील यासंदर्भातील एकही उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. इतर शहरातील मेट्रोचा उल्लेख करण्यात आला तसा उल्लेख नागपूरच्या मेट्रोच्या संदर्भात केला आहे. परंतु एकूणच विदर्भ म्हणून जी पोटतिडीक, आत्मीयता विरोधी पक्षात असतांना त्यांनी दाखवली होती परंतु या गोष्टींचा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, कृषी क्षेत्राच्या, सिंचनाच्या संदर्भात केवळ अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु यासाठी किती खर्च येणार आहे, यासाठी किती तरतूद केली जाणार आहे याबाबतचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्र ज्यावेळेला निर्माण झाला त्यावेळी गुजरातमध्ये मुंबई जावी अशा प्रकारची भावना काही वर्गाची होती व त्याप्रमाणे काही प्रयत्नही झाले होते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ......

गुजरातमध्ये मुंबई नेता येत नसेल तर मुंबई किमान केंद्रशासित करावी यासाठी प्रयत्न केले गेले होते. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न केला जात तर नाही ना अशा प्रकारच्या शंका महाराष्ट्रातील विशेषत: मुंबईकर जनतेच्या मनात सातत्याने डोकावत आहेत.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे अधिकार कमी करुन त्या ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक करावी म्हणून मुंबई महानगरपालिकेवर सीईओ पदी नेमण्याची कल्पना आम्ही वर्तमानपत्राच्या माध्यमातून ऐकलेली आहे. या बाबीचे काही वेळा खंडन करण्यात आले होते. नागपूर अधिवेशनात नागपूरच्या पत्रकारांच्या निवासस्थानी माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबई महानगर पालिकेवर सीईओ नेमण्याचा माझा उद्देश नव्हता असे सांगितले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी एका बाजूला एक शब्द सांगितला तर दुसऱ्या बाजूला तोच शब्द ते सोईस्करपणे परत घेतला आहे.

सभापती महोदय, मुंबईसाठी एक उच्चाधिकार समितीची स्थापना केली पाहिजे व त्या समितीचे अध्यक्ष माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीच असले पाहिजेत असे त्यांनी सांगितले होते. परंतु ही कल्पना माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची असेल असे मला वाटत नाही. ही कल्पना यांच्या मनामध्ये कोणी आणली याबद्दल मला शंका आहे. मुंबई महानगरपालिकेची क्षमता स्वतंत्रपणे काम करण्याची नाही काय , महाराष्ट्राच्या नेतृत्वामध्ये काम करण्याची क्षमता नाही काय हा प्रश्न माझ्या समोर उभा राहिलेला आहे. सत्तेमध्ये बीजेपीच्या सोबत शिवसेना बसली आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय उद्धवजी ठाकरे सत्तेमध्ये जाणार असल्यामुळे स्पष्टपणे बोलू शकले नव्हते. परंतु त्यांनी म्हटले होते की, मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न केला जात आहे हे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला वाटत असेल तर त्याचे उत्तर बीजेपी सरकारला द्यावे लागेल अशा प्रकारचा उल्लेख त्यांनी "सामना" या वर्तमानपत्रातून केला होता.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.माणिकराव ठाकरे....

आपण जे औषध घेत आहोत ते औषध विष असू नये, करायला गेलो एक आणि झाले दुसरेच असे होता कामा नये अशाप्रकारची शंका व्यक्त करण्यात आली आहे. पुढे असेही म्हटले आहे की, मराठी माणूस विचार करायला लागला आहे, शंका घेऊ लागला आहे. आपण उच्चाधिकार समिती स्थापन करण्याचा निर्णय करीत आहात तेव्हा आपण मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा विचार करीत आहात अशाप्रकारची शंका महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. हे सर्व मी सांगत नसून शिवसेना पक्षाचे मुखपत्र असलेल्या "दैनिक सामना" वर्तमानपत्रात छापून आले होते. अशाप्रकारच्या शंका निर्माण होऊन देखील आम्ही ताठर आहोत अशाप्रकारची भूमिका घेऊन चालत असाल तर महाराष्ट्राचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. आपण अशी सुरुवात करणार असाल तर त्याचा शेवट कुठपर्यंत जाईल हे आपणास सांगता येणार नाही. मुंबई महाराष्ट्रापासून दूर करण्याचा जो विचार आहे तो महाराष्ट्रातील जनता कधीही खपवून घेणार नाही. तेव्हा शासनाने या संदर्भातील स्पष्ट भूमिका जाहीर करणे आवश्यक आहे. उच्चाधिकार समिती नेमण्यात येणार आहे हे कोणत्या कारणाकरिता बोललो आहोत हे देखील स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. जनतेने आपल्या हातात सत्ता सोपविली आहे. आपण शासनकर्ते आहात आणि शासन जनतेच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेत असते. तेव्हा आपण या संदर्भात स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आज राज्यासमोर अनेक प्रश्न उभे ठाकले आहेत. सरकारने एलबीटीच्या संदर्भातील निर्णय जाहीर करावा. आपण एलबीटीच्या ऐवजी जे जाहीर करीत आहात ते सर्व महानगरपालिकांना मान्य आहे काय, जनतेला मान्य आहे काय, ग्रामीण भागावर त्याचा काय बोजा पडणार आहे, या संदर्भातील धोरण स्पष्ट केले पाहिजे. आम्ही एलबीटी रद्द करु असे आश्वासन निवडणुकीच्या काळात देण्यात आले. त्याचा आता सरकारला गळफास लागलेला आहे. त्यातून आपणास सुटका करायची असेल तर आपणास न्यायाचा टॅक्स लावला पाहिजे. त्यास आमची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

कोणतीही हरकत असण्याचा प्रश्न नाही. निवडणुकीच्या काळामध्ये घोषणा करायची आणि सत्तेवर आल्यानंतर अंमलबजावणी करण्याची वेळ आल्यावर कोणत्या ना कोणत्या कारणाने तो निर्णय पुढे ढकलायचा हे योग्य नाही.

सभापती महोदय, या राज्यात रस्ते आणि पूल बांधण्यात आले. ज्यावेळी टोलचा प्रश्न आला त्यावेळी आम्ही देखील सांगितले की, ज्या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने टोल आकारला जात असेल तर तो टोल बंद करावा आणि तत्कालीन सरकारने काही ठिकाणचे टोलनाके बंद करण्याचा निर्णय घेतला. परंतु त्या संदर्भातील प्रसिद्धी विरोधी पक्षाला मिळवावयाची होती, कारण निवडणुका तोंडावर आल्या होत्या. त्या संदर्भात सातत्याने भाषणे करण्यात आली, वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने भरुन आले. निवडणुकीच्या काळात सांगण्यात आले की, महाराष्ट्र टोलमुक्त करण्यात येईल. पण आज सत्तेवर आल्यानंतर महाराष्ट्र टोलमुक्त करण्या संदर्भातील शब्द फिरविण्यात आला आहे. काल काय घोषणा दिली होती त्याबाबत पूर्णपणे यु टर्न घेतलेला आहे. आज आपण वेगळे बोलत आहात. जेव्हा प्रमुख नेता अशाप्रकारचे वक्तव्य करतो त्यावेळी त्याचा परिणाम राज्यातील जनतेवर आणि निवडणुकीवर झाल्याशिवाय राहत नाही.

सभापती महोदय, आज राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची काय परिस्थिती आहे ? राज्यामध्ये बलात्काराच्या प्रकरणांमध्ये वाढ झालेली आहे. मागासवर्गीयांवरील अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये वाढ झालेली आहे. अपहरणाच्या प्रकरणांमध्ये वाढ झालेली आहे. चोरी दरोड्याच्या प्रकरणांमध्ये वाढ झालेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे गृह विभाग आहे. नागपूर येथील धरमपेठ परिसरात माननीय मुख्यमंत्री महोदयांचे निवासस्थान आहे. त्या निवासस्थानाच्या 500 मीटर अंतरावर गोळीबार झाला होता. माननीय मुख्यमंत्री नागपूर शहरातील असल्यामुळे निदान त्या भागातील कायदा व सुव्यवस्था चांगली असणे आवश्यक होते, परंतु मुख्यमंत्री राहत असलेल्या परिसरातील कायदा व सुव्यवस्था चांगली नसेल तर आपण त्यास कोणत्या प्रकारचे प्रशासन म्हणायचे असा प्रश्न आमच्यासमोर आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, या सरकारकडून लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. त्यांना न्याय मिळेल असे वाटते. आज राज्यामध्ये महानगरपालिका क्षेत्रातील, नगरपालिका क्षेत्रातील प्रश्नांबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख असणे आवश्यक होते पण तसा कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही हे दुर्दैवाने येथे सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, ज्या महान नेत्याने या देशाला लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने देशाचे नेतृत्व केले ते पंडित जवाहरलाल नेहरु यांची या वर्षी 125 वी जयंती आहे. हे औचित्य साधून आपण वर्षभर वेगवेगळे कार्यक्रम राबवून त्यांची जयंती साजरी करीत आहोत. तसेच महात्मा गांधी 9 जानेवारी रोजी आफ्रिकेतून भारतात आले त्या गोष्टीला 100 वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही या गोष्टीचा मला खेद वाटतो. या दोन्ही महत्वाच्या व्यक्ती आहेत. या महान विभुतींनी इतिहास घडविला आहे त्यांच्यामुळे आम्ही आज सदनात बसलो आहोत. त्यांच्यामुळे या देशातील लोकशाही टिकली आहे. त्यांच्या कार्यक्रमाबाबत कोणताही उल्लेख नसावा याचा मला खेद वाटतो. या राज्याची नेमकी दिशा काय आहे, ? राज्यात कोणत्या प्रकारचे विचार आणण्याचा प्रयत्न होत आहे ? निवडणुकीपूर्वी जी आश्वासने दिली त्याचा उल्लेख अभिभाषणामध्ये असणे आवश्यक होते. महात्मा गांधीजींच्या मारेकऱ्यांच्या बाबतीत "शौर्य दिन" पाळण्याचे धाडस या राज्यामध्ये होत आहे. एका वर्तमानपत्राच्या प्रमुखांनी गांधीजीचा वध झ ााला असे म्हटले होते, हे आपले दुर्दैव आहे. वध कोणाचा होतो हे आपणास माहीत आहे. महात्मा गांधींच्या संदर्भात कोणी अशाप्रकारचे वक्तव्य करीत असेल तर त्यांच्या मुसक्या बांधण्याचे काम सरकारने केले पाहिजे. तेव्हा सरकारने या संदर्भातील भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री विदर्भाच्या संदर्भात सातत्याने सांगत होते. परंतु त्या संदर्भातील कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसत नाही. विदर्भाला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून, शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून, गरीब माणसाला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून कोणताच उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही याचा मला खेद वाटतो. आम्ही समिती नेमलेली आहे. आम्ही काही लोकांवर जबाबदारी

..4..



AJIT पूर्वी श्री.जुन्नरे... 17:50

श्री.माणिकराव ठाकरे....

सोपविलेली आहे ते सर्व करतील आणि आमच्यासमोर आणून ठेवतील अशाप्रकारचा उल्लेख संपूर्ण अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे त्याला आमचा विरोध आहे. निवडणुकीपूर्वी जी आश्वासने देण्यात आली होती त्याचा कोणताही उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही याचा निषेध करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासंदर्भातील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील उत्तराबाबत</u>

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर दोन-तीन दिवसांपासून चर्चा सुरु आहे. या ठिकाणी माननीय संसदीय कार्यमंत्री बसलेले आहेत. सभापती महोदय, आपण सांगितले होते की, माझ्या भाषणानंतर उत्तराला सुरुवात होईल. परंतु आता आपण लक्षेवधी सूचना पुकारत आहात.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, मी उत्तराच्या संदर्भातील वक्तव्य केल्यानंतर बऱ्याचशा गोष्टी घडल्या आहेत. त्यामुळे आता मी सर्वप्रथम लक्षवेधी सूचना चर्चेला घेतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचे उत्तर आता नव्हे तर उद्या सकाळी होईल.

### <u>लक्षवेधी सूचनांबाबत</u>

**उप सभापती** : आता लक्षवेधी सूचना क्रमांक-1 चर्चेला घेण्यात येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : महोदय, माझी लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी लक्षवेधी सूचना क्रमांक-2 मांडावी.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना गृह विभागाशी संबंधित आहे. परंतु माननीय मुख्यमंत्री आणि गृह राज्यमंत्री या पैकी कोणीही सभागृहात उपस्थित नाही.

**उप सभापती** : ठीक आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक-2 उद्या घेण्यात येईल. ही लक्षवेधी सूचना लॅप्स होणार नाही.

तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विनंती केल्यानुसार लक्षवेधी सूचना क्रमांक-3 पुढे ढकलण्यात आलेली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक-4 चर्चेला घेण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई विमानतळावर काम करणाऱ्या कामगारांची पिळवणूक करणाऱ्या व्यवस्थापनाविरुध्द तक्रार दाखल होऊनही पोलिसांकडून कारवाई न होणे

**मु.शी.** : मुंबई विमानतळावर काम करणाऱ्या कामगारांची पिळवणूक करणाऱ्या व्यवस्थापनाविरुध्द तक्रार दाखल होऊनही पोलिसांकडून कारवाई न होणे , या संबंधी श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई विमानतळावर गो एअरलाईन्स कंपनीचे कॅप्टन, केबिन क्रु यांना ने-आण करणारे वाहनचालक हे वायुदूत मल्टी सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्याकडे काम करीत असणे, या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी भरला नसल्याचे कामगारांच्या निदर्शनास येणे, यासंदर्भातील सांताक्रूझ विमानतळ पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्यासाठी कामगार गेले असता त्यांची तक्रार नोंदवून न घेता उलटपक्षी सिनियर पी.आय यांनी स्वत: अधिकाराचा वापर करुन कामगारांना तडकाफडकी कामावरुन काढून त्यांच्या जागी तातडीने नवीन कामगार भरणे, पोलीस व व्यवस्थापन यांच्या संगनमतामुळे कामगारांना गेल्या दोन महिन्यांपासून बेरोजगार रहावे लागत असणे, अशाच प्रकारे ग्रांऊड हॅडलिंगचे काम करणारी खंबाटा एव्हिएशन प्रा.लि. कपंनीमध्ये काम करीत असलेल्या हजारो कामगारांचे जून, 2013 ते ऑगस्ट, 2014 या 11 महिन्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या पैशांचा अपहार करण्यांत येणे, भविष्यनिर्वाह निधी एन्फोर्समेंट ऑफीसर यांनी सहारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविणे परंतु पोलीस स्टेशनने कंपनीच्या स्थानिक जबाबदार व्यक्तींविरुध्द गुन्हा न नोंदविणे, भारतात नसलेले कंपनीचे मालक नेल्सन खंबाटा आणि जेफ फिल्ड यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला असून कंपनी व्यवस्थापन पोलिसांच्या संगनमताने कायदा धाब्यावर बसविण्याचे काम करीत असणे, गेल्या दोन वर्षात 2500 कामगारांची पिळवणूक व्यवस्थापन करीत असून सहारा पोलीस स्टेशनमध्ये अनेक तक्रारी दाखल करुनही पोलिसांकडून त्यांची दखल न घेणे,

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

सहारा पोलीस स्टेशन ए.सी.पी. मुख्य आरोपींना पाठीशी घालण्याचे काम करीत असल्याचे स्पष्ट निदर्शनास येत असणे, परिणामी कामगारांमध्ये तीव्र असंतोषाची भावना असून संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई होण्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.प्रकाश महेता (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर बोलण्यासाठी आपण मला 5 मिनिटे जास्त वेळ द्याल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभागृहात माननीय कामगार मंत्री उपस्थित आहेत. ही लक्षवेधी सूचना विमानतळ व्यवस्थापनाच्या बाबतीत असून या निमित्ताने संक्षिप्तपणे एवढेच सांगतो की, यापूर्वी ईस्ट-वेस्ट एयरवेज कंपनी बंद झाली. त्यानंतर मोदी-लूफ कंपनी, दमानीया एअरलाईन्स, एनईपीसी एअरलाईन्स, किंगफिशर एअरवेज कंपनी सुध्दा बंद झाली. बंद झालेल्या कंपन्यांची नावे यासाठी सांगितली की, या कंपन्या बंद झाल्यामुळे या कंपन्यांतील हजारो कर्मचारी बेकार झाले. आज एअरपोर्टमध्ये वेगवेगळ्या आस्थापनेवर काम करणारे कंत्राटी कामगार 60 हजारापेक्षा जास्त आहेत. मग ते इंटरनॅशनल एअरपोर्टमध्ये काम करणारे असतील, कार्गोमध्ये काम करणारे असतील किंवा डोमेस्टीक एअरपोर्टमध्ये काम करणारे असतील. गिरणी कामगारांनी संप पुकारल्याच्या घटनेला 28 वर्षे झाली आहेत. परंतु 28 वर्षानंतर त्यांना न्याय मिळाला आहे. विविध भागातून मागणी केल्यानंतर गिरणी कामगारांच्या मुलांना शासनाने तेथे घरे दिली. परंतु एअरलाईन्स कंपन्या बंद झाल्यानंतर तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युईटीची रक्कम मिळत नाही. या बाबत आवाज उठविला तर काही जण सांगतात की, हा प्रश्न केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहे आणि काही सांगतात की, हा प्रश्न राज्य सरकारच्या अखत्यारीत आहे. मुळात कंत्राटी कामगारांचा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत येत असल्यामुळे तो कामगार रस्त्यावर येऊ नये म्हणून मी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. गो एअरवेजसाठी काम करणारी वायुदूत मल्टी सर्व्हिसेस प्रा.लि. ही कंपनी आहे. या कंपनीने 30 सप्टेंबरला कंत्राट घेतले आणि 1 ऑक्टोबरला मी स्वत: एअरपोर्ट येथे जाऊन त्यांच्यासोबत बैठक घेतली. दरम्यानच्या काळात दिवाळी असल्यामुळे कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी ए.सी.पी. कार्यालयात बैठक घ्यावी लागली. राज्य सरकारने लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मान्य केले आहे की, त्या कर्मचाऱ्यांनी अगोदरच्या कंत्राटदाराकडे 5-7 वर्षे काम केलेले आहे. वास्तविक पाहता ठेकेदार बदलला जाईल मात्र कामगार तेच राहतील अशाप्रकारे उच्च न्यायालयाने एअर इंडियाला दिलेल्या निर्णयाची प्रत माझ्याकडे आहे. ए.सी.पी कार्यालयात 21 ऑक्टोबरला बैठक होते आणि सांगितले जाते की, या कर्मचाऱ्यांना सामावून घेऊ. त्या बैठकीत ठरल्यानुसार त्या कर्मचाऱ्यांना सामावून घेतल्यानंतर 30 नोव्हेंबर रोजी त्या सर्व कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले. लक्षवेधी

..5..

श्री.किरण पावसकर....

सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, कामामध्ये कुचराई केल्यामुळे त्या कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले. कामामध्ये एक-दोन कर्मचारी कुचराई करु शकतात. परंतु एकाच वेळी 50 कामगार कशा चुका करतील ? शेवटी या कामगारांना सामावून घेण्यासाठी पोलिसांची मदत घ्यावी लागली. दिनांक 13 नोव्हेंबर, 2014 रोजी काही कर्मचारी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यासाठी गेले होते. त्यांनी सांगितले की, आम्हाला पगार मिळाला आहे, परंतु पगारातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कापून घेण्यात आली नाही. आमच्या पगारातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात केली जात नसेल तर मालकावर केस दाखल करावी. आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, मालकाविरुध्द तक्रार दाखल केल्यानंतर त्यांच्यावर केस दाखल केली जाते. परंतु तक्रार करुनही मालकावर कोणतीही केस दाखल करण्यात आली नाही. रात्री दीड वाजता त्याच पोलीस स्टेशनचे सिनियर पोलीस इन्स्पेक्टर एअरपोर्टवर जातात आणि त्या कामगारांकडून चाव्या काढून दुसऱ्या कामगारांना देतात. ज्यांचे फोटो पोलीस स्टेशनमध्ये लागलेले आहेत त्या गुंडांकडे कार्यालयाच्या चाव्या देण्यात आल्या. अशा प्रकारे एका रात्रीत 50 कामगारांना कामावरुन काढून टाकण्यात आले. या विषयी मी जेव्हा संबंधितांची भेट घेतली तेव्हा असे सांगण्यात आले की, या संदर्भातील दाद मागण्यासाठी तुम्ही न्यायालयात जावे. या सर्वांनी कामगारांना कामावरुन काढून टाकण्याचे काम केले आहे. यापूर्वी मुंबई शहरामध्ये ट्रेड युनियनमध्ये गँगवार चालत होते. वेगवेगळ्या गँगवारच्या माध्यमातून मालक हवा तसा ट्रेड युनियनचा वापर करीत होते. मला वाटते आता गँगवारची जागा पोलीस स्टेशनने घेतली आहे. या कामगारांना पोलिसांनी कामावरुन काढून टाकले आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, या बाबत न्यायालयात प्रकरण दाखल झाले आहे. वास्तविक पाहता कंत्राट ऑक्टोबर महिन्यात घेतले आणि कामगारांना नोव्हेंबरचा पगार मिळाला. मग हे प्रकरण कोर्टात कधी गेले ? उच्च न्यायालयात हे प्रकरण जाण्याचा संबंध काय आहे ? माझ्या मते या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात अधिकाऱ्यांनी आपणांस असत्य माहिती दिली आहे. आज कोणतीही केस न्यायालयात नाही. उलट कर्मचारी बाहेर आहेत. मालकांच्या विरोधात आवाज उठवून न्याय मागितला तर पोलिसांकडून सांगितले जाते की, यापुढे कोणत्याही परिस्थितीत तुम्ही एअरपोर्टच्या आजूबाजूला दिसता कामा नये. आज एका ठेकेदाराने

..6..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 18:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामगारांना कामावरुन काढले आहे. अशाच प्रकारे 31 डिसेंबरला 5 ठेकेदार कामगारांना कामावरुन काढून टाकणार आहेत. या बाबत कामगारांना नोटीसेस मिळालेल्या आहेत.

श्री.हेमंत टकले : महोदय, सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. आपण सभागृहाची वेळ 6.00 वाजेनंतर वाढविली आहे काय, असल्यास, ती वेळ किती वाजेपर्यंत वाढविली आहे?

**उप सभापती** : सभागृहाचे जे कामकाज माझ्यासमोर आहे ते संपेपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु राहील.

श्री.हेमंत टकले : परंतु सभागृहाचे कामकाज नेमके किती वाजेपर्यंत चालणार आहे ?

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत सुरु राहील.

श्री.माणिकराव ठाकरे : ठीक आहे. परंतु सायंकाळी 7.00 वाजल्यानंतर पुढे कामकाज घेऊ नये. उर्वरित कामकाज नंतर घ्यावे.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.किरण पावसकर : महोदय, शेतकऱ्यांच्या विषयावर सभागृहात चर्चा झाली त्यावेळी सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. परंतु हा कामगारांचा विषय असल्यामुळे या विषयाचे गांभीर्य ठेवावे अशी मी विनंती करतो. महोदय, या कामगारांना कामावरुन काढण्यात आले. तसेच किंगफिशर कंपनी बंद झाली. एका मुलाला पायलट करण्यासाठी 40-50 लाख रुपये खर्च येतो. नवरा-बायको पायलट असतील तर त्यांची भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युईटीची रक्कम एक-दीड कोटी रुपये होते. परंतु त्यांना त्यातील एक पैसाही मिळाला नाही. परंतु या देशातील कुठल्याही ट्रेड युनियनने या बाबत आवाज उठविला नाही. मी अगोदर ज्या कंपन्यांची नावे घेतली त्यातील कामगारांना एकही पैसा मिळाला नाही. पण हा भयानक प्रकार मी पहिल्यांदा बघितला आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये पोलीस स्टेशनचे अधिकारी कामगारांना कामावरुन काढून टाकणार असतील तर त्या अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ? दुसरी केस खंबाटा एव्हिएशन मधील आहे. त्यांनी 35 कोटी रुपयांना फसविले असे सांगितले आहे. निवेदनात नमूद

..7..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

केले आहे की, एफ.आय.आर. हा पी.एफ. कमिशनरने दाखल केला आहे. परंतु त्या एफ.आय.आर.मध्ये आमेरिकेत राहणाऱ्या नेल्सन खंबाटा, आदिल खंबाटा यांची नावे समाविष्ट केली आहेत. मी गेल्या 20 वर्षात बघितले आहे की, पी.एफ.कमिशनरकडून एच.आर. आणि चिफ अकाऊंटण्ट विरुध्द केस दाखल केली जाते. यामुळे पोलीस नेमके कोणासाठी काम करीत आहेत ? कामगारांना काढून टाकण्यासाठी त्यांना ठेवले आहे काय, कामगारांना कामावरुन काढून टाकण्याचे अधिकार पोलीस स्टेशनला आहेत काय ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, ते कामगार 5 वर्षांपासून तेथे काम करीत होते. त्यामुळे माझी विनंती आहे की, त्या कामगारांना ताबडतोब कामावर घेण्याचे आदेश द्यावेत. तसेच ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी हे उपद्व्याप, केले त्यांचा सत्कार समारंभ कोणते पारितोषिक देऊन करणार आहात ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना दोन विषयांशी संबंधित आहे. वायुदूत मल्टी सर्व्हिसेस प्रा.लि. कंपनीने गो-एअरवेजशी करार केला होता.. कॅप्टन आणि विमान कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवासस्थानावरुन एअरपोर्टपर्यंत आणि एअरपोर्टपासून निवासस्थानापर्यंत पोहोचविण्याबाबत करार केला होता. हा करार दिनांक 30 सप्टेंबर रोजी केला होता. त्यापूर्वी 'जय माता दी' यांनी आस्थापनेबरोबर करार केला होता. त्या वेळी निर्माण झालेल्या परिस्थितीवरुन पूर्वीच्या आणि नंतरच्या ठेकेदारामध्ये वाद झाला असे पोलिसांचे मत आहे. या प्रकरणी कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलिसांनी कार्यवाही केल्याचे लक्षवेधी सूचनेत नमूद केले आहे. परंतु सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते सत्य मानू या. त्या ठिकाणी 50 असंघटित कामगारांवर अन्याय झाला आहे. या कामगारांवर झालेल्या अन्यायाच्या बाबतीत निश्चित भूमिका घेण्याचे धोरण कर्मचारी, कर्मचारी युनियनचे नेते आणि शासन प्रत्यक्ष चर्चा करुन या बाबतीत योग्य ती भूमिका घेईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश महेता ....

सदर प्रकरणी सहायक आयुक्तांना हाताशी धरून कारवाई झाली, असे सांगितले आहे. त्यातील सत्यता पडताळून सत्यतेमध्ये अधिकारी दोषी आढळून आले तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. मी अगोदरच सांगितले आहे की, सदर विषयाच्या संदर्भात मी स्वत: आपल्या कामगारांशी, आपल्याशी चर्चा करण्यासाठी एअरपोर्ट ऑथोरिटीकडे येईन. तुमच्याशी बोलून, पूर्ण माहिती घेऊन पुढील आदेश निर्गमित करण्यात येतील.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी कामगारांविषयी जरूर जाणून घ्यावे. आपल्या उत्तरात सांगितले आहे की, कामगारांनी चुका केल्या म्हणून त्यांना कामावरून काढले आहे. मला आपला कायदा कळलेला नाही की, कंपनीतील सर्वच कामगार एका महिन्यात चुका कशा करू शकतात आणि त्यांना एकाएकी कामावरून काढू कसे शकतात ? 5 कामगारांनी चुका केल्या तर त्यांच्यावर तुम्ही कायदेशीर कारवाई करावी. परंतु, एकाच वेळी सर्वच कामगारांना कामावरून काढून टाकण्यात आले आणि त्यांच्या जागी दुसरे कामगार नेमून काम करण्यास सुरूवात केली. हा सर्व उपद्व्याप पोलीस स्टेशनला हाताशी धरून करण्यात आला आहे. पोलीस अधिकाऱ्याने रात्री दीड वाजता गाड्यांच्या चाव्या काढून घेतल्या आणि दुसऱ्या गुंडांच्या ताब्यात दिल्या. आपण या संदर्भात काय कार्यवाही करणार आहात ? हा प्रश्न फक्त 50 कामगारांपुरता मर्यादित नाही. 31 डिसेंबरला जेट एअरवेजचे कॉंट्रॅक्ट काढून पाचशे वाहनचालकांना काढण्याची नोटीस यापूर्वीच आली आहे. हा प्रश्न फक्त 50 कामगारांसाठीचा आहे असे आपण समजता का ?

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेत एका कंपनीच्या वाहनचालकांसंबंधी प्रश्न विचारला आहे. परंतु, तो मांडताना व्यापक स्वरूपात मांडला आहे. मी व्यापक भूमिकेतूनच उत्तर दिले आहे. उत्तरामध्ये विभागामार्फत सांगितले आहे की, त्यांनी काही गैरवर्तन केले, गैरवर्तन या शब्दाचे इंटरप्रिटेशन काय आहे ? हा न्यायप्रविष्ट विषय आहे. कंपनी न्यायालयात गेली, असे मी उत्तर दिले आहे. मी पुन्हा सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती गृहीत धरून या पुढील कार्यवाही करताना सन्माननीय सदस्यांशी, कामगारांशी, मॅनेजमेंटशी बोलून कामगारांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, यासाठी कालावधी किती लागणार आहे ?

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्याच्या आत यासंबंधी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आता स्वत: उत्तरात सांगितले आहे की, याची व्याप्ती 2 स्टेजमध्ये आहे. आपण कार्यवाही करीत आहात त्याचे स्वागतच होईल. आपण कामगारांच्या बाबतीत संवेदना दाखवित आहात, त्याबद्दल तुमचे अभिनंदन. 50 कामगारांना कामावरून काढले आहे. माननीय मंत्री ज्या कामगारांवर कारवाई झाली, त्यांच्याबद्दल बोलत नाहीत. सर्व कामगारांवर कारवाई झाली आहे आणि ते आपल्या कायद्याला अभिप्रेत नाही. पोलिसांना कोणताही लेबर कायदा हातात घेण्याची मुभा दिलेली नाही. आम्हाला ते अपेक्षित आहे. आपण पूर्वीसुध्दा कामगारांविषयी योग्य भूमिका घेतली आहे. आपण मंत्री राहूनसुध्दा कामगारांच्या गेट बैठका केलेल्या आहेत. आपल्याकडे संवेदना आहेत. हा प्रश्न 50 कामगारांचा आहे. कामगारांचा रोजगार अशा पध्दतीने दादागिरी करून कामावरून काढून टाकून घालविला आहे. आपल्याला अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली आहे. चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. कोर्टात दावा नाही, असे सन्माननीय सदस्य सांगत आहेत. ते स्वत: नेतृत्व करीत आहेत. आपण म्हणालात की, सन्माननीय सदस्यांची माहिती सत्य आहे असे गृहीत धरणार आहे. तुमच्या खात्यातील ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली, त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. 50 कामगारांपैकी ज्यांच्यावर कारवाई झाली, मग ते 5 असतील, ते सोडून बाकीच्या कामगारांना तत्काळ कामावर घेण्याचे आदेश आपण देणार का ?

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे. अधिवेशन संपल्यानंतर 1 महिन्याच्या आत प्रत्यक्ष एअरपोर्ट ऑथोरिटीकडे जाऊन कामगारांना कामातून काढले आहे त्या प्रकरणी, प्रकरण न्यायप्रविष्ट नसताना न्यायप्रविष्ट आहे अशी माहिती देणे त्या प्रकरणी, त्यांच्या अखत्यारितील विषय नसून सुध्दा पोलीस अधिकाऱ्यांनी इंटरफिअर केले त्या प्रकरणी, विभागाच्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली त्या प्रकरणी या महिन्यात पूर्ण माहिती घेण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली आहे. तुम्ही या संदर्भात आताच सांगा.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, ही बाब पोलीस विभागाशी निगडित असून प्रत्यक्ष कामगार विभाग यामध्ये इन्व्हॉल्व्ह नाही. पोलिसांच्या अहवालाच्या आधारे ही तक्रार आली. सन्माननीय सदस्य सांगत आहेत ते सत्य गृहीत धरून त्यांच्याबरोबर, कामगारांबरोबर बैठक घेऊन, तपासणी करून यासंबंधीचा निर्णय एकत्रितपणे घेण्यात येईल.

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना सुरू झाल्यापासून मी माननीय मंत्र्यांची उत्तरे ऐकत आहे. मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, 50 कामगारांना कामावरून एकदम काढून टाकणे हा त्यांच्यावर घोर अन्याय झाला आहे. सदर प्रकरणी एसीपीचा काहीही संबंध नव्हता आणि असे असताना त्या एसीपीने 50 कामगारांना एकत्र बोलावून त्यांच्याकडून गाड्यांच्या चाव्या काढून घेऊन तिसऱ्या गुंडांच्या हातात देणे ही बाब संपूर्णत: आक्षेपार्ह आहे. वास्तविक पाहता, या गोष्टीचा तपास आपण निश्चितपणे चांगला कराल. परंतु, दरम्यानच्या काळात हे लोक मोकाट सुटतील. याकरिता माझी आपल्याला सूचना आहे की, एसीपीवर ताबडतोब कारवाई सुरू करावी आणि 50 निरपराध वाहनचालकांपैकी ज्या वाहनचालकांवर कोर्टात केसेस नसतील त्यांना ताबडतोब कामावर घेण्याच्या संदर्भात आपण आदेश द्यावेत.

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, होय.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : ठाणे येथील कापूरबावडी घोडबंदर व भिवंडीकडून नाशिक बाजूकडे जाणाऱ्या रस्त्यावर बांधण्यात आलेला उड्डाणपूल सदोष पध्दतीचा असणे.

**मु.शी.** : ठाणे येथील कापूरबावडी घोडबंदर व भिवंडीकडून नाशिक बाजूकडे जाणाऱ्या रस्त्यावर बांधण्यात आलेला उड्डाणपूल सदोष पध्दतीचा असणे यासंबंधी ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री संजय दत्त, प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे येथील कापूरबावडी घोडबंदर व भिवंडीकडून नाशिक बाजूकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांची वर्दळ वाढून ट्रॅफिक जाम होण्याचे होत असलेले प्रकार, सदरहू ट्रॅफिक सुरळीत चालू होण्याच्या दृष्टीने तसेच प्रवासी सुरक्षिततेच्या दृष्टीने जे.कुमार या कंत्राटदाराकडून नवीन उड्डाण पूल बांधण्यात येणे, तथापि, सदरहू उड्डाणपुलाचे बांधकाम व रचना सदोष पध्दतीची असणे, या रस्त्यावर वारंवार अपघात होऊन त्यामध्ये अनेक नागरिक व प्रवासी मृत्युमुखी पडत असल्याच्या दुर्दैवी घटना, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी पोलीस उपायुक्त (वाहतूक शाखा), ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणे, तसेच सदर समितीने याबाबतचा आपला अहवाल दिनांक 17 सप्टेंबर, 2014 व त्यानंतर पुन्हा 20 ऑक्टोबर, 2014 रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (MSRDC), ठाणे यांचेकडे सादर करण्यात येणे, तथापि, याप्रकरणी 4 महिन्यांचा कालावधी होऊनही संबंधित जे.कुमार कंत्राटदाराकडून तसेच रस्ते विकास महामंडळाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी ठाणे जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नैराश्याची भावना, त्याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथ शिंदे (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमसह)मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदनानंतर)

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे सांगण्यात आले आहे की, अपघात व अप्रिय घटना टाळण्यासाठी व सुरक्षितता वाढविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक धोकादायक दर्शक फलक व माहिती फलक प्रकर्षाने वाहतुकीस लांबून दिसतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. मुळात डीसीपी ट्रॅफिकचे एक पत्र एमएसआरडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांना गेले आहे की, नवीन उड्डाणपूलावरून बाळकूम, भिवंडी, कापूरबावडी सर्कलकरिता जाणाऱ्या वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी उड्डाणपुलाच्या शेवटच्या उतारापासून पुढे गतिरोधक अत्यावश्यक आहे. परंतु, त्या संदर्भात चार महिने होऊन गेले तरी कोणतीही कार्यवाही आजपर्यंत झालेली नाही. कापूरबावडी जंक्शनपासून नाशिककडे जाणारा मार्ग आहे आणि तेथून ठाणे शहराकडे जाणारी जी लेन उतरते त्या तिकडे भिवंडी बायपास रस्त्यांच्या रुंदीकरणातही पुढचा पिलर येणार आहे. त्यामुळे हाय-वे ऑथोरिटीने हे बांधकाम थांबविले आहे, ही बाब खरी आहे का, हाय-वे ऑथोरिटीने हे काम थांबविले आहे तर एमएसआरडीसीने या संदर्भातील पूर्व परवानगी का घेतली नाही, परवानगी घेतली नसताना या ठेकेदारास वर्क ऑर्डर का दिली, वर्क ऑर्डर देण्यासाठी कोण जबाबदार आहे ?

सभापती महोदय, ब्रिजला आतापासून तडे गेले आहेत, त्यामुळे निकृष्ट दर्जाचे काम केलेल्या ठेकेदारावर आपण सक्त कारवाई करणार का ? ठेकेदार प्रवाशांच्या जिवांशी खेळण्याचे काम करीत आहे.

श्री. एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपायुक्त, वाहतूक यांनी केलेल्या सूचनांसंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. दिनांक 17.09.2014 व दिनांक 20.10.2014 रोजीच्या पत्रांच्या अनुषंगाने रस्ते सुरक्षेसंबंधी सूचना करून उपाययोजना सुचविल्या आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथ शिंदे........

या पूर्वीच बहुतांश सूचनांचे पालन करण्याचे आदेश दिलेले आहेत. या संदर्भात स्थानिक सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी मला एक पत्र पाठविले होते. सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनीही पुलाला तडे गेल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यामुळे माहिती प्राप्त झाल्यानंतर मी स्वत: शनिवारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी केली. जवळपास 95 टक्के पुलाचे काम पूर्ण झाले आहे. घोडबंदरकडून वळसा घालून मुंबईकडे जाणाऱ्या पुलाचे काम सध्या सुरु आहे. क्रिस्टेट कॉंक्रिट पध्दतीने हा पूल बांधण्यात येत असून या तंत्रज्ञानात हायटेन्शन स्टिल आणि वायरचा वापर करण्यात येत आहे. स्लॅबचे कॉंक्रिट झाल्यानंतर जॅक लावून वायर्स ओढल्या जातात. त्यामधील एक वायर तुटल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे 20 मीटरचा स्लॅब तत्काळ काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचे काम ठेकेदार करणार आहे. त्याचबरोबर या संदर्भात चौकशीचे आदेशही दिलेले आहेत. त्यासाठी निवृत्त सचिव श्री.तांबे यांची एक सदस्य समिती नियुक्त करण्यात आली आहे. एक महिन्याच्या आत या संदर्भातील अहवाल सादर करावा, असे त्यांना सांगण्यात आले आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यात कंत्राटदाराचा दोष आढळून आला तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिनांक 20/10/2014 रोजी जे.कुमार या कंत्राटदाराला पत्र दिलेले आहे. या उत्तरामध्ये वाहतूक विभाग, ठाणे आयुक्त यांच्या पत्राचा उल्लेख आहे. त्या खाली एक वाक्य असे लिहिले आहे की, "सदर पत्रातील सूचनांची अंमलबजावणी कंत्राटदारामार्फत 10 दिवसात न झाल्यास कंत्राटदाराच्या पुढील बिलातील रक्कम राखून ठेवण्यात यावी." दिनांक 20/10/2014 चे हे पत्र आहे. मला असे विचारावयाचे आहे की, संबंधित कंत्राटदाराची किती रक्कम राखून ठेवली आहे, त्याच्यावर कोणती कारवाई केली आहे, त्यांना किती दंड केला आहे, सदर टेंडरची एस्टिमेटेड कॉस्ट किती होती आणि ती आता किती टक्क्यांनी वाढली आहे ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे हे टेंडर 167 कोटी रुपयांचे होते. सन 2011 पर्यंत या पुलाचे संपूर्ण काम झाले पाहिजे, अशी मुदत होती. परंतु, या पुलाच्या कामाला विलंब झाला आहे. परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली कडून उड्डाण पुलाच्या नाशिक

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथ शिंदे.........

आर्मसाठी परवानगी मिळण्यात झालेला विलंब, प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील अतिक्रमण काढण्यासाठी लागलेला कालावधी, काही न्यायप्रविष्ट प्रकरणे, शहर वाहतूक पोलिसांची परवानगी मिळण्यास झ ाालेला विलंब, उड्डाणपुलाच्या आराखड्यास एमएमआरडीए कडून मान्यता मिळण्यास झालेला विलंब, स्थानिक लोकांनी पीआयएल दाखल केल्यामुळे झालेला विलंब, अशी विलंबाची कारणे आहेत. त्यामुळेच या सर्व गोष्टींची चौकशी झाली पाहिजे. आतापर्यंत या कामावर 197 कोटी रुपये खर्च झालेला आहे. उर्वरित आकडेवारी मी पटलावर ठेवतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मूळ निविदा रकमेमध्ये 30 टक्क्यांपेक्षाही जास्त वाढ झाली आहे. त्याची कारणे मंत्री महोदयांनी सांगितली आहेत. एवढा खर्च वाढला असेल तर रिटेंडरिंग का केले नाही ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, 95 टक्के काम पूर्ण झाले आहे. केवळ 5 टक्के काम पूर्ण व्हावयाचे आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, जर 95 टक्के काम पूर्ण झाले असेल तर निविदा रकमेत एवढी वाढ होण्याचे कारण काय आहे ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, मंजूर निविदा किंमत 131 कोटी रुपये होती. निविदा कालावधी 18 महिने होता. सन 2014 अखेर झालेला खर्च 168 कोटी रुपये आहे. पुलाची अंदाजित किंमत 197 कोटी असून आतापर्यंत 168 कोटी रुपये खर्च झाला आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : पुलाच्या कामाचे मूळ बजेट, त्यावर झालेला खर्च, कामातील त्रुटी या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. एक गोष्ट नक्की की, कामामध्ये बऱ्याचशा त्रुटी आहेत. या त्रुटी प्रशासनाने लक्षात आणून दिलेल्या आहेत. मंत्री महोदयांनी चौकशीसाठी एक सदस्य समिती गठीत केली आहे. माझे एकच म्हणणे आहे की, ठाणे शहरात मी राहतो, मंत्री महोदयही तेथे राहतात आणि ज्या सन्माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना मांडली आहे, त्यांचाही या कामाशी संबंध आहे. ठाणे शहरातील अन्य सर्व लोकप्रतिनिधी, ज्यांचा या

...3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**...........

शहराशी संबंध आहे, त्यांच्यासह येत्या 15-20 दिवसात आपण पुलाला भेट देऊ. त्या कामात ज्या त्रुटी अद्याप समोर आलेल्या नाहीत, त्या आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ. त्या नंतर मात्र संबंधिताविरुध्द कठोर कारवाई आपण कराल, अशा प्रकारचे आश्वासन आपण सभागृहाला द्यावे.

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, आपण दिलेल्या आदेशाचे पालन होईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण अतिशय महत्त्वाची सूचना मंत्री महोदयांना केली आहे. त्याप्रमाणे ते कार्यवाही करतील, असा मला विश्वास आहे. प्रश्न एवढाच आहे की, दिनांक 20-10-2014 रोजी वाहतूक शाखेकडून पाठविण्यात आलेल्या पत्रान्वये ज्या सुधारणा सुचविलेल्या आहेत त्याला दोन महिने होत आले आहेत. सूचना आणि माहिती फलक लावावा आणि गतिरोधक बसवावा, अशा सूचना त्यांनी केल्या आहेत. याबाबत दोन महिन्यात काय प्रगती झाली, सूचना व माहिती फलक लावण्याबाबत आणि गतिरोधक बसविण्याबाबत आपल्या खात्याकडून अधिकचा किती वेळ देण्यात येईल, या सुधारणा लवकरात लवकर होण्याबाबत आपण कोणत्या उपाययोजना करणार आहात ?

**उप सभापती** : मी यापूर्वीच सांगितले आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांसह या पुलाला आपण भेट देऊ. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी आता केलेल्या सूचनेचाही त्यात अंतर्भाव आपण करु.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सायबर गुन्ह्यात होत असलेली वाढ

**मु.शी.** : सायबर गुन्ह्यात होत असलेली वाढ यासंबंधी सर्वश्री अनंत गाडगीळ, संजय दत्त, शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड. हुस्नबानू खलिफे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनंत गाडगीळ (राज्यपालव्दारा नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात गेल्या काही वर्षामध्ये सायबर गुन्ह्यामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत असून सन २०१४ मध्ये मुंबईत ४१८ पेक्षा जास्त सायबर गुन्हे दाखल झाल्याची नोंद असणे, सन २०१३ मध्ये अश्लील ई-मेल अथवा संदेश पाठविण्याच्या संदर्भात २८ गुन्हे व क्रेडिट कार्ड फसवणुकीचे २७ गुन्हे नोंद होणे, महाराष्ट्रात मुंबई खालोखाल पुणे शहरातही सायबर गुन्ह्यांची नोंद वाढणे, देशातील एकूण सायबर गुन्ह्यांपैकी १० टक्के गुन्हे महाराष्ट्र राज्यात झालेले आढळणे, हल्ली इंटरनेटवर ओ एल एक्स, स्नॅप डील या सारख्या वेब साईटवर ऑनलाईन खरेदी, विक्री चालणे, या वेब साईटवरून व्यवहार करणाऱ्या लोकांपर्यंत पोहोचणे अत्यंत कठीण असणे, अशा लोकाकडून बहुतेकदा चुकीचा व योग्य प्रतीचा माल न देणे, पेमेंट करुनही माल वेळेत किंवा योग्य स्थितीत न मिळणे, क्रेडिट कार्डच्या कोड नंबरचा नंतर गैरवापर केला जाणे, अशा अनेक प्रकारच्या गोष्टी घडत असणे, सद्या इंटरनेटचा वापर वाढत असल्याने फसविणाऱ्या कंपन्यांचे पेव फुटलेले असणे, या कंपन्यांची विश्वासार्हता तपासण्यासाठी शासनाकडे नियमावली नसणे, यामुळे जनसामान्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व असुरक्षिततेची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...5.....

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री (शहरे) ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------------

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर सुरु झाला तर किती भयानक परिस्थिती निर्माण होते, या संदर्भात मी ही लक्षवेधी सूचना मांडली आहे. आपल्या घरातील एखादी वस्तू विकावयाची असेल तर त्यासाठी अनेक वेबसाईटस् सुरु झाल्या आहेत. या वेबसाईटवर आपण केवळ आपला फोन नंबर दिल्यास, काही तासातच ती वस्तू विकली जाते. यासाठी पॅन कार्ड किंवा आधार कार्डही लागत नाही. आता तर या वेबसाईटव्दारा चोरीचा आणि स्मगलिंगचा माल विकण्यासही सुरुवात झाली आहे. या पलीकडे जाऊन स्त्रियांबाबत भयानक स्वरुपाच्या जाहिराती देण्यास सुरुवात झाली आहे. या पुढे जाऊन आता दहशतवादी लोक या वेबसाईटचा वापर करीत आहेत, अशी शंका येऊ लागली आहे. मी ज्यावेळी शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा माझाच मोबाईल नंबर त्यावर टाकण्यात आला होता. माझी गाडी विकावयाची आहे, असे दर्शविण्यात आले होते. माझी मारुती गाडी सुध्दा नाही. उद्या सायबर कॅफेमध्ये जाऊन मी जर नगरविकास मंत्र्यांचा दूरध्वनी नंबर दिला आणि मंत्रालयाचा सर्व्हे नंबर टाकून मंत्रालय विकावयाचे आहे, अशी जाहिरात दिली तर नगरविकास मंत्र्यांना 100 फोन येतील. हे एवढे भयानक असल्यामुळे मी याबाबतची अधिक माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. मी या संदर्भात सायबर क्राईम ब्रँचकडेही तक्रार केली. परंतु, त्यांनी असमर्थता व्यक्त केली. माझ्या माहितीतून, माझ्या सोर्समधून मी स्वत: एका कंपनीचे ऑफीस शोधून काढले, त्यांना लिगल नोटीस पाठविली, या संदर्भात मुंबई पोलीस आयुक्तांना आमदार म्हणून लेखी कळविले. परंतु, साधे उत्तरही मला त्यांच्याकडून आले नाही.

यानंतर श्री.मा.शिगम.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 18:30

श्री. अनंत गाडगीळ...

माझ्या पत्राला साधे उत्तरही आलेले नाही. पुढची भयानक गोष्ट अशी की, आयपी ॲड्रेस कसा ट्रेस करावा हे सायबर क्राईमवाल्यांना माहीत नाही. आज बंगलोरमध्ये इसीसच्या आंतरराष्ट्रीय दहशतवाद्याला पकडले गेलेले आहे. त्याला शोधण्याकरिता 74 आयपी ॲड्रेस स्कॅन करण्यात आले. ते केल्यानंतर त्याच्यापर्यंत पोहोचता आले. त्याने भारतातील तरूणांना उद्देशून 703 ट्विट्स केलेली आहेत. ही ट्विट्स तुर्कस्थानातून आलेली होती. या संदर्भात शासन कारवाई करणार आहे काय ? सायबर कॅफेवरील आयपी ॲड्रेस ट्रेस करता येत नाही. लक्षवेधीच्या निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, "मुंबईमध्ये सन 2011 ते ऑक्टोबर 2014 पर्यंत अनुक्रमे 9, 33, 40 व 454 सायबर गुन्हे दाखल झालेले आहेत." अश्लील ईमेलचे 18 गुन्हे आणि क्रेडिट कार्ड फसवणुकीचे 47 गुन्हे नोंद झालेले आहेत. या आकडयांचा कुठे ताळमेळ बसत नाही. तेव्हा मंत्री महोदय मी उपस्थित केलेल्या मुद्यांचे उत्तर देतील काय ?

डॉ. रणजित पाटील : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी वस्तुस्थिती सांगितली ती नाकारता येण्यासारखी नाही. आधुनिकीकरणासोबतच स्मार्ट फोन अतिशय स्वस्त होत गेले आणि ते यंग जनरेशनच्या हाती लागले त्यातून या वस्तूंचा इनज्युडिशियस वापर होऊ लागला. ही परिस्थिती भयावह आहे याबाबत माझे दुमत नाही. अश्लील ईमेल, तसेच इकॉनॉमिक ऑफेन्सचे गुन्हे आपण पकडलेले आहेत. इकॉनॉमिक ऑफेन्स म्हणजे एखाद्याच्या क्रेडिट किंवा डेबिट कार्डातील डाटा घेऊन समोरच्या व्यक्तीला ब्लॅकमेल करुन पैसे काढाले जातात. या गुन्ह्यासंबंधीचे स्टॅटिस्टिक दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या पत्राला उत्तर देण्यात आले नाही असे त्यांनी सांगितले. मी या सभागृहाला सांगू इच्छितो की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि जो कोणी संबंधित अधिकारी दोषी असेल त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. या बाबतीत सरकारने काय केले अशी त्यांनी विचारणा केली. या गुन्ह्यामध्ये एक्स्पोन्शियल राईज झाला हे मी मान्य करतो. त्यासाठी आपल्याला मॅन पॉवर पाहिजे, आयटीचे ट्रेनिंग घेण्याची गरज निर्माण झाली आहे. आपल्या राज्यात सायबर क्राईमचा तपास करण्याचा आपला प्रवास 2000 सालापासून सुरु झाला. पहिल्यांदा आपण आयटी ॲक्ट केला. त्यानंतर 2009मध्ये सायबर सेल चालू केला. त्यामुळे गुन्हा नोंदवून, त्याचा तपास करुन आरोपीला अटक करण्याचे काम सुरु झाले. बीकेसीमध्ये सायबर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील...

पोलीस स्टेशन सुरु झाल्यापासून या कामाला सुरुवात झाली. अशा प्रकारच्या लिंकेजेस दिसल्या तर त्या ब्रेक करण्यासाठी आपल्याला आजही सर्ट - कॉम्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम न्यू दिल्ली यांची मदत घ्यावी लागते. मुंबई सायबर लॅबच्यावतीने मुंबई पोलीस आणि नॅसकॉम यांच्या वतीने सेन्सेटायझेशन, सायबर वीक, सायबर मंथ असे कार्यक्रम आपण घेत आहोत. यामध्ये केवळ पोलीसच नाही तर न्यायदंडाधिकारी, पोलीस प्रॉसीक्युटर, स्वयंसेवी संस्था यांच्या मार्फत अवेरनेस चालू केलेला आहे. यामध्ये बरेच काम करावयाचे आहे. परवा या विषयासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषण केले. त्यांनी सांगितले की, हे आव्हान आम्ही पेलत आहोत. आमच्याकडे प्रशिक्षित स्टाफ उपलब्ध नाही हे माहीत असून देखील आगामी वर्षामध्ये हे सायबर गुन्हे कसे कमी होतील, तरुण पिढी या गुन्ह्यापासून कशी दूर राहील यादृष्टीने काम केले जात आहे. या सायबर क्राईममध्ये फसणारे लोक हे मध्यमवर्गीय आहेत असे दिसून आलेले आहे. ओएलएक्स, फ्लिपकार्ट या मार्फत बरेचसे व्यवहार होतात. माल चुकीचा जातो. कधी कधी दगड देखील जातात. मी सभागृहाला एवढेच सांगतो की, आपण याबाबतीत इम्मॅच्युअर स्टेटमध्ये आहोत. आगामी वर्षामध्ये याबाबतीत शासनाला बरेच काम करावयाचे आहे. आपणा सर्वांचे आम्हाला सहकार्य लागेल एवढेच मी या निमित्ताने सांगतो.

ॲड. अनिल परब : फसवणुकीचा भाग अशा गुन्ह्यामध्ये आहे. सायबर गुन्ह्यामध्ये बदनामीचे गुन्हे समोर येत आहेत. अशा बदनामीच्या गुन्ह्यामध्ये पोलीस स्टेशनला जाऊन साईट बंद करण्यास सांगितले तर पोलीस सांगतात की, कंपनीने साईट बंद केली तरच ती बंद होऊ शकते. ती बंद होण्यासाठी 48 तास लागतात. तोपर्यंत वातावरण बिघडलेले असते. एखाद्या नेत्याची किंवा मान्यवर व्यक्तीची बदनामी केली जाते, जातीय सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न केला जातो. अशा साईटस बंद करण्यासाठी तातडीने पावले उचलली जातील काय ?

डॉ. रणजित पाटील : अजूनही याबाबतीत आपल्याला सर्ट या एजन्सीची मदत घ्यावी लागते. राज्यात देखील अशा प्रकारची एक यंत्रणा आपण तयार करीत आहोत. आपल्याकडील काही लोकांना सर्टमध्ये पाठवून लिंकेजेस कशा बंद करावयाच्या याचे ट्रेनिंग देण्याचे ठरविलेले आहे.

.3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री विक्रम काळे : रस्त्यारस्त्यावर इंटरनेट कॅफेचे बोर्ड पहावयास मिळतात. या इंटरनेट कॅफेना परवाना देण्यात येतो काय, नसेल तर अशा प्रकारचे गुन्हे घडू नयेत म्हणून काही ठोस धोरण शासन आखणार काय ?

डॉ. रणजित पाटील : इंटरनेट कॅफेची नोंद असते. त्यांना परवाना नसतो. या इंटरनेट कॅफेंची नोंद आणि परवाना आवश्यक असल्याची सूचना सन्माननीय सदस्यांनी केली ती योग्य आहे. या इंटरनेट कॅफेवर पोलिसांची नजर असते. पोलीस तेथे जाऊन पहाणी करीत असतात. सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार मार्ग काढण्याचा शासन प्रयत्न करील.

श्री. हेमंत टकले. सायबर गुन्हेगारी हा नव्या युगाने दिलेला आणखी एक शाप आपणा सर्वांसाठी आहे. या सायबर गुन्ह्याचा इतिहास आणि कारवाईची माहिती मंत्री महोदयांनी दिलेली आहे. यावरुन असे लक्षात येते की, तंत्रज्ञान वेगाने बदलत असून नवनव्या उपलब्धी निर्माण होत आहेत. याला सामोरे जाण्यासाठी पोलीस दलाची क्षमता आहे काय ? ग्रामीण भागातील जो पीएसआय आहे तेथ पासून एसपी पर्यंतच्या सर्व लोकांना या विषयाचे ज्ञान असण्याची आवश्यकता आहे. आपणाकडे पोलिसांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. नाशिकला पोलीस ट्रेनिंग ॲकेडमी आहे. इतर अनेक संस्था आहेत. या संस्थांच्या अभ्यासक्रमामध्ये आपण अशा पध्दतीचा अभ्यासक्रम अंतर्भूत केलेला आहे काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2........... श्री.हेमंत टकले.....

एकदाच ते अंतर्भूत करुन आपल्याला हा प्रश्न सोडविता येणार नाही. अनेक प्रोफेशनमध्ये ज्याप्रमाणे रिफ्रेश कोर्सेस असतात ते काळानुसार परिस्थिती बदलत असल्यामुळे त्यांना अपडेट करण्यासाठी कायमस्वरुपी योजना करुनही आपल्याला पुरेसे मनुष्यबळ विकसित करता येईल की नाही याबद्दल शंका निर्माण होईल. म्हणून प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी ज्याप्रमाणे वकिलांचे पॅनल केले जाते त्या धर्तीवर पोलीस ॲडव्हायझर म्हणून या क्षेत्रातील तज्ज्ञांचे पॅनेल आपण करणार आहात काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मौलिक सूचना केली आहे. जे सेवेत आहेत त्यांचे कोर्स आपण करु शकतो. सायबर सेलमार्फत बॅचेस करुन त्यांचे ट्रेनिंग कोर्स करीत आहोत. आज पोलीस ट्रेनिंग घेत आहेत. त्यांना एमएस सीआयटी परीक्षा असते त्या धर्तीवर पोलीस ट्रेनिंग कॅम्पमध्ये प्रत्येकाला ट्रेनिंग द्यावे अशी सूचना प्राप्त झालेली आहे. त्यावर निश्चितपणे या आर्थिक वर्षापासून अंमलबजावणी करु एवढे सांगतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

**उप सभापती** : मी आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करीत आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, कालच्या आणि आजच्या अशा एकूण 14 विभागांच्या पुरवणी मागण्या कामकाज पत्रिकेवर चर्चेसाठी दर्शविण्यात आलेल्या आहेत. आम्हाला आपल्याकडून मार्गदर्शन हवे आहे. पुरवणी मागण्यांकरिता कोणते विभाग घ्यावेत हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे. परंतु आतापर्यंतच्या प्रथेप्रमाणे विधानसभेत एका दिवशी सहा किंवा सात विभागांच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी घेण्यात येतात. उर्वरित विभागांचे विषय कपात सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केले जातात आणि त्यावरील उत्तर विनियोजन विधेयकाच्या मंजुरीच्या वेळी देण्यात येते. पुढील वेळी पुरवणी मागण्या चर्चेला घेत असताना यामध्ये सुधारणा करता आली तर त्या दृष्टीने आपण दखल घ्यावी आणि आम्हाला मार्गदर्शन करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर अनुक्रमांक-9 वरील बाब ही नियम 101 अन्वये विशेष उल्लेखासंबंधीची आहे. आज विशेष उल्लेख मांडण्याची संधी मिळणार आहे की नाही याबाबत मला आपल्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या अधिवेशनात अद्याप एकही विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यात आलेली नाही.

**उप सभापती** : उद्या बुधवार, दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजी माननीय सदस्यांना विशेष उल्लेखाची सूचना मांडण्याची संधी दिली जाईल.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत असून पुरवणी मागण्यांवर अनेक माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. पुरवणी मागण्यांवरील चर्चा आणि त्यावरील मंत्री महोदयांच्या उत्तराची भाषणे आजच होणार आहे काय?

**उप सभापती** : होय.

श्री.राजेंद्र मुळक : आज आमच्या पक्षाची बैठक आयोजित केली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : पुरवणी मागण्यांवर कोणाला बोलायचे नसेल तर मी पुढील कामकाज पुकारणार आहे. मी मघाशी 7.00 वाजेपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविलेली आहे. आवश्यकता भासल्यास पुन्हा कामकाजाची वेळ वाढविता येईल.

श्री.राजेंद्र मुळक : अनेक माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवर बोलायचे आहे. आता सभागृहाच्या कामकाजाची वेळ संपण्यास 10 मिनिटांचा अवधी आहे. जर पुरवणी मागण्यांवर आता चर्चा घेतली तर मला ऑन लेग रहावे लागेल.

**उप सभापती** : तो निर्णय माझा आहे.

नंतर 2आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : सभागृहाचे कामकाज शक्यतो सहा वाजेपर्यंत पूर्ण व्हावे अशी दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून अपेक्षा असते. काही वेळा कामकाजात अचानक बदल झाला तर आपल्याला वेळ सुध्दा वाढवावी लागते, कारण त्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. आज पुरवणी मागण्यांवरील चर्चा आपल्याला पूर्ण करावी लागणार आहे. तसेच कामकाज पत्रिकेत दाखविलेले सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांची नियम 101 खालील चर्चा आज घेऊ शकणार नाही ती चर्चा उद्या घेण्यात येईल. तसेच आतापर्यंत दाखविलेल्या सर्व अर्धा-तास चर्चा घेण्यासाठी स्वतंत्र दिवस ठरवून त्या दिवशी सर्व अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील. आज माझी सभागृहाला विनंती आहे की पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण करावी. सभागृहात अनेक वेळा असेही प्रसंग घडलेले आहेत की, सन्माननीय सदस्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी जास्त वेळ सुध्दा आपण बसलो. एवढेच नव्हे तर काही वेळा रात्री 11.00 वाजेपर्यंतही सभागृहाचे कामकाज चाललेले आहे. एकदा तर संपूर्ण रात्रभर आपण सभागृहाचे कामकाज घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी 10.00 वाजता संपविले होते. आजच्या पुरवणी मागण्या यापूर्वी सुध्दा दोन तीन वेळा कामकाजामध्ये दाखविण्यात आल्या होत्या परंतु त्यावेळी चर्चा होउ शकली नाही म्हणून त्या आजच पूर्ण कराव्यात अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चा कमीत कमी वेळेत कशी संपविता येईल ते पहावे व त्यानुसार आपले भाषण करावे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभापतीस्थानी माननीय उप सभापती असताना त्यांनीच सायंकाळी 7 वाजेपर्यंत सभागृहाची कामकाजाची वेळ ठरविली होती. त्यानुसार आमचेही कार्यक्रम ठरलेले असतात. जर अशा प्रकारे सभागृहाची वेळ ठरवावयाची होती तर अगोदरच सकाळी सांगणे आवश्यक होते.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुरवणी मागण्या कालच्या कामकाज पत्रिकेत सुध्दा दाखविल्या होत्या पण त्यावर काल चर्चा होऊ शकली नाही. या पुरवणी मागण्यांवर आज चर्चा होऊ शकली नाही तर उद्या विनियोजन विधेयक पास होऊ शकणार नाही. विनियोजन विधेयक या सभागृहाने मंजूर केल्यानंतर खालच्या सभागृहातही परत पाठवावयाचे असते, त्यामुळे ही चर्चा आजच पूर्ण करावी, अशी माझी विनंती आहे.

...........2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : महोदय, सन्माननीय सदस्यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलावयाचे होते पण ते बोलू शकले नाहीत आणि आता पुरवणी मागण्यांवर देखील पूर्ण चर्चा होणार नसेल तर सदस्यांवर तो अन्याय होईल.

श्री. हेमंत टकले : महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेत एकूण 14 विभागांच्या पुरवणी मागण्या दाखविण्यात आलेल्या आहेत. ती चर्चा आणि त्यावरील उत्तर घेऊन त्या मंजूर कराव्यात अशी आपली सूचना आहे. वास्तविक हा आपला अधिकार मान्य करुन त्याचा स्वीकार करावा लागेल ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने बऱ्याच सन्माननीय सदस्यांना या सर्वच्या सर्व विभागांमध्ये चाललेल्या कामकाजाबाबत आणि त्यासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी व त्याची कमतरता आणि दुरुस्त्या याबाबत विचार केला तर त्यासाठी आजची वेळ कमी पडणार आहे. तसेच दिवसभराचे कामकाज वाढत जाऊन 7 वाजेपर्यंत आलेले आहे. याचे कारण या विषयावर बोलताना आताच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील म्हणाले तेही खरे आहे की, सभापतीस्थानावरुन 7 वाजेपर्यंत कामकाजाची वेळ ठरविण्यात आली होती. त्यानुसार काही सन्माननीय सदस्य सभागृहातून बाहेर निघूनही गेले. पूर्वीच्या प्रथा काय होत्या आणि त्यावेळी कशा प्रकारे मान्यता घेण्यात आली याचे दाखले न देता या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी वेळ हवा आहे आणि हा नवीन पायंडा का पाडू नये त्यामुळे आपण आपल्या सूचनेत काही सुधारणा करता आली तर ती करावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : एक काळ असा होता की, सभापती किंवा अध्यक्षांनी चार मिनिटे एखाद्या सदस्याला बोलण्याची परवानगी दिली तर साडेतीन मिनिटे झाल्यानंतरच बेल वाजविली जात होती. त्यामुळे ते सदस्य नवीन असतील तर बावरुन जाऊन ताबडतोब खाली बसत होते. पण आपल्यासारखे दर्दी सदस्य असतील तर ते मात्र आणखी पुढील दीड मिनिटे घेतात. पण अलिकडच्या दहा वर्षाच्या काळात आपण काहीसे फ्लेक्झिबल झालेलो आहोत. मघाशी सभागृहात नियम 260 अन्वये चर्चा सुरु होती. ती चर्चा फक्त अडीच तासांचीच होती. त्यात मंत्र्यांच्या उत्तरासाठी 30 मिनिटे आणि राईट-टू-रिप्लायसाठी 20 मिनिटे याप्रमाणे वेळ विचारात घेतला तर केवळ 1 तास 40 मिनिटांचाच वेळ चर्चेसाठी उरतो. त्यातही पहिल्या वक्त्यांना कल्पना असली

...........3



PFK/ प्रथम श्री. भोगले........ 18:50

**सभापती** ...........

तरी ते त्यातला 38 मिनिटांचा वेळ घेतात त्यामुळे इतर सदस्यांवर बंधन येते पण हे बंधन पूर्वी कटाक्षाने पाळले जात होते. हल्ली मात्र अडीच तासाचे साडेतीन तास ही चर्चा होते अशा परिस्थितीत एकूण कामकाजाची वेळ वाढत जाते, याचे सदस्यांनी भान ठेवावे.

श्री. संजय दत्त : महोदय, आम्ही सुध्दा सत्तारुढ बाकावर बरीच वर्षे बसत होतो. आज जरी विरोधात असलो तरी आमची भूमिका सकारात्मक व सत्ताधारी पक्षाला सहकार्य करण्याची तसेच सभागृहाचे कामकाज नीटपणे पार पाडण्याचीच आहे. आपण या सभागृहात चांगल्या परंपरा सुरु केल्या आहेत त्या म्हणजे सत्ताधारी आणि विरोधकांची बैठक घेऊन कामकाज सुरळीत कसे चालेल यावर चर्चा केली जाते. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आपण येण्यापूर्वी माननीय उप सभापतींना विचारले होते की, सभागृहाची कामकाजाची वेळ कोठपर्यंत आहे, त्यावर त्यांनी 7 वाजेपर्यंत सभागृहाची वेळ असल्याचे सांगितले होते. आपल्या निर्णयाविरुध्द आम्ही आताही जाणार नाही पण यातून काही तरी मार्ग निघावा अशी नम्रपणे माझी विनंती आहे.

**सभापती** : वास्तविक राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचे उत्तर आणि पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण करण्याचे आपले ठरलेले होते, त्यादृष्टीने आपल्याला पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपवावयाची आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले विचार व्यक्त करावेत.

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा आजच संपवावयाची आहे. कारण उद्याच्या कामकाजात विनियोजन विधेयक सुध्दा सभागृहाच्या मंजुरीसाठी येणार आहे त्यामुळे ही चर्चा आणखी लांबू शकते, म्हणून आजच ही चर्चा पूर्ण करावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि...........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (पाटील).....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवरच बोलता येईल. यावर जास्त काही बोलण्यासाठी वाव नाही. आपणा सर्वांना थोडक्यातच बोलावे लागणार आहे. बाब संबंधातीलच नोंद घेतली जाईल. बाबीच्या बाहेरील मुद्यांची आम्ही नोंद घेतच नाही आणि घेणारही नाही.

**सभापती** : मी सभागृहाच्या अनुमतीने सभागृहाच्या कामकाजाची वेळ रात्री 9.00 वाजेपर्यंत वाढवत आहे.

**पृ.शी./मु.शी.**: सन 2014-2015 च्या खर्चाच्या पूरक मागण्यांवर चर्चा

**सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा पहिला दिवस आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर आज चर्चा घेण्यात येईल. पूरक मागण्या आणि खालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यान्यात घ्यावे.

**<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या</u>**

**सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1. मुख्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक : ए-2, ए-3, ए-4, ए-8, बी-1,बी-4,बी-5,बी-7,एफ-2,एफ-3,एफ-4,एफ-5,आय-5,जे-1,जे-2
2. शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण,उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण,मराठी भाषा,सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक : ई-2, ई-3, ई-4, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3,डब्ल्यू-4,झेडडी-2,
3. गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्र्यांच्या विभागांची पूरक मागणी क्रमांक : के-4
4. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक : एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, व्ही-2
5. आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाची पूरक मागणी क्रमांक : टी-5

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती**.....

6. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाची पूरक मागण्या क्रमांक एन-3
7. महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक : बी-1, सी-1, सी-2, सी-4, सी-5, डी-3, डी-4, डी-6, डी-8, डी-9,
8. वित्त आणि नियोजन, वने मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक : सी-7, सी-10, जी-1, जी-4,जी-5,जी-7,ओ-7,ओ-9,ओ-10,ओ-17,ओ-21,ओ-25,ओ-28,ओ-30,ओ-33,ओ-39,ओ-31,ओ-42
9. ग्रामविकास आणि जलसंधारण रोजगार हमी योजना, महिला व बाल विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक : एल-2, एल-3, एल-5, ओ-3, एक्स-1, एक्स-2
10. अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न आणि औषध प्रशासन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक : एम-2, एम-3
11. जलसंपदा मंत्र्यांच्या विभागाची पूरक मागणी क्रमांक : आय-3,
12. उद्योग मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक : के-3, के-7, के-9
13. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाची पूरक मागणी क्रमांक : वाय-2,
14. सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक : आर-1, आर-2

आता सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी भाषणाला सुरूवात करावी.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शासनाने रूपये 8201.85 कोटीच्या मागण्या मांडलेल्या आहेत. सदर पुरवणी मागण्या मांडत असताना आपल्या माध्यमातून मी माननीय वित्त व नियोजन मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न करणार आहे. रूपये 8201.85 कोटीच्या पुरवणी मागण्या मांडत असताना भारित व दत्तमत मागण्या किती आहेत याची देखील माहिती मिळणे आवश्यक आहे. तसेच भांडवली लेख्यावरील एकूण खर्च किती आहे याची देखील माहिती मिळणे आवश्यक आहे. या बरोबरच महसुली खर्चाच्या संदर्भात नवीन रिसोर्सेस कसे तयार करण्यात येणार आहेत याची देखील माहिती मिळणे आवश्यक आहे. या आर्थिक वर्षात जे रिसोर्सेस निर्धारित केले होते त्यापेक्षा आपली काही वेगळी योजना आहे काय याची देखील आम्हाला माहिती मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मला येथे मागील दोन वर्षाच्या आर्थिक परिस्थितीची माहिती देणे आवश्यक आहे असे वाटते. सन 2005-2006 च्या किंमतीनुसार सन 2013-2014 मध्ये आपल्या राज्याच्या स्थूल उत्पन्नामध्ये 8.60 टक्क्यांनी वाढ झाली होती. त्यावेळी उद्योग क्षेत्रामध्ये 8.8 टक्के वाढ झाली होती, तर सेवा क्षेत्रामध्ये 9.3 टक्के वाढ झाली होती. आता नवीन सरकार राज्यामध्ये आलेले आहे. त्यामुळे उद्योग, सेवा क्षेत्रामध्ये ते किती टक्के वाढ अपेक्षित आहे यासंबंधातील माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन होईल. त्यावेळी आपली विस्ताराने भूमिका कळणारच आहे. पण या माध्यमातून माहिती मिळणे आवश्यक आहे. मार्च 2013 अखेरीस बँकेमध्ये एकूण ठेवी 17.85 लाख कोटी रूपयांच्या होत्या. एकूण कर्ज रूपये 15.76 लाख कोटी रूपयांचे होते. कर्जाचे ठेवीशी असलेले प्रमाण 88.3 टक्के होते. तेव्हा या संदर्भातील आजची आकडेवारी माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणातून मिळाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

मार्च 2013 अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभाली खालील रस्त्यांची लेंथ 2.5 लाख कि.मी.एवढी होती. या पुरवणी मागण्यातून आणि येणाऱ्या अर्थसंकल्पात आपण किती रूपयांची वाढ करणार आहात ? ..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी या राज्याचे वित्त राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. मी आपल्या मार्फत त्यांच्या लक्षात एक गोष्ट आणून देतो की, ही अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा नाही. महाराष्ट्र विधान परिषद नियम 230 (2) अन्वये बाबीवर आपण चर्चा उपस्थित करावी. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांना सूचना आहे की, संबंधित बाबी संबंधातील आपल्या काही सूचना असतील तर त्या त्यांनी कराव्यात.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मला कुठल्याही परिस्थितीत परंपरा मोडावयाची नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांना सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये भाग घेतो त्यावेळी संबंधित खात्याच्या बाबीचा उल्लेख करून तेवढ्या मर्यादेपुरतेच आपण बोलत असतो.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपली सूचना मला मान्य आहे. मी पुरवणी मागण्यांच्या चर्चेला सुरूवात केली आहे. मी फक्त थोडक्यात पार्श्वभूमी सांगत आहे. त्यानंतर मी बाबनिहाय चर्चेवर येणार आहे. त्यावर मी माझे मत मांडणारच आहे. सभागृहात पुरवणी मागण्या मांडल्यानंतर चर्चेला मी सुरूवात करीत असल्याने व त्यावर माझे मत मांडत असताना थोडी पार्श्वभूमी सांगणे हे माझे कर्तव्यच आहे. सभापती महोदय, मी देखील सत्तेमध्ये असताना वित्त राज्यमंत्री पदावर चार वर्षे होतो. विधान सभेमध्ये कामकाज कसे चालायचे याचा मला अनुभव असल्यामुळे त्याचा देखील मी येथे उल्लेख करतो. विधान सभेमध्ये देखील अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य बाब सोडून बोलत होते. त्यांचा मी आजही आदर करीत आहे. अनेकदा सर्वांनी बाब सोडून चर्चा केलेल्या आहेत. मला सन्माननीय मंत्री महोदय सूचना करू शकत नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांना सभापती या नात्याने सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्यांवर चर्चा करतो तेव्हा विभागाचा व बाबीचा उल्लेख केल्यानंतर त्या मर्यादेतच आपण बोलतो.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी त्या दृष्टीनेच माझे विचार मांडत आहे. माननीय मंत्री महोदय मला सूचना करू शकत नाही. आपली सूचना मला मान्य आहे.

...5





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : त्यांनी माझ्या मार्फत सदनाला सांगितले की, म.वि.प.नियम 230 (2) अन्वये चर्चा करावी. त्यांनी याकडे माझे लक्ष वेधले आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मला देखील यासंबंधातील पूर्ण माहिती आहे. मी फक्त थोडी पार्श्वभूमी सांगत होतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आता बाब सांगून भाषणाला सुरूवात करावी. सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री हे अभ्यासू असून त्यांनी सदनामध्ये चांगली भाषणे केली आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचा आम्ही आदर करतो. ते विरोधी पक्षात असताना सुद्धा खूप आक्रमक होते. त्यांनी येथे काही सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक हे देखील वित्त राज्यमंत्री होते. त्यांनी अशा चर्चेला यापूर्वी उत्तर दिलेले आहे. मी येथे दोन बाबी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्रत्येक गोष्टीमध्ये आम्ही सहकार्य करीत आहोत. सभागृहाचे कामकाज रात्री 9.00 वाजेपर्यंत चालेल असा आपण निर्णय दिल्यानंतर देखील आम्ही शांत बसलो. ताबडतोब सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक चर्चेला उभे राहिले आणि आपल्या भाषणाला त्यांनी सुरूवात केली. या अधिवेशनात प्रत्येक वेळी चर्चेची वेळ मर्यादित करण्यात यावी असे धोरण स्वीकारले जात आहे. विरोधी पक्षाला बोलण्याची संधीच देत नसाल तर मग आम्ही सभात्याग करू. दर दिवशी आम्हाला चर्चेची वेळ मर्यादित करावी असे सांगण्यात येते. तरी देखील आम्ही सहकार्य करीत आहोत. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी काय बोलावे यासंबंधातील सूचना आपल्या मार्फत आली तर ठीक आहे. डायरेक्ट येऊ लागली तर आम्ही कामकाज कसे काय करायचे. यासाठी आम्हाला आपले संरक्षण हवे आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्त व नियोजन मंत्री ) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधान परिषद नियमांचा उल्लेख केला असतांनाही सन्माननीय सदस्य माझ्यावर हेत्वारोप करीत आहेत. मंत्री म्हणून मी घटनेच्या, संविधानाच्या अधिन राहून काम करण्याचा आग्रह धरत असेल व त्यावर सन्माननीय सदस्य हेत्वारोप करीत असतील तर आश्चर्य आहे. मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 230/2 चा आग्रह केला तर ती चूक आहे असे मी समजत नाही.

**सभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चा लवकर कशी पूर्ण होईल याकडे आपण सर्वांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.सुधीर मुनगंटीवार साहेबांनी सन्माननीय सदस्य श्री. मुळीक साहेबांना बोलल्यानंतर सूचना केली आहे. आपण सर्वांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम 230/2 चा सातत्याने वाचलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. मुळक साहेब आपण स्वत: अर्थ व नियोजन विभागाचे राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. आपण अनेक वेळा पुरवणी मागण्यांना त्या त्या वेळी उत्तरेही दिलेली आहेत. मला वाटते पुरवणी मागण्यांवर चर्चा करतांना विभाग आणि बाबीचा उल्लेख करुन चर्चेला सुरुवात होऊन ती वेगवेगळया विभागावर जात असते. त्यामुळे आता सन्माननीय सदस्यांनी विभाग आणि बाबीचा उल्लेख करुन पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करावी अशी विनंती आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपला सन्मानन ठेवून मी सांगू इच्छितो की, मी पुरवणी मागण्यावरील चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी त्याची पार्श्वभूमी सांगून बाबक्रमांक निहाय चर्चेला सुरुवात करणार होतो. ठीक आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 144, पृष्ठ क्रमांक 116 वर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मोठे, मध्यम व लहान पाटबंधारे विभागाच्या प्रशिक्षण व दुरूस्ती खर्च भागविण्यासाठी तसेच विविध कामे करण्यासाठी निधी देण्यात आलेला आहे परंतु माझ्या मते हा निधी अपूर्ण आहे. चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदीचां खर्च भागविण्यासाठी जी पुरक मागणी प्रस्तावित करण्यात आलेली आहे ती 118 कोटी 60 लाख 44 हजार रुपयांची आहे. संपूर्ण राज्यातील कामांसाठी हा निधी अपूर्ण असून या निधीमध्ये वाढ करण्यात यावी अशी माझी विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

सभापती महोदय, मला अपेक्षा होती की, नागपूर जिल्हयातील कनान नदीवरील कोची प्रकल्पासाठी आपण मागणी केली होती. मागच्याही पुरवणी मागण्यांमध्ये कोची प्रकल्पासाठी पैसे उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यामुळे यासंदर्भात माझी विनंती राहणार आहे की, कोची प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झालेली आहे. कोची प्रकल्पाची नागपूर शहराला पाणी पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था म्हणून करण्यात आलेली आहे. सद्या नागपूर शहराला पेंच प्रकल्पाच्या माध्यमातून पाणी उपलब्ध होत आहे. कोची प्रकल्पाच्या कामाला वेग दिला तर पेंच प्रकल्पावरील ताण कमी होऊ शकतो. पेंच प्रकल्पाचे लाभ क्षेत्र हे भंडारापर्यंत आहे. पेंच प्रकल्पावर धान उत्पादक शेतकरी आपल्या धानाला पाणी देत असतो. पेंच प्रकल्पातील जवळपास 80 टक्के पाणी नागपूर शहराला पिण्याच्या पाण्यासाठी द्यावे लागत असल्यामुळे पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मी जलसंपदा मंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, नागपूर जिल्हयातील कनान नदीवरील कोची प्रकल्पाला किमान 140 कोटी रुपयांची तरतूद आता किंवा मुख्य बजेटच्या वेळी तरी करावी अशी विनंती करतो. पेंच प्रकल्पाचे काही काम शिल्लक असून त्यासाठी सुध्दा 110 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 207, बाब क्रमांक 233 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. गोंडवाना विद्यापीठ हे विदर्भातील संवेदनशील विभागात असून या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी दुर्गम भागातून विद्यार्थी येत असतात. शिक्षण घेणारे विद्यार्थी हे अतिशय गोरगरीब वर्गातून येत असतात. गोंडवाना विद्यापीठातील विद्यार्थ्यांना राहण्यासाठी व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये जी तरतूद करण्यात आलेली आहे ती अतिशय कमी आहे. आदिवासी विकास राज्यमंत्री श्री. राजे अम्ब्रीशराव राजे हे तरुण आहेत, शिक्षीत असून त्या भागातील जनतेने त्यांना मोठया मताधिक्याने निवडून दिलेले असल्यामुळे त्यांना माझी विनंती आहे की, गोंडवाना विद्यापीठ सुरु होत असतांना गडचिरोली जिल्हयामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. गोंडवाना विद्यापीठ हे अत्यंत दुर्गम भागात असून त्या ठिकाणी अगोदर शिक्षणाची कोणतीही सोय नव्हती. राज्यामध्ये गोंडवाना विद्यापीठ निर्माण व्हावे व तेथे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

सभापती महोदय, मशिक्षणाची व्यवस्था निर्माण होऊन येथील विद्यार्थी राज्यातील इतर विद्यार्थ्यांबरोबर यावा ही भूमिका घेऊन त्या काळात गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती. मागच्या पुरवणी मागण्यांमध्ये गोंडवाना विद्यापीठाला पैसे न देता इतर कामांसाठी पैसे देण्यात आले होते. परंतु या पुरवणी मागण्यांमध्ये गोंडवाना विद्यापीठातील विद्यार्थ्यांना वसतीगृह व इतर सोयीसुविधा पुरवण्यासाठी निधी फार कमी देण्यात आला आहे त्या निधीमध्ये वाढ करण्यात यावी अशी विनंती पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करतो.

सभापती महोदय, वने विभागाच्या पृष्ठ क्रमांक 37,बाब क्रमांक 42 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सद्या ग्लोबल वॉर्मिंगच्या युगामध्ये राष्ट्रीय वृक्ष रोपण कार्यक्रम राबविणे अत्यंत महत्वाचे आहे. ग्लोबल वॉर्मिंगचा प्रकोप दिवसेंदिवस वाढत चालला असून निसर्गाचा असमतोलही वाढत चालला आहे. आता हिवाळयामध्ये जी गारपीट होत आहे ती ग्लोबल वॉर्मिंग मुळेच होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगला कॉम्बॅट करावयाचे असेल तर त्यासाठी व्यवस्थित आराखडा आखणे आवश्यक आहे. त्यासाठी योग्य पध्दतीने वृक्षरोपण करण्याची व लावलेली झाडे जीवंत राहण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. आपण वृक्षरोपणाची चांगली सुरुवात केली आहे परंतु यासाठी व्यवस्थित कार्यक्रम आखण्याची गरज आहे. राज्याची भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन वृक्षरोपणाचा कार्यकम राबवावा अशी विनंती राहील.

सभापती सन्माननीय अर्थमंत्री हे विदर्भातील असल्यामुळे विदर्भातील जनतेच्या त्यांच्याकडून फार मोठया अपेक्षा आहेत. माननीय मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार साहेबांकडे वित्त, नियोजन व वने या विभागांची जबाबदारी देण्यात आलेली असल्यामुळे नागपूरकरांच्या त्यांच्याकडून अपेक्षा वाढलेल्या आहेत.

सभापती महोदय, गोरेवाडा प्रकल्पाला जास्तीत जास्त निधी मिळण्याची आवश्यकता आहे. गोरेवाडा प्रकल्पाला 17 कोटी रुपये दिल्या गेल्याची बातमी आम्ही वर्तमानपत्रातून वाचली आहे. परंतु गोरेवाडा प्रकल्प 17 कोटी रुपयांमध्ये पूर्ण होऊ शकत नाही. गोरेवाडा प्रकल्पाची आंतरराष्ट्रीय प्रकल्प म्हणून ओळख होणार आहे. नागपूर हे झिरो माईल्सवर असल्यामुळे

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

नागपूरमध्ये देश-विदशातील पर्यटक मोठया संख्येने येणार आहेत. कर्मधर्म संयोगाने महाराष्ट्राला नागपूरचे मुख्यमंत्री लाभले असल्यामुळे नागपूरकरांच्या अपेक्षा पल्लवित झाल्या आहेत. या राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय अर्थमंत्री हे नागपुरचे असल्यामुळे नागपूरकरांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. या शासनाने गोरेवाडा प्रकल्पाला केवळ 17 कोटी रुपये देऊन जी नकारात्मक भूमिका तयार केली आहे तशी नकारार्थक भूमिका आपण तयार करु नका. गोरेवाडा प्रकल्पाला जवळपास 700 ते 800 कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. राज्य शासनाच्या भरोवशावर या प्रकल्पाचे काम पूर्ण होईल असे काही नाही. त्यामुळे या शासनाने गोरेवाडा प्रकल्पाच्या संदर्भात नेमके धोरण जाहीर करण्याची आवश्यकता असून हा प्रकल्प आपण किती कालावधीमध्ये पूर्ण करणार आहोत, कोणत्या वित्तीय संस्थेच्या माध्यमातून या प्रकल्पाला पैसा दिला जाणार आहे, या प्रकल्पाच्या संदर्भात बीओटी तत्वावर कोणती भूमिका राहणार आहे ? यासंदर्भातील माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. नागपूर शहरात हिवाळी अधिवेशन सुरु असल्यामुळे नागपूरकरांना गोरेवाडा, मिहान प्रकल्पाच्या संदर्भात सविस्तर माहिती मिळावी अशी नव्या सरकारकडून जनतेच्या अपेक्षा आहेत.

यानंतर श्री. भारवि......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

गोरेवाडा प्रकल्प किती कालावधी पूर्ण करणार आहात, त्यास सेक्टोरियल मदत कशी केली जाऊ शकते, आपण त्यांच्यावर फायनान्शिअल लोड कसा टाकू शकतो या सर्व बाबींची माहिती माननीय वित्त मंत्री महोदयांनी द्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभाग, बाब क्रमांक 98 ते 102 यामधील काही बाबींवर मी बोलणार आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि राज्यातील इतर भागातील शहरांचा वेगाने विकास होत आहे. या परिसरांमध्ये बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. आज टीडीआर विकणारी लॉबी मोठ्या स्वरुपात तयार झाली आहे. या टीडीआर विकणाऱ्या लॉबीवर शासन कोणत्या प्रकारे अंकुश ठेवणार आहे ? रेग्युलॅरीटी ऑथॉरिटी म्हणून आपण काही रेग्युलेशन तयार करणार आहात काय ? कोणत्या भागात टीडीआर कसा राहील, भौगोलिक परिस्थितीनुसार टीडीआर कसा राहील आणि तो कसा रेग्युलेट करायचा या संदर्भातील माहिती मिळणे आवश्यक आहे. कारण ज्या पद्धतीने टीडीआरचा घोटाळा व्हायला लागला आहे, त्यातून वेगळी प्रणाली सुरु झाली आहे. यातून काही मंडळी ब्लॅक मनीच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये जमा करायला लागले आहेत. तेव्हा या सर्व गोष्टींना आळा घालण्याचे काम सरकारपुढे आहे आणि हे सरकार एकप्रकारचे ध्येय आणि उद्देश घेऊन राज्यामध्ये आणि देशामध्ये सत्तेमध्ये आले आहे आणि ते अशाप्रकरणांकडे गांभीर्याने पाहील आणि या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांकडून आम्हाला माहिती मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, गुंठेवारी अधिनियम 2001 मध्ये दुरुस्त्या करुन काही मुदतवाढ करुन 25 ते 30 टक्के लोकांची गुंठेवारी राहील असा उल्लेख आहे. त्या संदर्भातील देखील खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभाग आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून जेएनएनयुआरएम सारखी योजना राबविली जात होती. आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, यापुढे महानगरपालिकांना जेएनएनयुआरएम सारख्या योजनेचा लाभ घेता येणार नाही. जर महानगरपालिकेसाठी जेएनएनयुआरएम योजना राबविणार नसाल तर राज्य सरकारच्या माध्यमातून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

महानगरपालिकांना अर्थसहाय्य पुरविण्यात येणार आहे काय ? केंद्र सरकारची काही योजना येणार आहे काय, महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य म्हणून जेएनएनयुआरएम योजनेस मुदतवाढ द्यावी म्हणून आपण केंद्र सरकारपुढे काही योजना मांडणार आहात काय, आपण नवीन योजने संदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनापुढे मांडणार आहात काय या सर्व प्रश्नांचा खुलासा होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याने जेएनएनयुआरएम संदर्भात अन्य राज्यांच्या तुलनेत एकचा क्रमांक ठेवलेला आहे. तेव्हा या संदर्भातील माहिती मिळणे आवश्यक आहे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, रस्त्याच्या कामांच्या संदर्भात बाब क्रमांक 113 ते 132 मध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. रस्त्यांच्या कामासाठी तसेच दुरुस्तीच्या कामासाठी अत्यंत कमी निधी दिलेला आहे. नागपूर ते गडचिरोली हा दुहेरी मार्ग आहे. नागपूर-उमरेड-भिवापूर-ब्रम्हपुरी-गडचिरोली असा हा मार्ग आहे. नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्याची कनेक्टीव्हीटी जलद गतीने झाली पाहिजे. कारण त्याशिवाय आपली इकॉनॉमी वाढणार नाही. आपणास त्या भागातील इकॉनॉमी वाढवावयाची असेल तर नागपूर- गडचिरोली हे अंतर दूर असले तरी आपणास ते वेगाने कमी करायचे आहे. मी सन 2012 च्या अर्थसंकल्पामध्ये नागपूर ते गडचिरोली हा मार्ग चौपदरी करण्यासंदर्भात उल्लेख केला होता. त्यासाठी निधी देखील उपलब्ध करुन दिला होता. त्याशिवाय नागपूरजवळ जे टोल होते ते बाय-बॅक करायचे होते. त्यासाठी एमएसआरडीसीला 34 कोटी रुपये दिले होते. नागपूर-गडचिरोली हा मार्ग किती कालावधीत पूर्ण करणार आहात या संदर्भातील उत्तर मंत्री महोदयांनी देणे आवश्यक आहे.या बाबीमध्ये रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्या संदर्भातील उल्लेख आहे. त्यामध्ये नागपूर-गडचिरोली या रस्त्याचा समावेश आहे काय, असल्यास त्यासाठी किती निधीची तरतूद केलेली आहे, नसेल तर काय नियोजन केलेले आहे या संदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रामंक 174 ते 178,सामाजिक न्याय विभागावर मी बोलणार आहे. आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी देखील मी या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. आज सकाळी माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशीप संबधी मोघम उत्तर

..3..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 19:20

श्री.राजेंद्र मुळक...

दिले. मी स्पष्ट सांगितले होते की, स्कॉलरशीपसाठी ठेवलेली रक्कम कमी आहे. आपणास मागील वर्षाचा बॅकलॉग पूर्ण करायचा आहे. हे शैक्षणिक वर्ष अर्ध्यावर आलेले आहे आणि अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांच्या हातामध्ये स्कॉलरशीपचे पैसे मिळालेले नाहीत. एस.सी आणि एस.टी.ची स्कॉलरशीप केंद्र सरकारकडून मिळते. ओबीसी विद्यार्थ्यांना 50 टक्के स्कॉलरशीप शासन देते आणि 50 टक्के रक्कम विद्यार्थ्यांना भरावी लागते. तेव्हा ओबीसीच्या स्कॉलरशीप संबंधात शासनाची काय भूमिका आहे हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. कारण आपण जी तरतूद केलेली आहे त्या रकमेतून संपूर्ण बॅकलॉग आणि या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचे पैसे देऊ शकू काय याचा खुलासा समाज कल्याण मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 205 ते 212 आरोग्य विभागाच्या बाबींवर मी बोलणार आहे. राज्य शासनाची नव संजीवनी योजना, कुटुंब कल्याण कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम, पल्स पोलिओ कार्यक्रम, जीवनदायी आरोग्य योजना अशा विविध योजना आहेत. या सर्व योजनांसाठी निधीची तरतूद उपलब्ध करुन देण्याचा उल्लेख केलेला आहे. आपण योजनानिहाय निधी उपलब्ध करुन देणार आहात काय या संदर्भातील माहिती मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी नियोजन मंत्री उपस्थित नाहीत. पण मी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात यावी अशी विनंती आहे. वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथे महात्मा गांधी यांचे काही काळ निवासस्थान होते. त्या निवासस्थानातून देशाच्या स्वातंत्र्याचा लढा लढला गेला होता. सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पामध्ये 550 कोटी रुपयांचा सेवाग्राम विकास आराखडा जाहीर करण्यात आला. त्यावेळी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्या संदर्भातील संपूर्ण पिक्चर तयार करण्याचे काम एका कंपनीला देण्यात आले. या कार्यक्रमामध्ये विनोबा भावे यांच्या आश्रमाशी जोडून आनंदाश्रमापर्यंत कसे जाऊ शकतो या संबंधी त्या आराखड्यामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. या सर्व कामासाठी पुरवणी मागण्यांमध्ये काही निधी उपलब्ध करुन देण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. हा निधी किती असेल याची माहिती मिळणे आवश्यक आहे. हा आराखडा पूर्ण करण्यासाठी किती कालमर्यादा ठेवली आहे या संदर्भातील माहिती मिळणे आवश्यक आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 19:20

श्री.राजेंद्र मुळक...

सभापती महोदय ,नागपूरमध्ये 200 कोटी रुपयांचा ताज-बाग विकास आराखडा जाहीर केला होता. या वर्षी 30 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते.या पुरवणी मागण्यांमध्ये काही निधी उपलब्ध करुन दिला आहे काय या संदर्भातील माहिती द्यावी अशी विनंती मी नियोजन मंत्री महोदयांना करतो.

सभापती महोदय, मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात केली असल्याने मी प्रत्येक विभागाची बाब क्रमांक सांगून विषय मांडले आहेत. मी भाषणाच्या सुरुवातीलाच राज्याची आर्थिक स्थिती कशी आहे, हे सरकार पुढे राज्य कसे चालविणार आहे, भविष्यात परिस्थिती कशी राहील, याचा उल्लेख केला. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2014-15 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मी शालेय शिक्षण विभागाच्या केवळ दोन मागण्यांवर माझे विचार व्यक्त करणार आहे. शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक-88, पृष्ठ क्रमांक-54 वर मी अगोदर बोलतो. महोदय, या पुरवणी मागणी अंतर्गत शिक्षकांच्या पगारासाठी तरतूद करण्यात आली आहे. या शिक्षकांच्या पगारासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली असली तरी, या राज्यातील अनेक शाळांचे मूल्यांकन झालेले आहे ही बाब सुध्दा लक्षात घेतली पाहिजे. कारण मूल्यांकन झालेल्या शाळांचे प्रस्ताव जिल्हा शिक्षणाधिकारी आणि विभागीय स्तरावर मंजूर होऊन संचालकांकडून शासनाला प्राप्त झाले आहेत. या शाळांची पडताळणी करुन राज्य सरकारने त्या शाळा अनुदानास पात्र ठरविल्या आहेत. या बाबतचा शासन निर्णय सुध्दा निर्गमित झाला आहे. वास्तविक पाहता पुरवणी मागण्यांमध्ये या संदर्भात उल्लेख होणे अपेक्षित होते. परंतु या शाळांसाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. या निमित्ताने मी मागणी करतो की, या विषयी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

महोदय, आता मी दुसऱ्या बाबीवर बोलतो. शासनाने सन 2008 ते 2011 या कालावधीतील उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयातील 926 पदांना 2014 मध्ये मान्यता दिली आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना गेल्या सहा वर्षांपासून वेतन मिळालेले नाही. ते विना वेतन काम करीत आहेत. वास्तविक पाहता या पदांना मान्यता दिल्यानंतर अपेक्षा अशी होती की, या पुरवणी मागण्यांमध्ये त्या शिक्षकांच्या वेतनासाठी तरतूद करण्यात येईल. परंतु अशा प्रकारची तरतूद झालेली नाही. याचाच अर्थ अजून काही कालावधीपर्यंत त्या शिक्षकांना विना वेतन काम करावे लागणार आहे.

महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या अनुषंगाने एवढेच सांगतो की, ज्या शाळा अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत त्यांना वेतन अनुदान देण्याबाबत आणि शासनाने जुन्या 926 शिक्षकांच्या पदांना मंजुरी दिल्यामुळे त्यांच्या गेल्या सहा वर्षातील वेतनाच्या संदर्भात कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती करतो व येथेच थांबतो.

--------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सन 2014-15 या वर्षाच्या गृह, नगर विकास, उच्च व तंत्रशिक्षण, कामगार आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सर्वप्रथम मी गृह विभागाच्या बाब क्रमांक-13 वर बोलतो. या मागणीद्वारे पोलीस विभागात 10,443 नवीन पदे निर्माण करण्यात येणार असून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. माझ्या ठाणे शहरात दररोज चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. दिवसाढवळ्या महिलांची मंगळसूत्रे आणि अन्य दागिने हिसकावून पलायन करण्याचे, ज्वेलर्सची दुकाने लुटण्याचे, ए.टी.एम. सेंटर फोडून त्यातील रोकड पळविण्याचे, त्याचप्रमाणे महिला आणि लहान मुलांवर सातत्याने अत्याचार करण्याचे प्रकार घडत असल्याने गुंडांनी एकप्रकारे दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. या सर्व घटनांमुळे ठाणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ठाणे शहर हे मुंबईच्या लगत आहे. मुंबईला जाण्या-येण्याच्या दृष्टीने ठाणे शहर सोयीचे असल्यामुळे आणि त्या भागात स्वस्त किंबहुना परवडणारी घरे उपलब्ध होत असल्यामुळे त्या भागात लोकसंख्या वाढत आहेत. ठाणे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता तेथे असलेल्या पोलिसांची संख्या अल्प आहे. मागच्या आठवड्यात एकाच कॉम्प्लेक्समधून सहा वाहनांची चोरी झाली. वर्तक नगर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे मुळात कर्मचारी कमी आहेत. पेट्रोलिंग करण्यासाठी सुध्दा पोलीस कर्मचारी उपलब्ध नाहीत, अशी तेथील परिस्थिती आहे. या निमित्ताने माझी मागणी आहे की, ठाणे शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुरेसे पोलीस उपलब्ध करुन द्यावेत.

महोदय, ठाणे शहरात महिला पोलीस पथक निर्माण करणे गरजेचे आहे. महिला पोलीस पथक निर्माण करीत असताना प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलिसांना योग्य त्या सोयी सुविधा मिळाल्या पाहिजेत. परंतु बऱ्याच पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलिसांसाठी पुरेशा सोयी सुविधा नाहीत. त्या उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तसेच त्या भागात पुरेसे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन ठाणे शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करुन तातडीने उपाययोजना कराव्यात. आवश्यकता पडल्यास नवीन पद

..3..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 19:30

ॲड.निरंजन डावखरे....

भरतीतील पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात नियुक्त करावे, अशी मी विनंती करतो.

महोदय, आता मी नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 98 वर बोलतो. या पुरवणी मागणीद्वारे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरी परिवहन प्रकल्पासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेची अत्यंत दुरवस्था झाली आहे. ठाणे महापालिकेची परिवहन सेवा म्हणजे 'ढकलगाडी' झाली आहे. या परिवहन सेवेच्या बसेस रस्त्यात मध्येच बंद पडतात. त्या बसेसची दुरुस्ती करण्यासाठी कुशल कामगार उपलब्ध नाहीत. जेएनएनयुआरएम च्या माध्यमातून ज्या नवीन बसेस मिळाल्या आहेत त्या बसेसची दुरुस्ती करण्यासाठी कुशल कामगारांची मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. या संदर्भात शासनाने पुढाकार घेऊन कंपन्यांच्या माध्यमातून ट्रेनिंग सेशन घेतले तर कार्यरत असलेल्या कामगारांना मार्गदर्शन मिळेल. शिवाय परिवहन सेवेतील कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी ट्रेनिंग इंजिनिअर्सची तातडीने भरती करण्याची गरज आहे. एका बाजूला ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेला दिवसाला 5 लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे आणि दुसऱ्या बाजूला कर्मचाऱ्यांचे परिवहन सेवेकडून विविध स्वरुपाची 100 कोटी रुपयांची थकीत येणी बाकी आहे. आज परिवहन सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची अशी परिस्थिती आहे की, त्यांना मागील महिन्याचे कर्ज चालू महिन्याच्या पगारातून द्यावे लागते. त्यामुळे पुढील महिन्यातील कर्जाच्या हप्त्याचा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहिलेला असतो. ठाणे परिवहन सेवेतील बहुतेक कामगारांवर कर्ज हे अजगरासारखा फणा काढून उभे आहे. त्यांच्या गृहिणीला तर दर महिन्याला प्रश्न पडतो. दिवाळीसारख्या सणामध्ये सुध्दा तिला प्रश्न पडतो की, संसाराचा गाढा कसा चालवावा. ठाणे महापालिकेची परिवहन सेवा मुंबई महापालिकेच्या बेस्ट प्रकल्पामध्ये वर्ग करावी काय असा प्रस्ताव नाईलाजास्तव ठाणे महापालिकेच्या प्रशासनासमोर विचारार्थ आहे. ठाणे महापालिकेची परिवहन सेवा दयनीय अवस्थेत असल्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेला आर्थिक सहाय्य करावे, अशी मी विनंती करतो. तसेच ठाणे महापालिकेची परिवहन सेवा सुस्थितीत येण्यासाठी ट्रेनिंग इंजिनिअर नेमून सध्याच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे आणि कुशल कर्मचाऱ्यांची भरती करावी, अशी मी विनंती करतो.

..4..

16-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) VV-4

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 19:30

ॲड.निरंजन डावखरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, आता मी नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक-99 वर बोलतो. नागपूर नागरी परिवहन म्हणजेच मेट्रो प्रकल्पासाठी 163 कोटी 97 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ठाणे शहरात मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी शासनाने अनेक वर्षापूर्वी सल्लागार समिती नेमून ती समिती सर्व्हे करीत आहे असे जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात या संदर्भात कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. या निमित्ताने माझी मागणी आहे की, या कामी निधीची तरतूद उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. नागपूर नागरी परिवहन प्रकल्पाच्या धर्तीवर ठाणे नागरी परिवहन प्रकल्पासाठी सुध्दा शासनाने आर्थिक तरतूद करुन ठाणे येथील मेट्रो प्रकल्पाला चालना द्यावी. कारण ठाणे ते मुंबई आणि मुंबई ते ठाणे या दरम्यान बरेच लोक रोजगारासाठी ये-जा करतात. लोक सकाळी कामासाठी गेल्यानंतर रात्री घरी येतात. या लोकांना चांगल्या दर्जाची मेट्रो सेवा उपलब्ध करुन द्यावी, अशी मी या मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

ठाणे मनपामार्फत छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय चालविले जात आहे. सदर रूग्णालयाच्या कामकाजाबाबतही नागरिकांच्या अनेक तक्रारी सातत्याने होत आल्या आहेत. हे मनपाचे रूग्णालय भिवंडीमधील स्व. इंदिरा गांधी स्मृती रूग्णालयाच्या धर्तीवर शासनाकडे वर्ग करावे की काय असा प्रस्तावही ठाणे मनपाने प्रशासनास विचारार्थ दिला आहे. शासनाने याबाबत चौकशी करून छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयाचा कारभार व कामकाज सुधारण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलावीत, अशी मी शासनास विनंती करीत आहे.

सभापती महोदय, ठाणे येथील मॉडेल मिलची जागा आहे. त्या जागेवर कॅन्सर रूग्णालय उभारण्याची फार गरज आहे. टाटा मेमोरियलची परिस्थिती आपणा सर्वांना ज्ञात आहे. बरेचसे माननीय मंत्री मुंबईतील विभागांचे प्रतिनिधित्व करतात. इतर भागातील सन्माननीय सदस्यांना आपल्या भागातील लोकांना कॅन्सर रूग्णालयात पाठवायचे असते, त्यावेळी तिकडे अनेक महिने अपॉईंटमेंट घेऊनही भेट मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. अशा वेळी मुंबई लगत असलेल्या ठाणे मनपाच्या क्षेत्रात कॅन्सर रूग्णालय निर्माण केले तर आपण निश्चितपणे एक चांगली सुविधा लोकांना उपलब्ध करून देऊ शकतो, कॅन्सर रूग्णांना न्याय देऊ शकतो, चांगला उपचार देऊ शकतो, असा विश्वास मला आहे.

सभापती महोदय, आता मी शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 18 वर बोलणार आहे. मुंबई, नागपूर व पुणे येथील न्याय सहायक प्रयोगशाळांमधील कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. परंतु, प्रयोगशाळा परिचारिकांची पदे ही अतिरिक्त ठरवून रद्द करण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे राज्यातील 15,500 प्रयोगशाळा परिचारिकांचे भविष्य अंधारमय झाले आहे. शासनाने याबाबत विचार करून प्रयोगशाळेतील परिचारिकांना न्याय द्यावा, अशी मी शासनास विनंती करीत आहे. प्रयोगशाळेच्या परिचारिकांची अनेक वर्षे सेवा झालेली आहे. शासन त्यांना असेच ओवाळून टाकणार असेल तर ते अन्यायकारक ठरेल. शासन या संदर्भात निश्चितपणे न्याय देईल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. मी आपल्या सर्वांच्या माध्यमातून शासनास या संदर्भात विनंती करीत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

सभापती महोदय, आता मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 234 वर बोलणार आहे. या मागणीद्वारे मुंबई विद्यापीठाचा विकास या अंतर्गत निधी देण्याबाबत आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. परंतु, मुंबई विद्यापीठाचे ठाणे येथील डोकाळीचे उप केंद्र दिनांक 1 ऑगस्ट, 2014 पासून विविध अभ्यासक्रमांसाठी सुरू झाले आहे. तेथे 8 फॅकल्टी सुरू केल्या असून त्यामध्ये 120 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. परंतु, सदरचे अभ्यासक्रम शिकविण्यासाठी कायमस्वरूपी तज्ज्ञ प्राध्यापकांची आजतागायत नियुक्ती झालेली नाही. व्हिजिटिंग फॅकल्टी प्रोफेसर यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कामचलाऊ शिक्षण देण्याचे काम सुरूआहे. ही बाब शैक्षणिक दृष्टीने निश्चितपणे उचित नाही. परिणामी, प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र प्रमाणात असंतोष निर्माण होत आहे. ठाणे येथील उप केंद्रात कायमस्वरुपी तज्ज्ञ प्राध्यापक नियुक्त करण्यात यावेत या संदर्भातील कार्यवाही शासनामार्फत व्हावी. ठाणे येथील उपकेंद्र विकसित करीत आहात त्याप्रमाणे कल्याण येथील उप केंद्र हेही योग्यपध्दतीने विकसित व्हावे, अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, आता मी जो विषय मांडणार आहे तो फार महत्त्वाचा आहे. मुंबई विद्यापीठ पुढील काळात प्रश्नपत्रिकेवर वॉटर मार्क देण्याचे नियोजन करीत आहे. मुंबई विद्यापीठाकडे वॉटर मार्क उपलब्ध नाही. सदर काम आऊटसोर्स करून एका एजन्सीला देण्यात येणार आहे. यामुळे प्रश्नपत्रिका लिक होणार नाही का, हा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे या संदर्भातील पुनर्विचार शासनाने करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आता मी उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 234 वर बोलणार आहे. मुंबई विद्यापीठांतर्गत डी.वाय.पाटील वास्तुशास्त्र महाविद्यालय, नवी मुंबई, वांद्रे येथील रहेजा रिझवी महाविद्यालय, पनवेल येथील पिल्लई डॉक्टर बळीराम हिरे महाविद्यालय, समयक संकल्पना विद्यालय, कमला रहेजा विद्यालय व अन्य महाविद्यालयांमधील मासाद्वारे आपल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन मुंबई विद्यापीठाने त्यांच्या परीक्षा देखील घेतलेल्या आहेत. परंतु, सन 2008 पासून सदर विद्यार्थ्यांच्या प्रवेशास नियंत्रण समितीने मान्यता दिलेली नाही. सन 2008-09 पासून विद्यार्थ्यांनी

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

प्रवेश घेतले असून दरवर्षी त्यांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करूनही त्यामध्ये विद्यार्थी उत्तीर्ण देखील झाले आहेत. परंतु, सन 2012 मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाने म्हणजे डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशनने सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश नियंत्रण समितीने मान्य केले नसल्यामुळे विद्यार्थ्यांची विद्यापीठ नोंदणी म्हणजे एन्रोलमेंट करू नये असे आदेश दिले असल्यामुळे त्यांची नोंदणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना मागयग्रेशन सर्टिफिकेट मिळू न शकल्यामुळे त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी इतर विद्यापीठांत प्रवेश घेण्यापासून वंचित रहावे लागत आहे. हा वाद डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन आणि मासामध्ये आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची हेळसांड होत आहे. विद्यार्थ्यांची नोंदणी झाली नव्हती तर मग त्यांना परीक्षेला बसण्यास पात्र कसे ठरविण्यात आले आणि त्यांच्या परीक्षांचे निकाल कसे काय जाहीर करण्यात आले, याचा मात्र बोध होत नाही. विद्यार्थ्यांची काहीही चूक नसताना त्यांना वेठीस धरण्यात येऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान करण्यात येत आहे. त्यामुळे शासन व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या पातळीवर समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. शासनाने या संदर्भात चौकशी करून संबंधित विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मी शासनास विनंती करतो.

सभापती महोदय, आता मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 246 वर बोलणार आहे. सदर पुरवणी मागणीद्वारे अशासकीय तंत्रनिकेतनचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे वेतन अदा करण्याबाबत आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. परंतु, शासनाच्या सेवाविषयक नियमानुसार सलग 12 वर्षे कायम सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात येते. त्यामुळे सदर बाब शासनाच्या धोरणाचाच एक भाग असल्याने शासन अखत्यारीत सर्व विभागांना लागू असणे क्रमप्राप्त ठरते. तथापि, तंत्र व उच्च शिक्षण विभागाने त्यांचे अखत्यारितील अशासकीय तंत्र विद्यालयांतील निदेशकांना विना अनुदानित कालावधीमधील सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य न धरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नेरूळ, नवी मुंबई येथील तेरणा विद्यालयातील निदेशक पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांवर झालेला हा फार मोठा अन्याय आहे. वास्तविक पाहता, शालेय शिक्षण विभागाने आपल्या अखत्यारीत शाळा, महाविद्यालयांतील शिक्षक व



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती दिनांकांपासून 12 वर्षे सेवा ग्राह्य धरून त्यानुसार त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येणे तथापि, त्याच प्रकरणी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मात्र या प्रकरणी नकारात्मक भूमिका घेतली आहे. हे न्यायाचे वाटत नाही. तेव्हा शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर तंत्रशिक्षण विभागांतर्गत अनुदानित शाळा, महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी देखील असाच निर्णय तातडीने घेण्यात यावा, अशी मी शासनास विनंती करीत आहे.

सभापती महोदय, आता मी कामगार विभागाच्या बाब क्रमांक 158 वर बोलणार आहे. ठाणे येथील कोलशेत येथे बॉम्बे वायर रोप्स कंपनी सन 1982 ते सन 1995 या कालावधीत चालू होती. तथापि, 1995 मध्ये सदर कंपनी बंद करण्यात येऊन एका खाजगी विकासकास विकली गेली. कंपनीची विक्री करण्यापूर्वी कंपनीच्या मालकाने, व्यवस्थापनाने त्या कंपनीत काम करीत असलेल्या कामगारांची कायदेशीर असलेली आर्थिक देणी दिल्याशिवाय कंपनीची विक्री करू नये, असा शासनाचा स्पष्ट आदेश असूनही आणि हा आदेश कंपनी मालकावर बंधनकारक असूनही बॉम्बे वायर रोप्स कंपनीच्या मालकाने कामगारांची आर्थिक देणी न देता, त्यांना वाऱ्यावर सोडून कंपनीची विक्री केली आहे. हे शासनाच्या आदेशाचे उल्लंघन तर आहेच. परंतु, संबंधित कामगारांवर त्यांनी फार मोठा अन्याय केला आहे. शासनाने याबाबतीत तातडीने चौकशी करून शासन आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाविरूध्द कारवाई करावीच. एवढेच नव्हे तर सर्वप्रथम कंपनीच्या सर्व कामगारांची थकीत देणी देण्याबाबत कंपनी व्यवस्थापनास भाग पाडावे, अशी मी शासनास नम्र विनंती करीत आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे........

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 207 या मागणीव्दारे राज्यातील मनोरुग्णालयाच्या पुरवठा व सामुग्रीच्या खर्चासाठी आर्थिक तरतूद केली आहे. राज्यात मनोरुग्णांची संख्या वाढत जाऊन ती आता 29491 एवढी झाली आहे. वाढती स्पर्धा, बेरोजगारी, विविध व्यसने, कौटुंबिक कलह, प्रेमभंग, या कारणांमुळे या आजाराचे रुग्ण वाढत आहेत. हे जरी खरे असले तरी या आजाराची उपचार पध्दती दीर्घकालीन असल्यामुळे अनेकदा उपचारामध्ये सातत्य रहात नाही. मनोरुग्णांचा आजार गंभीर बनत असून मनोरुग्णांची संख्या देखील वाढत आहे. रस्त्यावर भटकणाऱ्या अशा मनोरुग्णांची संख्या शहरी भागाप्रमाणे आता ग्रामीण भागातही वाढत आहे. शासन मनोरुग्ण रुग्णालयांवर लाखो, करोडो रुपये खर्च करीत आहे. हे लक्षात घेऊन शासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मी शासनास विनंती करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 208 या मागणीव्दारे कुष्ठरोग्यांच्या वर्णोपचाराच्या वाढीव मानधनासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. तथापि, राज्यात कुष्ठरोग्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यांमध्ये कुष्ठरोगावर नियंत्रण आणण्यासाठी शासना मार्फत विविध योजनांमध्ये लाखो रुपये खर्च होत आहेत. त्या तुलनेत कुष्ठरोगावर फारसे नियंत्रण न येता कुष्ठरोग्यांच्या संख्येत वाढ होत आहे. याबाबत चौकशी करुन कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मी शासनास विनंती करीत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात सन्माननीय सदस्यांना छापील भाषण करता येत नाही. वाचून भाषण करता येत नाही.

**सभापती** : भाषण वाचून दाखविणे योग्य नाही. तथापि, सन्माननीय सदस्य नवखे आहेत. त्यांना मी जरुर सूचना देईन.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मी रेफरन्ससाठी पॉईंट घेतले आहेत.

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे.........

सभापती महोदय, भिवंडीत महानगरपालिकेचे स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय आहे. त्यामधील जवळपास 43 कर्मचाऱ्यांना राज्य शासन सेवेत घेणार आहे, असे हमी पत्र राज्य शासनाने दिले होते. राज्य शासनाने त्यांचा पगार द्यावा, अशी सूचना भिवंडी महानगरपालिकेने राज्य शासनाला केली होती. अनेक वर्षापासून भिवंडी महानगरपालिका त्या कर्मचाऱ्यांचे पगार देत आहे. आजपर्यंत त्या 43 कर्मचाऱ्यांना आपल्या सेवेत घेण्यास कोणताही पुढाकार शासनाने दाखविलेला नाही. राज्य शासनास मी विनंती करतो की, लवकरात लवकर या संदर्भात कार्यवाही करावी. मागील आरोग्य मंत्री महोदयांनी अनेक बैठका घेतल्या होत्या. त्यामुळे लवकरात लवकर या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने आपल्या सेवेत घ्यावे, अशा प्रकारची विनंती करतो आणि थांबतो.

--------------

...3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 15 अन्वये वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये बळी पडलेल्या व्यक्तींना नुकसान भरपाई व पुनर्वसनासाठी आर्थिक तरतूद केली आहे. मला या संदर्भात अशी सूचना करावयाची आहे की, नुकसान भरपाई व पुनर्वसनाचे निकष आणि नियम याबाबत पुन्हा एकदा पुनर्विलोकन करणे अत्यावश्यक आहे. कारण, अनेक वेळा विविध पीडित लोकांना मदत करण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनच्या अखत्यारीत महिला दक्षता समिती असते. गुन्ह्यांमध्ये बळी पडलेल्या व्यक्तींना नुकसान भरपाई मिळावी आणि त्यांचे पुनर्वसन व्हावे, याबाबतचा विचार आपण करीत आहोत. परंतु, अनेक वेळा साक्षीदारावर दबाव आणणे किंवा साक्षीदार होस्टाइल होईल, या पध्दतीने त्याला त्रास देणे, असे प्रकार घडतात. यामुळे पीडित लोकांना न्याय मिळण्यात अडचणी निर्माण होतात. त्यासाठी सुध्दा आर्थिक तदतूद केली पाहिजे, या बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभाग बाब क्रमांक 42 या अन्वये वनांचे संवर्धन, विकास आणि पुनर्निर्मिती याबाबत अतिशय चांगल्या प्रकारची आर्थिक तरतूद केलेली आहे. त्याचे मी स्वागत करते. परंतु, वनहक्क कायद्यानुसार अनेक ठिकाणी अंमलबजावणी होत नाही. आदिवासींनी सामुदायिक स्वरुपाचे वनहक्क दावे केलेले आहेत. त्यांना माहिती देण्याच्या संदर्भात अडचणी आल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये वनहक्काचे दावे प्रलंबित राहिले आहेत. म्हणून माझी सूचना-वजा-विनंती आहे की, वनहक्क संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आपण काही आर्थिक तरतूद करावी आणि कायदा साक्षरता तयार करण्यासाठी पावले उचलावीत.

सभापती महोदय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 147, बाब क्रमांक 185 अन्वये व्यसनाधीन व्यक्तींचे पुनर्वसन आणि अंमली पदार्थांचे सेवन या विरोधी मोहिमेचा उल्लेख केलेला आहे. नुकताच माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी जनतेशी संवाद साधला आणि त्यामध्ये त्यांनी एम.डी. आणि वेगवेगळ्या पध्दतीचे जे नवीन अंमली पदार्थ आहेत, ज्यामुळे कुटुंबांचे नुकसान होते, त्या संदर्भात उल्लेख केलेला आहे आणि आवाहन केलेले आहे.

...4.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...........

अंमली पदार्थ सेवन विरोधी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांसाठी आपण 4 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. ही महत्त्वाची आहे आणि हे चांगले काम आहे. अंमली पदार्थाबाबत जागृती करीत असतानाच एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, चंद्रपूर येथील श्रमिक येल्गार संस्थेच्या महिलांनी संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दारूबंदी व्हावी म्हणून आंदोलन केले. मध्यंतरी त्यांनी मुंडण देखील केले होते. सन्माननीय अर्थमंत्री श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी त्यांना आश्वासन दिले आहे की, चंद्रपूरमध्ये आम्ही दारूबंदी करू त्या महिलांनी 800 गावांमध्ये ठराव केले होते आणि आपल्याकडेही ते निवेदन घेऊन आले होते. अशा संस्थांचा समावेश करून त्यांच्या मागणीला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून या बाबीमध्ये विचार व्हावा, असे माझे आपल्याला मन:पूर्वक आवाहन आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 186 च्या माध्यमातून मला सन्माननीय राज्यमंत्री व कॅबिनेट मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी 1 कोटी रूपयांची तरतूद आपण केलेली आहे. नुकताच वर्धा येथे नरबळीचा प्रकार झाला. तेथे गेल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, नरबळी कसा घडवायचा याचे मार्गदर्शन मांत्रिकांना करणाऱ्या काही व्यक्ती यवतमाळ व चंद्रपूर भागामध्ये फिरत आहेत. म्हणून माझी अशी खास विनंती आहे की, अंधश्रध्दा निर्मूलन समितीबरोबरच ज्या कम्युनिटी ऑर्गनायझेशन किंवा स्वयंसेवी संस्था आहेत व ज्या भागात नरबळीच्या घटना घडलेल्या आहेत, अशा भागामध्ये फोकस करून काम केले तर नुसती जागृतीसाठी जागृती न राहता या लोकांचे धागेदोरे सापडण्याच्या दृष्टीकोनातून काही संस्थाना तयार करता येईल. सामाजिक न्याय विभागाने अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कामासाठी एक वेगळा कक्ष तयार करावा. जेणेकरून या स्पेसिफिक भागातील घटनांमध्ये आपल्याला हस्तक्षेप करता येऊ शकेल.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 152 अन्वये आपण 9 ग्राम न्यायालयांची स्थापना केलेली आहे. राज्य सरकारचा हा कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा आणि स्वागतार्ह आहे. गडचिरोलीमधील कोर्ची, गोंदियामधील गोरेगांव, रायगडमधील तळा, लातूरमधील जळकोट, अशा काही गावांमध्ये आपण ग्राम न्यायालयांची स्थापना केलेली आहे.

...5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...........

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये खाजणी गावामध्ये वाळीत टाकण्याचा प्रकार झाला आणि त्यामधून मोहिनी तळेकर या महिलेने आत्महत्या केली. ज्या ठिकाणी वाळीत टाकण्याचे प्रकार वारंवार होत आहेत, त्या जिल्ह्यांमध्ये विशेषत: रायगड सारख्या जिल्ह्यात ग्राम न्यायालय स्थापन करुन काही उपयोग होतो का, समाजातील कायद्याच्या अंमलबजावणीसाठी किंवा प्रबोधनासाठी, त्या गावपातळीवरील केसेसचे निराकरण करण्यासाठी उपयोग होतो का, याबाबतचा विचार सरकारने करावा, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 256, पृष्ठ क्रमांक 218 अन्वये आपण मनोधैर्य योजनेसाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अतिशय महत्त्वाची आणि चांगली तरतूद आहे. या योजनेतून आपण पीडित महिलेला 1 लक्ष रुपयांचा निधी देत असतो व तो निधी बँकेत जमा करीत असतो. जेणेकरुन ते पैसे खर्च होऊ नयेत. त्यामधील 25 हजार रुपये गुन्हा घडल्याची नोंद झाल्यानंतर पहिल्या पंधरा दिवसात मिळाले पाहिजेत. हॉस्पिटलला जाणे-येणे किंवा गरीब समाज असेल तर मजुरी बंद होणे, ताबडतोबीच्या उपचारासाठी रुग्णालयात न्यावे लागणे, यासाठी त्यांना उसने पैसे घेण्याची वेळ येते. त्यानंतर 5 हजार रुपये पहिल्या महिन्यामध्ये आणि कोर्टात केस उभी राहिल्यानंतर 15 हजार रुपये रोख स्वरुपात दिले गेले पाहिजेत. कोर्टामध्ये ये-जा करण्यासाठी त्यांच्याकडे काहीही सोय नसते. बँकेत ठेवलेल्या पैशाच्या व्याजातून ते कसा तरी उदरनिर्वाह करीत असतात. त्यामुळे 25 हजार रुपये त्या त्या स्टेजनुसार रोख स्वरुपात द्यावेत, अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री.मा.शिगम.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 20:00

डॉ. नीलम गोऱ्हे...

उर्वरित 75 हजार रुपये बँकेमध्ये ठेवले तर ते त्या मुलीच्या शिक्षणासाठी किंवा उदरनिर्वाह करण्यासाठी उपयोगी पडतील, नाही तर त्या पैशाचा उपयोग ती केस हरे पर्यंत होईल. असे होणार नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या बाब क्रमांक 254, पृष्ठ क्रमांक 217वर स्वागत केंद्रे, राज्य गृहे व सरंक्षण गृहे यासाठी तरतूद केलेली आहे. या स्वागत केंद्रामध्ये हरवलेल्या किंवा फसवल्या गेलेल्या मुलींच्या राहाण्याची व्यवस्था करण्यात येते. हा निधी केव्हा पासून प्रलंबित आहे ? मुंडवा, पुणे मुंबई येथील काही मुली कुंपणावरुन उडी मारुन पळून गेल्याचे आपणास माहीत आहे. त्या मुलींचे समुपदेशन करण्यासाठी, त्यांना मानसिक धैर्य देण्यासाठी या निधीचा वापर केला जाईल असा विश्वास वाटतो. शासनाने याबाबतीत पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते आणि माझे भाषण संपविते.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2014-2015 च्या पूरक विवरणपत्राच्या संदर्भात बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 13 वरील बाब क्रमांक 13मध्ये पोलीस दलामध्ये 10443 पदे निर्माण करण्यासाठी निधी मागितलेला आहे. पोलीस दलामध्ये या योगे विविध पदे निर्माण केली जाणार आहेत. त्यामुळे पोलीस दलाची क्षमता निश्चितच वाढेल. अलीकडे राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला असून त्याकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे. या पदांचा फायदा गृह विभागाला राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी होईल असा मला विश्वास आहे.

गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 15 वरील बाब क्रमांक 16मध्ये जिल्हा पोलीस बलासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद देखील योग्य आहे. बाब क्रमांक 17मध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपले कर्तव्य बजावत असताना जे पोलीस जखमी होतात किंवा शहीद होतात अशा पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्यासाठी केलेल्या तरतुदीचे मी स्वागत करतो. पृष्ठ क्रमांक 16 वरील बाब क्रमांक 19मध्ये होमगार्डस्ना कर्तव्य भत्याचे प्रदान करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. होमगार्डस् हा अत्यंत उपेक्षित असा वर्ग आहे. हे होमगार्डस् संकटाच्या वेळी पोलीस खात्याला मदत करीत असतात. त्यांचा योग्य गौरव व्हायला मग तो आर्थिक स्वरुपाचा असेल किंवा सवलतीच्या स्वरुपामध्ये असेल, तो व्हायला पाहिजे.होमगार्डस्ना कर्तव्य भत्ता प्रदान करण्यासाठी पुरेशी तरतूद असणे गरजेचे आहे. त्यांची कर्तव्य क्षमता वाढेल अशा त-हेने ही तरतूद केली पाहिजे.

महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 38 वरील बाब क्रमांक 43मध्ये खेड्यांचा पर्यावरणीय विकास व आदिवासी विकास यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये या परिसरातील गावांचे पुनर्वसन करण्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे, त्याचे मी स्वागत करतो. आदिवासी जंगलामध्ये राहतात,. त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन होईल याची दक्षता आपण घ्याल असा मला विश्वास आहे.

..3..



प्रा. जोगेंद्र कवाडे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 33 वरील बाब क्रमांक 37मध्ये दंगलीमध्ये बळी गेलेल्या व्यक्तींना वित्तीय सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. दंगलीमध्ये बळी गेलेल्यांच्या परिवाराला आर्थिक मदत करुन त्याचे पुनर्वसन करावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे. बाब क्रमांक 38मध्ये गडचिरोली जिल्हयातील नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्यांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी तरतूद केलेली आहे. गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या 57 बाधित व्यक्तींच्या वारसदारांना केंद्र सरकारच्या योजनेनुसार प्रत्येकी रुपये 3 लाख इतकी नुकसान भरपाई देण्याचे ठरवण्यात आले आहे. राज्य शासनाचा हिस्सा देखील तितकाच राहणार आहे. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांच्या परिवाराला देखील आर्थिक मदत करुन त्यांच्या परिवाराचे पुनर्वसन करायला पाहिजे.

आपण एसआरपीला सर्व प्रकारच्या सवलती देतो. परंतु सिव्हिलियन स्टाफला मात्र कोणत्याही सवलती दिल्या जात नाहीत. या सिव्हिलियन स्टाफला देखील एसआरपी प्रमाणे सर्व सवलती द्याव्यात अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रामंक 35 वरील बाब क्रमांक 40मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाची भरपाई देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मराठवाडा आणि विदर्भावर नैसर्गिक आपत्ती कोसळलेली आहे त्यामुळे शेती उत्पादनावर विपरीत परिणाम झालेला आहे. या परिस्थितीची दखल सरकार घेईल असा मला विश्वास वाटतो.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 53 वरील बाब क्रमांक 73मध्ये नारळावरील इरि ओफाईड माईट रोगाच्या नियंत्रणासाठी तरतूद करण्यात आली आहे. माझे अनेक सहकारी सदस्य हे कोकणातील आहेत. नारळावर इरि ओफाईड माईट हा रोग पडतो. त्यामुळे नारळाचे फार मोठे नुकसान होते. ते होऊ नये म्हणून केंद्रीय नारळ विकास मंडळ पुरस्कृत कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो. बाब क्रमांक 74मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि यराष्ट्रीय कृषी विकास योजनोंतर्गत बांधलेल्या शेततळयांच्या अस्तरीकरणासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद उचित आहे. पृष्ठ क्रमांक 56 वरील बाब क्रमांक 83 अंतर्गत तारापोरवाला मत्स्यालयाचे

..4..



आधुनिकीकरण व नूतनीकरणासाठी तरतूद केलेली आहे. तारापोरवाला मत्स्यालय हे देशी आणि

विदेशी पर्यटकांचे आकर्षण आहे. या मत्स्यालयाच्या नूतनीकरणासाठी केलेली तरतूद स्वागतार्ह आहे.

महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 38 वरील बाब क्रमांक 44मध्ये चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथे बांबू प्रशिक्षण व संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. बांबूपासून अनेक प्रकारच्या कलाकृती, घरगुती वापराच्या वस्तू निर्माण केल्या जातात. या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पृष्ठ क्रमांक 41 वरील बाब क्रमांक 53मध्ये गोरेवाडा नागपूर येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाच्या प्राथमिक कामासाठी तरतूद केलेली आहे. नागपूर हे झिरोमाईल नगर आहे. येथे दीक्षा भूमी आणि संघ भूमी आहे. या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणी संग्रहालय व्हावे अशा प्रकारची जी योजना आहे ती लवकरात लवकर व्हावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

...नंतर श्री. भोगले...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

त्यासाठी 17 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च होणार असेल तर त्याची तरतूद करावी. आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्कृष्ट प्राणी संग्रहालय व्हावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 122, बाब क्रमांक 149. विधी व न्याय विभाग. उच्च न्यायालयातील जे निवृत्त न्यायमूर्ती आहेत त्यांच्या भत्त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. न्यायदानाचे पवित्र काम करणाऱ्या न्यायमूर्तींची निवृत्तीनंतर आर्थिक अडचण होऊ नये, त्यांचा मान सन्मान राखला जावा यासाठी तरतूद केली आहे. आवश्यकता असेल तर तरतूद वाढविण्यात यावी, परंतु कमी करु नये अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग, पृष्ठ क्रमांक 144, बाब क्रमांक 174. अनुसूचित जातीची मुले व मुली यांच्यासाठी नवीन वसतिगृहे निर्माण करण्यासाठी आणि परिरक्षण करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात केलेली तरतूद अपुरी असल्यामुळे प्रयोजनासाठी नियतव्यय उपलब्ध करुन दिला त्याचे मी स्वागत करतो. अनुसूचित जातीच्या मुलांसाठी व मुलींसाठी 100 वसतिगृहे निर्माण करण्याचे मागील शासनाचे धोरण होते. त्यानुसार अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जी वसतिगृहे निर्माण केली जाणार आहेत ती उत्कृष्ट असली पाहिजेत, त्या ठिकाणी सर्व सोयी सुविधा असल्या पाहिजेत, कोणत्याही प्रकारे त्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 145, बाब क्रमांक 177, 179 व 180. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची मॅट्रिक व मॅट्रिकोत्तर फ्री शीप व शिष्यवृत्ती यासाठी तरतूद केली आहे. अनुसूचित जाती, आदिवासी, ओबीसी प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फ्री शीप व शिष्यवृत्ती वेळेवर मिळाली पाहिजे या दृष्टीने शासनाने दक्षता घ्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 147, बाब क्रमांक 185. सामाजिक न्याय विभाग. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थाच्या व्यसनाचे प्रमाण वाढत चालले आहे. व्यसनाधीन व्यक्तींची अंमली पदार्थ सेवनापासून मुक्तता करण्यासाठी मोहीम राबविण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी, त्यांच्यावर उपचार करण्यासाठी अधिकाधिक तरतूद करण्यात यावी. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी चंद्रपूर जिल्हयातील दारुबंदीबाबत उल्लेख केला ते ऐकून मला बरे वाटले.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली जिल्हयामध्येच दारुबंदी करुन चालणार नाही. महाराष्ट्राच्या उर्वरित जिल्हयांमध्ये देखील दारुबंदी करणे गरजेचे आहे. एका बाजूला व्यसनमुक्ती कार्यक्रम, दारुबंदी प्रचार कार्यक्रम राबविला जातो. दुसऱ्या बाजूला दारु दुकानासाठी परवाने दिले जातात, देशी दारु विक्रीचे परवाने दिले जातात, चिल्लर दारु विक्रीचे परवाने दिले जातात. पूर्वी लोक सकाळी उठल्यानंतर चहा प्यायचे. आता सकाळी उठल्यानंतर लोक दारु पिण्यासाठी दारु विक्रीच्या दुकानावर धाव घेतात. या संदर्भात धोरणात्मक चर्चा झाली पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रात दारुबंदी लागू करुन महाराष्ट्रातील जनतेला दारुचा थेंब देखील मिळणार नाही अशी व्यवस्था झाली पाहिजे. शासनाने केलेला प्रयत्न उचित आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 147, बाब क्रमांक 186. वर्धा शहरामध्ये नरबळीचा प्रकार घडला आहे. तेथून 50 ते 60 कि.मी.अंतरावर पवनार आश्रम आहे. नरबळी, अमानुष, अनिष्ट प्रथेला कायद्याने प्रतिबंध घालून चालणार नाही. त्याबाबत प्रचार झाला पाहिजे. मीडिया, प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व वेगवेगळया माध्यमांच्या सहाय्याने या प्रथांचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 192, बाब क्रमांक 214. आदिवासी विकास विभाग. जनजाती क्षेत्रात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध आरोग्याच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. 2014-2015 या वित्तीय वर्षापासून राज्यामध्ये ही योजना राबविली जात आहे. आदिवासी भागामध्ये राहणारा आदिवासी समाज, उपेक्षित वंचित समाजाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तरतूद केली आहे त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 214, बाब क्रमांक 253. उच्च व तंत्रशिक्षण विभाग. शिक्षकांना पुरस्कार वितरण करावयाच्या सोहळ्याचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. शिक्षकांना जो पुरस्कार दिला जातो त्यातून सरकारचे दारिद्र्य दिसता कामा नये. राज्यावर अधिक कर्ज झाले तरी चालेल, परंतु शिक्षकांना जो पुरस्कार दिला जातो त्यातून त्यांचा सन्मान झ ाला पाहिजे. 10 हजार रुपयांवरुन 25 हजार रुपये इतकी वाढ केली त्याबद्दल मी शिक्षकांच्या वतीने सरकारचे अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, राज्य सरकारने 2007 पासून राज्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती निर्माण केली. महात्मा फुले चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती निर्माण केली. छत्रपती राजर्षि शाहू महाराज ग्रंथ प्रकाशन समिती स्थापन केली. अशा प्रकारच्या तीन वेगवेगळ्या समित्या स्थापन करुनही त्यांचा कारभार योग्य पध्दतीने चालत नाही, त्याकरिता अर्थमंत्र्यांनी तरतूद करुन या थोर पुरुषांचा सन्मान राखावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 227, बाब क्रमांक 264, पर्यटन विभाग. साहित्य, कला इत्यादी क्षेत्रामध्ये ज्या मान्यवर व्यक्ती आहेत, कलावंत आहेत त्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी या योजनेंतर्गत तरतूद केली आहे. नवीन निवडलेल्या 5 कलावंतांना मानधन देण्यासाठी ही तरतूद केली आहे त्याचे मी स्वागत करतो. ग्रामीण भागात जे कलावंत आहेत ते सातत्याने उपेक्षित असतात. त्यांच्याकडे कोणाचे लक्ष नसते. ग्रामीण भागातील लोक कलावंतांचा सन्मान झाला पाहिजे. त्यांना दरमहा आर्थिक मानधन कसे देता येईल, ते मानधन 200 रुपये इतके अल्प न देता किमान 2000 रुपये मिळेल यासाठी तरतूद केली तर त्यांना सन्मान होईल आणि तो चेष्टेचा विषय ठरणार नाही. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देतो आणि मी ज्या सूचना केल्या आहेत त्याची शासनाने दखल घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त करुन थांबतो.

------

नंतर 3ए.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बाब क्र. 7, पृ. क्र. 6 च्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, ज्यावेळी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यावेळेस विदर्भातील जनतेला आश्वासन देण्यात आले होते की, विदर्भातील नागपूर येथे सहा महिने सरकार येईल. या पुरवणी मागणीच्या निमित्ताने माझ ी अशी मागणी आहे की, नागपूरला मंत्रालय, विधानभवन आणि स्टाफ सुध्दा कार्यरत असून दर महिन्याला किमान राज्यमंत्र्यांनी आलटून पालटून येथे येऊन मिनी मंत्रालय स्थापन करावे व लोकांची दैनंदिन कामे करावीत. जेणेकरुन विदर्भातील जनतेला मुंबईला चकरा माराव्या लागणार नाहीत तसेच विदर्भ वेगळा करण्याचीही गरज पडणार नाही. याच बाबीच्या अनुषंगाने मी अशीही मागणी करतो की, मुंबई येथील मंत्रालयाच्या दुरुस्तीसाठी सुरुवातीला जे अंदाजपत्रक मंजूर केले होते त्यातील अटी व शर्ती कोणत्या, कंत्राटदाराकडून किती अनामत रक्कम घेतलेली आहे, आजपर्यंत किती खर्च या कामावर झालेला आहे आणि पुढील किती दिवसात ते काम पूर्ण होणार आहे, वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदाराला किती रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे, याचा खुलासा झाला पाहिजे. मंत्रालयाच्या दुरुस्तीचे काम सुरु झाल्यापासून मी मंत्रालयात तीन वेळा गेलो असता मला कोठेच जाता आले नाही. मी अद्याप माननीय मुख्यमंत्र्यांचे कार्यालय सुध्दा बघितलेले नाही. याचे कारण असे की, या मंत्रालयात जाण्यासही मला भीती वाटते. कारण मध्येच लिफ्ट बंद पडण्याची भीती असते. हे सर्व प्रकार थांबले पाहिजे व मंत्रालयाचा कारभार सुटसुटीत कसा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

यानंतर बाब क्र. 16 आणि पान क्र. 15, गृह विभागाच्या या मागणीच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राज्यात वाळीत टाकण्याचे प्रकार वाढत चालले असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्या अनुषंगाने मी त्यामागची पार्श्वभूमी थोडक्यात सांगू इच्छितो. ग्रामीण भागात विशेषत: आमच्या कोकणात एक वेगळीच गोष्ट असते. आमच्या कोळी वाड्यांमधील मच्छिमारांची होडी समुद्रात बंद पडली तर ती किनाऱ्यावर खेचून आणण्यासाठी किमान 50 ते 100 माणसे गोळा करावी लागतात. ही होडी जर एखाद्या गरीब मच्छिमाराची असेल तर तो एवढे लोक जमा करु शकत नाही आणि त्याला ते परवडणारेही नसते म्हणून असे

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ..........

काम गावकीच्या माध्यमातून करण्यात येते. जो अशा कामासाठी पुढे येणार नाही त्याची चूक झाली असे समजून त्याला काही तरी द्यावे लागते असे बंधन त्याच्यावर असते, यात प्रत्यक्ष आर्थिक हितसंबंध आहेत ही गोष्ट खरी आहे पण बंधन म्हणून त्याला मदतीसाठी यावेच लागते. आमच्या जमिनी समुद्र किनाऱ्याजवळ असल्याने समुद्रकिनारी असलेला बांध फुटला तर गावकीलाच हाक मारत असतो आणि प्रत्येक घरातील माणसाला तेथे यावेच लागते आणि जो मदतीला येणार नाही त्यावर गावकी कारवाई करते, ही एक प्रकारची व्यवस्था असते. गावकीच्या नियमांच्या बाहेर जाऊन कोणी काम करीत असेल तर प्रॅक्टीकली हे काम कसे करावयाचे हा प्रश्न आहे.

दुसरा याच बाबीच्या अनुषंगाने माझा मुद्दा असा आहे की, तंटा मुक्ती समित्या शासनाने गावोगावी नेमलेल्या आहेत पण त्यासाठी आमच्याकडे कोणीच येण्याची इच्छा व्यक्त करीत नाहीत. त्यामुळे वाद होऊन निर्णय घेतला तर एखाद्याला वाळीत टाकले म्हणून केसेस दाखल केल्या जातात यासंबंधी दोन्ही सभागृहातील सदस्यांनी एकत्र बसून, सखोल चर्चा केली पाहिजे. यातील कायदेशीर बाबींचा विचार करुन निर्णय घेण्याची गरज आहे. कालच मी माझ्या तालुक्यात नवगांव नावाचे कोळी समाजाचे गांव आहे तेथे गेलो होतो. तेथे एका कोळी समाजातील तरुणाने मच्छी सुकविण्याची जागा घेऊन त्यावर अतिक्रमण केले होते. त्याबाबत लोकांनी त्याच्याविरुध्द पोलीस केस दाखल केली, पण त्या तरुणाने मला वाळीत टाकले म्हणून उलट त्या लोकांविरुध्द केस दाखल केली व त्या अनुषंगाने पोलिसांनी गावकऱ्यांना अटक केली यावर कुठेतरी बंधन घालणे आवश्यक आहे. अशा घटना मिडियामध्ये आल्यानंतर पोलीस यंत्रणेवर दबाव येतो म्हणून हे प्रकार थांबले पाहिजेत. वास्तविक पोलीस यंत्रणेने अशा घटनांमधील सत्यता पडताळून तसा तपास केला पाहिजे व त्याकडे गृह विभागाने लक्ष दिले पाहिजे.

महोदय, आज रायगड जिल्ह्यातील जमिनीला सोन्यापेक्षाही जास्त भाव आहे. समुद्र किनारी असलेल्या जमिनीचा भाव तर एकरी 20 कोटीपर्यंत आहे आणि इतर ठिकाणच्या शेत जमिनीचा भाव अडीच ते तीन कोटीपर्यंत आहे. आता पोलीस सुध्दा एजंटचे काम करीत असून पोलीस स्टेशनमध्ये 7/12 चे उतारे घेऊन बसलेले असतात. वास्तविक पोलिसांना 7/12 चे उतारे पाहण्याचे अधिकार नाहीत. महसूल यंत्रणेकडून अशा प्रकारे वादाची नोंदणी केल्या शिवाय

........3

अशुध्दप्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील........

पोलिसांना हे अधिकार नाहीत. आता अच्छे दिन आलेले असून या सरकारला हे सर्वच साफ करावयाचे आहे त्यामुळे अशा बाबींवर बंधने घालून यातील पोलिसांचा हस्तक्षेप थांबविण्याची आवश्यकता आहे. मी माननीय गृह मंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, या विषयाबाबत त्यांना सभागृहात या प्रश्नावर उत्तर देण्यासाठी मर्यादा येत असतील तर त्यांनी आम्हाला चर्चेला बोलवावे तसेच या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बोलून यासंदर्भात धोरणात्मक निर्णय झाला पाहिजे अशी मी मागणी करतो.

यानंतर श्री. भारवि........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

सभापती महोदय, माजी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना मी मित्र या नात्याने आरोंदा येथे पोर्ट करण्यासाठी मनापासून मदत केली आहे. पोर्ट तयार झाल्यानंतर तेथील सुरक्षा रक्षकांनीच स्टील चोरले. पोर्टमधील स्टील चोरीला गेल्यानंतर ते तक्रार करण्यासाठी गेले असता त्यांना 8 तास पोलीस ठाण्यामध्ये थांबवून ठेवण्यात आले. तसेच, रूपये 3.00 लाखाचा जप्त केलेला पोलिसांनीच विकून टाकला. सदर घटना ही निवडणुकीच्या काळातच घडलेली आहे. ही गंभीर बाब आहे. तेथील पोलीस हा जमिनीचा एजंट आहे. त्याचे नाव देखील द्यायला मी तयार आहे. ज्या मालाची किंमत 3 लाख रूपये होती तो माल दहा हजार रूपयांमध्ये घेऊन जा असे तो सांगत होता. ज्याला माल विकला होता त्याच्याकडून दहा लाख रूपये पोलीस स्टेशनने घेतले.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य अतिशय गंभीर बाब सांगत आहेत. त्यांनी आता पोलिसांसंबंधी जी तक्रार केलेली आहे त्यासंबंधी माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी कारवाई करण्यासंबंधातील आदेश दिले पाहिजेत. ते पोलिसांचे नाव देखील द्यायला तयार आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे सर्व थांबले पाहिजे. आज आपण सत्तेमध्ये असल्यामुळे आपल्याला अधिकार प्राप्त झालेले आहेत. खुर्ची ही कधीही कायमची नसते. ती आलटून पालटून बदलत असते. त्यामुळे यावर निर्णय झाला पाहिजे. मी माजी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना मदत करीत आहे. ते स्वत: लोकप्रतिनिधी होते. तरी देखील पोलिसांची हिंमत होते याची कुठे तरी चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र.31, पान क्र.4 वर बोलणार आहे. माझे गाव अलिबाग तालुक्यात भेरड येथे आहे. माझे गाव समुद्र किनारी आहे. माझ्या गावातून मुंबई दिसते. आता आमचे गाव मुंबईच्या जवळ आलेले आहे. माझे आजोबा या गावातून आले आणि ते 25 वर्षे विधिमंडळाचे सन्माननीय सदस्य होते. आमचे गाव मुंबईच्या जवळ असून तेथे आता टाटाचा प्रकल्प होत आहे. येथे राज्य शासनाने सुप्रीम पेट्रोकेमिकल्सला जागा दिली आहे. पण गेल्या 30 वर्षापासून अद्यापपर्यंत तेथे प्रकल्प झालेला नाही. मुदतीत इंडस्ट्री उभारणीचे काम झाले नाही तर ती जागा संबंधितांना परत देण्याचा कायदा आहे. त्यामुळे ती जागा शेतकऱ्यांना परत मिळावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. संबंधित कंपनीने इंडस्ट्रीसाठी परवानगी घेतली होती. त्याची

...3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे ती जमीन शेतकऱ्यांना परत मिळावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, आता मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्रमांक 90 वरील बाब क्रमांक 110 वर बोलणार आहे. 1972 मध्ये महाराष्ट्रात सर्वात पहिली टोल आकारणी वाशी, नवी मुंबई येथील पुलापासून झाली. त्यावेळी श्री.मधुसुदन वैराळे हे माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. या पुलाचे उद्‌घाटन तत्कालीन माननीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते निवडणुकीच्या काळात झाले होते. त्यावेळी आचारसंहितेची अंमलबजावणी होत नव्हती. त्यावेळी टोल पाच वर्षात बंद होईल असे आश्वासन देण्यात आले होते. तो टोल 1995 पर्यंत सुरू होता. तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्या कल्पनेतून मुंबईमध्ये 52 पूल बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हा पुन्हा टोल सुरू करण्यात आला. ही कल्पना चांगली होती. रिकव्हरी झाल्यानंतर वाशी पुलाचा टोल बंद करण्यात येईल असे शासनाने आश्वासन दिले होते. ते आश्वासन आजतागायत पूर्ण झालेले नाही. तेव्हा टोलसंबंधी शासनाचे नेमके धोरण काय आहे ? पुण्याहून साताऱ्यायला जाताना टोल लागतो. सातारा ते कराड पर्यंत नवीन रस्ता असेल तर पुन्हा टोल लावण्यात येतो. त्यामुळे कोणी कितीही बोलले तरी टोलमुक्त महाराष्ट्र करणे एवढे सोपे नाही. जे प्रॅक्टीकल आहे ते बोलले पाहिजे. टप्प्याटप्प्याने टोल बंद केले पाहिजेत. पण गेल्या पाच वर्षामध्ये ज्या टोलची मुदत संपली आहे त्यांना आपण मुदतवाढ दिलेली आहे. ते धोरण चुकीचे असून त्याची पुनरावृत्ती करू नका एवढीच माझी विनंती आहे. कोणत्या टोलचे किती पैसे वसूल झ ाले हे कळले पाहिजे. पुलासाठी किती खर्च झाला हे देखील कळले पाहिजे. आता झालेल्या खर्चाचे फलक लावण्यात आले आहेत. 15 दिवसांपूर्वीच धरमतर येथील टोल बंद झाला आहे. तशी सुरूवात आपण कधी करणार आहात ? या राज्यात एकूण किती ठिकाणी टोलनाके आहेत, त्या टोलनाक्यांना कोणत्या वर्षापर्यंत मुदत आहे व नवीन प्रस्ताव कुठले आहेत यासंबंधातील माहिती आम्हाला येथे समजली पाहिजे.

...3

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मुंबई-गोवा रस्त्यावरून सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते येतात. मुंबई गोवा महामार्गावरील पहिल्या टप्पाचे काम पळस्पे ते इंदापूर असे सुरू आहे. भूसंपादनाच्या कामाचे पैसे आलेले आहेत. पण कंत्राटदाराला कामाची मुदत वाढवून पाहिजे आहे. त्यामुळे तो मुद्दाम तेथील जागा ताब्यात घेत नाही, तेथील वाद सोडवत नाही. तेव्हा मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याचे काम कधी पूर्ण होणार आहे याचे उत्तर या मागणीच्या निमित्ताने आम्हाला हवे आहे. ज्या ठिकाणची जागा ताब्यात मिळाली आहे तेथील काम पूर्ण केले तरी देखील आम्हाला 50 टक्के रिलिफ मिळू शकेल. या मार्गावरील सर्वात वाईट टप्पा पेण ते वडखळ नाक्या पर्यंतचा आहे. पेणवरून मुंबईला येण्यासाठी आम्हाला 45 मिनिटांचा कालावधी लागतो. पण पेण ते वडखळपर्यंत जाण्यासाठी एक तासा पेक्षा जास्त कालावधी लागत आहे. तेव्हा या टप्प्याची सुरूवात कधी करण्यात येणार आहे. सदर रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत या रस्त्याची देखभाल त्या कंपनीने करावयाची आहे. आज तेथे प्रचंड खड्डे पडले आहेत. तेव्हा संबंधित कंत्राटदारास दंड आकारून तो हे काम किती मुदतीत पूर्ण करणार आहे हे आम्हाला समजले पाहिजे. तसेच, या कंत्राटदाराचे काम रद्द करून नवीन कंत्राटदार नेमण्यासंबंधी शासन विचार करणार आहे काय अशी मागणी मी या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करीत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ........

सभापती महोदय, ग्रामीण विकास विभागाच्या बाब क्रमांक 165, पृष्ठ क्रमांक 144 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. ग्रामपंचायतींना गुरे चराईसाठी जागा देण्यात आलेल्या आहेत. गुरे चराईच्या जागेवर ग्रामपंचायतीचे पंच, ग्रामपंचायतीचे सदस्य तसेच सरपंच स्वत:ची नावे लावून जमिनी विकण्याचा सपाटा आमच्या जिल्हयात तरी मोठया प्रमाणात सुरु आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंचाना एनओसी देण्याचा अधिकार नसतांनाही सरपंच जमिनींना एनओसी देत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीकडे असलेल्या गुरे चराईच्या जमिनी महसूल खात्याकडे वर्ग करण्याची आवश्यकता आहे. वाढणारे गावठाण व वाढणारी गुरे ढोरे हा उद्देश डोळयासमोर ठेवून जमिनी ग्रामपंचायतींना देण्यात आल्या होत्या. परंतु आज ग्रामपंचायतीच्या गुरे चराईच्या जमिनींची राजरोसपणे सर्वत्र विक्री सुरु आहे. ज्या ठिकाणी औद्योगिकरण होत आहे, ज्या ठिकाणी शहरी करण होत आहे अशा ठिकाणी जमिनी विकण्याचे व्यवहार मोठया प्रमाणात सुरु आहेत. त्यामुळे यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सहकार विभागाच्या बाब क्रमांक 125, पृष्ठ क्रमांक 200 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्य बँकेमध्ये मी 20 वर्षे संचालक म्हणून काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाऊसाहेबांनी सुध्दा माझ्या बरोबर काम केलेले आहे परंतु त्यांचा कालावधी थोडा कमी होता. राज्य बँकेत आम्ही प्रकरणे अडविण्याचा प्रयत्न केला, विक्री करण्यास विरोध केला असे असतांना आम्हालाच तुम्ही आरोपी केले ? आम्हाला यासंदर्भात आपल्या सरकारची नोटीस आलेली आहे. कोर्टात गर्व्हमेंट गॅरंटीचे पैसे बँक मागायला गेली असता पैसे देण्यास नकार दिला गेला. पैसे नाकारल्यामुळे आम्ही उच्च न्यायालयात गेलो. उच्च न्यायालयाने प्रॉपटी विकून पैसे जमा करावेत व प्रॉपटी विकून पैसे दिले गेले नसेल तर आमच्याकडे या असा निर्णय उच्च न्यायालयाने दिला होता. प्रॉपर्टी विकण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने घेतलेला असतांना राज्य शासनाने त्याला मान्यता दिली. राज्यसहकारी बँकेच्या संचालक मंडळात राज्यशासनाचे प्रतिनिधी आहेत. त्या ठिकाणी जॉईंट रजिस्ट्रार असतात, नाबार्डचा अधिकारी असतो तसेच आरबीआयचा सुध्दा अधिकारी असतो. अर्धातास बैठक झाल्यानंतर प्रोसिडींग वाचून त्याला मान्यता दिली तर त्यामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ........

आम्ही कसे काय आरोपी होऊ शकतो ? राज्य शासनाने बँकेला 300 कोटी रुपयांची बँक गॅरंटी दिल्यामुळे बँक फायद्यात आली ही वस्तुस्थिती आहे. विकासकाच्या काळात प्रॉपर्टीज कशा विकल्या गेल्या, प्रॉपर्टीज कोणाला विकल्या गेल्या, कोणाचे वनटाईम सेटलमेंट करण्यात आले यासंदर्भात संपूर्ण चौकशी करण्याची आवश्यकता आहे. एवढेच नाही तर बँकेच्या अधिकाऱ्यांच्या प्रॉपर्टीची सुध्दा आपल्याला चौकशी करावी लागणार आहे. राज्य सहकारी बँक आपल्या राज्याचा आत्मा आहे. 7 कोटी जनतेचा या बँकेत डायरेक्ट इन डायरेक्ट समावेश आहे. जिल्हा बँकेचेच पैसे राज्य बँकेत आहेत. किती जिल्हा बँकानी किंवा प्रशासकांनी किंवा एमडी यांनी भेटी दिलेल्या आहेत ? त्यावेळेस आपले लोकप्रतिनिधी काम करीत होते. त्या ठिकाणी सगळया जिल्हयाचे डायरेक्टर होते. त्यावेळेस डे टू डे काम होत होते. प्रशासक मंडळ कोणाला कर्ज देतात हे आम्हाला कळले पाहिजे. प्रशासक मंडळ जनरल बॉडीच्या बैठकीला सुध्दा हजर राहत नाहीत. वेळ नसल्यामुळे आम्ही हजर राहू शकत नाही अशी कारणे ते देत असतात. कोणत्याही जनरल बॉडीच्या बैठकीस प्रशासक उपस्थित नसतात. त्यामुळे यासंदर्भात प्रशासकांची चौकशी होण्याची आवश्यकता असून राज्य बँक लवकरात लवकर कशी अस्तित्वात येईल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. नाही तर राज्य बँकेला पुन्हा खुळखुळा करण्याचे काम प्रशासक मंडळ केल्याशिवाय राहणार नाही. शिखर बँक सहकारामध्ये काम करीत आहे. त्यामुळे शिखर बँकेवर जास्त वेळ प्रशासकाची नियुक्ती करुन चालणार नाही. आम्हाला अधिकारी व सेक्रेटरी सांगत होते की, यासाठी रिझर्व्ह बँकेची परवानगी लागेल. त्यामुळे बँक आता अधिकारीच चालविणार आहे काय ? प्रशासक मंडळच 10-10 वर्षे बँक चालविणार आहे काय ? त्यामुळे हा सर्व प्रकार थांबण्याची आवश्यकता असून यासंदर्भात राज्य सरकार काय निर्णय घेणार आहे याची महिती आम्हाला पुरवणी मागण्यांवरील उत्तरात मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. पुरवणी मागण्यांवर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) :सभापती महोदय, या ठिकाणी पुरवणी मागण्यावरील चर्चा सुरुअसून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

राज्यातील वेगवेगळया विभागातील पूरक मागण्यांच्या मंजूरीसंदर्भात आम्हाला विवरणपत्र दिले गेले आहे. पुरवणी मागण्यावरील चर्चेत अनेक मान्यवरांनी भाग घेऊन काही मौलिक सूचनाही केल्या. महाराष्ट्र राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी या ठिकाणी अनेक मान्यवरांनी सूचना केलेल्या आहेत. आम्हाला आता निधीची कमतरता पडणार नाही असे आम्हाला वाटू लागले होते. या राज्याचे मुख्यमंत्री नागपूरचे असून वित्तमंत्री चंद्रपूरचे असल्यामुळे आम्हाला पैशांची कमतरता पडणार नाही असे वाटू लागले होते. या सभागृहात आम्ही माननीय श्री. देवेंद्र फडणवीस तसेच माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार साहेबाची भाषणे ऐकली आहेत.

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, पुरवणी मागण्यांवर बोलतांना प्रथम विभाग आणि विभागाची बाब सांगून त्यावर चर्चा केली तर बरे होईल.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, आता आम्हाला पैशांची कमतरता पडणार नाही हे सांगणे मला महत्वाचे वाटते. मी पहिल्यांदाच पुरवणी मागण्यावर माझे विचार व्यक्त करीत आहे. नगरविकास खात्याच्या संदर्भात बोलत असताना माझ्या समोर वर्तमानपत्राची काही कटींग्ज आहेत.

यानंतर श्री. अजित........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक झाली त्यावेळी भारतीय जनता पक्षाचे महापौर यांनी मागणी केली की, (अडथळा ) मी नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 98 वर बोलत आहे. मी नवीन सदस्य आहे. माझी कोंडी करण्यात येऊ नये. सन्माननीय सदस्यांचा आणि मंत्री महोदयांचा सन्मान ठेवून मी बोलत आहे.

सभापती महोदय नागपूर मेट्रो प्रकल्पाकरिता 10 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याची आवश्यकता होती. परंतु तशी तरतूद करण्यात आलेली नाही. तेव्हा नागपूर मेट्रोकरिता निधीची तरतूद करण्यात यावी अशी माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे. तसेच नागपूर नगरीकरिता विशेष 500 कोटी रुपयांचे अनुदान द्यावे अशी विनंती आहे. आपण हा निधी द्याल अशी आम्हाला खात्री आहे.

बाब क्रमांक 96, पृष्ठ क्रमांक 65-शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - प्रत्येक जिल्ह्यामध्ये क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. हे अतिशय चांगले काम आहे. या कामासाठी शासन अभिनंदनास पात्र आहे. या प्रशिक्षण केंद्रासाठी 3 कोटी 71 लाख 61 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. परंतु ही रक्कम फार तुटपुंजी आहे असे वाटते. ही रक्कम वाढविण्यात यावी अशी माझी मागणी आहे. आपण क्रीडा धोरण ठरविलले आहे. आपल्या राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करायचे असतील तर आपणास अशा क्रीडा प्रशिक्षण केंद्रांची आवश्यकता आहे. आपल्या राज्यातील खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकावेत यादृष्टीने आपण काम केले पाहिजे.

बाब क्रमांक 93, पृष्ठ क्रमांक 64, शालेय शिक्षण विभाग, सर्व समाजातील लोकांना सम प्रमाणात निधीचे वाटप झाले पाहिजे. कोणत्याही समाजाच्या भावना दुखावता कामा नये. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. अल्पसंख्याकामध्ये जैन, मुस्लिम, बौद्ध व अन्य समाजाची लोक येतात. या अल्पसंख्याक समजातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी 75 कोटी 16 लाख 37 हजार इतक्या रकमेची मागणी करण्यात आलेली आहे. आम्ही बाबा ताजुद्दीनचा दर्गा असो किंवा अन्य कारणासाठी निधीची मागणी केलेली नाही. आपणच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

या ठिकाणी खडखडाट आणि खणखणाट या दोन शब्दांनी वर्तमानपत्रात शब्दच्छल केला होता. मी बाब क्रमांक 93 वर बोलत आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण जे विषय चर्चेला घेतले त्यामध्ये मायनॉरीटी हा विभाग नाही.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, सरकारला निधी द्यायचा नसेल तर त्यांनी तो देऊ नये परंतु आम्हाला आमच्या भावना आपल्यापर्यंत पोहाचू द्याव्यात. आम्ही आपली भाषणे ऐकली आहेत. आपण आपल्या बाकावरील सदस्यांना गप्प राहण्यास सांगत होते.

बाब क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 13, गृह विभाग, - पोलीस विभागात 10 हजार 443 नवीन पदे निर्माण करण्यासाठी 403 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. हा खर्च पोलिसांच्या वेतनावर होणार आहे. आपल्या राज्यातील पोलीस यंत्रणा सक्षम बनविण्याकरिता ही मागणी करण्यात आलेली आहे. आज सकाळी सायबर गुन्ह्याच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना होती. परंतु ती पुढे ढकलण्यात आली. सायबर गुन्ह्याचा तपास करण्याच्या संदर्भात पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी निधीची तरतूद ठेवण्यात आली पाहिजे.

बाब क्रमांक -19, पृष्ठ क्रमांक 16 गृह विभाग, - ज्या ठिकाणी पोलिसांची कमतरता असते त्याठिकाणी होमगार्डस काम करतात. या होमगार्डसना पुरेसे वेतन मिळत नाही. तसेच आपण त्यांना कोणताही संविधानिक अधिकार दिलेला नाही. तेव्हा या होमगार्डससंबधी आपण काही विचार करणार आहात की नाही ? राज्यात किती होमगार्डस काम करीत आहेत, त्यांच्यामध्ये इन्स्पेक्टर आणि हेड कॉन्स्टेबल अशी वर्गवारी करुन त्यांना विशेष अनुदान देण्यात यावे तसेच त्यांना सेवेत नियमित करण्यात यावे अशी माझी मागणी आहे. होमगार्डसना कर्तव्य भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासाठी 56 कोटी 61 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. ही रक्कम अपुरी पडत असेल तर त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

..3..



AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे... 20:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

बाब क्रमांक 38, पृष्ठ क्रमाक 33 सामाजिक सुरक्षा व कल्याण विभाग, - गडचिरोली जिल्हयामध्ये नक्षलवादी कारवाईत बाधित झालेल्या लोकांना 3 लक्ष रुपये देण्यात येतात. त्यासाठी 1 कोटी 71 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. जे लोक देशाच्या सेवेसाठी आपले प्राण देतात त्यांच्या परिवारांना मदत करण्यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. काही महिन्यांपूर्वी नक्षलवादी हल्ल्यामध्ये बाधित झालेल्या एका परिवारातील पत्नीला अजून नोकरी किंवा पैसे मिळालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी शेवटपर्यंत मंत्रालयाच्या पायऱ्या झिजवल्या परंतु त्यांना मदत मिळालेली नाही. माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण 3 लक्ष रुपयांऐवजी 5 लक्ष रुपये देण्याची तरतूद करावी. नक्षलग्रस्त भागामध्ये सर्वसाधारण माणूस फिरु शकत नाही. मंत्री महोदय त्या भागात जाऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

**सभापती** : सभागृहाची वेळ रात्री 9.00 वाजेपर्यंत वाढविण्यात आली होती. आता पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण होईपर्यंत आणि मंत्री महोदयांची उत्तरे पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सभागृहाची वेळ 7.00 वाजेपर्यंत वाढविण्यात आली,त्यानंतर ती वेळ रात्री 9.00 वाजेपर्यंत वाढविण्यात आली आणि आता आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपेपर्यंत वेळ वाढवीत आहात. आपणास रात्री 10.00 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक चालू ठेवायची होती तर आपण सुरुवातीलाच तसे सांगितले असते तर आमचे सदस्य येथे उपस्थित राहिले असते.

**सभापती** : ठीक आहे. या पुढील काळात अशा पद्धतीची परिस्थिती निर्माण होईल तेव्हा जास्त वेळ वाढविण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी बॉम्बस्फोट झाले. त्यात काही जवान मृत्युमुखी पडले. त्या जवानांच्या विधवा आणि कुटुंबीयांना 3 लाख रुपये आर्थिक मदत देण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. ही रक्कम फारच कमी आहे. या निमित्ताने मी विनंती करतो की, शहीद जवानांच्या कुटुंबीयातील एका व्यक्तीला तातडीने नोकरी द्यावी तसेच 5 लाख रुपये मदत करण्यात यावी.

महोदय, बाब क्रमांक-40 च्या बाबतीत मी बोलतो. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीबाबत चर्चा केल्यानंतर राज्य सरकारकडून 7 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. परंतु या कामी केवळ 2 हजार कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, इतक्या अत्यल्प रकमेची मागणी का करण्यात आली ? वास्तविक पाहता 7 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी जाहीर करण्यात आले होते. परंतु आता अवकाळी पाऊस व गारपीट झाल्यामुळे सदरहू रक्कम वाढवून द्यावी, अशी मी विनंती करतो. माझी विनंती आहे की, 7 हजार कोटी रुपयांऐवजी 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज देऊन, त्या अनुषंगाने तरतूद करावी.

सभापती महोदय, आता मी वन विभागाची बाब क्रमांक 55 वर बोलतो. राज्यात 291 कायमस्वरुपी चेक नाके आणि 431 तात्पुरते चेक नाके निर्माण करण्यासाठी 18 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. वास्तविक पाहता चेक नाक्यावर तपासणीसाठी मनुष्यबळ सुध्दा लागणार आहे. त्यामुळे या कामी करण्यात आलेली 18 लाख रुपयांची मागणी कमी आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितले की, आम्ही जंगलात राहणारी माणसे आहोत. सन्माननीय अर्थ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार हे सुध्दा त्याच भागातून निवडून आलेले आहेत. त्यामुळे 18 लाख रुपये ही रक्कम अपुरी असल्यामुळे या रकमेत वाढ करावी अशी मी विनंती करतो.

महोदय, वन विभागाच्या बाब क्रमांक 56 वर मी बोलतो. वन क्षेत्रातील पर्यटनाचा विकास करण्याकरिता 2 कोटी 52 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

विचारु इच्छितो की, नागझिरा, ताडोबा किंवा अन्य वन प्रकल्पासाठी तसेच या भागातील पर्यटनाचा विकास करण्यासाठी केवळ 2 कोटी रुपयांची मागणी करणे योग्य आहे काय, 2 कोटी रुपयांमध्ये कोणती कामे होऊ शकतात ? या निमित्ताने मी विनंती करतो की, वन विभागात पर्यटनाचा एखादा प्रकल्प करीत असताना होणारा खर्च लक्षात घेता या मागणीच्या रकमेमध्ये वाढ करावी.

महोदय, आता मी वन विभागाच्या बाब क्रमांक-61 वर बोलणार आहे. वनतळी बांधकामासाठी 2 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. वाघ आणि सिंह हे राष्ट्रीय प्राणी आहेत. त्यांना जंगलात पाणी पिण्यासाठी वनतळी बांधण्यात येणार आहेत. संपूर्ण राज्यातील वनतळ्यांसाठी केवळ 2 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. ही रक्कम अपुरी असल्यामुळे या रकमेत वाढ करावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-91 ही साक्षरता अभियानाबाबतची आहे. आपले राज्य साक्षरतेच्या बाबतीत केरळ राज्यापेक्षा मागे आहे हे आपण मान्यच केले पाहिजे. केंद्राची भारत साक्षरता अभियान आहे. राज्यातील कोणताही गरीब मुलगा निरक्षर राहता कामा नये यासाठी राज्य सरकारने कार्यक्रम राबवायला पाहिजे. यासाठी राज्यातील जे शहर निवडायचे असेल ते निवडा, परंतु साक्षरतेच्या बाबतीत थीम पार्क सुरु करुन त्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केली पाहिजे, अशी मी विनंती करतो.

महोदय, बाब क्रमांक-95 ही आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याबाबतची आहे. वास्तविक पाहता राज्याचे क्रीडा धोरण असावयास पाहिजे. माननीय श्री.विनोद तावडे हे क्रीडा मंत्री आहेत. त्यामुळे दोन-चार लोकांचा सहभाग घेऊन राज्याचे क्रीडा धोरण तयार केले पाहिजे. त्यामध्ये सन्माननीय मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांना सुध्दा घेतले पाहिजे. शारीरिक शिक्षण महाविद्यालयातून खेळाडू निर्माण केले पाहिजेत. अशा प्रकारे खेळाडू निर्माण करण्यासाठी केवळ 2 कोटी 81 लाख 41 हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या अनुषंगाने आवश्यक ते प्रयत्न करुन ही तरतूद 25 कोटी रुपयापर्यंत वाढवावी अशी मी विनंती करतो.

महोदय, आता मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक-242 वर बोलतो. शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना 100 टक्के अनुदान तत्त्वावर घेण्याबाबत शासनाने विचार करावा. या

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

महाविद्यालयांच्या खर्चासाठी 8 लाख 27 हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. ही रक्कम कशासाठी ठेवली आहे, हे कळण्यास मार्ग नाही. राज्यातील शारीरिक महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्यासाठी या महाविद्यालयांचे आपल्याला योगदान लाभेल. त्यामुळे त्यांचा सुध्दा विचार करावा, अशी मी विनंती करतो.

महोदय, यानंतर मी बाब क्रमांक-244 वर बोलतो. भारतीय प्रशासनिक प्रशिक्षण सेवा संस्था नागपूरला आहे. आय.ए.एस. आणि आय.पी.एस. परीक्षेमध्ये बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्ली या भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उत्तीर्ण होतात. महाराष्ट्रातील विद्यार्थी या परीक्षेमध्ये टिकू शकत नाहीत. राज्यातील विद्यार्थी या परीक्षेमध्ये टिकले पाहिजेत म्हणून यशदा संस्थेच्या धर्तीवर नागपूरमध्ये प्रशिक्षण संस्था सुरु केली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री, माननीय अर्थ मंत्री आणि सामाजिक न्याय मंत्री हे विदर्भातील आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून हे काम होऊ शकते. म्हणून नागपूर येथे आय.ए.एस., आय.पी.एस. ॲकॅडेमी सुरु करावी आणि त्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करावी. पुरवणी मागण्यामध्ये हे शक्य नसेल तर अर्थसंकल्पामध्ये या बाबतीत तरतूद करु शकतो.

महोदय, यानंतर मी बाब क्रमांक-233 वर बोलतो. ही मागणी विद्यापीठांच्या बाबतीत करण्यात आलेली आहे. यासाठी 1 कोटी 65 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. गोंडवाना विद्यापीठात मागासवर्गीय आणि आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळे या ठिकाणी ॲडव्हान्स रिझल्ट ओरिएंटेड कोर्सेस सुरु केले पाहिजेत. त्या ठिकाणी इमारती आणि पायाभूत सुविधा चांगल्या दर्जाच्या निर्माण केल्या पाहिजेत. केवळ 1 कोटी रुपयांच्या मागणीतून काही होणार नाही. त्यामुळे या रकमेमध्ये वाढ करावी, अशी मी विनंती करतो.

महोदय, यानंतर मी बाब क्रमांक-184 वर बोलणार आहे. ही मागणी संजय गांधी निराधार योजनेच्या बाबतीत करण्यात आलेली आहे. या योजनेतून लाभार्थ्यांना न्याय मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. संजय गांधी निराधार योजनेच्या बाबतीत अनेक तक्रारी आहेत. या योजनेचा फायदा मिळविण्यात गरीब माणूस होरपळून निघतो. संजय गांधी निराधार योजनेचा लाभ

..4..

श्री.प्रकाश गजभिये....

घेण्यासाठी चकरा मारुनमारुन त्याच्या चपला झिजतात. पण त्याला न्याय मिळत नाही. या योजनेसाठी 50 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या रकमेमध्ये वाढ केली तर बरे होईल.

नंतर श्री.कांबळे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये ....

मला माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करावेसे वाटते. चांगल्या कामाला निश्चितपणे चांगले म्हटले पाहिजे. सामाजिक न्याय विभागाने विमुक्त भटक्या जाती यांच्या शिष्यवृत्तीकरिता 100 कोटी रूपये आणि एसबीसीकरिता 20 कोटी रूपये ठेवले आहेत. मी या संदर्भात त्यांचे अभिनंदन करतो. आपण केलेले चांगले काम पटलावर राहिले पाहिजे.

सभापती महोदय, आता मी विधी व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 152 वर बोलणार आहे. हा फार गंभीर मुद्दा आहे. राज्यामध्ये दलितांवरील अत्याचार मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. दलित असुरक्षित आहे, त्याला विश्वास राहिलेला नाही. त्यांना ज्या गतीने न्याय मिळाला पाहिजे त्या गतीने तो मिळत नाही. दलितांवरील अन्यायाची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असतात. परंतु, त्यांना न्याय मिळत नाही. आपण राज्यामध्ये 100 फास्ट ट्रॅक कोर्ट तयार करणार होता. आपण तशी घोषणा सुध्दा केली होती. आम्ही या संदर्भात वर्तमानपत्रात वाचले. आम्हाला वाटले की, हे सरकार आता काहीतरी चांगले करणार आहे. मी या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून माननीय वित्तमंत्र्यांना विचारू इच्छितो की, आपण 100 फास्ट ट्रॅक कोर्ट केव्हा करणार आहात, जेणेकरून राज्यातील दलितांना न्याय मिळेल. 9 ग्राम न्यायालयांचे बांधकाम नव्याने निर्माण करणे, यासाठी पैसे ठेवले आहेत. परंतु, फास्ट ट्रॅक कोर्टसाठी निधी उपलब्ध करून दिलेला नाही.

आता मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 110, रस्ते व पूल बांधकाम यावर बोलणार आहे. रस्ते व पूल यासाठी 72 कोटी रूपयांचे प्रावधान मंजुरीसाठी ठेवले आहे. मी सांगू इच्छितो की, एवढ्यात काहीही होणार नाही. मी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती करतो की, नागपूर ते पुणे एक्सप्रेस हाय-वे व नागपूर ते दिल्ली एक्सप्रेस हाय-वे आपल्या 5 वर्षांच्या कार्यकाळात होत असतील तर ते करावेत. नागपूर ते चंद्रपूर हा चांगला रस्ता होत असेल तर तो देखील ॲड करावा. मागे मंत्रालयाला आग लागली होती. मंत्रालयाच्या नूतनीकरणासाठी किती रूपये ठेवले ते आम्हाला माहीत नाही. गोंदिया येथील मेडिकल कॉलेज व नागपूर येथील नॅशनल स्कूल फॉर लॉ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये ....

याकरिता निधी ठेवलेला नाही. आपण या सर्व बाबींचा विचार करावा, आमच्या मागण्यांवर निश्चितच विचार करावा, अशी माननीय वित्तमंत्री, माननीय महसूल मंत्री व माननीय परिवहन मंत्री यांना विनंती करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या माध्यमातून माझ्या मागण्या मांडण्यासाठी मी उभी आहे. आम्हाला पुरवणी मागण्यांचे पुस्तक दिलेले आहे. त्यामध्ये 1 ते 22 विभाग दिले आहेत. मात्र त्यामध्ये कुठेही मला अल्पसंख्याक विकास आणि औकाफ या खात्याच्या पुरवणी मागण्या दिसल्या नाहीत.

सभापती महोदय, मी आता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 64, बाब क्रमांक 93 वर बोलणार आहे. त्यानुसार अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीसाठी तरतूद करण्यात आली आहे. तथापि, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी निधी कमी पडत आहे, असे माझ्या निदर्शनास आले आहे. त्याकरिता सुध्दा अधिक रकमेची तरतूद करण्यात यावी. सभापती महोदय, आता मी कृषी व मत्स्य व्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 56, बाब क्रमांक 83 वर बोलणार आहे. तारापोरवाला मत्स्यालय हे पूर्वी दापोलीच्या कोकण कृषी विद्यापीठाकडे होते. काही वर्षांपूर्वी हे शासनाकडे घेण्यात आले. तेव्हापासून त्याच्या आधुनिकीकरणाचे काहीही काम करण्यात आलेले नाही. हे मुंबईमध्ये गिरगाव चौपाटीजवळ आहे. संपूर्ण भारतातील लोक मुंबईमध्ये आल्यावर तारापोरवाला मत्स्यालयाला भेट देतात. परंतु, आज कित्येक वर्षे त्याच्या आधुनिकीकरणाचे काम थांबलेले आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, त्या ठिकाणी मत्स्य विभागाचे जे ऑफिस होते ते आता बांद्रा येथे कलेक्टर ऑफिसमध्ये आहे. तेथे छोट्या प्लॅस्टिकच्या टँकमध्ये माशांचे संवर्धन केले जात आहे. त्यामुळे तारापोरवाला मत्स्यालयाकरिता जास्त निधीची तरतूद करण्यात यावी आणि लवकरात लवकर त्याचे आधुनिकीकरण करून लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कृषी व मत्स्य व्यवसाय विभागात एक बाब अद्यापही प्रलंबित आहे आणि ती अतिशय महत्त्वाची आहे. कोकणातील संपूर्ण समुद्रकिनाऱ्यामधील गाळ काढण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. पूर्वी केलेली तरतूद अतिशय कमी आहे. तेथे ड्रेझरने गाळ काढावा लागतो. लहान मोठा मच्छीमार नोव्हेंबर, डिसेंबर पर्यंत ड्रेझरने गाळ काढेपर्यंत होड्या समुद्रात घालू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या रोजीवर, व्यवसायावर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे गाळ काढण्यासाठी ड्रेझरकरिता निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

ॲड. हुस्नबानू खलिफे ....

आता मी नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 71, बाब क्रमंक 102, वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी नगरपरिषदांना अनुदान या संदर्भात बोलणार आहे. मी एक व्यथा आपल्याकडे मांडते. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर नगरपरिषद शहर असे आहे की, ज्यातून दोन नद्या वाहतात. त्यामुळे जूनपासून डिसेंबमध्ये शहरामध्येच होडी वाहतूक केली जाते, होडीतून विद्यार्थी प्रवास करतात, महिला प्रवास करतात. त्यांना 6 महिने होड्यांमधून प्रवास करावा लागतो. पुलासाठी निव्वळ 5 कोटी रूपयांची आवश्यकता आहे. वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी ते राजापूर नगरपरिषदेला देण्यात यावेत, अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, आता मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 117, बाब क्रमांक 111, पोलीस गृहनिर्माण या संदर्भात बोलणार आहे. मी राजापूर शहराचीच आपल्याला व्यथा सांगते. त्या ठिकाणची पोलीस वसाहत 60 वर्षांपूर्वी बांधली आहे, ती अतिशय जीर्ण अवस्थेत आहे. कित्येक वेळा मागणी करूनही त्या संदर्भात काहीही करण्यात आलेले नाही. पोलीस वसाहतींच्या बांधकामासाठी जी तरतूद केली आहे, त्यात राजापूर शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा अंतर्भाव करण्यात यावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, आता मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 91, बाब क्रमांक 111 व 112, रस्ते व पुलांची दुरूस्ती यावर बोलणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर संगमेश्वर, चिपळूण, खेड या ठिकाणी असलेले पूल अतिशय जीर्ण अवस्थेत आहेत. फक्त एकेरी वाहतूक होईल असे ते पूल आहेत. त्यांची तातडीने दुरूस्ती करावी किंवा त्यांचे नव्याने बांधकाम अग्रक्रमाने घेण्यात यावे. आपल्याकडून ते घेण्यात आलेले नाही.

सभापती महोदय, राजापूर रोड हे रेल्वे स्टेशन आहे. परंतु, राजापूर ते स्टेशनपर्यंत फक्त 18 कि.मी.चा रस्ता आहे. परंतु, रस्ता खराब झाला असल्याने 45 ते 50 मिनिटे रेल्वे स्टेशनवर जाण्यास लागतात. त्यामुळे लोक त्या रेल्वे स्टेशनचा उपयोगच करीत नाहीत. कोंडीए-पांगरे-हसोळ-निखरे इजिमा 113 हा रस्ता आपल्या नवीन रस्त्यांमध्ये घेण्यात यावा, अशी मी विनंती करते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. हुस्नबानू खलिफे ....

सभापती महोदय, आता मी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 145, बाब क्रमांक 177 ते 180 वर बोलणार आहे. सदर पुरवणी मागण्यांमध्ये शिष्यवृत्तीच्या रकमेची तरतूद केली आहे. मात्र त्यामध्ये वाढ करण्यात यावी. कित्येक विद्यार्थ्यांची मागच्या वर्षांचीही शिष्यवृत्ती मिळालेली नाही. त्यामुळे आपल्याला या रकमेत वाढ करावी लागेल.

सभापती महोदय, कोकणातील सिंचन प्रकल्प अपूर्ण आहेत. बंधारे झाले आहेत. परंतु, कालव्यांचे बांधकाम झालेले नाही. कालव्यांचे काम अपूर्ण आहे. कालव्यांसाठी नव्याने तरतूद करण्यात यावी आणि सिंचन प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मी आपणास विनंती करते. मी येथे ज्या मागण्या मांडल्या आहेत, त्यांचा नव्याने येणाऱ्या पुरवणी मागण्यांच्या वेळी जरूर विचार करण्यात यावा. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद !

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पाणी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 261, पृष्ठ क्रमांक 203 अन्वये राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी तरतूद करण्यात आली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. या निमित्ताने आपल्या माध्यमातून मला शासनाच्या असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, अकोला जिल्ह्यात तीव्र पाणी टंचाई आहे. या अकोला जिल्ह्यात 84 गावांसाठी एक पाणी पुरवठा योजना आणि ग्रामीण भागासाठी खांबोरा पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून चालविण्यात येत आहे. तथापि, आता ही योजना सक्तीने जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्याचा प्रयत्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु आहे. माझी या निमित्ताने पाणी पुरवठा मंत्री महोदयांना विनंती आहे की, या वर्षी अकोला जिल्ह्यात भीषण पाणी टंचाई आहे. त्यामुळे 84 गावांसाठी असलेली पाणी पुरवठा योजना आणि खांबोरे पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फतच चालविण्यात यावी.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 110, पृष्ठ क्रमांक 79 अन्वये रस्ते आणि पुलांसाठी 72 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, अकोला जिल्ह्यामध्ये चिखलगाव हे एक छोटे गाव आहे. त्या ठिकाणी एक छोटा पूल असून तो अत्यंत खराब परिस्थितीमध्ये आहे. त्यामुळे चिखलगावामधील लोकांना 10 किलोमीटरचा फेरा मारुन गावामध्ये यावे लागते. या पुरवणी मागणीच्या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, या पुलाच्या दुरुस्तीसाठी वाढीव निधीची तरतूद करावी.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 110, 101 व 102, पृष्ठ क्रमांक 64 अन्वये राज्यातील नगरपालिकांसाठी 17 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील अ, ब व क नगरपालिकांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. नागरीकरणात सातत्याने वाढ होत आहे. अशा परिस्थितीत सर्व नगरपालिकांसाठी वाढीव तरतूद करावी. त्यामध्ये अकोला नगरपालिकेची स्थिती अत्यंत वाईट आहे. राज्यातील 227 नगरपालिका आणि 22 महानगरपालिकांमध्ये शेवटची नगरपालिका म्हणून अकोला नगरपालिका ओळखली जाते. माननीय नगर विकास राज्यमंत्री हे

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया............

अकोला जिल्ह्यातील आहेत. अकोला नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. त्या ठिकाणी असलेले आयुक्त आणि उपआयुक्त नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी छोट्या छोट्या दुकानदारांना किंवा हॉटेल व्यावसायिकांना पार्किंगची व्यवस्था नाही, बोर्ड लावलेला नाही, या कारणासाठी दंड आकारीत आहेत किंवा त्यांच्या आस्थापना बंद करीत आहेत. यामुळे अकोला नगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारणार नाही. माझी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी अकोला नगरपालिकेसाठी भरीव आर्थिक तरतूद करावी. एवढी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिभाऊ राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 180, पृष्ठ क्रमांक 145 अन्वये इतर मागासवर्गीयांसाठी 50 कोटी, भटक्या व विमुक्तांसाठी 100 कोटी आणि एसबीसीसाठी 20 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु, मी गेल्या कित्येक वर्षांपासून पहातो आहे की, विद्यार्थ्यांना वेळेवर स्कॉलरशिप मिळत नाही. गरिबीतून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप योजना सुरु करण्यात आलेली आहे. यासाठी 350 कोटी रुपयांची आवश्यकता असताना केवळ 170 कोटी रुपयांची तरतूद आतापर्यंत झाली आहे. त्यामुळे अनुशेष राहणार आहे. पुढील वर्षी विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागणार आहे. राज्यात भटक्या व विमुक्तांची लोकसंख्या केवळ 22 टक्के आहे. परंतु, त्यांच्याकडे कोणाचेही लक्ष नाही.

सभापती महोदय, मला आठवते की, स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी भटक्या व विमुक्तांसाठी स्वतंत्र विभाग सुरु केला. परंतु, आता मी पहातो आहे की, तो विभागच मला कोठे दिसला नाही. त्यावेळी माननीय श्री.मनोहर जोशी हे मुख्यमंत्री होते. मुंडेसाहेबांनी स्वतंत्र विभाग सुरु करण्यासाठी आग्रह धरला होता. परंतु, मुख्यमंत्री महोदयांचा त्याला विरोध होता. एकदा मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी विदेशात गेले. त्या काळात गोपीनाथराव मुंडे यांनी मंत्रिमंडळाची मंजुरी घेतली आणि हा विभाग सुरु केला. हा इतिहास आहे. परंतु, आज या विभागाला सर्व लोक विसरले आहेत. आम्ही सातत्याने मंत्री महोदयांकडे स्कॉलरशिप देण्याची मागणी करतो. परंतु, ते असे सांगतात की, या विभागासाठी बजेट नाही. भटक्या व विमुक्तांसाठी बजेट नाही. आजपर्यंत ज्यांनी राज्य केले, त्या राज्यकर्त्यांचा हा दोष आहे.

सभापती महोदय, भटक्या व विमुक्तांसाठी राज्य शासनाने वसंतराव नाईक महामंडळाची स्थापना केली. आपण या महामंडळाची 28 कोटी रुपयांची गॅरेंटी घेतली. परंतु, केंद्र सरकार ही गॅरेंटी मानण्यास तयार नाही. राज्य शासनाला विनंती आहे की, हे पैसे केंद्र सरकारकडून त्यांनी मिळवावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिभाऊ राठोड............

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 220, पृष्ठ क्रमांक 195 अन्वये वनबंधु कल्याण योजनेसाठी तरतूद करण्यात आली आहे. परंतु, या ठिकाणी रू.1000 ची लाक्षणिक पूरक मागणी, असा शब्द प्रयोग करण्यात आला आहे. मला लाक्षणिक पूरक मागणी या शब्दाचा अर्थ समजलेला नाही. कदाचित ही प्रिंटिंग मिस्टेकही असू शकेल. मंत्री महोदयांनी याबाबतचा खुलासा त्यांच्या उत्तरात करावा.

सभापती महोदय, आदिवासींना शासनाकडून खावटी दिली जाते. आमचे नेते माननीय श्री.दादाराव मडावी आणि मी एकदा माननीय श्री.शरद पवार यांच्याकडे गेलो होतो. त्यांना आम्ही समजावून सांगितले की, आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. आदिवासी तेव्हा बाहेरही पडू शकत नाही. साधारणपणे एकदा पावसाची झड लागली की, 8-10 दिवस पाऊस थांबत नाही. मी आदिवासी भागातील आहे. आमच्या भागात अनेक आदिवासी लोक आहेत. खावटी या प्रकारालाच पोषण आहार असे म्हणतात. हा पोषण आहार जून, जुलै मध्ये द्यावयाचा असतो. माझ्या जिल्ह्यात अद्याप पोषण आहार मिळालेला नाही. त्यासाठी केलेली तरतूद सुध्दा तुटपुंजी आहे. प्रत्येक वेळी तरतूद नसल्यामुळे जून, जुलै मध्ये पोषण आहार दिला जात नाही. याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एका गोष्टीचे मी अभिनंदन करीन की, शासनाने मॉरीस कॉलेजचे नामकरण वसंतराव नाईक असे केले आहे. येथील मुलींच्या वसतिगृहासाठी शासनाने 4 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्याचेही मी स्वागत करतो. मुलांच्या वसतिगृहाची दुर्दशा झाली आहे. त्यामुळे त्यासाठी देखील 4-5 कोटी रूपयांची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.मा.शिगम.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 21:30

श्री. हरिभाऊ राठोड...

नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 165 वरील बाब क्रमांक 190मध्ये केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत केलेली तरतूद खर्च झालेली आहे काय हे मंत्री महोदयांनी तपासून पहाण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसे यांनी आपल्या भाषणामध्ये 50-50 टक्क्याची तरतूद रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. कापूस वेचणारा मजूर क्विंटलला 500 रुपये मजुरी घेतो. या कापूस वेचणाऱ्या मजुराला देखील रोजगार हमी योजनेंतर्गत कापूस वेचण्याचे काम दिले तर त्याच्या हाताला काम मिळण्यास मदत होईल. या कापूस वेचण्याच्या कामाचा समावेश रोजगार हमी योजनेमध्ये करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, ज्या मुलांना आई-वडील नसतात अशा मुलांना बालकाश्रमामध्ये ठेवले जाते. या बालकाश्रमासाठी मंत्रीस्तरवर निधी उपलब्ध होत नसून तो सचिवस्तरावर उपलब्ध होतो. प्रत्येक वेळी निधी मिळण्यामध्ये अडथळे आणले जातात. बालकाश्रमाला पोषण आहार मिळणे, शिक्षकांचे पगार मिळणे, असे अनेक प्रश्न आहेत. हे विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना बाहेर प्रादेशिक औद्योगिक संस्थांचे निदेशक उपाषणाला बसलेले आहेत. त्यांना पगार मिळालेले नाहीत. त्यांना नियमित केलेले नाही. मंत्री महोदयांनी त्यांच्या मोर्चाला भेटून त्यांचे प्रश्न सोडवावेत अशी विनंती करतो आणि मागण्यांच्या संदर्भात मी ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांचा शासनाने विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-2015च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

नगरविकास विभागाच्या पान क्रमांक 70 वरील बाब क्रमांक 98 संबंधी बोलत असताना मला टोलच्या संदर्भात काही गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. टोल या विषयावर काही दिवसापासून चर्चा सुरु आहे. आता झालेल्या विधानसभेच्या निवडणुका ह्या काही अंशी टोलच्या प्रश्नावर लढविल्या गेल्या असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. कोल्हापूरच्या टोलचा प्रश्न आहे, खारघर तसेच ठाणे येथील टोलचा प्रश्न आहे. या टोलच्या प्रश्नावर राजकीय पक्षांनी रस्त्यावर येऊन आंदोलने केल्यामुळे मागच्या सरकारला काही निर्णय घेणे भाग पडले. कोल्हापूरच्या टोल नाक्यावर मंत्री महोदय श्री. चंद्रकांत पाटील, माजी मंत्री महोदय सतेज ऊर्फ बंटी पाटील हे संघर्ष कमिटीमधून रस्त्यावर उतरले होते. लोकांसाठी टोल की टोलसाठी लोक असा प्रश्न निर्माण झालेला होता. आता नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर या टोलच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल असे वाटले होते. अद्याप कोल्हापूरच्या टोलबाबत निर्णय झालेला नाही, तेथील नागरिक टोलच्या प्रश्नावर रस्त्यावर येऊन आंदोलने करीत आहेत. खारघर टोलच्या प्रश्नी काँग्रेस पक्षाच्या एका खासदारांनी त्यांचा पक्ष सोडला आणि ते भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढले. या टोल नाक्याच्या संदर्भात माजी अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, टोलचा जो 1200 कोटी रुपये खर्च आलेला आहे तो सिडकोच्या माध्यमातून नगरविकास विभाग देऊ शकेल. परंतु माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी धाडसाने तो निर्णय घेतला नाही. त्यांनी तो निर्णय घेतला असता तर काँग्रेस पक्षाच्या एका खासदाराला आपल्याच पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढविता आली असती. परंतु तसे झाले नाही. श्री. प्रशांत ठाकूर यांनी निवडणूक जिंकली. सत्ता हाती आल्यानंतर आणि शपथ विधी झाल्यानंतर या टोलच्या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यास त्यांनी सुरुवात केली. परंतु अजूनही खारघरच्या लोकांना न्याय मिळालेला नाही ही शोकांतिका आहे. ठाण्याचे आमदार श्री. प्रताप सरनाईक तसेच मंत्री महोदय श्री. एकनाथ शिंदे हे आता सत्तेमध्ये आहेत. त्यांनी देखील ठाण्याचा टोल बंद होण्यासाठी आंदोलन केले होते. त्यांच्या कार्यकर्त्यांनी टोल कार्यालयाची

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तोडफोड केली होती. आता ते सत्तेत आल्यानंतर देखील ठाण्याचा टोल बंद झालेला नाही. या टोलची निर्मिती बीओटी तत्वावर झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या गोष्टीचा उल्लेख केला. पुण्याच्या द्रुतगती मार्गावर टोल घेतला जातो. परंतु त्या मार्गावर पडलेले खड्डे बुजविले जात नाहीत. राज्यातील टोलचा प्रश्न शासनाने निकाली काढावयास पाहिजे. काही टोल नाके आज बंद पडलेले आहेत. काही ठराविक अंतरावरचे टोल नाके आपणाला बंद करता येतील. त्या टोल नाक्याचे पैसे राज्य सरकारने स्वत:च्या तिजोरीतून देण्याचा धाडसी निर्णय घ्यावयास पाहिजे. राज्याचे नवे मुख्यमंत्री टोलमुक्त महाराष्ट्राचे धोरण जाहीर करुन नागरिकांची मने जिंकतील असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, नवी मुंबई येथील सिडकोने बांधलेल्या इमारती जुन्या झालेल्या असून त्या केंव्हाही कोसळण्याच्या स्थितीत आहेत. या इमारतींची पुनर्बांधणी करण्यासाठी 4 एफएसआय देण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे हे नगरविकास खात्याचे राज्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी या इमारतींची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. माजी मंत्री महोदय श्री. गणेश नाईक यांनी या जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणी करिता माननीय मुख्यमंत्र्यांकडे अनेक निवेदने दिली. निवेदने देऊन ते थकले. आता नवीन सरकार आलेले आहे हे सरकार या इमारतींच्या पुनर्बांधणीच्या संदर्भात आणि एफएसआयच्या संदर्भात निर्णय घेईल असा विश्वास वाटतो. या जुन्या इमारती कोणी बांधाव्यात असा काही लोकांनी प्रश्न उपस्थित केला. जुन्या घरांची पुनर्बांधणी विकासकाच्या माध्यमातून न करता ती सिडकोच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घ्यावा. अन्यथा या इमारती कोसळून जीवित हानी झाली तर त्याचा ठपका सरकारवर येईल. म्हणून या बाबतीत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, एलबीटीचा मुद्दा फार गाजला. (अडथळा) ...

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, एक एक तास भाषण करण्यापेक्षा जी बाब आहे त्या बाबीपुरते सदस्यांना मर्यादित भाष्य करता येते. पुरवणी मागण्या म्हणजे बजेट नाही. पुरवणी मागणीपुरते मर्यादित बोलावे लागते. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ते कितीही बोलले, काही बोलले तरी आम्ही उत्तर देऊ शकणार नाही आणि त्याची नोंद सुध्दा घेणार नाही. हे बरोबर नाही. जी बाब आहे त्या अनुषंगाने बोलले पाहिजे. सभागृहात जे माननीय सदस्य हजर नसतील त्यांच्या मुद्यांबाबत मंत्री महोदय उत्तर देणार नाहीत. सभागृहात पुरवणी मागण्यांवर बोलायचे आणि निघून जायचे हे बरोबर नाही. सभापती महोदय, आपण त्यांना समज दिली पाहिजे. जे माननीय सदस्य सभागृहात हजर आहेत त्यांच्यापुरते मर्यादित उत्तर दिले जाईल.

**सभापती** : मी माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, सभागृहाच्या कामकाजाची पध्दत अशी आहे की, माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवर बोलत असताना पृष्ठ क्रमांक आणि बाब क्रमांकाचा उल्लेख करावा आणि आपले विचार मांडावेत.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, एलबीटीचा मुद्दा मांडताना बाब क्रमांकाचा उल्लेख करणे राहून गेले त्याबद्दल मी क्षमा मागतो. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 70, बाब क्रमांक 98. राज्यामध्ये एलबीटीचा प्रश्न गाजला आहे. या प्रश्नावर आघाडी शासनाच्या कार्यकाळातील अनेक लोकप्रतिनिधी निवडणुकीत पराभूत झाले. काही उद्योगपतींनी नवीन सरकार आपल्या विचाराचे असेल आणि ते सत्तेवर आल्याबरोबर एलबीटीचा प्रश्न निकाली निघेल या अपेक्षेने मतदान केले. सांगलीमधील व्यापाऱ्यांनी एलबीटीच्या मुद्यावर नवीन सरकार सत्तेवर आल्याबरोबर माननीय खासदार श्री.संजय पाटील यांच्या समवेत माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. नवी मुंबई महापालिकेच्या दृष्टीने हा प्रश्न महत्वाचा आहे. एलबीटीच्या माध्यमातून महानगरपालिकांना जे उत्पन्न मिळणार होते त्यामध्ये घट झालेली आहे. एलबीटीच्या माध्यमातून अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही तर महापालिकेचा कारभार चालविणे कठीण होईल. म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, एलबीटीच्या संदर्भात तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. जेणेकरुन स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले कामकाज करणे सोयीचे होईल आणि व्यापाऱ्यांना कर भरण्यामध्ये सुसूत्रता येईल.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 201, बाब क्रमांक 227, पणन विभाग. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात मी बोलू इच्छितो. प्रत्येक वेळी राज्यामध्ये कांद्याचे दर वाढले, भाजीपाल्याचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील.......

दर वाढले, अन्नधान्याचे दर वाढले की असे म्हटले जाते की, एपीएमसीच्या अधिकारातून हे वगळावे. परंतु कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा कारभार ज्या पध्दतीने चालतो तो लक्षात घेतला पाहिजे. शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेत येतो, व्यापारी त्या मालाची खरेदी विक्री करतात, त्यानंतर तो माल मुंबई शहर, नवी मुंबई व इतर जवळपासच्या शहरामध्ये पाठविला जातो. या प्रक्रियेमध्ये किती यंत्रणा गुंतली आहे त्याचा सरकारने विचार केला पाहिजे. त्यात कामगार आहेत, वाहतूकदार आहेत. कृषी पणन बाजार समिती राज्य सरकारने गठीत केली आहे. भविष्यात बाजारभाव पडले तर कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधून तो माल वगळण्याचा विचार करु नये. किंबहुना आम्ही यापूर्वीही सत्ताधारी पक्षात असताना सरकारला हेच सांगितले होते की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका आलेल्या असतील तर त्या निवडणुका घेण्यात याव्यात.

सभापती महोदय, ऊस, कापूस, अन्नधान्याबाबत राज्य सरकार आधारभूत किंमत निश्चित करते. परंतु टोमॅटो, कांदा, बटाटा, भाजीपाला यांच्या उत्पादनाबाबत आधारभूत किंमत निश्चित केली जात नाही. मी सत्ताधारी पक्षात असताना शेतमालासाठी आधारभूत किंमत ठरविण्याचा निर्णय घ्यावा अशी सरकारला विनंती केली होती. जेणेकरुन शेतकरी कर्जबाजारी होणार नाही, त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला चांगला भाव मिळू शकेल. बाजारामध्ये व्यापारी चांगला भाव देत नसेल तर शेतकरी उत्पादित केलेला माल रस्त्यावर आणून टाकतात. कारण अतिरिक्त उत्पादनामुळे बाजारभाव गडगडलेले असतात. त्यामुळे आधारभूत किंमत निश्चित केली तर त्यांना फार मोठा दिलासा मिळू शकेल.

सभापती महोदय, कामगार विभागाची बाब क्रमांक 158, 159. पृष्ठ क्रमांक 129. राज्याच्या नवीन सरकारचे उद्योगांसाठी एक वेगळे धोरण आहे, कामगारांसाठी वेगळे धोरण आहे. कामगार मंत्री श्री.प्रकाश महेता या ठिकाणी उपस्थित आहेत. सभागृहात एअरपोर्टमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली त्यावेळी त्यांनी एक धाडसी निर्णय सभागृहात जाहीर केला. कामगारांची चूक नसेल तर त्यांना पुन्हा कामावर पाठवू असे त्यांनी सांगितले. कामगार विभागामध्ये अत्यंत अपुरा कर्मचारी वर्ग आहे. कामगार आयुक्त आहेत. परंतु उप कामगार आयुक्त किती कार्यरत आहेत, किती निवृत्त झाले, नवीन भरती झाली आहे का याची मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. शासकीय कामगार अधिकाऱ्यांनी कामगार कायद्याची अंमलबजावणी करावयाची असते. त्यांची नव्याने भरती झालेली नाही. महाराष्ट्रात नवीन उद्योगधंदे वाढविण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील........

कितीही प्रयत्न केला तरी कामगार सुरक्षित राहतील याची शाश्वती नाही. कामगार मंत्र्यांना माझी विनंती आहे की, प्रथम कामगार विभागातील रिक्त अधिकाऱ्यांची पदे भरण्याचा प्रयत्न करावा.

सभापती महोदय, कोल्हापूर येथील कामगार कार्यालयासाठी निधी उपलब्ध करुन दिला ही चांगली बाब आहे. परंतु सातारा येथील कामगार कार्यालयाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. पावसाळ्यामध्ये त्या कार्यालयाचे छप्पर गळत होते. मंत्री महोदयांनी याबाबत जातीने लक्ष घालावे अशी माझी त्यांना विनंती आहे. ज्या कार्यालयामध्ये सहाय्यक कामगार आयुक्त, शासकीय कामगार अधिकारी बसतात त्या कार्यालयाचे छप्पर गळत असेल तर ते अधिकारी काम कसे करु शकतील? राज्यातील अनेक कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. सातारा जिल्हा कार्यालयात कर्मचारी कमी असल्यामुळे कामगार कायदे राबविण्यासाठी अधिकाधिक कर्मचारी उपलब्ध करुन द्यावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, प्रत्येक कार्यालयांमध्ये भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी याबाबत नियम आहेत. बोनस ॲक्ट आहे. या राज्यामध्ये स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.नरेंद्र तिडके यांनी माथाडी कामगारांसाठी फार मोठे योगदान दिले आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आपण निदेश देऊनही माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवर विचार मांडत असताना राजकीय भाषण करीत आहेत. सभागृहाच्या नियमातील अनेक आयुधांचा वापर करुन त्यांना आपले मुद्दे उपस्थित करता येऊ शकतील.

श्री.नरेंद्र पाटील : मी कामगार विषयाबाबत बोलत आहे. माझे काही चुकलेले नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, 10 वर्षे आम्ही विरोधी पक्षात असताना आम्हाला अशा प्रकारे बोलण्याची संधी मिळाली असती तर आम्ही आज मंत्री महोदयांच्या जागेवर असतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आताचे मंत्री महोदय विधानसभेचे सदस्य म्हणून पुरवणी मागण्यांवर बोलत असताना त्यांनी काय भाषण केले ते मी पटलावर ठेवू शकतो.

श्री.सुधीर मुनगंटीवार : (जागेवर बसून) 100 टक्के ठेवा.

**सभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असताना आपण काही मर्यादा पाळतो. बाब क्रमांक व पृष्ठ क्रमांक उद्धृत करण्याची मर्यादा पाळली पाहिजे. माननीय सदस्यांनी 90 टक्के भाष्य केलेले असल्यामुळे दोन मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 3जे..1...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील : महोदय, आपण केलेली सूचना योग्य आहे पण मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कोल्हापूरमध्ये कामगार कार्यालयासाठी 11 लाखाची तरतूद केली त्याप्रमाणे सातारा येथील कार्यालयासाठी देखील अशी तरतूद करावी आणि ही बाब मला सभागृहातच बोलावी लागणार आहे, बाहेर जाऊन बोलता येणार नाही म्हणून मी येथे मांडली. तसेच कामगार कायद्याच्या संदर्भात देखील मला बोलणे गरजेचे असून बऱ्याच लोकांचे म्हणणे ...

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांचा मुद्दा योग्य असला तरी त्यासाठी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून न्याय मिळू शकणार नाही कारण या विषयाच्या बाबतीत सविस्तर बोलता येणार नाही. त्यासाठी आपण अशासकीय ठरावाच्या माध्यमातून सभागृहात विस्तृतपणे चर्चा करुन मंत्री महोदयांकडून कायद्यात बदल करण्याचे आश्वासन घेऊ शकता.

श्री. नरेंद्र पाटील : महोदय, काही उद्योगपतींची व्यूहरचना अशी झाली आहे त्यामुळे मला ही बाब सभागृहात उपस्थित करणे गरजेचे होते. काही प्रमाणात कारखान्यांच्या माध्यमातून देखील हा कायदा वगळण्याचे कारस्थान रचलेले आहे. माझी कामगार मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांना विनंती आहे की, अनेक महापुरुषांचे हात हा कायदा तयार करण्यामध्ये लागलेले आहेत, काबाडकष्ट करणाऱ्या लोकांसाठी असलेला हा कायदा केवळ आपल्या विभागाच्या हलगर्जीपणामुळे रद्द होणार नाही याची दक्षता घेण्याची गरज आहे.

सिंचन विभागाच्या बाबतीत पृ.क्र. 115 आणि बाब क्र. 141 च्या अनुषंगाने मी बंधाऱ्यांचा विषय सभागृहापुढे मांडतो. सातारा जिल्ह्यात काही बंधाऱ्यांची कामे सन 1995 ते 1999 या युती शासनाच्या काळात सुरु झाली होती पण ती अद्यापही पूर्ण झालेली नाहीत. अशा ज्या ज्या कामांचे नारळ फुटलेले आहेत ती कामे आता आपल्या काळात तरी पूर्ण व्हावीत अशी कळकळीची विनंती मी करतो. याचे कारण म्हणजे त्या धरणांची कामे पूर्ण तर झाली नाहीच पण शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्यानंतर त्यांना मोबदलाही मिळाला नाही तो मिळाला पाहिजे आणि त्यांचे पुनर्वसन देखील झाले पाहिजे. असे केले तरच हे बंधारे बांधले जातील आणि त्यांच्या माध्यमातून दुष्काळी भागाला फायदा होऊ शकेल याकडे लक्ष द्यावे अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल पुन्हा एकदा आभार व्यक्त करुन आणि माझे चुकले असेल तर क्षमा मागतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. राहूल नार्वेकर ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पान क्र. 14, बाब क्र. 14 - गृह विभागाच्या संदर्भात मला एक बाब निदर्शनास आणावयाची आहे की, लाचलुचपत प्रतिबंधक केंद्रांसाठी ही अधिकची मागणी करण्यात आली आहे. लाचलुचपत विभाग म्हणजे ज्याप्रमाणे केंद्रात सीबीआय सारखी संस्था आहे त्याप्रमाणे राज्यातील एक प्रकारे व चांगली इन्व्हेस्टिगेटिंग बॉडी म्हणजे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आहे. या सीबीआय सारख्या संस्थेला वारंवार आणि वर्षानुवर्षे तसेच आता आलेले एनडीएचे सरकारने सुध्दा ॲटॉनॉमी देण्याचे वचन अनेक वेळा दिले आहे. त्याचबरोबर राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हा देखील एक महत्वाची बॉडी असून या इन्व्हेस्टिगेटिंग बॉडीला जर ॲटॉनॉमी दिली तर डिस्पेशन ऑफ जस्टीसमध्ये खूप फरक पडेल आणि ते या राज्याच्या हिताचेच ठरेल. माझी शासनाकडे कळकळीची विनंती आहे की, या अनुषंगाने योग्य ती पावले उचलून हे काम अगत्याने करावे.

यानंतर पान क्र. 15, बाब क्र. 15 च्या माध्यमातून चौकशीच्या दरम्यान जखमी अथवा मृत होणाऱ्यांना मोबदला देण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. मी आजच सकाळी नियम 289 अन्वये सभागृहात कस्टोडियन डेथबाबत सूचना दिली होती. हा विषय अत्यंत गंभीर आहे आणि त्याचे कारण राज्यात किंवा देशाच्या पातळीवर न्यायालयाने वेळोवेळी कठोर भूमिका घेतल्या आहेत आणि कस्टोडियन डेथ होतात त्यांना योग्य प्रकारे कॉम्पेन्सेशन मिळण्यासाठी देखील तरतूद करण्याची गरज आहे व याबाबतीत शासनाने जरुर विचार करावा.

यानंतर पान क्र. 15 आणि बाब क्र. 17 च्या अनुषंगाने ज्या पोलीस कर्मचाऱ्यांनी जनतेची सेवा करीत असताना बलिदान दिले अथवा जखमी झाले आहेत त्यांच्या कुटुंबियांना मोबदला देण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. 26/11 च्या हल्ल्यात महाराष्ट्र पोलिसांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली व कित्येक शूर पोलीस कर्मचाऱ्यांनी आपल्या जिवाचे बलिदान दिले. या बलिदानाला उतराई म्हणून 26/11 हा दिवस बलिदान दिवस म्हणून साजरा करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

........3

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. राहूल नार्वेकर .......

महोदय, पान क्र. 16, बाब क्र. 18 च्या माध्यमातून इन्व्हेस्टिगेटिंग लेबोरेटरीजसाठी तरतूद मागितलेली आहे. काही दिवसांपूर्वी माजी उप मुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेऊन ही बाब त्यांच्यासमोर ठेवली होती की महाराष्ट्र राज्यासाठी एक डेडिकेटेड फोरेन्शिक लॅब निर्माण करावी अशी मागणी केली होती. कारण सध्याच्या परिस्थितीत फोरेन्शिक लॅबच्या माध्यमातून इव्हिडन्स गोळा करण्यासाठी आपल्याला हे नमुने एकतर अहमदाबाद आणि बंगलोर येथे पाठवावे लागतात व त्यात काही महत्वाचे पुरावे गहाळ होण्याची भीती असते म्हणून आपल्या राज्यात अशा प्रकारची फोरेन्शिक लॅब निर्माण करावी, अशी माझी विनंती आहे.

पान क्र. 17 आणि बाब क्र. 21 च्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, पोलीस दलातील डिसप्युटचा जो मुद्दा आहे तो समोर येऊ नये, जनतेसमोर अशा प्रकारचे डिसप्युट आले तर पोलीस दलाबद्दल नागरिकांच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण होईल यादृष्टीनेही विचार करावा, अशी मागणी करतो.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर.....

सभापती महोदय, यानंतर मी महसूल व वन विभागाच्या पान क्र.42 वरील बाब क्रमांक 55 वर बोलणार आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये मोठ्या संख्येने खाजगी वन आहे. त्याबद्दलची भूमिका अजूनही स्पष्ट झालेली नाही. रायगड जिल्ह्यात मोठ्या संख्येने खाजगी वन आहे. जेथे एकही झाड नाही ती जमीन खाजगी वन म्हणून घोषित करण्यात आली आहे, तर जेथे झाडे आहेत तो भाग वन म्हणून घोषित करण्यात आलेला नाही. त्यामुळे खाजगी वनांसंबंधी आपल्याला निश्चित असे ठोस धोरण ठरवावे लागेल. हे काम लवकर झाले तर त्याचा फायदा नागरिकांना निश्चितपणे मिळणार आहे. त्याचप्रमाणे राज्यातील औद्योगिकीकरणाचा विषय देखील मार्गी लागू शकेल.

यानंतर मी पान क्रमांक 42 वरील बाब क्रमांक 56 वर बोलणार आहे. आपल्या राज्यात पक्षी अभयारण्य आणि वन्यजीव अभयारण्य आहेत. त्यांच्या विकासासाठी अधिकची मागणी करण्यात आली आहे. मुंबईच्या जवळ रायगड जिल्ह्यात कर्नाळा येथे पक्षी अभयारण्य आहे. हे पक्षी अभयारण्य कित्येक वर्षांपासून आहे. आज त्या पक्षी अभयारण्याची अवस्था बघितली तर प्रश्न पडतो की, आपल्याला खरोखरच पर्यटनाला स्कोप द्यावयाचा आहे की नाही ? या पक्षी अभयारण्यात कुठल्याही प्रकारच्या मूलभूत सुविधा नाहीत. मुंबई ही आपल्या देशाची आर्थिक राजधानी आहे. येथे दर दिवशी हजारो-लाखो लोक व्यवसाय, पर्यटनासाठी येत असतात. अशा लोकांनी पर्यटनासाठी एक दिवस बाहेर जाण्याचा विचार केला तर कर्नाळा हे ठिकाण पर्यटनासाठी योग्य आहे. या पक्षी अभयारण्याचा विकास करण्यासाठी शासनाने योग्य पावले उचलून निधी द्यावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो. असे केले तर येथील पर्यटनाला खूप वाव मिळू शकेल.

सभापती महोदय, यानंतर कृषि, मत्स्य व्यवसाय विभागाच्या पान क्रमांक 57 वरील बाब क्रमांक 85 वर बोलणार आहे. एनसीडीसीकडून फिशिंग इंडिस्ट्रीसाठी अनुदान मिळते. सदर अनुदान मिळण्यासाठी अनेक मच्छीमार सहकारी संस्थांनी अर्ज दिलेले आहेत. त्यातील कित्येक अर्ज प्रलंबित आहेत. शासनाकडे निधी नसल्यामुळे शासन आज मच्छीमारांना हप्त्याहप्त्यामध्ये निधी देत आहे. बोट बांधण्याकरिता किंवा बोटीचे आधुनिकीकरण करण्याकरिता 56 लाख रुपयाचा प्रस्ताव असेल तर त्यांना 2,3,4,5 वर्षात टप्प्याटप्प्याने 2 ते 5 लाख रुपये देण्यात येतात. ज्या कामासाठी ते पैसे दिलेले असतात ते त्यांना वापरता येत नाहीत. त्यामुळे मच्छीमारांना या सुविधेचा अजिबात फायदा होत नाही. आज शासनाने 9 कोटी रुपयांची मागणी केली आहे.

ॲड.राहुल नार्वेकर.....

पण सध्याचा पेंडन्सी रेट बघता 9.00 कोटी रूपये अत्यंत अल्प आहेत असे मला वाटते. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, मत्स्य व्यवसायासाठी किमान 20 कोटी रूपयांची तरतूद करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी मी स्वत: फिशिंग कमिशनरना भेटलो आहे. त्यांच्या बरोबर चर्चा केल्यानंतर निधीचा प्रश्न सभागृहासमोर मांडणे मी माझे कर्तव्य समजतो. तसेच, ससून डॉक येथे मोठ्या प्रमाणावर फिशिंग इंडस्ट्री चालते. तेथे दर दिवशी करोडो रूपयांचा व्यवहार होतो. ससून डॉकमधील खलाशांनी, नाखवांनी मोठ्या प्रमाणावर संप केला होता. जवळ जवळ एक महिना ससून डॉकमधील व्यवहार ठप्प झाला होता. आता तेथे इलेक्ट्रॉनिक मीटर लावल्यामुळे तो संप मागे घेण्यात आला आहे. यापुढे संप झाल्यानंतर इम्प्रूव्हमेंटच्या गोष्टी करण्यापेक्षा त्या आधीपासून करायला पाहिजे होत्या. शासनाने तेथे अगोदर योग्य ते लक्ष घातले असते तर बरे झाले असते. आपण तेथे आधुनिकीकरण केले तर मत्स्य व्यवसायाला खूप मोठा वाव मिळेल.

यानंतर मी नगरविकास विभागाच्या पान क्र.70 वरील बाब क्रमांक 98 वर बोलणार आहे. माझ्या अत्यंत जवळचा हा विषय आहे. पुण्यातील पिंपरी-चिंचवड येथील नागरी परिवहन व्यवस्थेसाठी अधिक तरतुदीची बाब मांडलेली आहे. सार्वजनिक वाहतुकीची व्यवस्था आपण नागरिकांसाठी उपलब्ध करून देतो. आज पिंपरी चिंचवड येथील नागरिकांवर अनधिकृत बांधकामाची टांगती तलवार लटकत आहे. या विषयासंबंधी शासनाने लवकरात लवकर तोडगा काढून काही तरी निर्णय घ्यावा अशी माझी कळकळीची विनंती आहे. यापूर्वी आघाडी सरकारने आपली भूमिका घेतली होती. त्या विषयी पावले उचलली होती. पण अद्याप काहीही तोडगा निघालेला नाही. यासंबंधी शासनाची स्पष्ट भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे या शासनाला मी आपल्या मार्फत विनंती करतो की, या बाबी संबंधातील स्पष्टता जनतेसमोर लवकरात लवकर आणावी.

यानंतर मी पान क्र.76 वरील बाब क्रमांक 104 संबंधी बोलणार आहे. आता सभागृहात माननीय वित्त मंत्री नाहीत. तरी देखील या बाबीची नोंद व्हावी असे मला वाटते. अतिशय महत्त्वाची अशी एक बाब आहे. आज जगभरात कच्च्या तेलाच्या किंमती अगदी खाली आलेल्या

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर.....

आहेत. त्यामुळे पेट्रोल, डिझेलसह अन्य कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्या आहेत. त्यामुळे राज्य शासनाने स्टेट टॅक्स कमी करण्याची आवश्यकता आहे. आज गोव्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. माजी मुख्यमंत्री श्री.मनोहर पर्रिकर यांनी गोव्यामध्ये इंधनाच्या किंमती अगदी कमी केलेल्या आहेत. हे करण्यासाठी त्यांनी तेथील स्टेट टॅक्सेस व इंधनावरील कर कमी केले. गोव्या सारखे लहान राज्य करू शकते तर महाराष्ट्र सारखे राज्य आपल्या जनतेसाठी स्टेट टॅक्सेस कमी करून इंधनाच्या किंमतीमध्ये अजून सवलत देऊ शकेल. त्याची नोंद माननीय वित्त मंत्र्यांनी घेतली तर त्याचा मला आनंद होईल.

यानंतर मी विधी व न्याय विभागाच्या पान क्र.122 वरील बाब क्रमांक 148 वर बोलणार आहे. उच्च न्यायालयामध्ये अधिक मोकळी जागा निर्माण करण्यासाठी तरतूद केली आहे. आज भारतामध्ये परदेशी गुंतवणूक का येत नाही ? ते न येण्याचे कारण आपला हाय ज्युडिशियरी पेंडन्सी रेट आहे. महाराष्ट्रात परदेशी गुंतवणूक वाढवावयाची असेल तर आपल्याला आपला ज्युडिशियरीमधील पेंडन्सी रेट कमी करणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतनर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. राहूल नार्वेकर .......

तर आपल्याला ज्युडीशिअरीमधील पेंन्डसी रेट कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. लोएस्ट ज्युडीशिअरीपासून राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेल्या ज्युडिशिअरी सिस्टीममध्ये लाखो प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने ज्युडिशिअल इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये वाढ करण्यासाठी योग्य ती तरतूद करुन ज्युडिशिअल इन्फ्रास्ट्रक्चर मध्ये जास्तीत जास्त लक्ष दिले तर प्रलंबित प्रकरणे जास्तीत जास्त निकाली काढू शकलो तर या राज्याला त्याचा फायदाच होईल.

सभापती महोदय, पर्यटनाला खरोखर चालना द्यावयाची असेल तर आपल्याला इन्कम जनरेटींग इन्स्ट्रुमेंट म्हणून बघण्याची गरज आहे. आज लाखो लोक मुंबईत येत असतात. परंतु सोमवार ते शुक्रवार काम केल्यानंतर शनिवार व रविवार या दोन दिवसाचा ब्रेक मिळाला तर या दोन दिवसात माणसाने काय करावयाचे हा प्रश्न पडतो. जर शासनाने पब्लीक सेक्टरमधून टूरिझमला वाव देण्यासाठी पाऊले उचलली तर लाखो पर्यटक महाराष्ट्रात येतील. महाराष्ट्रात आपल्याला पर्यटन वाढवावयाचे असेल तर आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईमध्ये टुरीझम वाढविण्यासाठी पाऊले उचलणे गरजेचे आहे. दक्षिण मुंबईत 5 मोठी फाईव्ह स्टार हॉटेल्स आहेत. परंतु या फाईव्ह स्टार हॉटेलमधून माणूस जेव्हा बाहेर येतो तेव्हा काय करायचे हा त्याच्या समोर प्रश्न असतो. आपल्याकडे ब्रिटीशांनी बांधलेले सुंदर हेरिटेज इन्फ्रास्ट्रक्चर्स दक्षिण मुंबईत आहेत. त्या ठिकाणी वॉकिंग स्ट्रीट तयार करण्याची आवश्यकता आहे. आपण एनसीपीएकडे कल्चरल स्ट्रीट बनवावयास पाहिजे. या सर्व गोष्टीकडे शासनाने लक्ष दिले तर पर्यटनासाठी आपल्या अधिकची तरतूद मागण्याची गरज पडणार नाही. पर्यटन विभाग स्वत:च एवढा पैसा कमावून देईल की, त्याचा फायदा आपल्या इतर विभागालाही होऊ शकेल. या ठिकाणी मी जे मुद्दे मांडले आहेत त्यासंदर्भात शासन योग्य ते पाऊल उचलले अशी आशा बाळगतो. धन्यवाद.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले ) : आदरणीय सभापती महोदय, पुरवणी मागण्यावर विचार माडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले प्रथमत: आभार मानतो.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 12 युनीक आयडेंटीफिकेशन क्रमांकाचा वापर बँक खात्यासह शासकीय योजनांसाठी करता येत असल्यामुळे त्याला महत्व आहे. या आधार कार्डच्या संदर्भात तहसिल पातळीवरील अनेक लोक आधार कार्डापासून वंचित राहत आहेत. या लोकांना कदाचित आधार कार्डचे गांभीर्य नसावे. आधार कार्डचा उपयोग केवळ निवडणुकीत मतदान करण्यापुरता मर्यादित आहे की, काय असा विचार त्यांच्या मनात दिसतो. या लोकांना आधार कार्ड न मिळाल्यामुळे हे लोक अनेक योजनांपासून वंचित आहेत.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 17 वर मी माझे विचार मांडणार आहे. कर्तव्य बजावतांना जखमी अगर मृत पावलेल्या कुटुंबियांना अत्यंत अपुऱ्या सुविधा आहेत. मृत पावलेले जे कॉन्स्टेबल किंवा कर्मचारी आहेत त्यांना सहा महिन्याच्या नंतर नोटीस देऊन पंधरा एक दिवसांनी त्यांचे निवासस्थान जबरदस्तीने खाली करुन घेतले जाते. मुंबईसारख्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था नाही तसेच दुसरे राहण्याचे ठिकाण नसल्यामुळे त्यांच्याकडून जबरदस्तीने निवासस्थान खाली करण्यात येऊ नये. जोपर्यंत पर्यायी व्यवस्था निर्माण होत नाही तोपर्यंत निवासस्थान खाली करण्यात येऊ नये यासाठी तरतूद केली जावी अशी सूचना करतो.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 16 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सन 2005 मध्ये या विषयावर अर्धातास चर्चा घडवून आणली होती. एफआरआय लॉंच करीत असतांना एफआरआय लॉंच करणारा जो कॉन्स्टेबल असतो त्याचे केवळ अक्षर चांगले असते म्हणून त्याला एफआरआय लॉंच करण्याच्या कामासाठी बसविले जाते. एफआरआय लॉंच करणाऱ्याच्या शिक्षणाकडे काहीच लक्ष दिले जात नाही. त्याला कायद्याचे ज्ञान आहे की, नाही तो पदवीधर आहे की, नाही हे सुध्दा बघितले जात नाही. तर केवळ अक्षर चांगले आहे म्हणून एफआरआय लॉंच करण्याचे काम दिले जाते. एफआरआय लॉंच करीत असताना कोणत्या कायद्याखाली लॉंच करायची असते याची त्याला काही सुध्दा कल्पना नसते. लॉंच करण्यासाठी आलेली व्यक्ती व्हीक्टीम असते त्याने आपले जे काही मत मांडले असते, ते एफआरआय लॉंच करणारा लिहित असतो. केवळ सुंदर अक्षर आहे म्हणून अशा व्यक्तीला



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .. ..

एफआरआय लॉंच करण्याचे काम दिले जाते. एफआरआय मधील त्रुटींमुळे दोषी व्यक्ती निर्दोष सुटतात. अर्धातास चर्चच्या वेळी सुध्दा मी माझे मत मांडले होते परंतु दुर्दैवाने या विषयाला न्याय मिळाला नव्हता. या विषयाच्या संदर्भातील दोन्ही मंत्री सुशिक्षित आहेत. एफआरआय लॉंच करणारा व्यक्ती किमान पदवीधर असावा, त्याला कायद्याचे थोडे तरी ज्ञान असावयास पाहिजे. त्यामुळे गृह विभागाने यासंदर्भात आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे की, एफआरआय लॉंच करीत असतांना त्या ठिकाणी किमान कायद्याचेज्ञान असणाऱ्या किंवा पदवीधर व्यक्तीला त्या ठिकाणी बसविण्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या संदर्भात बाब क्रमांक 23 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सकाळ या वर्तमानपत्रात चार पाच दिवसापूर्वी पोलीस लोक 24 तास डयुटी करीत असतात. रिलीव्हर न आल्यामुळे अनेक लोक 24 तास डयुटी करीत असतात. परवाच्या वर्तमान पत्रात रवि भवनवर माननीय मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी जी काही संरक्षण यंत्रणा आहे त्यांना 24 तासापर्यंत जेवण पोहचले नव्हते. या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता सुध्दा वेळेवर मिळत नाही. शहरी आणि ग्रामीण गृह विभागाला तरूण आणि तडफदार मंत्री लाभलेले आहेत. त्यामुळे या मंत्र्यांनी कॉन्स्टेबलसाठी अधिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. ही तरतूद केवळ महागाई भत्त्यापुरतीच मर्यादित राहता कामा नये यासाठी लक्ष देणे अधिक गरजेचे आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 86 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. बीड जिल्हयातील गेवराई-धारूर-वडवनी या ठिकाणी नवीन मॉडर्न इंग्लिश स्कूल देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. दोन वर्षापूर्वी सर्व शिक्षा अभियानांतर्गत निधी मंजूर करण्यात आला होता. वडवनी आणि गेवराई येथे केवळ जागेमुळे काम सुरु होऊ न शकल्यामुळे 15x15 च्या खोलीत 80 विद्यार्थी बसतात. या विद्यार्थ्यांना फळयाकडे नजर देण्यासाठी सुध्दा जागा नाही. नवीन मॉडर्न इंग्लिश स्कूल निर्माण करण्याचा निर्णय तत्कालीन राज्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .. ..

सरकारने घेतला होता परंतु जागेच्या अभावामुळे या निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. या शाळेसाठी उपलब्ध असतांना जागेअभावी निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित .......

या नवीन मॉर्डन इंग्लिश स्कूलमध्ये मराठी माध्यमातील निवृत्त झालेल्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या शिक्षकांचे वय 72 ते 75 वर्षे आहे. आपल्याकडे अनेक सुशिक्षित तरुण आहेत. पोस्ट ग्रॅज्युएट झालेले तरुण आहेत. ते आज नोकऱ्या मिळविण्यासाठी वणवण फिरत आहेत. आपण त्यांना संधी दिली पाहिजे. त्या शिक्षकांना 10 ते 15 हजार रुपये पगार देण्यात येत आहे. निवृत्त झालेल्या शिक्षकांना नियुक्ती दिल्याबद्दल माझी हरकत नाही. परंतु त्यांच्या वयाची निश्चितपणे अडचण होत आहे. ते शाळेत वेळेवर येत नसतील तर त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊन त्यांचे नुकसान होत असेल तर त्याबाबत जरुर विचार करावा. तेव्हा जिल्हाधिकारी स्तरावर एक समिती नियुक्त करुन या सुशिक्षित तरुणांची मुलाखत घेऊन त्यांची तात्पुरती नियुक्ती करावी अशी माझी या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने विनंती आहे.

बाब क्रमांक 245, पृष्ठ क्रमांक 212, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - बीडच्या आयटीआयमध्ये साधारणत: 40 टक्के पदे रिक्त आहेत. बीड हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. बीडच्या आयटीआयमधील प्राचार्याचे पद मागील अनेक वर्षापासून रिक्त आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सुविधा नाहीत त्यासाठी विशेष तरतूद करावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

बाब क्रमांक 227, पृष्ठ क्रमांक 201, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग - बीड जिल्ह्यात नाफेडच्या वतीने उडिदाची खरेदी चालू होती त्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. ज्या शेतकऱ्यांनी आपला उडीद तेथे दिलेला आहे त्यांची देणी अजून त्यांना मिळालेली नाहीत. या प्रकरणी दलालांची चौकशी होणार आहे. परंतु या चौकशीच्या फेऱ्यामध्ये शेतकऱ्यांना अडकवून नाफेडमार्फत खरेदी झालेल्या उडिदाची रक्कम मागील तीन वर्षापासून शेतकऱ्यांना देण्यात आलेली नाही. तेव्हा या बाबत मंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, दुष्काळ आणि अल्प पर्जन्यमान यामुळे पिकाचा उतारा कमी झाला याचा उल्लेख आलेला आहे. मी काल नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावर माझे म्हणणे मांडत असताना शेतीमालाचा उल्लेख केला होता. कापसा संदर्भात शेतकऱ्यांना बोनस देणार आहात की नाही याचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित ......

उल्लेख केला होता, परंतु त्या संदर्भात मंत्री महोदयांकडून कोणताही उल्लेख झालेला नाही. आजचे आयुध योग्य आहे की अयोग्य आहे हा भाग बाजूला राहिला. राज्य सरकारने पुन्हा एकदा कापूस आणि सोयाबीन पिकाला भाव देण्याच्या संदर्भात फेरविचार करावा अशी माझी मागणी आहे. किमान दुष्काळी भागापुरता तरी निर्णय घ्यावा अशी मी पुन्हा एकदा मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, शनिवार व रविवार अशी दोन दिवसांची सुट्टी असल्यामुळे मी गावाला गेलो होतो. मला अनेक शेतकऱ्यांनी विचारले की, कधी आणि केव्हा निर्णय होणार आहे. मी एका शेतकऱ्याच्या घरी जेवायला गेलो होतो त्याच्याकडे फक्त साडेसात क्विंटल कापूस होता. त्याने मला सांगितले की, अधिवेशनामध्ये कापसाच्या भावासंबंधी घोषणा होत असते. आपण नंतर भाव वाढवून देता आणि ते आमच्या पदरात पडत नाहीत. ती किंमत दलाला मिळते. तेव्हा मंत्री महोदयांनी कापसाला बोनस द्यायचा किंवा कसे या संदर्भातील निर्णय घ्यावा अशी त्यांना विनंती आहे.

बाब क्रमांक 174, पृष्ठ क्रमांक 144-सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग- गेवराई तालुक्यातील अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहासाठी मान्यता देऊन साधारणत: एक ते दीड वर्षाहून अधिकचा काळ झालेला आहे. या वसतिगृहासाठी जागा उपलब्ध असताना हे काम प्रलंबित का राहते ते मला कळत नाही. मी ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्यांना सांगितले की, आपणास फक्त जागेचा ताबा घेऊन ती संबंधित विभागाच्या ताब्यात द्यायची आहे. आपणास तेथे वसतिगृह उभे करता येईल. पण त्या कामाच्या बाबतीत सातत्याने पेन्डन्सी दाखविण्यात येत आहे आणि दुर्दैवाने त्या संदर्भात काही निर्णय होत नाही. या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत परंतु राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी या संदर्भात लवकर निर्णय घ्यावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

बाब क्रमांक 190, पृष्ठ क्रमांक 165 नियोजन विभाग - आज एमआरईजीएसच्या मजुरांना दिवसाला फक्त 162 रुपये मजुरी देण्यात येते. त्यापेक्षा जास्त मजुरी मिळत नाही. ही मजुरी वाढविण्याच्या संदर्भातील निर्णय जलसंधारण व ग्राम विकास विभाग मिळून घेणार आहे काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित ......

काही मजूर कापूस वेचणी करतात त्यांना दिवसाला 400 रुपये मजुरी मिळते. एमआरईजीएसची मजुरी 162 रुपयांच्या पुढे जाऊ शकत नाही. एमआरईजीएसवरील एखादा मजूर 200 रुपयांचे काम करीत असेल आणि आपण त्याच्या पदरात 162 रुपये टाकणार असाल तर ते योग्य नाही. एखादा मजूर सकाळी 7.00 वाजता कामाला लागतो तर दुसरा मजूर सकाळी 11.00 वाजता कामाला लागतो. आपण सर्व मजुरांना सब घोडे बारा टके असे समजणे चुकीचे होईल असे मला वाटते. तेव्हा एमआरईजीएसवरील मजुरी वाढविण्याच्या संदर्भात विचार व्हावा अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमाक 31, पृष्ठ क्रमांक 30, महसूल विभाग - बीड जिल्हयातील भूसंपादनाची 1247 प्रकरणांची रुपये 2656 कोटी इतकी रक्कम देणे बाकी आहे. हा विषय मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मांडला होता. अर्ध्यातासाची चर्चा देखील उपस्थित केली होती, परंतु दुर्दैवाने अजूनपर्यंत त्या संदर्भात निर्णय झालेला नाही. इतक्या मोठ्या रकमेचा निकाल आपण तातडीने करावा अशी माझी अपेक्षा आहे. बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी विविध प्रकल्पासाठी आपल्या जमिनी दिलेल्या आहेत. भूसंपादनाची एकूण 1247 प्रकरणे आहेत. या प्रकरणांच्या संदर्भात एक बैठक घेऊन काय निर्णय घेणार आहात हे सांगितले तर निदान पेन्डन्सी चार्टमध्ये ते दिसेल. तेव्हा या भूसंपादनाच्या प्रलंबित प्रकरणासंबधी मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात उत्तर द्यावे अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 35, महसूल व वन विभाग - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य करण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. बीड तालुक्यातील सहा गावे अजूनही कापूस अनुदान योजनेपासून वंचित आहे. ते पैसे इतर कामांसाठी वापरण्यात आले. मी जिल्हाधिकाऱ्यांना विचारल्यानंतर आम्ही नव्याने पैशाची मागणी करीत आहोत, पुरवणी मागण्यांमध्ये ती रक्कम येईल असे वाटते, असे त्यांनी सांगितले. परंतु दुर्दैवाने त्या संदर्भातील निर्णय झालेला नाही. ती सहा गावे आजही या योजनेपासून वंचित आहेत. तेव्हा या संदर्भात जरूर विचार करावा अशी माझी विनंती आहे.

..4..



श्री.अमरसिंह पंडित ......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बाब क्रमांक 74 व 75, पृष्ठ क्रमांक 53, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग - मी काल 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलत असताना सांगितले होते की, आपण शेततळ्यांच्या संदर्भात अटी आणि शर्ती घालू नयेत. एनआरएचएम अंतर्गत शेततळी घेण्यात येतात ती फक्त फळबागांपुरती मर्यादित असतात. शेततळ्यातील पाणी फळबागांना देणार असाल तरच शेततळे देण्यात येईल अशी अट आहे. आपण दुष्काळी भाग म्हणून शेततळे देतो. माझे असे म्हणणे आहे की, शेतकरी त्या शेततळ्यातील पाणी कापसाला देईल किंवा फळबागाला देईल, आपण त्यासाठी अटी का घालत आहात ?

यानंतर श्री,बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

फळबागा बघितल्यानंतर आपण शेततळी मंजूर करणार आहात. माझी विनंती आहे की, पॉलिथीन पेपरचा समावेश सुध्दा शेततळ्यांच्या अंदाजपत्रकात करावा. या अनुषंगाने मराठवाडा आणि विदर्भातील 5 हजार गावांच्या बाबतीत निर्णय घ्यावा. बीड जिल्ह्यातील 5-10 टक्के गावे वगळली तर उर्वरित 100 टक्के गावांच्या दृष्टिकोनातून निर्णय करावा. दुष्काळी भागात जे शेततळी करु इच्छितात त्यांना एनआरएचएम मधून 30 जूनपर्यंत शेततळी करण्याची परवानगी दिली आहे. एमआरईजीएसमधून शेततळी घेण्याची परवानगी दिली जाते. परंतु त्यामध्ये पॉलिथीन पेपरसाठी तरतूद केलेली नाही. बीड हा दुष्काळी भाग आहे. जमिनीची धूप खूप वाढलेली आहे. 10 हॉर्सपॉवरच्या मोटारीने आज सकाळी 10 वाजता शेततळे भरले तर दुसऱ्या दिवशी सकाळी 11 वाजता ते रिकामी झाल्याचे दिसते. यामुळे सरकारचे उद्दिष्ट साध्य होत नाही. सरकारच्या हेतूला न्याय दिला जात नाही. त्यामुळे ही शेततळी उभी करताना त्यांना पॉलिथीन पेपरसह मान्यता द्यावी अशी मी मुद्दाम मागणी करतो.

महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 169, लेखाशीर्ष 2515 च्या बाबतीत बोलतो. बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागात लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांसाठी निधीची तरतूद करुन त्या कामांना तत्कालीन सरकारने सुरुवात केली होती. परंतु नवीन सरकारने त्या कामांना स्थगिती दिलेली आहे. ही स्थगिती का दिली याचे कारण समजले नाही. या बाबतचा निर्णय नवीन सरकारने घेतला काय हे समजले नाही. ज्या कामांना स्थगिती दिलेली आहे त्यातील 50 टक्के कामे पूर्ण झाली आहेत. त्या कामांचे फोटो सुध्दा जिल्हा परिषदेला पाठविलेले आहेत. त्यामुळे या बाबतीत योग्य तो निर्णय करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बीड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागा अजून त्यांच्या नावे झालेल्या नाहीत. या बाबतीत मी दोन वेळा लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या जागेवर लोक अतिक्रमण करीत आहेत. ही बाब खूप गंभीर आहे. शहराच्या मध्यभागी पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची 10-15 एकर जागा आहे. ही जागा पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या नावे करण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 209 वर मी बोलतो. बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात एचआयव्ही बाधित रुग्णांची हेळसांड होत आहे. एआरटी सेंटरमध्ये या रुग्णांसोबत अमानवी व्यवहार होतो. या बाबतीत तक्रार करुनही प्रशासनात सुधारणा झाली नाही. तेथील तपासणीची यंत्रसामुग्री अजूनही धूळ खात पडली आहे. मी या बाबतीत दोन वेळा सूचना केली होती की, या बाबतीत आऊटसोर्सिंग करावे. तेथील रुग्णांना उपचारार्थ बाहेर पाठविण्याऐवजी राज्याच्या दृष्टीने आऊटसोर्सिंग करण्याचा निर्णय घ्यावा. या बाबत तांत्रिक सहाय्य घेऊन ही यंत्रसामुग्री वापरात आणण्याच्या हेतूने तातडीने निर्णया घ्यावा, अशी मी विनंती करतो.

महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्रमांक-261 वर मी बोलतो. या विभागाचे मंत्री तरुण आणि तडफदार आहेत. ते नव्या दमाचे आहेत. बीड जिल्हा हा दुष्काळी जिल्हा आहे. या जिल्ह्यातील 153 प्रस्ताव राज्य सरकारकडे प्रलंबित आहेत. हे प्रस्ताव क्षुल्लक कारणांमुळे प्रलंबित आहेत. या प्रस्तावांच्या बाबतीत होकारार्थी किंवा नकारार्थी निर्णय घेऊन ते प्रस्ताव मार्गी लावावेत. दुष्काळ शिगेला पोहोचण्यापूर्वी या बाबतीत सकारात्मक निर्णय घेतला तर हे 153 प्रकल्प अधिक सोयीचे होऊ शकतील. महोदय, माझ्या मतदारसंघातील उमापूर गावातून 40 टँकर भरले जातात. या वर्षी अधिकचे टँकर भरावे लागतील. उमापूर नळ पाणी पुरवठा योजना ही त्या भागातील एकमेव फिल्टर प्लांट असलेली योजना आहे. परंतु एका क्षुल्लक कारणामुळे तिचे काम अडलेले आहे. गेल्या वर्षी आमच्या भागात 150 टँकर्स सुरु होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर टँकरवर खर्च करणे आपल्याला परवडणारी गोष्ट नाही. उमापूर नळ पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव निकाली काढला तर या वर्षी 60 ते 65 टँकर्स तेथून भरता येतील. या बाबतीत निर्णय झाला नाही तर 40 कि.मी. पुढे यावे लागेल. शासनाचा हा खर्च टाळायचा असेल तर बीड जिल्ह्यातील उमापूर प्रकल्पासह प्रलंबित प्रस्तावांबाबत निर्णय घ्यावा लागेल.

महोदय, आताच मी नेटवर बघितले की, सावळेश्वर गावात तहसीलदार शेतपंपाचे कनेक्शन तोडण्यासाठी गेल्यानंतर गावकरी आणि त्यांच्यात वाद झाला. त्यामुळे पूर्ण गावाने रस्त्यावर येऊन दगडफेक केली. ही दगडफेक कोणीही जाणीवपूर्वक केली नाही. ती कोणत्या पक्षाने किंवा गटाने केली नसून, शेतकऱ्यांनी केली आहे. ..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

महोदय, गेवराई शहराला सागर बंधाऱ्यातून पाणी जाते. त्या ठिकाणी 30 हजार पेक्षा जास्त लोकसंख्या आहे. गेवराई शहराला दुसरा बॅकअप नाही. गेवराई शहराला केवळ त्या एका योजनेवर अवलंबून राहावे लागते. दुसऱ्या बॅकअपसाठी केतकपांग्रीच्या प्रकल्पाचे 79 टक्क्यांपेक्षा जास्त काम झाले आहे. हा प्रकल्प जलसंधारण विभागाचा आहे. या विभागाने या प्रकल्पासाठी भरीव तरतूद केली तर फार मोठे काम होऊ शकते. या प्रकल्पाचे केवळ मावेजाचे काही पैसे द्यायचे राहिले आहेत. या संदर्भातील निर्णय झाला तर गेवराई शहराला बॅकअप देणारी दुसरी योजना सरकारला तेथे तयार करता येईल. त्यामुळे केतकपांग्री येथील जो प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहे तो पूर्ण करण्याच्या बाबतीत सरकारचे काय नियोजन आहे, या बाबतचा उल्लेख माननीय मंत्र्यांनी उत्तरात करावा.

महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पुरवणी मागण्यांवर प्रत्यक्ष विचार व्यक्त करण्यापूर्वी आपल्या निदर्शनास आणून देतो की, आज सकाळी आपल्या दालनामध्ये सभागृहाच्या कामकाजाबाबत बैठक पार पडली. त्या बैठकीत दिवसभराच्या कामकाजाचा क्रम आपण ठरविला. त्या बैठकीला सत्ताधारी आणि विरोधी बाजूचे सन्माननीय नेते उपस्थित होते. आज सभागृहाचे कामकाज इतका वेळ चालवावे या बाबत त्या बैठकीत काहीही ठरलेले नव्हते. परंतु या बाबतीत नंतर ठरले. आता रात्रीचे 10 वाजून 40 मिनिटे झाली आहेत. परंतु...

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सकाळी माझ्या दालनात मी आपणा सर्वांना बोलविले होते. त्यावेळी माननीय संसदीय कार्यमंत्री, माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आणि इतरही काही मान्यवर उपस्थित होते. त्या बैठकीत आज किती कामकाज करायचे यावर चर्चा झाली. गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा प्रस्ताव प्रश्नोत्तराच्या तासानंतर घ्यावा आणि त्यानंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आणि त्यावरील उत्तर घेण्याचे ठरले होते. तसेच करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक घेण्याचे ठरले होते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

त्यानंतर सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण करायची, असे ठरले होते. एवढे आपण ठरविले होते. आपला मूळ अंदाज असा होता की, हे सर्व कामकाज संध्याकाळी सात-साडे सातपर्यंत संपेल. अलीकडच्या काळात एखादी चर्चा अडीच तासांची ठरविली तर प्रत्यक्ष ती चर्चा अडीच तासांत होत नाही. समजा ती चर्चा अचानक साडे तीन तासांवर गेली तर आपल्या कामकाजाचा एक तास निघून जातो. त्यामुळे ठरविलेले कामकाज पूर्ण करण्याकरिता आपण ठरविलेल्या वेळेपेक्षा काहीसा जास्त वेळ लागतो. आज आपण सकाळी ठरविले होते की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा आजच संपवायची, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा उत्तरासहित संपवायची, कालची नियम 260 अन्वयेची गारपिटीची चर्चा संपवायची. त्यामुळे आपल्याला एवढा वेळ लागला आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आता जवळपास रात्रीचे पावणे अकरा होत आले आहेत. सत्तारूढ पक्षासोबत ठरले होते की, काही कामकाज झाले पाहिजे आणि त्या दृष्टीकोनातून सहकार्य करण्यात आले. विशिष्ट वेळेपर्यंत सभागृहाचे कामकाज संपले पाहिजे, अशी अनेक वर्षांपासूनची प्रथा होती. त्यामुळे पत्रकारसुध्दा वेळेनंतर उपस्थित राहत नाहीत. एका विशिष्ट वेळेपर्यंत पत्रकार थांबत होते आणि त्यानंतर ते सुध्दा निघून जायचे. पूर्वी असे ठरविले होते की, एका मर्यादेपेक्षा अधिक वेळ सभागृहाचे कामकाज चालवू नये आणि त्यानंतर तशा पध्दतीची प्रथा पाळली गेली. परंतु, आज आपण पाहत आहोत की, ती प्रथा मोडीत काढली आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा संध्याकाळी 6 वाजता सुरू केली आणि ती चर्चा संध्याकाळी 7 वाजता संपवायची, असे ठरले होते. त्यानंतर सभागृहाचा वेळ रात्री 9 पर्यंत वाढविला. त्यानंतर सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वेळ वाढविला. चर्चा अजून चालू द्या. आम्ही 12 तास उत्तर देऊ शकतो. आता रात्रीचे 11 वाजले आहेत. पुरवणी मागण्यांवर जवळपास 5 तास चर्चा केली आहे. मला वाटते की, विधानपरिषदेच्या संपूर्ण काळात पुरवणी मागण्यांवर कधी इतका वेळ चर्चा झाली नाही. आपण चर्चेला वेळ दिला. सन्माननीय सदस्यांनाही बोलायचे होते. पुरवणी मागण्यांवर चर्चा करू, असे सर्वांचे मत झाले. अजून वेळ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

आपल्या हातात आहे, तशी काही घाई नाही. उत्तर देण्यासही वेळ लागेल. इतके सन्माननीय सदस्य बोलल्यानंतर उत्तराला किमान 3 तास लागणार आहेत. मी स्वत: तासभर बोलणार आहे. उत्तर सविस्तर आले पाहिजे. उत्तरात कमतरता राहता कामा नये. प्रत्येक माननीय मंत्र्यांनी 15 मिनिटे बोलायचे ठरविले तरी 3 तास होतात. त्यामुळे घाई नाही. आपण सभागृहाचे कामकाज असेच चालू द्यावे. मात्र सन्माननीय सदस्यांनी उत्तर ऐकण्यासाठी थांबावे, अशी आमची विनंती राहणार आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आता रात्रीचे 11 वाजत आले आहेत. आतापर्यंतची परंपरा मोडीत काढली का, हा विषय आहे. आपण अपवादात्मक स्थितीत चर्चा करावी. आपण बंधन टाकू शकता की, किती वेळपर्यंत बोलायचे. आपण यावर बंधन आणा, त्याबद्दल आमचे म्हणणे नाही. शेवटी एका मर्यादेपर्यंत सभागृह चालावे, अशी अपेक्षा आहे.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज सकाळी 11 वाजता सुरू झाल्यानंतर संध्याकाळी 6 वाजता बंद व्हावे, अशा पध्दतीचा नियम जरूर केलेला आहे. परंतु, आज पुरवणी मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर विनियोजन विधेयक येण्याच्या दृष्टीने सुध्दा एखादी तांत्रिक अडचण येऊ शकेल. सकाळीच आपण त्या संदर्भात चर्चा केली होती की, आपल्याला 3 महत्त्वाचे टप्पे आजच पूर्ण करावयाचे आहेत, त्यात पुरवणी मागण्या होत्या, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील उत्तर होते आणि सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी 260 अन्वये मांडलेल्या गारपिटीच्या प्रस्तावावरील चर्चा होतील. या तीनही चर्चा आजच व्हाव्यात, ही अपेक्षा होती. अपवाद म्हणून आजची वेळ वाढली आहे. आपण म्हणता त्या पध्दतीने पुन्हा एकदा माझ्या दालनात चर्चा करू. आपण सत्तारूढ पक्षात होता, त्यावेळी एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत 7-8 तास किंवा त्यापेक्षा जास्त चर्चा केलेली आहे. आपले म्हणणे एवढेच आहे की, हे सतत करू नका. आपले म्हणणे मान्य आहे.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, गेल्या 4 दिवसांपासून महाराष्ट्र विधानपरिषद नियम 156 अन्वये माननीय मुख्यमंत्र्यांचा ठराव या सभागृहात प्रलंबित राहत आहे. हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. देशभरात गाजलेला विषय आहे. त्यामुळे आपण हा विषय घ्यावा. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपल्यानंतर शेवटचा आयटम तो घेण्यात येईल. आता सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी आपले भाषण पुढे सुरू करावे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे. आता मी महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 35, नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी लेखाशीर्ष 2245 वर बोलणार आहे. राज्यातील मराठवाडा व विदर्भात दुष्काळाची भयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्याच भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरूआहे. सरकारला जाग आली आणि सरकारने शेतकऱ्यांसाठी 7 हजार कोटी रूपयांच्या पॅकेजची घोषणा केली. दुष्काळाने जी क्षेत्र बाधित झाली, त्या 93 हजार हेक्टर जमिनीबाबतीतील निधीही या पॅकेजमध्ये गृहीत धरून ठेवला आहे. तो निधी एकरी, हेक्टरी किती येणार आहे, हे सुध्दा पॅकेजच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना समजले पाहिजे, अशी माझी विनंती आहे. आम्ही 7 हजार कोटी रूपयांचा हिशेब काढला. आमच्या हिशेबाने एकरी 1400, 1450 रूपयांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना मिळणार नाही.

सभापती महोदय, मदत व पुनर्वसन विभाग पृष्ठ क्रमांक 35 वर बाब क्रमांक 40 मध्ये 2245 लेखाशीर्षाखाली आपण 2 हजार कोटी रूपयांची तरतूद ठेवली आहे. शेतकऱ्यांना 7 हजार कोटी रूपयांच्या पॅकेजमधील हेक्टरी किती पैसे मिळणार, हे पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून कळणे आवश्यक आहे. पुढील 5 वर्षांसाठी 34,500 कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर करून राज्यातील 5 हजार गावे दुष्काळमुक्त करण्याची घोषणा आज आपल्या सर्वांना आकर्षक वाटते. ही घोषणा आकर्षक वाटत असली तरी यामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या विविध योजनांचे सर्व आर्थिक विषय एकत्रित करून 35,400 कोटी रूपयांची घोषणा केली आहे. 7 हजार कोटी रूपयांचे पॅकेज घोषित केले. 14 तारखेला राज्यातील पाहणीसाठी केंद्रातील पथक येणार होते, ते काल आले. केंद्राचे पथक पाहणी करीत होते आणि आदल्या दिवशी राज्य शासनाकडून पॅकेजची घोषणा होऊन सुध्दा 10 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना या पॅकेजचा फायदा होणार आहे का, हा प्रश्न निर्माण होत आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.........

दुष्काळी भागातील शेतकऱ्यांची आज असलेली अवस्था कशामुळे झाली आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे. आज सोयाबीनला भाव नाही. सोयाबीनची विक्री हमी भावापेक्षा खालच्या दराने होत आहे. कापसाची तीच अवस्था आहे. तसे पाहिले तर सोयाबीनला 3957 रुपये हमी भाव मिळावा, अशी शिफारस राज्य सरकारने केली होती. तथापि, प्रत्यक्षात 2560 रुपये हमी भाव मिळाला. मागील वर्षी देखील 2560 रुपयेच भाव देण्यात आला होता. तोच या वर्षी दिला गेला. या वर्षी धानाला 1360 रुपये हमी भाव देण्यात आला. मागील वर्षी तो 1310 रुपये होता. त्यामुळे हमी भावात फक्त 30 रुपयांनी वाढ झाली आहे. मागील वर्षी मक्याचा हमी भाव 1310 रुपये होता. या वर्षी 1310 रुपयेच आहे.

सभापती महोदय, निवडणुकीच्या प्रचारसभांमध्ये सत्तारुढ पक्षाच्या प्रत्येक नेत्यांकडून असे सांगण्यात आले होते की, आपल्या उत्पादनांना उत्पादन खर्चापेक्षा 50 टक्के अधिक भाव दिला जाईल. परंतु, आज तसे झालेले दिसत नाही. कापसाचा हमी भाव केवळ 50 रुपयांनी वाढला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. सरकारने या शेतकऱ्यांना काही तरी मदत करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कापसाच्या बाबतीत मी असे ऐकले आहे की, शेतकऱ्यांना बोनस दिला जाईल. मला याबाबत काही सांगता येणार नाही. काही लोकांनी वर्तमानपत्रात असे वाचले की, बोनस दिला जाणार आहे. बोनस देण्यापेक्षा या शेतकऱ्यांच्या 7/12 वर कापसाचा जेवढा पेरा आहे, त्या पध्दतीने त्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 195, पृष्ठ क्रमांक 167 अन्वये माननीय नियोजन मंत्री महोदयांच्या मला हे लक्षात आणून द्यावयाचे की, ते विरोधी पक्षात असताना आमदारांचा स्थानिक निधी 2 कोटी रुपयांवरुन 5 कोटी रुपये करावा, अशी मागणी त्यांनी सातत्याने सरकारकडे लावून धरली होती. आज सकाळीच राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अभ्यासवर्गात त्यांनी केलेले भाषण मी लक्षपूर्वक ऐकले आहे.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.........

त्या भाषणात ते असे म्हणाले होते की, आजपर्यंत मी सरकारकडे जेवढ्या मागण्या केल्या आहेत, तेवढ्या मागण्या पूर्ण करावयाच्या असतील तर राज्याचे नाही तर देशाचेही बजेट पुरे पडू शकणार नाही. ही स्वाभाविक गोष्ट आहे. मला फक्त त्यांना एवढेच विचारावयाचे आहे की, त्यांनी सातत्याने आमदारांचा विकास निधी वाढवून देण्याबाबत मागणी केली आहे. आता ते अर्थमंत्री म्हणून याबाबत काही करणार आहेत का ? सत्तेत आल्यानंतर त्यांनी चंद्रपूरला बांबू क्लस्टर पासून महिला रुग्णालयापर्येंत सर्व गोष्टींसाठी निधी उपलब्ध करुन घेतला आहे. तशाच प्रकारे आमदार विकास निधीचा विचार ते करणार आहेत का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या ठिकाणी आमदार निधीबाबतची मागणी करण्यात येत आहे. मी विधानसभेत आणि विधानपरिषदेत सन्माननीय सदस्यांनी पोटतिडीकीने केलेली भाषणे ऐकली आहेत. शेतकऱ्याला मदत केली पाहिजे, याबाबतच्या त्यांच्या भावना जाणून घेतल्या आहेत. परंतु, आज राज्यावर आर्थिक ताण आहे. या वर्षी जर आपण आमदार विकास निधी गोठविला तर त्या माध्यमातून आपल्याला 700 कोटी रुपये प्राप्त होतील. त्यामधून आपण पॅकेजसाठी खर्च करु शकू. मंत्रिमंडळापुढे मी जाणार आहे. माननीय अर्थमंत्री श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्याशीही माझी चर्चा झाली असून त्यांनी संमती दिली आहे. दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी गोठवून आपल्याला 700 कोटी रुपये उभे करता येतील.शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत दिली पाहिजे, अशा भावना सन्माननीय सदस्यांनीच पोटतिडीकीने मांडल्या आहेत. त्यामुळे या प्रस्तावाला ते विरोध करणार नाहीत, अशी माझी अपेक्षा आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्या प्रमाणे महसूल मंत्री महोदय आमदार विकास निधी गोठविण्याबाबतचा विचार करीत आहेत, तशाच प्रकारचा सकारात्मक विचार त्यांनी अन्य योजनांच्या बाबतीतही करावा, अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 42 अन्वये मी एका महत्वाच्या मुद्याकडे सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. पदानुसार शैक्षणिक पात्रतेचे निकष धुडकावून राज्यातील

...3....



SRR/ प्रथम श्री.मंगेश...... 22:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.........

काही जिल्ह्यात सुमारे 2500 नॉन मॅट्रिक वन कर्मचा-यांना थेट वनपरिक्षेत्रात अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी दिल्याबाबतचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला आहे. याबाबत मॅटने स्पष्ट शब्दात ताशेरे ओढूनही प्रशासनातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही. या निमित्ताने मी हा विषय सदनासमोर उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभागाच्या बाब क्रमांक 227, पृष्ठ क्रमांक 201 अन्वये नाफेड मार्फत खरेदी केलेल्या शेत मालाची रक्कम पणन महासंघाला अदा करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, दुष्काळामुळे कापसाचे उत्पादन कमी झाले आहे. देशात सर्वाधिक कापसाची लागवड करणारा महाराष्ट्र कापूस उत्पादकतेमध्ये हेक्टरी 369 किलोवर स्थिरावला आहे. कापूस लागवडीमध्ये महाराष्ट्र वरुन पहिला आहे तर उत्पादकतेमध्ये शेवटून पहिला आहे. आपल्या राज्याच्या लगत असलेल्या गुजरात राज्याच्या तुलनेत आपले हेक्टरी उत्पादन निम्म्याहून कमी आले आहे. देशाची सरासरी उत्पादकता 565 किलो असताना राज्याची मात्र 369 किलो एवढीच आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशसह राज्यातील 20 जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक कणा असलेल्या कापसाला मिळणारा भाव आणि खरेदी मूल्य लक्षात घेऊन भविष्यात कापसाचे भाव कमी होऊ नयेत, उत्पादन कमी होऊ नये, यासाठी शासनाने सहकार, वस्त्रोद्योग आणि पणन विभागाच्या माध्यमातून काळजी घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सहकार विभागाच्या बाब क्रमांक 225, पृष्ठ क्रमांक 200 अन्वये मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, कालच आपल्या सभागृहात सहकार विभागाचे एक विधेयक मंजूर झाले आहे. परंतु, याबाबतीत भविष्यात काही अडचणी समोर येणार आहेत. संचालक मंडळाच्या ठरावान्वये प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीला जिल्हा बँक किंवा सहकारी दूध संघाची निवडणूक लढविता येते. त्यामुळे एखाद्या संस्थेमध्ये वर्चस्व असणाऱ्या बड्या पुढाऱ्याची मक्तेदारी निर्माण होऊन जिल्हा स्तरावरील सहकारी संस्था वर्षानुवर्षे त्यांच्या ताब्यात राहण्याचा धोका आहे. परंतु, परवा सभागृहाने मंजूर केलेल्या विधेयकाच्या माध्यमातून किंवा 97 व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून यामध्ये योग्य ते बदल होतील, अशी अपेक्षा आहे.

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.........

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 101 व 102 अन्वये मला शासनाला एवढीच विनंती करावयाची आहे की, राज्यातील सर्व अ, ब व क वर्ग नगरपालिका आणि नगरपंचायती मधील नगराध्यक्षांचे कार्यकारी अधिकार कायम रहावेत.

सभापती महोदय, सर्व अ, ब व क वर्ग नगरपालिका आणि नगर पंचायतींमधील राज्य संवर्गातील रिक्त पदांची भरती होणे अत्यंत गरजेचे आहे. उदाहरणार्थ, लेखापाल, अंतर्गत लेखापरीक्षक, पाटबंधारे अभियंता, पाणी पुरवठा अभियंता, कर निरीक्षक किंवा सहायक कर निरीक्षक यांची भरती होणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, युआयडीएसएसएमटी सारख्या केंद्रीय योजनेची देखील नगरविकास विभागाच्या माध्यमातून प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, अशी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री.मा.शिगम..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 23:00

श्री. धनंजय मुंडे...

युडी-6 अंतर्गत नगरपालिकांना जे आर्थिक सहाय्य केले जाते त्यामधील नगरपालिकांचा आर्थिक सहभाग कमी करुन राज्य शासनाचा आर्थिक सहभाग वाढवून या योजनेअंतर्गत 50 टक्के अनुदान व 50 टक्के कर्ज असे प्रमाण न ठेवता 80 टक्के अनुदान व 20 टक्के कर्ज असे प्रमाण ठेवणे आवश्यक आहे. रस्ते विकास वैशिष्टय पूर्ण अनुदान कोणताही पक्षपात न करता नगरपालिकाना देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत 80:20 चा आकृतीबंध 95:05 असा केला तर नगरपालिकांची प्रलंबित असलेली कामे मार्गी लागू शकतील.

नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 101, 102 च्या संदर्भात बोलत असताना मी सांगू इच्छितो की, राज्यातील नगरपालिकांच्या कर्मचा-यांच्या वेतनासाठी शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येते. शासन दरवर्षी सहायक अनुदानामध्ये 10 टक्क्यांनी वाढ करते. सहायक अनुदानामध्ये कर्मचा-यांचे नियमित पगार, सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांची पेन्शन, सहावा वेतन आयोग, ग्रॅच्युइटी आदी सुविधांचा लाभ या माध्यमातून मिळतो. मात्र शासनाने सहायक अनुदानात वाढ न करता कपात करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे मागील तीन वर्षापासून मराठवाड्यातील आणि राज्यातील 78 नगरपालिकेच्या कर्मचा-यांना पगार मिळालेला नाही. आज या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन, सहाव्या वेतन आयोगाचा लाभ, ग्रॅच्युईटी इत्यादीचा लाभ होत नाही. परळी नगरपरिषदेमध्ये सहायक अनुदानाचे अडीच कोटी रुपये अनुदान बाकी आहे. हे अनुदान येत नसल्यामुळे नगरपालिका कर्मचाऱ्यांचा पगार करु शकत नाही. या नगरपालिकांसमोर कर्मचारी उपोषणास बसलेले आहेत.

सामाजिक न्याय विभागाच्या पान क्रमांक 154 वरील बाब क्रमांक 177, 179 आणि 180 संबंधी बोलताना मी सांगू इच्छितो की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी तरतूद केलेली आहे. राज्यातील विविध प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी 170 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे करोडो रुपये थकीत असताना तरतूद मात्र 170 कोटी रुपये केलेली आहे.ही तरतूद वाढवावी अशी माझी शासनाला विनंती आहे. हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा विषय प्रलंबित आहे. त्यामध्ये देखील शासनाने लक्ष घालावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या पान क्रमांक 144 वरील बाब क्रमांक 176, मध्ये स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा चालविण्यासाठी अनुदान व अतिरिक्त कर्मचारी वर्ग व कनिष्ठ महाविद्यालयीन कर्मचारी वर्गाचे वेतन देण्याची बाब समाविष्ट आहे. बीड जिल्हयातील माध्यमिक आश्रमशाळांना जोडून उच्च माध्यमिक आश्रमशाळा चालविण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने मान्यता दिलेली आहे. मात्र या उच्च माध्यमिक आश्रमशाळामधील 100 पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना सन 2008 पासून वेतन आणि वेतनेत्तर भत्ते मिळालेले नाहीत. या कर्मचाऱ्यांनी अनेकदा उपोषणे केली आहेत. या कर्मचाऱ्यांना जोपर्यंत मान्यता मिळत नाही तोपर्यंत त्यांना वेतन आणि वेतनेत्तर निधी मिळणे शक्य नाही. म्हणून या कर्मचा-यांना मान्यता देणे आवश्यक आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पान क्रमांक 64 वरील बाब क्रमांक 93मध्ये अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीक-पूर्व शिष्यवृत्ती देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. शालेय शिक्षण आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री आता सभागृहामध्ये नाहीत. अभियांत्रिकी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना केन्द्र सरकारकडून मेरिट कम मिन्स शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी केंद्र सरकारकडून सन 2013-2014 वर्षाकरिता निधी देण्यात आलेला असताना देखील विद्यार्थ्यांना ती शिष्यवृत्ती मिळालेली नाही. ही शिष्यवृत्ती कोठे अडकली याचा शोध घेऊन ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्रमांक 90 आणि 91वरील बाब क्रमांक 110 व 112मध्ये मार्ग व पुलाच्या बांधकामावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद केलेली आहे. औरंगाबाद जिल्हयातील पैठण तालुक्यातील आपेगाव-पुरण पिंपरी दरम्यानचा पूल 9 नोव्हेंबर रोजी खचला. त्या ठिकाणी भरमसाठ वाळू उत्खनन करण्यात आले. वाळूचे टेंडर 2 कोटी 10 लाख रुपयाचे होते. परंतु त्या किंमतीच्या कित्येक पटीने वाळू उत्खनन करण्यात आले. परिणामी 2 कोटी 10 लाख रुपयाच्या टेंडरसाठी 10 कोटी रुपयाचा पूल खचला. भूकंपरोधक पध्दतीने हा पूल बांधलेला होता.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे....

आज दोन गावांचे दळणवळण बंद झालेले आहे. या पुलाच्या दुरूस्तीचे काम करावे अशी मी शासनाला या निमित्ताने विनंती करीत आहे.

गृह विभागाच्या पान क्रमांक 19 वरील बाब क्रमांक 16मध्ये होमगार्डच्या बाबतीत शासनाने चांगला निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाचे मी स्वागत करतो. पोलीस पाटलाचे मानधन वाढविण्याची मागणी अनेक वर्षापासून केली जात आहे. या मागणीचा विचार या पुरवणी मागण्याच्या माध्यमातून करावा. त्यांचे मानधन 7500 रुपये करावे अशी त्यांची मागणी आहे. शासनाने त्यांच्या मानधनामध्ये काही तरी वाढ करावी अशी या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी विनंती करतो.

गृह विभागाच्या पान क्रमांक 13 वरील बाब क्रमांक 13मध्ये पोलीस कर्मचा-यांची 10 हजार पदे निर्माण करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने 5 वर्षामध्ये पोलिसांची 55 हजार पदे भरण्याचा निर्णय आघाडी सरकारच्या काळात घेण्यात आला. त्यादृष्टीने 10 हजार पदे निर्माण करण्याची बाब उचित असून उर्वरित पदे भरण्यासाठी या सरकारने कालबद्ध कार्यक्रम आखावा अशी मी शासनाला विनंती करतो. कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात मी एक उदाहरण देऊ इच्छितो. 19 वर्षापूर्वी परळी शहर पोलीस ठाण्याला 126 पदे मंजूर करण्यात आली होती. आज शहराची संपूर्ण परिस्थिती बदललेली आहे, लोकसंख्या वाढलेली आहे, शहर वाढलेले आहे. अशा परिस्थितीत या पोलीस ठाण्याला 57 कर्मचा-यावर काम भागवावे लागते. संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परळी शहरासाठी 19 वर्षापूर्वीचा मंजूर आकृतीबंध बदलून अधिकची पदे मंजूर केली पाहिजेत. महाराष्ट्रात अशा प्रकारची अनेक पोलीस स्टेशन्स आहेत की त्यांच्या पदांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे, जेणेकरुन तेथील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मदत होऊ शकेल. मधल्या काळामध्ये परळी शहरासाठी एक पोलीस स्टेशन मंजूर करण्यात आले होते. त्याचे संभाजीनगर पोलीस स्टेशन म्हणून नामकरण झाले. त्या पोलीस स्टेशनसाठी कर्मचारी वर्ग देखील देण्यात आला. परंतु ते पोलीस स्टेशन अजून सुरु झालेले नाही. ते पोलीस स्टेशन सुरु व्हावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो. सभापती महोदय, मला पुरवणी मागण्यावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--

..4..

श्री. एकनाथराव खडसे ( महसूल, मदत कार्य व पुनवर्सन मंत्री) : सभापती महोदय, सन 2014-2015च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांचे मी सर्वप्रथम आभार मानतो. महसूल व वन विभाग, कृषी विभाग, पशु संवर्धन विभाग, मत्स्य व्यवसाय विभाग या संदर्भातील मागण्यावर ज्या ज्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत त्याची शासन निश्चितपणे नोंद घेईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या तेवढया पुरता मी खुलासा करीन. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी भूसंपादनाच्या 1247 प्रकरणांमध्ये 2656 कोटी रुपये मोबदला देणे बाकी आहे असे सांगितले. यामध्ये भूसंपादनाची 589 प्रकरणे असून त्यामधील वाढीव मोबदल्याची रक्कम ही 63,78,20,793 रुपये इतकी आहे.

..नंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

सदर प्रकरणी अपिलामध्ये वरिष्ठ न्यायालयाला स्थगिती आदेश असल्याने वित्त विभाग शासन निर्णय दिनांक 12.08.2014 मधील तरतुदीनुसार '8674 शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी' या लेखाशिर्षामधून वाढीव मोबदला रक्कम वित्त विभागाच्या मान्यतेने देण्यात येते. यामध्ये संपादक संस्था जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आहे, रोजगार हमी आहे. या प्रकरणाच्या निधीची मागणी संबंधित संपादक संस्थांकडे जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे. याची छाननी केली आहे. सद्य:स्थितीत मंत्रालय स्तरावरील एकही प्रकरण प्रलंबित नाही. प्रकरण छाननी करून आता वित्त विभागाकडे जाईल त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 85 संबंधी माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी एनसीडीसी अंतर्गत बोट बांधण्यासाठी टप्प्याटप्प्याने पैसे देण्यात यावेत याबद्दलची मागणी केली आहे. या बाबीमध्ये 20 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण 90 टक्के अर्थसहाय्य बोट बांधण्यासाठी मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांना दिले जाते. यामध्ये नियतव्यय फक्त 9 कोटी रुपये उपलब्ध झाला आहे. त्यामुळे 20 कोटी रुपयांची मागणी असताना फक्त 9 कोटी रुपये मिळाल्यामुळे सर्वांना मार्चपर्यंत हा पैसा देता येणार नाही. तीन महिन्यात 9 कोटी रुपये रक्कमेतून बोट बांधण्यासाठी मदत करता येईल.

सभापती महोदय, ससून डॉकमध्ये इलेक्ट्रानिक वजन काटे बसविण्यात आलेले आहेत. त्यासाठी संप करण्याची वाट न पाहता वैधमापन नियंत्रण कायद्यानुसार सर्व ठिकाणी वजन काटे बसविण्याच्या सूचना दिल्या असून त्याची कार्यवाही सध्या सुरु आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी राज्य शासनाने दुष्काळग्रस्तांसाठी विविध योजनांना एकत्रित करून 5 वर्षासाठी 35 हजार कोटी रुपयांची घोषणा केली आहे असे म्हटले आहे. एका वर्षात 7 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीतून 93 हजार हेक्टर बाधित क्षेत्रासाठी हेक्टरी किती मदत करणार या संदर्भात विचारणा केली आहे. दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी 3924 कोटी रुपयांचे ज्ञापन केंद्र शासनाकडे सादर केले आहे. केंद्र शासनाला जोपर्यंत पाहणी पथक अहवाल देत नाही तोपर्यंत केंद्र शासनाकडून पत्र अप्राप्त आहे, ते मिळालेले नाही. केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी मिळण्याची अपेक्षा आहे. अजूनही या संदर्भातील पूर्ण अहवाल राज्य सरकारला प्राप्त झालेले नाहीत. जे दिलेले पॅकेज आहे त्या माध्यमातून आणखी काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

अहवाल यायचे आहेत, माहिती यायची आहे. पूर्ण माहिती येत नाही तोपर्यंत प्रती व्यक्ती निश्चित किती मदत करु शकतो हे आपल्याला सांगता येत नाही. निश्चित ही जास्तीची मदत आहे, रोख मदत वेगळी आहे, साहित्य रुपाने दिली जाणारी मदत वेगळी आहे आणि दीर्घकालीन उपायाच्या संदर्भात द्यावयाच्या वस्तूंची किंमत वेगळी आहे. वेगळया स्वरुपाचा हा विषय असल्यामुळे सर्व माहिती एकत्रितपणे संकलित करुन आकडेवारी काढता येईल. परंतु आज तरी माहिती देणे अवघड आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी बीड तालुक्यातील 6 गावातील कापूस नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वाटप करावयाचा निधी डीपीसीडीमध्ये वळविण्यात आला, आपद्ग्रस्तांना तत्काळ निधी द्यावा असे सांगितले. डीपीडीसीकडे असा निधी वळविता येत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : जिल्हा बँकेने केलेली चूक आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सदर बाब तपासून घेतो. परंतु असे करता येत नाही. ती रक्कम तुम्हाला मिळाली पाहिजे. त्यासाठी पैसा दिलेला आहे. माननीय सदस्या श्रीमती हुस्नबानू खलिफे या ठिकाणी हजर नाहीत त्यामुळे त्यांच्या मुद्याबाबत उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय सदस्या सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांनी मांडलेल्या मुद्याबाबत उत्तर देण्याची आवश्यकता नाही असे मंत्री महोदयांनी म्हटले आहे. सदनामध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभाग घेऊन माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडले आहेत. ज्यावेळी तुम्ही विरोधात होता त्यावेळी तुम्हीही असेच करीत होते.

श्री.एकनाथराव खडसे : तुम्ही आम्हाला सांगायचे की, उत्तर लेखी स्वरुपात पाठवू. आताही रेकॉर्ड काढून बघा. सभागृहात सदस्य हजर नसतील तर उत्तर लेखी स्वरुपात पाठवून देऊ असेच तुम्ही सांगायचे. आताही शासनाने जे माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत त्यांच्या सर्व मुद्यांची नोंद घेतलेली आहे. त्यामुळे त्यांना वाऱ्यावर सोडून दिले आहे असे नाही. जी जूनी पध्दत होती तशीच आता आहे. त्यामध्ये काही बदल होणार नाही.

**सभापती** : या ठिकाणी पुरवणी मागण्याच्या निमित्ताने ज्या मुद्यांवर चर्चा झाली त्या त्या विभागांनी त्या मुद्यांच्या अनुषंगाने मंत्री महोदयांकडे माहिती पाठवून दिली तर ते सगळ्यांच्या दृष्टीने सोयीचे होईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभागृहात त्या मुद्यांबाबत बोलण्याची आवश्यकता नाही. त्यांची नोंद घेतली आहे, त्याबाबतचे उत्तर त्यांना लेखी स्वरुपात कळविण्यात येईल. कपात सूचनांबाबत विधानसभा सभागृहात उत्तर दिले जाते त्याच पध्दतीने त्यांना कळविण्यात येईल. माननीय सदस्य सभागृहात हजर राहिले असते तर त्यांच्या मुद्यांना उत्तर देता आले असते. ते सभागृहात हजर राहणे उचित ठरले असते. रात्री 11.30 ते 12.00 वाजेपर्यंत पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु राहणार असेल, आपण याठिकाणी थांबत असाल आणि प्रश्न उपस्थित करुन, भाषण करुन त्यांनी सभागृहातून निघून जायचे हे औचित्याला धरुन नाही. जे सभागृहातून बाहेर गेले तो त्यांचा अधिकार आहे.

माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी दुष्काळ निवारणासाठी 2000 कोटी रुपयांची तरतूद केली, त्याबाबत म्हणणे मांडले आहे. नेहमी पुरवणी मागण्यांमध्ये टोकन तरतूद केली जाते. ज्यावेळी टोकन तरतूद असते त्यावेळी 2000 कोटी रुपयांऐवजी 20 हजार कोटी रुपयांपर्यंत खर्च करण्याची मर्यादा आणि मुभा आपण सभागृहाकडे मागतो आणि रिॲप्रोप्रिएशनचे बिल येते त्यामध्ये ते मंजूर करतो. ती बजेटची सिस्टीम आहे. अनेक खात्यामध्ये टोकन तरतूद केली जाते. 1 रुपयाची टोकन तरतूद केली याचा अर्थ एकच रुपया काढला जातो असे नाही. त्यासाठी लागणारा निधी पुढे घेण्यात येतो. पुढे एखाद्या कामाच्या संदर्भात प्रशासकीय मान्यता मिळालेली असते. परंतु तांत्रिक मान्यता राहते, टेंडर प्रोसेस राहते, वर्क ऑर्डर राहते. पैसा कमी पडत नाही. आपल्याकडे कोणत्याही परिस्थितीत दुष्काळासाठी पैसा कमी पडत नाही. म्हणून आपण आमदार निधी गोठवित आहोत. त्यामुळे 700 कोटी रुपयांची मदत होणार आहे.

सभापती महोदय, नक्षलवादी हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या वारसांना 3 लाख रुपयांऐवजी 5 लाख रुपये मिळावेत असे आपले म्हणणे आहे. नक्षलवादी हल्ल्यात बळी पडल्यासंबंधी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे मृतकाच्या वारसांना 3 लाख रुपये मदत दिली जाते. सदर मदत केंद्र सरकारची असून ती प्रथम राज्य सरकारमार्फत दिली जाते. केंद्र सरकार मदत करते, फक्त राज्य सरकारमार्फत दिली जाते. आपली सूचना मान्य आहे. आपण केंद्र सरकारकडे नक्की या गोष्टीचा पाठपुरावा करु. राज्य सरकारकडे अशी मागणी आलेली आहे त्या अनुषंगाने प्रस्तावही पाठवू. निश्चित त्या प्रस्तावाबाबत आपण प्रयत्न करणार आहोत.

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक, माननीय सदस्या श्रीमती हुस्नबानू खलिफे, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या मुद्यांना लेखी उत्तर पाठविणार आहोत. या ठिकाणी कापसाच्या किंमतीबद्दल बोलले गेले. 4050 रुपये भाव दिला गेला. कापसाचे किंवा कोणत्याही धान्याचे भाव केंद्र सरकार ठरवित नसून कृषी मूल्य आयोगाकडून शिफारस केली जाते. कृषी मूल्य आयोग ही स्वायत्त संस्था आहे. आतापर्यंतचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. 2005 पासून 2015 पर्यंत आपण अमुक भाव द्यावा म्हणून सातत्याने आयोगाला कळवित होतो. परंतु कृषी मूल्य आयोग देशभरातील शेतीमालाला येणारा खर्च, खताचा खर्च विचारात घेऊन भाव जाहीर करतो. सोयाबीनच्या संदर्भात राज्य सरकारने 2013-14 मध्ये 3957 रुपये भावाची मागणी केली होती परंतु आयोगाने 2560 रुपये भाव जाहीर केला. कापसाला 6068 रुपये भाव मागितला होता. परंतु आयोगाने 4050 रुपये भाव जाहीर केला. 2014-15 मध्ये सोयाबीनला 3995 रुपये भावाची शिफारस केली असताना आयोगाने 2560 रुपये भाव जाहीर केला. कापसाला 6505 रुपये भावाची शिफारस केली असताना आयोगाने 4050 रुपये इतका कमी भाव दिला आहे. ही स्थिती आजची नाही. 2010-11, 2011-12, 2012-13 या वर्षात अशाच स्वरुपाने भाव जाहीर केले होते. 2010-11 मध्ये कापसासाठी 3697 रुपये इतकी मागणी केली असताना त्यांनी 3000 रुपये इतका भाव मान्य केला. त्यापुढील वर्षात 4285 रुपयांची मागणी केली होती. परंतु आयोगाने 3300 रुपये एवढाच भाव जाहीर केला. गेल्या 10 वर्षात ज्या ज्यावेळी महाराष्ट्र राज्याकडून शिफारस केली गेली तेवढा भाव कृषी मूल्य आयोगाने कधीच मान्य केलेला नाही.

नंतर 3एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ........

त्यामुळे नेहमीच तफावत राहिली आणि शासनाला त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही पण केंद्र शासनाच्या माध्यमातून यातून मार्ग काढता येईल.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी केवळ दुष्काळी भागातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. शासन या शेतकऱ्यांसाठी वेगळ्या रुपाने काही मदत करणार आहे काय, ज्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी बोनसबाबत चर्चा केली होती तशा रुपात बोनस देण्याचा शासनाचा विचार आहे काय?

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, कापूस आणि सोयाबीनला किती मदत करणार याबाबत खालच्या सभागृहात विश्लेषण केलेलेच आहे. सभागृहात बहुतांशी जे जे मुद्दे उपस्थित केले त्यासंबंधी शासन निर्णय घेईलच एवढे बोलून महसूल व वन विभाग, कृषी व पदुम विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पुरे करतो.

--------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश महेता (कामगार मंत्री) : महोदय, कामगार विभागाच्या दोन पुरवणी मागण्यांवर प्रामुख्याने सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनी उल्लेख केलेल्या आणि बंद पडलेल्या कंपनीतील कामगारांचे पगार थकित आहेत म्हणून या कंपनीला पुढील परवानग्या देऊ नयेत अशी मागणी केली. ही कंपनी 1 नोव्हेंबर, 2006 रोजी बंद पडली आणि त्यातील 154 कामगारांना 2.57 कोटी 8 हजार 800 रुपये एवढी रक्कम नियमानुसार अदा केलेली आहे. सन 2012 मध्ये 10 कामगार उच्च न्यायालयात गेले पण न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावताना कामगार आयुक्तांनी यासंबंधीचा निर्णय घ्यावा अशा सूचना दिल्या. त्या निर्णयाविरोधात हे कामगार सर्वोच्च न्यायालयात गेले असून तेथे ती याचिका प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी कामगार विभागातील अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आणले. मी त्यांना सांगू इच्छितो की, रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच एक पद कामगार आयुक्ताचे असून अपर कामगार आयुक्ताची एकूण 3 पदे आहेत त्यापैकी 2 पदे रिक्त आहेत. कामगार उपायुक्तांची 16 पैकी 3 पदे रिक्त आहेत. सहाय्यक कामगार आयुक्तांची 70 पदे असून त्यापैकी 24 पदे रिक्त आहेत आणि सरकारी कामगार अधिकाऱ्याच्या 145 पदांपैकी 102 पदे भरलेली असून 43 पदे रिक्त आहेत व ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे तसेच एमपीएससीकडे देखील मागणी पत्र पाठविले आहे, त्यानुसार लवकरच ही रिक्त पदे भरण्यात येतील. एवढे बोलून कामगार विभागाच्या दोन पुरवणी मागण्या मान्य कराव्यात, अशी विनंती करतो आणि थांबतो.

------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार (अर्थ व नियोजन व वन मंत्री) : महोदय, वन विभागाच्या मागणी क्रमांक सी-7, सी-10, बाब क्र. 42 ते 70, योजनेतर बाबींसाठी 40 कोटी रुपयांच्या आणि योजनांतर्गत बाबींसाठी 141.20 कोटी रुपयाच्या मागण्या, वित्त विभागाच्या बाब क्र. 103 ते 107, एकूण 12 कोटी 27 लाख 39 हजार रुपयांच्या, नियोजन विभागाच्या बाब क्र. 193 ते 204 कोटीची एकूण 184.69 कोटी रपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या आहेत.

महोदय, आपण गेल्या साडेचार तासापासून या खुर्चीत बसलेला आहात ते निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांबाबत आपले विचार व्यक्त केले. गेल्या 15 वर्षात सत्तेत असताना जी कामे ते करु शकले नाहीत ती कामे सत्तारुढ पक्षात आम्ही आल्यानंतर वेगाने करावीत अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा असली तरी त्यांनाही आमच्या बद्दल विश्वास आहे की, हे सरकार आपले प्रश्न सोडवू शकते, याबद्दल मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी आम्ही विरोधात असताना आमचीच भाषणे येथे उदाहरण म्हणून दाखविण्याचा प्रयत्न केला तरी मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही जी जी भाषणे केली ती जशीच्या तशी आमच्या आठवणीत आहेत. आपण आमदार निधीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला पण आपणास माहीतही नसेल की आमदाराने पत्र न देता विधानसभेत निवडून आलेल्या आमदारांना विशेष निधी म्हणून आम्ही 50 लाख इतका निधी दिला आणि तीच 144 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सभागृहासमोर आलेली आहे. याचा अर्थ असा आहे की, आपल्या मनात प्रश्न येण्याच्या अगोदर तो सोडविण्याचा आमचा पूर्ण प्रयत्न आहे. मला विश्वास आहे की, या सरकारच्या कामाच्या पध्दतीमुळे अजून काही दिवसात आपल्याला तिकडे बसावे असेही वाटणार नाही, आपण इकडे येऊन बसाल अशी माझी खात्री आहे. सभागृहाचे नेते माननीय श्री. एकनाथराव खडसे यांनी सांगितल्यानुसार जे जे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत त्यांच्याच प्रश्नांना मी उत्तरे देणार आहे.

त्यानुसार सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी चंद्रपूर जिल्हा दारुबंदीबाबत प्रश्न उपस्थित केला. त्या अनुषंगाने मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, मी विरोधी पक्षात असताना नेहमीच अशासकीय ठरावाच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करुन त्या त्या वेळेस मंत्र्यांकडून आश्वासन घेतलेले आहे. त्यामुळे हा विषय मीच सुरु

......4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार .......

केला व त्याला अंतिम रुप मीच देणार आहे. दुसरा प्रश्न त्यांनी विचारला की, वन हक्क कायद्याची योग्य व प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. हे खरे आहे कारण बाजूच्या मध्य प्रदेश राज्यात वन हक्क कायद्याची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी होत आहे आणि आपल्या राज्यात मात्र अपेक्षेनुसार तशी अंमलबजावणी होत नाही. अनुसूचित जाती व जमाती व इतर वन निवासी अधिनियम 2006 हा कायदा दि. 31 डिसेंबर, 2014 रोजी लागू झाला पण त्याची अंमलबजावणी मात्र आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून होते. आदिवासी विकास विभाग हा समन्वय विभाग आहे.

यानंतर श्री. भारवि ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार...

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाशजी गजभिये यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. विदर्भावर अन्याय होण्याचे दिवस आता संपले. आता विदर्भाला चांगले दिवस येण्यास सुरूवात झालेली आहे. वन तळ्यांसाठी दोन कोटी रूपयांची तरतूद कमी आहे असा प्रश्न आपण उपस्थित केला. यापूर्वी कधीही तरतूद होत नव्हती. पण आम्ही या वर्षी दोन कोटींची तरतूद केली. भविष्यात तांत्रिक व प्रशासकीय पदे भरून यासंबंधी एक धडक कार्यक्रम राबविण्याचा आमचा संकल्प आहे.

वन पर्यटनासंबंधी देखील प्रश्न उपस्थित करण्यात आले. येथे त्यांनी दोन कोटींचा देखील उल्लेख केला आहे. अर्थसंकल्पामध्ये जवळपास साडेआठ कोटींची तरतूद होती. अडीच कोटींची तरतूद राहिली होती. हे सर्व छोट्या वन पर्यटनासाठी आहे. आपण गोरेवाडा प्राणी संग्रहालयाला चालना देणार आहोत. इतकेच नव्हे तर ताडोबा व्याघ्रप्रकल्पा पर्यंत आपण डेक्क्न ओडिसी ट्रेन आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. विदर्भात कधीच डेक्कन ओडिसी ट्रेन येत नव्हती. ताडोबा येथे आता आंतरराष्ट्रीय पर्यटक येत आहेत. डेक्क्न ओडिसी ट्रेन ताडोबा पर्यंत नेण्याचा निर्णय झालेला आहे. बोरिवली येथे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आहे. गोरेवाडा प्राणी संग्रहालय, ताडोबा व्याघ्र प्रकल्प आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली या तीनही क्षेत्रांना विकसित करण्याचे काम आपण हातामध्ये घेतले आहे. हे काम भविष्यामध्ये आपण निश्चितपणे पूर्ण करणार आहोत. गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणी संग्रहालय निर्माण करण्याचा निर्णय झालेला आहे. आपण 17 कोटी रूपये कमी आहेत असा उल्लेख केला आहे. खरे म्हणजे 17 कोटी रूपये आपल्याला मार्च पर्यंत खर्च करावयाचे आहेत. किती खर्च होणार आहे हे लक्षात घेऊन अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते. विभागाने जेवढी मागणी केली आणि तेवढा निधी दिला नाही तर मग प्रश्न निर्माण होतो. गोरेवाडा येथील प्राणी संग्रहालयासाठी विभागाने 17 कोटी रूपयांची मागणी केली होती. त्यातील एकही रूपया कमी न करता आपण 17 कोटी रूपयांची मागणी मान्य केलेली आहे. या प्राणी संग्रहालयासाठी आपण काही निर्णय घेणार आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांचे याकडे लक्ष आहे. बायोपार्क, आफ्रिकन सफारी, नाईट सफारी करावयाची आहे. तसेच संशोधन देखील करावयाचे आहे. हा संपूर्ण प्रकल्प पीपीपी अंतर्गत करण्यात येणार आहे. यात सरकारचा 51 टक्के हिस्सा

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार...

राहणार असून 49 टक्के खाजगी उद्योजकाचा राहील.

सन्माननीय सदस्य श्री.राहुल नार्वेकर यांनी खाजगी वनांचा प्रश्न उपस्थित केला आहे. यासंबंधातील धोरण ठरविण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जाईल. त्यांनी कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये टुरिझम डेव्हलपमेंटसाठी प्रश्न उपस्थित केला आहे. तेथे रेस्ट हाऊस व 7 कक्ष आहेत त्याचा देखील निश्चितपणे विचार केला जाईल. वन विभागा अंतर्गत येणारी सर्वच विश्रामगृहे पाच वर्षात टप्प्याटप्प्याने अपग्रेड करण्यात येणार आहेत. त्यातून महसूलामध्ये भर पडेल आणि पर्यटनाचा आनंद महाराष्ट्रातील नव्हे, देशातील नव्हे तर परदेशातील नागरिकांना घेता येईल.

एस.एस.सी.पास नसलेल्या वन कर्मचाऱ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी दिली आहे. सदर अनियमितता सन्माननीय सदस्य श्री.धनंजयराव मुंडे यांनी निदर्शनास आणली. आपण वर्तमानपत्राचे जे कात्रण वाचले ते आम्हाला उपलब्ध करुन द्यावे. त्यासंबंधी निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. यासंबंधी चूक करणारी जी कोणी व्यक्ती असेल तिला कुठेही थारा देणार नाही, अशी भूमिका या शासनाची आहे.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी बांबू प्रशिक्षणासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी शेवटचा मुद्दा सांगतो आणि आमच्या मागण्यांना मनापासून पाठिंबा द्यावा अशी विनंती करतो. हा पाठिंबा नुसता होय म्हणून देऊ नका तर तो मनापासून द्यावा. कारण हे राज्य आपल्याला सुजलाम सुफलाम करावयाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वप्न साकार करणारा महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे. यासाठी मला आपल्या पाठिंब्याची गरज आहे. आपण बांबू प्रशिक्षण केंद्राची सुरुवात चंद्रपूर जिल्ह्यापासून करीत आहोत. चंद्रपूर हेच ठिकाण का निवडले असा प्रश्न अनेकांच्या मनात येईल. एक साधे कारण आहे. महाराष्ट्रात जेवढा बांबू होतो त्यापैकी 85 टक्के बांबू चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात होतो. त्याचे चांगल्या पद्धतीने संशोधन व्हावे असे आमचे मत आहे. 167 प्रकारच्या वस्तू बांबू पासून तयार होतात. चीनमध्ये तर बांबूपासून कापड तयार होते. येथे तरुणांना प्रशिक्षण द्यावे, रोजगार द्यावा म्हणून आम्ही हे केंद्र सुरू करीत आहोत. इतकेच नव्हे तर येथील आदिवासी, दलित, ओबीसी बांधव असतील त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून हे प्रशिक्षण केंद्र आपण उघडत आहोत. यात यश प्राप्त झाले तर त्याचा

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार...

निश्चितपणे विस्तार करता येईल. बांबू धोरणासंबंधी सन 2007 मध्ये ड्राफ्ट तयार झाला होता. दुर्दैवाने त्यास राज्य सरकाराने मान्यता दिली नव्हती. बांबू धोरणाच्या माध्यमातून आपण बांबू लागवडीला प्रोत्साहन देणार आहोत. केंद्र सरकारने बांबू मिशन सुरू केले आहे. त्याचा उपयोग राज्यातील जनतेसाठी करावयाचा आहे. मराठवाड्यामध्ये बांबू निर्माण होत नाही. मराठवाड्याला आमची सासुरवाडी आहे. वित्त विभागासंबंधी येथे जास्त प्रश्न उपस्थित करण्यात आले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. ते असते तर वित्त विभागासंबंधातील अधिकची माहिती त्यांना मला देता आली असती. राज्यावर कर्ज आहे ही बाब खरी आहे. आपल्या राज्यावर 3 लक्ष 444 कोटी रुपयांचे कर्ज आहे. एक मिनिटाला 4 लाख 35 हजार 500 रुपये व्याज राज्य सरकार देत आहे. एका दिवसाला शासन 63.00 कोटी रुपयांचे व्याज देत आहे. राज्यावर कर्ज असले तरी आत्मविश्वास जबर आहे. व्याज कितीही असले तरी लोकांच्या आशीर्वादाची शक्ती प्रचंड आहे. त्यामुळे हे राज्य निश्चितपणे वेगाने पुढे जाईल. आज आपल्या येथे इतर राज्यांची उदाहरणे देतात. पण एक दिवस असा येईल की, महाराष्ट्राचे उदाहरण इतर राज्यांमध्ये अभिमानाने सांगितले जाईल. आपले उदाहरण दीपस्तंभाप्रमाणे, मार्गदर्शक म्हणून घेतले जाईल. याच विचाराने आम्ही राज्याला पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहोत. हे सांगत असताना इतिहासाची पुनरावृत्ती होता कामा नये. त्या शुक्राचार्यांना आपण तेथेच संपवू या. आपण सर्वजण मिळून एकत्र येऊन पुढे जाऊ या. राज्याला प्रगतीच्या मार्गावर नेऊ या. या सर्व मागण्यांना एकमताने आपला पाठिंबा असेल अशी आम्ही अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या इतर ज्या काही सूचना आहेत त्या माझ्या विभागाशी संबंधित नाही. सन्माननीय सदस्यांनी भटक्या विमुक्त जातींना सवलती देण्याच्या संदर्भात सूचना केल्या आहेत. त्या त्यांनी वित्त विभागाच्या बाबींवर बोलताना जरी उपस्थित केल्या असल्या तरी त्या माझ्या विभागाशी संबंधित नाही. वित्त विभागाशी संबंधित बाबी ह्या अतिशय अल्प आहेत. नियोजन विभागावर तर कोणीच चर्चा केलेली नाही. वन विभागासंबंधी मी उत्तरे दिलेली आहेत. बाबी माझ्या विभागाशी संबंधित नसल्या तरी देखील आपण माझे सर्वजण मित्र असल्याने आपण

..4



BGO/ PFK 23:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार...

जेव्हा माझ्याकडे याल तेव्हा त्या बाबीवर निश्चितपणे चर्चा करण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने सांगतो व वित्त आणि नियोजन तसेच वने विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

.........

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रविण पोटे-पाटील (सार्वजनिक बांधकाम [सार्वजनिक उपक्रम वगळून] राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी नागपूर उमरेड रस्ता चौपदरी करण्याचा विषय मांडला. सदर कामे मंजूर झाली आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी टोल संबंधीचा प्रश्न मांडला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रविण पोटे-पाटील ....

सार्वजनिक बांधकाम विभागाची पूरक मागणी क्रमांक एच-3 अंतर्गत बाब क्रमांक 108 ते 132 अन्वये एकूण 346 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. सभागृहाने या मागण्या मान्य कराव्यात, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, उद्योग विभागाच्या पुरवणी मागण्यांवर काही सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्या सर्वांना मी धन्यवाद देतो.

सभापती महोदय, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे येथील कैद्यांच्या मजुरीच्या वाढीव दराचा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी बाब क्रमांक 157 अन्वये 5 लक्ष रुपयांची मागणी करण्यात आली असून बाब क्रमांक 160 व 161 अन्वये एकूण 55 लक्ष रुपयांची मागणी करण्यात आली आहे. याही विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला आणि बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभाग, ग्रामविकास विभाग व रोजगार हमी योजना विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या सर्वांना मी धन्यवाद देते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ राठोड यांनी राज्यातील बालगृहातील बालकांच्या संख्येनुसार अनुदान उपलब्ध होत नाही, असा मुद्दा उपस्थित केला आहे. राज्यातील बालसुधार गृहासाठी अर्थसंकल्पात जवळपास 35 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून यापेक्षा अधिक निधीची आवश्यकता असेल तर आवश्यकतेप्रमाणे निश्चितच पावले उचलली जातील.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ राठोड यांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी केंद्र सरकारकडून निधी प्राप्त होत असतो. त्यासाठी राज्य सरकारने निधीची तरतूद का केली आहे, असा प्रश्न उपस्थित केला होता. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत शासन प्रती वर्षी, प्रती कुटुंब 100 दिवसांचा रोजगार उपलब्ध करुन देत असते. कुशल कामाच्या 75 टक्के निधी केंद्र शासन उपलब्ध करुन देत असते. 100 दिवसावरील कुशल कामगारांच्या मजुरीच्या 25 टक्के खर्च राज्य शासन करीत असते व 75 टक्के खर्च केंद्र सरकार करीत असते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ राठोड यांनी कुशल व अकुशल कामाच्या संदर्भात असलेली 60:40 ची अट शिथिल करावी, अशी सूचना केली आहे. ही अट शिथिल करण्याबाबत विभागाकडून पावले उचलली जाणार असून केंद्र सरकारला तसे निवेदनही पाठविले आहे. खास करुन, राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे रोजगार वाढविण्याची गरज असून गरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजुराच्या हाताला काम मिळवून देण्याची आवश्यकता असल्याने कुशल व अकुशल कामा संदर्भात असलेली टक्केवारी 51:49 करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे ....

सभापती महोदय, नरेगातून जॉबकार्ड धारकांना कापूस वेचणीचे काम उपलब्ध करुन द्यावे, अशा प्रकारची सूचना सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ राठोड यांनी केली आहे. आम्ही सुध्दा विरोधी पक्षात असताना अशा प्रकारची सूचना शासनाला वारंवार करीत आलो आहोत. शेतीची कामे एमआरईजीएसच्या माध्यमातून केली गेली पाहिजे. महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेचा सन 2005 चा कायदा आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार अधिनियम 1977 हा दिनांक 6 ऑगस्ट, 2014 चा सुधारित कायदा असून त्यानुसार जी कामे नेहमी करावयाची असतात, अशी शेतीची कामे या योजने अंतर्गत करता येत नाहीत. परंतु तरी सुध्दा दुष्काळी परिस्थितीची दाहकता विचारात घेऊन यामध्ये काही बदल करुन या कामांचा समावेश करता येईल किंवा कसे, या बाबत आम्ही केंद्र सरकारला विनंती करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ज्या मौलिक सूचना केल्या आहेत, त्याबाबत त्यांना लेखी कळविण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे या ठिकाणी उपस्थित आहेत. सभागृहात सध्या त्या एकट्याच महिला सदस्या उपस्थित आहेत. त्यांनी बाब क्रमांक 255 अन्वये तरतूद करण्यात आलेल्या निधीचे स्वागत केले असून असे मत व्यक्त केले आहे की, केंद्र आणि राज्य संरक्षणगृह यांची सन 2011-2012 ची देयके अद्याप प्रलंबित आहेत. अनाथ, निराश्रित, परित्यक्ता, विधवा, अनैतिक व्यापारातून सुटलेल्या महिलांसाठी या केंद्रामध्ये आश्रय दिला जात असतो. तसेच, त्यांना वैद्यकीय उपचाराच्या सेवा आणि प्रशिक्षण या केंद्रांच्या माध्यमातून दिले जात असते. या महत्वाच्या संस्थांकडे मागील सरकारने थोडे दुर्लक्ष केले होते, ही वस्तुस्थिती आहे. त्यांना खरोखरच निधी उपलब्ध झाला नव्हता. आता या संस्थांतील महिलांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने या संस्थांसाठी जास्तीत जास्त तरतूद करण्याचा आमचा मानस राहणार असून हे काम आम्ही येणाऱ्या काळात करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बाब क्रमांक 156 वर बोलत असताना मनोधैर्य योजने संदर्भात एक सूचना केली आहे. एखाद्या महिलेवर अत्याचार झाले असतील आणि तशा प्रकारचा गुन्हा पोलिसांकडे दाखल झाला असेल तर त्या पिडीत महिलेला औषधोपचारावरील खर्चासाठी 50 हजार रुपयांपर्यंतची मदत देण्याची तरतूद धोरणात आहे असे

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे ....

सांगितले. एफआयआर नोंद झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून त्या व्यक्तीला 2 ते 3 लक्ष रुपयांपर्यंतची मदत दिली जाते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी रोजगार हमी योजनेच्या दरासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला आहे. रोजगार हमी योजनेचा सध्याचा दर 162 रुपये असून मजुराने मर्यादेपेक्षा जास्त काम केले असेल तर त्याला जास्तीची मजूरी द्यावी, अशा प्रकारची सूचना त्यांनी केली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेअंतर्गत मजुरीचा दर 168 रुपये निर्धारित केलेला आहे. मजुराने एका दिवसात जेवढे काम केले असेल तेवढी मजूरी देता येते. मजुरीच्या दरातील फरक राज्य शासना मार्फत दिला जात असतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी लेखाशीर्ष 2515 बाबत मुद्दा उपस्थित केला असून बीड जिल्हयातील लेखाशीर्ष 2515 अंतर्गत कामे का रद्द करण्यात आलेली आहेत, असा प्रश्न उपस्थित केला आहे. मी या माध्यमातून त्यांना सांगू इच्छिते की, शासनाने केवळ बीड जिल्हयातीलच नाही तर संपूर्ण राज्यातील कामांना स्थगिती दिलेली आहे.

सभापती महोदय, लेखाशीर्ष 2515 अंतर्गत असलेल्या कामांसाठी सन 2008 मध्ये 70 कोटी रुपये वितरित झाले होते. सन 2009 मध्ये 140 कोटी रुपये, सन 2012-2013 मध्ये 144 कोटी रुपये आणि सन 2013-2014 मध्ये ही रक्कम जवळपास 502 कोटी रुपयांपर्यंत गेली होती. निवडणुकीच्या काळात म्हणजे सन 2014-2015 मध्ये आर्थिक तरतुदीचा विचार न करता बेधडकपण 573 कोटी रुपये वितरीत केले होते. हे 573 कोटी रुपये वितरित करीत असताना सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ग्रामपंचायतींना वितरित करण्यात आली आहेत. त्या वेळी आर्थिक तरतूद उपलब्ध नव्हती. आता जी कामे सुरु आहेत, ती शासनाने रोखलेली नाहीत. परंतु ज्या कामांना केवळ प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, अशा कामांना स्थगिती देण्यात आलेली आहे. तसेच ज्या कामांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची प्रोसेस झालेली नाही, अशी कामे पूर्णपणे थांबवली आहेत. या कामांना कोणतीही आर्थिक तरतूद नव्हती तसेच यातील

.....5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे ....

काही कामांमध्ये पारदर्शकता नव्हती, असे आम्हाला आढळून आले आहे. तसेच काही ठिकाणी काहीच निधी दिला नसल्याचेही आम्हाला आढळून आले आहे. मागील वर्षी 102 कोटी रुपये खर्च झाले असतील आणि या वर्षी 573 कोटी रुपये खर्च झाले असतील तर या प्रकरणाची चौकशी केली गेली पाहिजे, असे माझे मत आहे. त्यामुळे हे 502 कोटी रुपये कोठे आणि कसे खर्च झाले, तसेच पैशांचा ग्रामपंचायतींना किती फायदा झाला, याची माहिती प्राप्त करुन घेण्याच्या सूचना मी माझ विभागाला देणार आहे. सदर 502 कोटी रुपये विशिष्ट दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून खर्च झाले आहेत का, हे देखील आम्ही तपासणार आहोत. त्यामुळे केवळ बीड जिल्हयातीलच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील कामांना आम्ही स्थगिती दिली असून निधी वितरण थांबविलेले आहे. बीड जिल्हयामध्ये सन 2011-2012 मध्ये केवळ 1 कोटी रुपये देण्यात आले होते. सन 2012-2013 मध्ये 5 कोटी रुपये देण्यात आले होते. सन 2013-2014 मध्ये 19.72 कोटी रुपये एकटया बीड जिल्हयाला देण्यात आले होते. सन 2014-2015 मध्ये 27.23 कोटी रुपये देण्यात आले होते. बीड जिल्हयातील लोक फास्ट असल्यामुळे त्यांच्याकडे गेलेली सर्व रक्कम त्यांनी वापरलेली आहे. आम्ही केवळ 70 कामांना स्थगिती दिली असून त्याची किंमत 3.94 कोटी रुपये एवढी आहे. आम्ही बीड जिल्हयातील कामे फारशी रोखलेली नाही. आम्ही यासंदर्भात बीड जिल्हयाला 27 कोटी रुपयांची मान्यता दिलेली आहे. उलट महाराष्ट्रातील एकंदर 100 कोटी रुपये वाचवण्याचा प्रयत्न केला असून याबाबतीत पुनर्रविचार करुन निधी वितरित करणार आहोत.

यानंतर श्री. अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे....

ज्या भागांना याचा कधीच लाभ झाला नाही अशा भागांना प्रातिनिधीक स्वरुपात निधी वितरित करणार आहोत.

सभापती महोदय,पंचायत समिती आणि जिल्हापरिषदेच्या जागा त्यांच्या नावावर नाहीत असा येथे उल्लेख करण्यात आला. ज्या जागेच्या संदर्भात 7/12मध्ये फेरफार करण्याची गरज आहे तेथे तो करण्यात येईल. पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागांवर कुंपण घालून त्या सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने विचार करण्यात येईल. इतकी वर्षे हा विचार झाला नाही परंतु आम्ही हा विचार लगेच अमलात आणणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केले त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. माझ्या विभागाच्या सर्व मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

ग्राम विकास विभागाची बाब क्रमांक 162 ते 165, 168 ते 170- योजनेतर खर्चासाठी रुपये 221 कोटी 87 लक्ष 52 हजार आणि योजनेंतर्गत खर्चासाठी 272 कोटी 73 लक्ष रुपये अशी एकूण रुपये 494 कोटी 60 लक्ष 52 हजार इतक्या रकमेच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, जलसंधारण विभागाच्या 278 लक्ष रुपयांच्या तसेच महिला व बाल कल्याण विभाग- बाब क्रमांक 254 ते 258 खालील योजनंतर्गत खर्चासाठी रुपये 20 कोटी 10 लक्ष 80 हजार आणि योजनेतर खर्चासाठी रुपये 3 कोटी 4 लक्ष 84 हजार अशी एकूण रुपये 23 कोटी 15 लक्ष 64 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. वरील दोन्ही विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

सभापती महोदय, रोजगार हमी योजना विभागाची रुपये 232 कोटी 91 लक्ष 70 हजार रुपयांची पुरवणी मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी मी विनंती करते. एकूण चार विभागाच्या रुपये 753 कोटी 45 लक्ष 86 हजार इतक्या रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्री ) : सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची मागणी क्रमांक वाय-2 बाब क्रमांक 259 ते 263 या पाच बाबींवर एकूण रूपये 881 कोटी 61 लाख 10 हजार इतक्या रकमेची मागणी केलेली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विष्णू सवरा ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, आदिवासी विभागावर तीन सन्माननीय सदस्यांनी काही सूचना आणि प्रश्न मांडले आहेत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वन हक्क कायद्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता त्याचे उत्तर माननीय वने मंत्री महोदयांनी दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. अपण वनबंधू कल्याण योजनेसाठी 1 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून 10 कोटी रुपये मिळणार आहेत. हा खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणावयाचा होता म्हणून आपण एक लक्ष रुपयांची लाक्षणिक मागणी सादर केलेली आहे. हा निधी मिळाल्यानंतर तो खर्च करण्यात येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी खावटी कर्जा संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. सन 2013-2014 या आर्थिक वर्षाकरिता 23 कोटी 25 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. खावटी कर्जासाठी एकूण 77 हजार 486 लाभार्थी होते. या सर्व लाभार्थ्यांना खावटी कर्जाचा लाभ देण्यात आलेला आहे. आपण दरवर्षी ही योजना राबवित असतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे या ठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे त्यांना लेखी स्वरुपात उत्तर पाठविण्यात येईल.

सभापती महोदय, आदिवासी विभागाची बाब क्रमांक 214 ते 224 या बाबींवर रुपये 425.64 कोटी इतक्या रकमेची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

-------

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (गृह,(शहरे),नगर विकास, सामान्य प्रशासन, विधी व न्याय विभाग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 1 ते 11 व 12 एकूण रक्कम रुपये 414 कोटी 6 लाख 38 हजार, गृह विभाग (शहर) बी-1, 4 5 व 7,13 ते 20, 23 व 24 ते 29 रुपये 123 कोटी 78 लाख 15 हजार, बंदरे विभाग- बी-7, 30, 10 कोटी रुपये, नगर विकास विभाग 98 ते 102, रुपये 225 कोटी 10 लाख 50 हजार, विधि व न्याय विभाग 147 ते 156 रुपये 365 कोटी 26 लाख 65 हजार, खार जमीन -आय-5, बाब क्रमांक 143, रुपये 1 हजार इतक्या रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते व्यक्त करुन काही मौलिक सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी सायबर क्राईम संबंधी एक्स्पोन्शियल राईज बाबत अतिशय मौलिक सूचना केलेली आहे. आम्ही त्या संदर्भात आधीच काळजी घेतलेली आहे आणि आपणास आगामी काळात त्याची अंमलबजावणी झालेली दिसेल.

सभापती महोदय, गृह विभागावर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे आणि अमरसिंह पंडित यांनी काही सूचना केलेल्या आहेत त्याबाबत साकल्याने विचार करण्यात येईल. त्यांनी सांगितले की, पोलिसांची कॅज्युअल्टी होते आणि त्यांच्या कुटुंबीयांना घरे खाली करण्यास सांगण्यात येते. त्याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल. त्यांनी एफआयआर बाबत देखील मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, इन्व्हेस्टीगेशन ऑफीसरचे सेन्सेटायझेशन होणे गरजेचे आहे. त्यांना कायद्याचे ज्ञान असण्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले जाईल. तसेच या पुढील काळात एका प्रॉसीक्युटवर अवलंबून न राहता त्यांचे पॅनेल कसे तयार करता येईल याचा देखील आम्ही विचार करीत आहेत. आपला कन्व्हीक्शन रेट कसा वाढेल या बाबीचा देखील विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, गृह, नगर विकास, सामान्य प्रशासन, विधी व न्याय, बंदरे, खार जमीन या विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण),पणन, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, गृह विभाग (ग्रामीण), सार्वजनिक आरोग्य विभाग व पणन विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सुरुवातीलाच सभागृहाला विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 13 ते 20, 23 ते 29 अशा एकूण 15 बाबी आहेत. या बाबींची एकूण मागणी रुपये 113 कोटी 78 लाख 15 इतकी आहे.

सभापती महोदय, पणन विभागाची बाब क्रमांक 227- योजनेतर योजनेसाठी रुपये 33 लाख 33 हजार आणि 228 योजनांतर्गत योजनेसाठी रुपये 14 कोटी 62 लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग बाब क्रमांक 205 ते 213 अशा एकूण 9 बाबी आहेत. सदर बाबींवरील एकूण रुपये 622 कोटी 73 लाख 9 हजार इतकी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

सभापती महोदय, गृह विभाग, पणन विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

-----

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे (जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 133 ते 146 च्या एकूण 121 कोटी 73 लाख 8 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो. तसेच सन 2014-15 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र एल-ग्रामविकास व जलसंधारण विभागापैकी जलसंधारण विभागाची मागणी क्रमांक-एल-3 अंतर्गत बाब क्रमांक 166 मधील राज्य योजने अंतर्गत मधील तरतूद 9 लाख रुपये आणि बाब क्रमांक 167 अंतर्गत केंद्र पुरस्कृत तरतूद 2 कोटी 69 लाख, अशा एकूण 2 कोटी 78 लाख रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी पुनश्च विनंती करतो.

महोदय, या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी एक मुद्दा उपस्थित केला होता. परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी त्या मुद्याचे उत्तर देत नाही.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी केकत पांग्री साठवण तलावाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. या साठवण तालावाला 2003-04 मध्ये मंजुरी देण्यात आली होती. 133 हेक्टर सिंचन क्षेत्र असलेल्या या प्रकल्पाची किंमत 212 लाख रुपये होती. परंतु भूसंपादनाच्या बाबतीत डीएसआरच्या दरामध्ये वाढ झाल्यामुळे या प्रकल्पाच्या किंमतीत दुपटीने वाढ झाली. त्यामुळे या प्रकल्पाला नव्याने प्रशासकीय मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करावा लागला. वित्त विभागाने या प्रकल्पाच्या किंमतीत कशामुळे वाढ झाली हे वाल्मी किंवा मेरी या संस्थांना कळविण्यास सांगितले. वास्तविक पाहता तांत्रिक मुद्यामध्ये ही बाब अडकली होती. महामंडळाने या संदर्भातील संपूर्ण त्रुटींची पूर्तता केली आहे. त्यामुळे निश्चितपणे पुढील काळात हा प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

मी पुन्हा एकदा विनंती करतो की, माझ्या दोन्ही विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दादाजी भुसे (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सहकार विभागाच्या बाब क्रमांक 225 योजनेतर बाबीसाठी 2 कोटी 8 लाख 22 हजार रुपये एवढ्या रकमेची पुरवणी मागणी सभागृहाने मंजूर करावी, अशी विनंती करतो.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी सहकार विभागातील निवडणुका पारदर्शक पध्दतीने झाल्या पाहिजेत अशा प्रकारची सूचना केली आहे. सहकार कायद्यानुसार जी नवीन तरतूद करण्यात आली आहे त्यानुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येतात. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी निश्चिंत राहावे. महाराष्ट्रातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका पारदर्शक पध्दतीने घेतल्या जातील.

मी पुन्हा एकदा विनंती करतो की, सभागृहाने सहकार विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सभागृहाला विनंती करतो की, सभागृहाने सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभागाची मागणी क्रमांक एन-3, अंतर्गत बाब क्रमांक 174 ते 188 मधील एकूण 15 पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून योजनेतर 540 कोटी 70 लाख 54 हजार रुपयांच्या आणि योजनेंतर्गत 26 कोटी 63 लाख रुपयांच्या, अशा एकूण 567 कोटी 33 लाख 54 हजार रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, शासन किती गतिशील आहे याचे एक उदाहरण मी सांगतो. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी गुणवत्ता आधारित शिष्यवृत्ती अद्यापपर्यंत देण्यात आली नाही असा मुद्दा उपस्थित केला होता. याचे कारण असे होते की, सीआरसी कोड बदलल्यामुळे पुनर्नियोजन करण्यास वेळ लागला. पण आजच म्हणजे 16 डिसेंबर, 2014 रोजी त्यास मंजुरी मिळाली असून त्या बाबतचे पत्र शनिवार, दिनांक 20 डिसेंबर, 2014 पर्यंत मिळणे अपेक्षित आहे. त्यानंतर तत्काळ शिष्यवृत्ती देण्यात येईल. यावरुन सरकार किती गतिशील आहे हे दिसून येते.

महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सभागृहाला सादर केलेल्या बाब क्रमांक 231 ते 253 साठी एकूण 31 कोटी 94 लाख 69 हजार रुपयांची पुरवणी मागणी सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आलेली आहे. सभागृहाने या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी 2 हजार कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. या रकमेतून शेतकऱ्यांना हेक्टरी किती मदत मिळेल या बाबतचे उत्तर माननीय मंत्र्यांच्या भाषणातून मिळालेले नाही.

महोदय, मी दुसरा विषय वित्त व नियोजन विभागाशी संबंधित उपस्थित केला होता. वित्त व नियोजन मंत्री सभागृहात आहेत. ते सभागृहात आणि सभागृहाबाहेर वारंवार मागणी करीत होते की, आमदार निधीमध्ये वाढ करावयास पाहिजे. आमदार निधीसाठी 144 कोटी रुपयांची तरतूद ठेवली आहे. परंतु ती तरतूद आमदार निधीच्या वाढीव रकमेबाबतची नाही. मी मागणी केली होती की, स्थानिक स्वराज्य संस्था निधीच्या बाबतीत ही रक्कम दोन कोटी रुपयांच्या ऐवजी तीन-चार कोटी रुपये करावी.

माननीय उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांनी आताच सांगितले की, हे सरकार गतिशील आहे. वास्तविक पाहता या सरकारचे हे पहिलेच हिवाळी अधिवेशन आहे. पहिल्या अधिवेशनात आमच्या आपल्या सर्वांना शुभेच्छा आहेत, या बाबत दुमत नाही. परंतु हा जोर आणि दम कायम राहावा यासाठी आमच्या शुभेच्छा आहेत. हा जोर आणि दम कायम राहताना सरकारने लोकाभिमुख असावे आणि लोकाभिमुख राहावे या बाबत त्यांना शुभेच्छा आहेत. सन्माननीय मंत्री श्री.रावते साहेब, मी आशीर्वाद देत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, माननीय ग्राम विकास मंत्री महोदया सभागृहातून निघून गेलेल्या आहेत. मी सांगितले होते की, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची जागा त्यांच्या मालकीची नाही. त्या जागेला कम्पाउंड वॉल करण्याबाबतची माझी मागणी नव्हती. रेकॉर्डवर चुकीचे राहता कामा नये म्हणून मी हे सांगत आहे. ती जागाच त्यांच्या ताब्यात नाही, त्या जागेची 7/12 वर नोंद नाही हा माझा मुद्दा होता.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी उत्तर देताना असे सांगितले की, ती जागा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या रेकॉर्डवर आणली जाईल. तसेच त्या जमिनीचे प्रोटेक्शन करण्यासाठी तेथे फेन्सिंग करण्यात येईल.

..6..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, मी 2515 लेखाशीर्षाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. परंतु माननीय मंत्र्यांनी अशी हरकत घेतली की, बीड जिल्ह्याला मूळ निधी जास्त स्वरुपात मिळाला. मूळ विषय असा आहे की, लेखाशीर्ष 2515 अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांना स्थगिती दिली आहे. माननीय मंत्र्यांनी असे सांगितले की, 2515 लेखाशीर्षांतर्गत जी कामे 50 टक्के पूर्ण झाली आहेत किंवा ज्या कामांना सुरुवात झाली आहे त्यांच्यासाठी स्थगिती लागू नाही. परंतु अशा प्रकारचे स्पेसिफिक आदेश दिलेले नाहीत. सरसकट सर्व कामांना स्थगिती दिलेली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, या ठिकाणी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागेचा प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी तासभर तरी लागेल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडा संयम राखावा. ग्रामपंचायतीच्या अनेक जागा असून त्या जागांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण वाढत आहे. प्रामुख्याने शहरी भागाजवळ ज्या ग्रामपंचायती आहेत त्यांचे 8-अ लावून त्या जमिनीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात. प्रत्यक्षात ती जागा अशा प्रकारे विकण्याचे अधिकार नाहीत. ती जमीन अगोदर महसूल विभागाकडे वर्ग केली पाहिजे, त्या जमिनीची 7/12 वर नोंद केली पाहिजे. त्यानंतरच त्या जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार झाले पाहिजेत. परंतु बऱ्याच ग्रामपंचायती भोगवटादार सदरी संबंधित व्यक्तींचे नाव लिहितात. भोगवटादार सदरी व्यक्ती त्या ठिकाणी बांधकाम करतात. या संदर्भात शासनाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, ग्रामपंचायतीला अशा स्वरुपाची भोगवटादार सदरी सुध्दा नोंद करता येणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

अशा स्वरूपाची नोंद करण्यात आली तर संबंधित ग्रामपंचायतच बरखास्त करण्यात येईल, सरपंचाविरूध्द कारवाई करण्यात येईल. त्यामुळे अशा स्वरूपाच्या जागा आता हस्तांतरण करण्यास मनाई केली आहे. दुसरे असे की, ज्या जागा हस्तांतरित झाल्या आहेत किंवा ज्या 8(अ) च्या भोगवटादार सदरी आहेत किंवा त्यापूर्वीच्या आहेत, त्या जागा अतिक्रमणगृहीत धरून नियमानुकूल करण्याच्या संदर्भातील अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. बऱ्याच वर्षापूर्वी भोगवटादार सदरी असेल तर आणि त्यावर बांधकाम केले असेल तर त्याला दंड वगैरे, जे नियमात असेल ते, करण्याच्या संदर्भात सांगितले आहे. असे जर वर्षानुवर्षे त्या ग्रामपंचायतीच्या जागेवर असेल, भोगवटादार सदरी असेल, मालकी ग्रामपंचायतीची असेल आणि त्याला आवश्यकता असेल, नियमात बसत असेल तर अशा जागांना नियमानुकूल करण्याच्या संदर्भातील अधिकार प्रांतांना दिले आहेत आणि जिल्हाधिकाऱ्यांची संमती त्यास आवश्यक आहे, अशी सूचना केली आहे. अजूनही या संदर्भात नवीन कायदे करण्याची गरज आहे. ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात जेवढ्या मालमत्ता आहेत त्यावर अशा स्वरूपांचे अतिक्रमण झाले आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आता भाषण पूर्ण करावे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर इतकी चर्चा होत आहे, ही पध्दत योग्य नाही. पुरवणी मागण्या संध्याकाळी 6 वाजता सुरू झाल्या. आतापर्यंत पुरवणी मागण्यांवर 6 तास चर्चा झाली आहे. पुरवणी मागण्यांवर इतकी चर्चा तर बजेट सादर झाल्यानंतर किती चर्चा होईल ? सभापती महोदय, आपल्या प्रकृतीकडे पाहून आम्ही काळजी करतो. आम्ही सकाळपर्यंत भाषणे करू, आम्हाला तुमची चिंता आहे.

श्री. अमरसिंह पंडित (बसून) : सभापती महोदय, 'वा'.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय सदस्य 'वा' म्हणतात. त्यांना आपल्या प्रकृतीची काळजी नाही का ?

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आम्हाला 100 टक्के काळजी आहे. आम्ही दुजोरा दिला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मग 'वा' म्हणण्याचे कारण काय आहे ? सन्माननीय सदस्यांनी टिंगल करण्याच्या शब्दामध्ये तुमचीच टिंगल केली आहे. हे बरोबर नाही. अशाप्रकारे 'वा' म्हणणे बरोबर आहे का ? आम्ही काळजी घेत आहोत. सन्माननीय सदस्य खाली बसून बोलत आहेत. सन्माननीय सदस्यांनी दुजोरा दिल्याबद्दल अभिनंदन. विधानपरिषद सन 1935 ला स्थापन झाली. विधानपरिषदेच्या इतिहासात असे कधी झाले नाही की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा संध्याकाळी 6 वाजता सुरू झाली आणि रात्री 12.20 वाजता संपली. आज आपण उच्चांक निर्माण केला आहे. सभागृहातील सर्व अभ्यासू सन्माननीय सदस्य चांगल्यारितीने बोलले, चांगल्या सूचना केल्या. साडे सहा तास पुरवणी मागण्यांवर चर्चा केली, त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानतो. परंतु, आपण असे करू नये, अशी विनंती आहे. आपण नियमानुसार जरूर बोलावे.

श्री. रवींद्र वायकर : सभापती महोदय, सन 2014-15 या वर्षाच्या शालेय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात याव्यात, ही विनंती आहे.

**सभापती** : सन 2014-15 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : संविधान (एकशे एकविसावी सुधारणा ) विधेयक

**RESOLUTION UNDER ARTICLE 368 OF THE CONSTITUTION OF INDIA FOR RATIFICATION OF THE CONSTITUTION ( ONE HUNDRED AND TWENTY-FIRST AMENDMENT) BILL BY HON. MINISTER OF STATE FOR GENERAL ADMINISTRATION**

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील ठराव मांडतो. :-

"संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केल्याप्रमाणे संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयक, 2104 द्वारे प्रस्तावित करण्यात यावयाच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 368 च्या खंड (2) मधील परंतुकाच्या खंड (ख) च्या कक्षेत येणाऱ्या सुधारणांचे हे सभागृह अनुसमर्थन करीत आहे."

ठराव प्रस्तुत झाला.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 156(3) खाली आपण ही चर्चा करीत आहोत. अनुच्छेद 368(2)(क) खाली महत्त्वाची कॉन्स्टिट्यूशनल अमेंडमेंट होते, त्यावेळी रॅटिफिकेशन 50 टक्के राज्यांनी तरी करणे आवश्यक असते. एवढ्या महत्त्वपूर्ण कॉन्स्टिट्यूशनल अमेंडमेंटवर शभंर टक्के चर्चा केली जाते. आपण महाराष्ट्र विधानपरिषदेचा नियम 156(3) पहा. चर्चा न करून रॅटिफिकेशन केले, असे होईल. त्याचे गांभीर्य काय आहे, ते मी आपल्याला सांगतो. यापूर्वी आयपीसी, सीआरपीसीमध्ये "सुसायड" हा गुन्हा नसला पाहिजे, अशी करेक्शन अमेंडमेंट करण्यात आली होती. त्यावेळी प्रत्येक राज्याकडून रॅटिफिकेशन मागितले होते. महाराष्ट्राने देखील ते दिले. महाराष्ट्राला हे रॅटिफिकेशन कितपत परवडणारे आहे, याचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांकडून राजरोस आत्महत्या होत आहेत. आत्महत्यांचा विषय सर्व राज्यांसारखा आपण मान्य केला तर आपल्याला तो परवडणारा आहे का ? चर्चेविना रॅटिफिकेशन करतो तेव्हा असे निर्णय होतात. त्यामुळे ही 121 वी कॉन्स्टिट्यूशनल अमेंडमेंट

ॲड. राहुल नार्वेकर ....

अत्यंत महत्त्वाची आहे. देशात यातून ज्युडिशिअल ट्रान्सपरन्सी डिसाईड होणार आहे. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, या विषयावर सविस्तर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्य या संदर्भात ठरवतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात विनंती केली पाहिजे होती की, हे रॅटिफिकेश्न बिल उद्या घ्यावे, यावर चर्चा होणे आवश्यक आहे, आम्हाला चर्चा करायची आहे. आपण उद्या चर्चा केली असती. आम्हाला समजले असते की, यामध्ये किती गांभीर्य आहे. आता रात्रीचे साडे बारा वाजले आहेत.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, आपण मला बोलण्यास संधी दिली असती तर मी हे सांगितले असते. माननीय मंत्री, आपण इतर सदस्यांचे ऐकून घ्यावे. जोरात बोलले म्हणजे बोलता ते सत्य नसते. 2 मिनिटे ऐकूण घ्यावे. आपण हे विधेयक पुकारले आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण कृपया खाली बसावे.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, आपण हे विधेयक पुकारले त्यावेळी मी उभा राहिलो होतो आणि या विधेयकावर चर्चा होणे आवश्यक आहे, त्यामुळे हे विधेयक तुम्ही आज घेऊ नका, असे सांगणार होतो. आता या विधेयकावर चर्चा होऊ द्यावी.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे की, यावर चर्चा होणे गरजेचे आहे. तसे बरेचदा होते. परंतु, आपण आतापर्यंत रॅटिफिकेशन बिल सभागृहासमोर आल्यावर त्यावर चर्चा केलेली नाही. चर्चा करण्यास हरकत नाही. सन्माननीय सदस्यांचा आग्रह पूर्वीपासून होता की, हे विधेयक आज घ्यावे, जेणेकरून यावर चर्चा होईल. त्यामुळे आज याचा समावेश करण्यात आला होता. परंतु, आता रात्रीचे साडे बारा वाजले आहेत. या विधेयकावर चर्चा करीत राहिलो तर उशीर होईल. मला वाटते की, हे रॅटिफिकेशन आहे. आपण केंद्र शासनाला पाठवावे, अशी माझी विनंती आहे.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, हे रेकॉर्डवर राहू द्यावे की, या विषयावर आम्ही चर्चा मागितली होती. मात्र सत्तारूढ पक्षाने चर्चा होऊ दिली नाही.

**सभापती** : मी त्यावरील चर्चा नाकारली आहे. ..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, याचा परिणाम शेवटपर्यंत राहणार आहे. ज्युडिशिअल ट्रान्सपरन्सीवर याचा परिणाम होणार आहे.

ठराव मतास टाकून संमत झाला.

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, बुधवार, दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 12 वाजून 20 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 17 डिसेंबर, 2014 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही